म. ग्रं. सं. ठाणें
विषय चरित्र
सं. क्र. १७९२
१८८७
REFBK-0016022



उमाकांत भेंडे

# प-ड-छा-या

( विविध व्यक्तिरेखा )

☆

— लेखक —

उमाकांत भेंडे

साहित्य ग्रंथालय
९६०२२
REFBK-0016022

ईशावास्य प्रकाशन, पुणें ४

प्रकाशक :
अशोक श्रीपाद किंजवडेकर
ईशावास्य प्रकाशन,
आश्वलायन
३१ कर्वे रोड, एरंडवणें,
पुणें ४ – दूरध्वनि – ५५२७८

※ ※ ※

© श्रीमति लताबाई भेंडे

※ ※ ※

प्रथमावृत्ति
मार्गशीर्ष शु. १५, प्लवंगनाम संवत्सर,
दत्तजयंति, शके १८८९
दि. १६ डिसेंबर, १९६७.

किंमत पांच रुपये

※ ※ ※

मुखपृष्ठ व आंतील सजावट
भय्यासाहेब ओंकार.

※ ※ ※

मुद्रक :
दत्तात्रय अनंत इंदलकर,
सरस्वती मुद्रण मंदिर,
११२२ भवानी पेठ,
पुणें २.

# चार शब्द

'पडछाया' या ह्यांच्या पुस्तकासंबंधीं चार शब्द लिहावे असें प्रकाशकांनीं सुचविल्यावरून मी ते चार शब्द लिहीत आहे.

माझ्यापाशीं तसा कोणताहि अधिकार नाहीं ह्याची मला पूर्ण जाणीव आहे. आणि अधिकार असलाच तर तो ह्यांच्या जीवनांत मी त्यांची 'पडछाया' म्हणून गेलीं तीस वर्षें वावरले हा एवढाच. 'ते' बुद्धीनें थोर होते, बहुश्रुत व्यासंगी होते, आध्यात्मिक प्रकृतीचे होते, एक चिंतक होते, तत्त्वज्ञानी होते, साहित्यिक होते. पण मी मात्र ह्यांच्या त्या जीवनांत कोणतीच भूमिका घेऊं शकले नाहीं, ही गोष्ट सत्य आहे. कारण माझ्या अंगीं तशी कोणतीच कुवत नव्हती आणि त्याबद्दल मला खंतहि वाटत नाहीं. कारण सांसारिक व प्रापंचिक जीवनांत ह्यांच्याशीं जी कांहीं वेडीवाकडी भागीदारी केली ती त्यांना पूर्णतया मान्य झाली होती, त्याबद्दल मला धन्यता वाटलेली आहे. त्यांच्या साहित्यिक तत्त्वज्ञानी आध्यात्मिक जीवनाची माझ्यावर सावली पडली त्यांतच मी स्वत:ला भाग्यवान समजते. त्यांचें जीवन अगदीं जवळून पाहिल्यामुळें त्यांच्या अंगच्या थोर गुणांचें जें दर्शन झालें ह्यांत मी तृप्त राहिले, संतुष्टता मानली, आनंद उपभोगिला.

त्यांच्या मागून त्यांच्या सार्वजनिक वा साहित्यिक कार्यासंबंधीं जें स्मारक होईल त्याच्याबद्दल मला आत्मियता वाटणारच आणि म्हणूनच 'पडछाया' या ग्रंथप्रकाशनांत मला त्यांची तीस बत्तीस वर्षांची 'सावली' या नात्यानें अवर्णनीय आनंद लाभत आहे. सामान्य वाचकांस त्या ग्रंथांतून बरेंचसें मनोरंजक उद्बोधक साहित्य वाचावयास मिळेल अशी मला खात्री वाटते.

श्री. श्रीपादशास्त्री किंजवडेकर, श्री. भाऊराव ऊर्फ ग. त्र्यं. माडखोलकर, श्री. किराणे व मिसेस किराणें इत्यादि त्यांच्या स्नेहीमंडळींनीं हें प्रकाशनकार्य करण्याची जबाबदारी घेतल्याबद्दल त्यांचे मी आभार मानते. प्रस्तुत पुस्तकाप्रमाणें त्यांच्या लिखाणाची ग्रंथस्वरूपांत अधिकाधिक चिरस्मारकें निर्माण होवो हीच माझी परमेश्वरचरणीं मनोमन प्रार्थना.

—स्नेहलता भेंडे

# कै. उमाकांत भेंडे यांचें हस्ताक्षर

U. M. BHENDE
Darab House
Bombay-26

ता. ५-८-६५

मान्यवंत पं. मीमांसातीर्थ श्रीपादशास्त्री किंजवडेकर यांस.

सप्रेम नमस्कार. वि. वि. माझी प्रकृति गेल्या आठवड्यांत बिघडल्यामुळें आपले कार्य समाधानपूर्वक करतां आलेले नाहीं. बरा झालो कीं कामाला लागतो व पुण्यास येऊन आपल्याला भेटतो.

आपल्या कार्यास निरपेक्षबुद्धिनें मदत करणें हे संतवाङ्मय प्रेमी माणसाचें कर्तव्य आहे. ते माझ्या मगदुराप्रमाणें मी पार पाडीन.

अनेक संस्था, व्यक्ति आपल्याला मदत करतील अशी खात्री आहे. कार्य इतकें महत्वाचें आहे कीं ईश्वरप्रेषित मदत आपल्या दाराशी येईल.

घरीं सर्वांस नमस्कार. कळावे..

आपला स्नेहांकित,
उमाकांत भेंडे
५-८-

# प्रस्तावना

माझे परमस्नेही श्री. उमाकांत भेंडे यांच्या या लेखसंग्रहाला त्यांच्या निधनानंतर प्रस्तावना लिहिण्याचा प्रसंग मजवर येईल, असें माझ्या कधीं स्वप्नांतहि आलें नव्हतें. 'भटक्याची कमाई' हा त्यांचा पहिला लेखसंग्रह १९४३ सालच्या जुलैमध्यें प्रसिद्ध झाला, त्या वेळीं मींच त्याला प्रस्तावना लिहून श्री. भेंडे यांचा परिचय मराठी वाचकवर्गाला करून दिलेला होता. त्यानंतर गेल्या चोवीस वर्षांत मराठी आणि इंग्रजी नियतकालिकांतून श्री. भेंडे यांनीं निरनिराळ्या विषयांवर विपुल लेखन केलें. तथापि, 'गांवगप्पा' हा त्यांच्या ललित लेखांचा दुसरा संग्रह जरी १९४६ सालीं प्रसिद्ध झाला, तरी गेल्या वीस वर्षांतलें आपलें विविध लिखाण पुस्तकरूपानें प्रकाशित करण्याची कल्पना कांहीं त्यांच्या मनांत आलेली नव्हती. १९६५च्या मेमध्यें, माझा मुक्काम मुंबईस त्यांच्याकडे असतांना, १९६३ च्या जानेवारी-पासून नागपूरच्या 'तरुण भारतां'त प्रसिद्ध झालेलें त्यांचें लिखाण स्वतंत्र पुस्तकरूपानें काढावें, असा विचार आमच्या मनांत आला. तदनुसार माझ्या सूचनेप्रमाणें त्यांनीं आपल्या 'तरुण भारतां'तील लेखांची निवड करून विषयानुरोधानें बनविलेले त्यांचे तीन गट मला दाखविले. पुढे सप्टेंबरच्या शेवटल्या आठवड्यांत, पुणें विद्यापीठातर्फे झालेल्या रविकिरण मंडळाच्या सन्मानसमारंभासाठीं, आम्ही दोघे पुण्यास गेलों असतां, तेथील मुक्कामांत त्यांच्या व्यक्तिविषयक लेखांचा संग्रह प्रथम प्रसिद्ध करण्याचें निश्चित झालें. आमचे दोघांचे मित्र, पुण्याचे विख्यात पंडित आणि ग्रंथकार, मीमांसातीर्थ श्री. श्रीपादशास्त्री किंजवडेकर यांनीं आपल्या ईशावास्य प्रकाशन या संस्थेतर्फे त्याच्या प्रकाशनाची जबाबदारी घेतली. दुर्दैवानें मध्यंतरी, ता. २३ जानेवारी १९६६ रोजीं सायंकाळीं ५॥ वाजतां श्री. भेंडे हे परळ येथील म. फुले विद्यालयांत नेताजी सुभाषचंद्र बोस यांच्या जयंतीनिमित्त भाषण करीत असतां, त्यांना ठसका लागून तिथल्या तिथेंच त्यांच्यावर काळाची झडप पडली. त्यामुळें, त्यांचा हा लेखसंग्रह, त्यांच्या दुसऱ्या श्राद्धदिनाच्या सुमारास, वाचकांना सादर करण्याचें दुःखद कर्तव्य आज आम्हांला करावें लागत आहे.

श्री. भेंडे यांना कोणत्याहि अर्थानें साहित्यिक म्हणतां येणार नाहीं; व त्यांना स्वतःलाहि साहित्यिक म्हटलेलें आवडत नसे. १९२७ सालीं इतिहास आणि अर्थशास्त्र या विषयांत मुंबई विद्यापीठाची बी.ए. ची पदवी घेतल्यावर, प्रथम वर्षभर मुंबईंतील चिकित्सक समूहाच्या शिरोळकर हायस्कूलमध्यें प्रमुख शिक्षक म्हणून आणि नंतर महिला विद्यापीठाच्या महाविद्यालयांत १९३० ते ३४ पर्यंत अध्यापक म्हणून, त्यांनीं काम केलें. १९३४ सालीं त्यांच्या या शिक्षणक्षेत्रांतील बैठ्या जीवनाला अचानक कलाटणी मिळाली. त्या वर्षीं मेसर्स ब्लॅकी अँड सन या विख्यात ब्रिटिश प्रकाशन संस्थेचे प्रवासी शैक्षणिक प्रतिनिधि म्हणून काम करण्याची संधि त्यांना प्राप्त झाली. तेव्हांपासून १९४४ पर्यंत, त्या संस्थेचे प्रतिनिधि म्हणून पेशावरपासून त्रावणकोरपर्यंत, सगळ्या भरतखंडांत प्रवास करण्याचें भाग्य त्यांना लाभलें. मी 'भाग्य' हा शब्द मुद्दामच योजिलेला आहे. कारण, एका संस्कृत सुभाषितांत, "...चिरप्रवासी परान्नभोजी परावसथशायी" यांचें जीवन "यज्जीवति तन्मरणम्" या कोटींतील असल्याचें वर्णन केलेलें असून, इतिहासकाळांत जरी आपण मराठी लोक मुलूखगिरीबद्दल गाजलेले असलों, तरी आजच्या मराठी सुशिक्षित समाजाची वृत्ति मात्र कांहीं प्रवासानुकूल नाहीं. विशेषतः "केल्यानें देशाटन, पंडित मैत्री, सभेंत संचार" या लोकप्रिय आर्येंत चातुर्य संपादन करण्याचें पहिलें साधन म्हणून जरी देशाटनाचा उल्लेख केलेला असला, तरी खुद्द महाराष्ट्र राज्यांतसुद्धां नागपूरहून मुंबईला किंवा मुंबईहून कोल्हापूरला नोकरीनिमित्त बदली होण्याची पाळी आली, तर ती कांहीं आपल्या सुशीक्षितांना रुचत नाहीं, असा अनुभव आहे. पण, श्री. भेंडे यांना प्रवासी–प्रतिनिधि म्हणून सर्व देशभर परिभ्रमण करण्याचा आणि निरनिराळ्या प्रांतांतील शिक्षणसंस्थांप्रमाणेंच लोकजीवनहि पाहण्याचा जो हा सुयोग लाभला, त्यामुळें त्यांची दृष्टि, अभिरुचि आणि मनोवृत्ति यांचा विलक्षण विकास झाला. त्या विकासांतूनच गेल्या तीस वर्षांतील त्यांचें सर्व लिखाण बाहेर पडलेलें आहे. 'भटक्याची कमाई' आणि 'गांवगप्पा' हीं जीं त्यांचीं दोन पुस्तकें तीन वर्षांच्या अंतरानें वीस वर्षांपूर्वी प्रसिद्ध झालीं, तीं त्यांच्या या विकासाचीं निदर्शक आहेत.

श्री. भेंडे यांना साहित्यिक म्हटलेलें जरी रुचत नसे, तरी त्यांचा साहित्य-

६२०८९० वाचन २१३१

क्षेत्रांत प्रवेश मात्र १९३३ सालींच झाला, आणि तोहि त्या काळांत लोकप्रिय असलेल्या 'यशवंत' मासिकाचे कांहीं काळ संपादक म्हणून ! त्याचप्रमाणें १९३९ सालीं 'रुरल इंडिया' या इंग्रजी मासिकाचें संपादनहि त्यांच्याकडे आलें. १९४२ पर्यंत ते त्याचें काम पाहात होते. अध्यापन आणि संपादन हे दोन व्यवसाय अशा रीतीनें करीत असतांनाच, निरनिराळ्या मराठी आणि इंग्रजी नियतकालिकांतून, विविध विषयांवर लेख लिहिण्याचा त्यांचा क्रमहि चालू होता. लघुनिबंध आणि गोष्टी यांच्यापासून तो भूगोल आणि महायुद्ध यांच्यापर्यंत नाना प्रकारच्या विषयांवर १९३३ पासून १९४४ पर्यंत सुमारें दहा वर्षे त्यांची लेखणी सतत चालत होती. १९४४ सालीं पद्म प्रकाशनाचे व्यवस्थापक म्हणून जी जबाबदारी त्यांनीं पतकरली, तिच्यामुळें त्यांच्या लेखनांत कांहीं काळ खंड पडला; व या जबाबदारींतून उद्‌भवलेल्या आर्थिक गंडांतरामुळें जी साडेसाती त्यांना भोगावी लागली, त्या आपत्तीच्या दिवसांत तर १९४९ पासून १९५६ सालपर्यंत आध्यात्मिक ग्रंथांचें वाचन आणि मनन हा त्यांचा एकमेव विरंगुळा होऊन बसला. मात्र या आपत्प्रसंगांत, राजापूरचे विख्यात सत्पुरुष श्रीकाकामहाराज पुराणिक यांना अनन्यभावानें शरण जाऊन, जी अध्यात्मविद्येची उपासना त्यांनीं केली, तिच्यामुळें त्यांच्या जीवनदृष्टीला जशी स्थिरता आणि व्यापकता आली, तशीच त्यांच्या व्यासंगाला आणि निरीक्षणालाहि एक प्रकारची प्रौढता आणि पक्वता येऊन गेली. 'भटक्याची कमाई' आणि 'गांवगप्पा' या त्यांच्या तत्पूर्वी प्रसिद्ध झालेल्या पुस्तकांत जो अवखळपणा दृष्टीस पडतो, तो कांहीं नंतरच्या लिखाणांत दिसून येत नाहीं. उलट, या आपत्तीच्या दिवसांत जीवनाकडे उपभोगापेक्षां अनुभवाच्या, रसिकतेपेक्षां अनुकंपेच्या, चिकित्सकतेपेक्षां सहृदयतेच्या आणि निरीक्षणापेक्षां चिंतनाच्या दृष्टीनें पाहण्याची जी वृत्ति त्यांच्या ठिकाणीं उत्पन्न झाली, त्यामुळे त्यांचें गेल्या सात आठ वर्षांतील लिखाण हें सात्त्विक, प्रांजळ आणि गुणग्राहक झालें असल्याचा प्रत्यय येतो. प्रस्तुत पुस्तकांतील निरनिराळ्या व्यक्तींवरील लेखांत दोष दाखविण्याच्या बाबतींतसुद्धां जो हळुवारपणा आढळून येतो, तो याच परिवर्तनामुळें. किंबहुना, ता. १३ जानेवारी १९६३ च्या 'तरुण भारता'च्या रविवारच्या साप्ताहिक अंकांत 'धन' ही जी त्यांची हृदयंगम कथा प्रसिद्ध झाली, तिचें,

"धन रमण महर्षींत अंतर्धान पावली—रमणमय झाली...देवमय झाली," हें करुण पर्यवसान या परिवर्तनाचें निदर्शक म्हणून सांगतां येईल.

श्री. भेंडे यांना वाचन आणि प्रवास यांचें जणुं व्यसनच होतें. त्या व्यसनाला वेळ किंवा पैसा यांची मर्यादा नव्हती. ते मला नेहमीं म्हणावयाचे, "भाऊराव, जेवण, वाचन आणि प्रवास हीं माझीं तीन व्यसनें आहेत. वाटल्यास वेडे म्हणा! भेळपुरीपासून पुलावापर्यंत कोणताहि पदार्थ खातांना मला जितका आनंद होतो, तितकाच आनंद एखाद्या रहस्यकथेपासून तो ज्ञानेश्वरीसारख्या ग्रंथराजापर्यंत कोणतेंहि पुस्तक वाचतांना मला होतो. प्रवासांतहि असेच! लोकांना गोव्याला किंवा काश्मीरला जाणें म्हणजे मोठी अपूर्वाई वाटते. पण, मला मात्र उरणपासून न्यूयॉर्कपर्यंत कुठेंहि जाण्याची संधि आली, तरी सारखाच आनंद वाटतो. स्वतःला 'भोजनभाऊ' आणि 'भटक्या' म्हणवून घेण्यांत मला धन्यता वाटते. वाचनाचें वेड हें कोणालाहि भूषण वाटेल. पण, मला नाना प्रकारचीं पुस्तकें गोडीनें वाचण्याइतकेंच नाना प्रकारचे नवे प्रदेश हौसेनें पाहणें आणि त्या प्रदेशांतील नाना प्रकारच्या खाद्यपेयांचा रुचीनें आस्वाद घेणें हेंहि भूषणास्पद वाटतें. त्यामुळें मनाला आणि जीवनाला सर्वच दृष्टींनीं विशालता येते, असें मी मानतों. म्हणून जेवणाचें, प्रवासाचें, नाटकाचें किंवा गाण्याच्या मैफलीचें निमंत्रण कशाहि स्वरूपाचें असलें आणि कुणीहि दिलेलें असलें, तरी मी तें नाकारीत नाहीं." या त्यांच्या उद्‌गारांवरून जीवनाकडे पाहण्याची, त्याचा उपभोग घेण्याची आणि उपयोग करण्याची त्यांची कल्पना किती मुलखावेगळी होती, हें कळून येईल. जीवन हें जितकें उपभोगासाठीं आहे, तितकेंच तें उपयोगासाठींहि आहे अशी त्यांची धारणा होती. त्यामुळें, नाना परीचे उपभोग घेण्यासाठीं ते जसे सदैव उत्सुक आणि उद्युक्त असत, तसेच आपल्या परीनें लोकांच्या उपयोगी पडण्यासाठींहि ते सारखे झटत आणि झिजत असत. त्यांच्या या मनोवृत्तीची यथार्थ कल्पना येण्यासाठीं 'भटक्याची कमाई' या पुस्तकांतील निवडक विधानें पुढें देत आहे—

"सृष्टिसौंदर्य, मानवी सौंदर्य आणि अद्‌भुतता हे माझे सदाचे सोबती आहेत. त्यांची माझी फारकत करा—माझ्या जीवनांतील आनंद, जिवंतपणा व उत्साह नाहींसा होईल."

" लोक मला 'भोजनभाऊ भेंडे' म्हणतात. लोकांनीं ही पदवी मला बहाल करून जो माझ्यावर अनुग्रह केला आहे, त्याबद्दल मला फार आनंद वाटतो. रुचकर आणि स्वादिष्ट पदार्थांचा आस्वाद मनःपूर्वक घेतां येणं हा मी एक सद्‌गुण समजतों. हा सद्‌गुण माझ्यामध्ये प्रकर्षानं आहे, याबद्दल मला नेहमींच अभिमान वाटतो."

" माझी पूर्वीं अशी समजूत होती कीं, मोठ्या लोकांतच अद्वितीयत्व असतं. पण समाजांत अशींहि कित्येक छोटीं माणसं असतात कीं, त्यांच्या-मध्यें असाधारण अद्वितीयत्व दिसून येतं. मोठेपणा हा जन्मतःच माणसांत असतो. ती एक दैवी देणगी होय. मोठ्या माणसांच्या पावलावर पाऊल टाकून कांहीं मी मोठा होत नाहीं. म्हणूनच मी ठरवून टाकलंय कीं, छोट्यांचं अनुकरण करायचं. कारण, त्यामुळं माझं नांव इतिहासजमा झालं नाही, तरी मी चारित्र्यवान् बनेन. आणि मला वाटतं, जगांत माणसाचं श्रेष्ठत्व त्याच्या उज्ज्वल चारित्र्यावरच अवलंबून आहे."

" दुःखाची छटा मला वाटतं, घरोघर पसरलेली आहे. जगांत असं एखादं तरी कुटुंब सांपडेल कां, कीं ज्याच्या घरावर दुःखाची सावली कधींच पडली नसेल ? ......असा एक दिवस येईल कां कीं, ज्या वेळीं घरोघरचीं दुःखं या विषयाऐवजीं घरोघरचीं सुखं या विषयावर लेख लिहितां येईल ? '

ललित लेखनाच्या ऊर्मींत केलेल्या या विधानांवरून श्री. भेंडे यांचें व्यक्तित्व, विचार आणि वर्तन यांचा उलगडा होऊन जाईल. त्यांच्या आयु-ष्यांत जीं आर्थिक गंडांतरें त्यांच्यावर ओढवलीं, किंवा जे प्रवाद—अपवाद त्यांच्यासंबंधीं अगदीं शेवटपर्यंत कानांवर येत असत, त्याला कारण त्यांची ही लोकविलक्षण जीवनदृष्टि. 'एकेकाचा स्वभाव' या लघुनिबंधांत त्यांनीं एका परप्रांतीयाचे म्हणून महाराष्ट्रीयांविषयीचे असे उद्‌गार उद्‌धृत केलेले आहेत कीं—

" आगगाडींतून जातांना जेव्हा मला डोंगराचे सुळे—त्यांवर झाड नाहीं, पाड नाहीं, हिरवेपणा नाहीं—वरवर आकाशांत गेलेले दिसतात, तेव्हां मला महाराष्ट्रीयांची आठवण होते. ते सुळके जसे ऊन—पाऊस झंझावाताला तोंड देऊन टिकतात, तसेंच तुम्ही महाराष्ट्रीय आयुष्यांतील ऊन—पाऊस झंझावात

यांना तोंड देऊन मोठ्या प्रामाणिकपणें दिसत काढता. पण मजा नाहीं तुमच्या आयुष्यांत. रंग नाहीं तुमच्या जीवनांत. मिठ्ठासपणा नाहीं तुमच्या बोलींत. ओलावा नाहीं तुमच्या हृदयांत. सारं रखरखीत जीवन तुमचं."

पण श्री. भेंडे हे या वर्णनाला अपवाद होते. ते स्वतः हाडाचे महाराष्ट्रीय आणि महाराष्ट्राभिमानी असूनहि त्यांचा सगळा व्यवहार आणि वागणूक ही मात्र सर्वसामान्य महाराष्ट्रीयाहून अगदीं भिन्न होती. ते जसे बहुभाषी आणि बहुश्रुत होते, तसेंच त्यांचें व्यक्तित्वहि बहुसंध आणि बहुढंगी होतें. त्यांचा मित्रपरिवार, त्यांचा पुस्तकसंग्रह आणि त्यांच्या जेवणाच्या टेबलावरील खाद्यसंभार हीं त्यांच्या स्वभावाचीं वैशिष्टचें, अभिरुचीचें वैचित्र्य आणि जीवनाचा व्याप यांचें निदर्शक होतें. त्यांच्या घरच्या जेवणांत जितकी विविधता असे, तितकीच त्यांच्या बैठकींतल्या गप्पांतहि! मराठी, गुजराती, हिंदी, इंग्रजी इत्यादि निरनिराळ्या भाषांत मिठ्ठास बोलणारा त्यांच्याइतका संभाषणचतुर माणूस मी तरी दुसरा पाहिला नाहीं.

श्री. भेंडे यांच्या या वैचित्र्यपूर्ण संसाराची त्यांच्या पत्नी श्री. स्नेहलताबाई या शोभा आणि शुचिता होत्या. त्या दोघांच्या वयांत, आजच्या मानानें बरेंच म्हणजे पंधरा वर्षांचें अंतर होतें. लग्न झाल्यनंतर लगेच श्री. भेंडे त्यांच्यासह नागपुरास आमच्याकडे राहावयाला आले. तेव्हां त्या पतिपत्नींतील वयापासून तों व्यासंगापर्यंत सगळ्या बाबतींतलें अंतर पाहून आम्हांला नवल वाटल्याविना राहिलें नाहीं. पण श्री. लताबाईनीं हें अंतर भेंडे यांच्या संयुक्त कुटुंबांत धाकट्या सूनबाई म्हणून नांदत असतांनाच आपल्या समंजसपणानें थोड्याच दिवसांत कमीकमी करीत आणलें व उमाकांतांचे ज्येष्ठ बंधू श्री. केशरीनाथ यांच्या निधनानंतर जेव्हां त्यांच्याकडे कुटुंबाची वडीलकी आली तेव्हां आपल्या पतीच्या या जबाबदारींत तत्परतेनें सहभागी होऊन लताबाईंनीं त्यांचा संसार यशस्वी करून दाखविला. श्री. भेंडें यांचें घराणें हें मुंबईत 'नवघरे' म्हणून गाजलेल्या सारस्वत ब्राह्मणांच्या सुप्रतिष्ठित परंपरेंतलें. चिराबाजारमागील कॅव्हेल स्ट्रीटवर आपल्या पिढीजात दुमजली जुन्या घरांत जेव्हां त्यांचें संयुक्त कुटुंब राहात होतें, तेव्हांपासून त्यांच्या हौशी रहाणीचा थाट मी पाहात आलेलों होतों. कॅव्हेल स्ट्रीटवरील तें घर विकून खंबाला हिलच्या पायथ्याशीं

फॉर्जेट स्ट्रीटवरील दाराब हाऊसमध्यें राहावयाला आल्यावर त्यांच्या रहाणीला आधुनिकतेची ऐट आली. श्री. लताबाई या बडोद्याच्या पागेदार घराण्यांतल्या. त्या घराण्याच्या सरदारी वळणांतले जेवढे म्हणून गुणांश होते, तेवढे घेऊन त्या भेंडे यांच्या मुंबईकर घराण्यांत आलेल्या होत्या. त्यांची दर्शनीयता आणि शालीनता, सौजन्य आणि संयम, अगत्य आणि आतिथ्य, सुग्रणपणा आणि सोशिकपणा या गुणांत अधिक वाखाणणी कोणत्या गुणाची करावी, हे सांगणें कठीण जाईल. उमाकांतांचा कारभार एकंदरीत बेहिशेबी. ब्लॅकी अँड सनमध्यें असतांना काय, पद्म प्रकाशनांत असतांना काय किंवा पुढें स्वतंत्र व्यवसाय करीत असतांना काय त्यांच्या रहाणीचें खर्चिक मान सारखें वाढतच गेलें. १९४९ सालीं आलेल्या आर्थिक गंडांतरांतून हिमतीनें डोकें वर काढल्यानंतर त्या राहणींत फरक न पडतां उलट ती अधिकच डौलदार होत गेली. दिवसभर नाना प्रकारचे लोक घरीं येत असावयाचे व त्यांचा दर्जा आणि काम लक्षांत घेऊन त्यांची सरबराई होत राहावयाची. आपल्या वातानुकूल खोलींत बसलेले उमाकांत केव्हां घंटी वाजवतील आणि कोणतीं खाद्यपेये आणण्याचा हुकूम फर्मावतील, याचा कांहीं नेम नसे. शिवाय दर आठवड्याला एखादी तरी पार्टी किंवा मेजवानी ही झडावयाचीच. केव्हां घरीं, केव्हा मलबार हिलवरील वेस्टर्न क्लबांत, तर केव्हां ताजमहल हॉटेलांतील सी–लौंजमध्यें. या त्यांच्या सगळ्या धबडग्याला श्री. लताबाई या न कंटाळतां आणि न कातावतां पुऱ्या पडल्या ही त्यांची केवढी थोरवी ! उमाकांतांनीं पूर्वायुष्यांत ‘ लते ’ म्हणून आणि उत्तरायुष्यांत ‘ ममी ’ म्हणून हांक मारल्याबरोबर हंसतमुखानें आल्यागेल्यांचें स्वागत करावयाला त्या सदैव खड्या असत. पद्म प्रकाशन ढासळल्यानंतर १९४९ सालीं आलेल्या आपत्काळांतसुद्धां त्या डगमगल्या नाहींत; व पतीला निष्ठेनें साथ देऊन त्या साडेसातीच्या काळांत त्यानीं सगळे प्रसंग खंबीरपणानें निभावून नेले. उमाकांतांविषयीं अनुकूल ग्रह नसलेल्या त्यांच्या परिचितांनीसुद्धा, “ लताबाई या देवता आहेत, ” असे उद्‌गार त्यांच्यासंबंधीं काढलेले मी अनेकदा ऐकलेले आहेत. ते उद्‌गार मला यथार्थ वाटतात. गेल्या तीस वर्षांच्या आमच्या स्नेहसंबंधाच्या कालावधींत मी लताबाईंच्या कपाळावर कधीं आठी चढलेली पाहिली नाहीं किंवा तोंडून कधीं दुरुद्‌गार

निघालेला ऐकला नाहीं. उमाकांत हे इतरांशीं वागतांना कितीहि मिठ्ठास असले, तरी ते जात्या शीघ्रकोपी. घरांतल्या सुव्यवस्थेंत किंवा सजावटींत जराहि कांहीं उणें पडलें, तर तें त्यांना सहन होत नसे. स्वयंपाकांतला एखादा पदार्थ थोडा जरी बिघडला, तरी ते एकदम गरम होऊन जावयाचे. पण लताबाईंचा सोशिकपणा त्यांच्या या सगळ्या स्वभावविशेषांना पुरून उरला. सौजन्य, चातुर्य, समयसूचकता आणि धारिष्ट या त्यांच्या गुणांमुळेंच उमाकांतांचा संसार इतका सुखी आणि सफल झाला. लग्न झाल्यापासून ते मुंबईत किंवा मुंबईबाहेर लताबाईंशिवाय कधीं कुठें गेले नाहींत. त्यांच्य भटकेपणाला जशी ही गृहस्थतेची मर्यादा होती, तशीच भोगलोलुपतेला चारित्र्याची मर्यादा होती. त्यांच्या एरव्हीं अमर्याद वाटणाऱ्या जीवनांतल्या श्री. लताबाई या मूर्तिमंत मर्यादा होत्या. त्यामुळेंच त्यांचा तो मर्यादशील अमर्यादपणा त्यांच्या जीवनाला आणि लिखाणाला रसिकता आणि रुचिरता आणावयाला कारण झाला. श्री. लताबाईंचें हें ऋण १९६५ च्या जूनमधील आपल्या एकसष्टाव्या वाढदिवसाच्या रात्रीं, जेवणानंतर आम्ही दोघे गप्पा मारीत असतां, उमाकांतांनीं अगदीं भरल्या डोळ्यांनीं मजजवळ बोलून दाखविले. श्री. लताबाई हा त्यांच्या संसारांतला आनंद आणि आधारहि होत्या.

१९३० सालापासून तों थेट मरणाच्या दिवसापर्यंत श्री. भेंडे यांनी जें त्रुटित लिखाण विविध विषयांवर गेलीं तीन तपें केलें, त्यांत त्यांच्या या वैचित्र्यपूर्ण जीवनांतला सगळा जिव्हाळा, गोडवा, दिलदारपणा आणि अजबपणा उतरलेला आहे. त्यांनीं स्वत:ला कधीं साहित्यिक म्हणवून घेतलें नाहीं ही गोष्ट खरी; पण साहित्याविषयीं इतकी अवीट गोडी असलेला हौशी रसिक मी दुसरा पाहिला नाहीं. मराठींतलीं बहुतेक सगळी नियत-कालिकें आणि ताजीं पुस्तकें जशी त्यांच्या टेबलावर असावयाचीं, तशींच इंग्लंड आणि अमेरिका या देशांतलीं निवडक नियतकालिकें आणि पुस्तकेंहि. त्यांचें संभाषणचातुर्य जितकें उपजत. तितकेंच कमावलेलेंहि होतें; म्हणजे असें कीं, आपल्या वाचनांत आलेल्या आख्यायिका, गोष्टी, घटना, सुभाषितें इत्यादि साहित्याचा उपयोग करून ते गप्पांत इतकी रंगत उत्पन्न करीत असत कीं, तिच्यामुळे त्यांना भेटावयाला येणारा कोणीहि माणूस अगदीं गार होऊन जावयाचा. त्यांच्या संभाषणाइतकें जरी त्यांचें लिखाण रसाळ

आणि रंजक नसलें, तरी आपल्या मिष्किल डोळ्यांवर चढविलेल्या काळ्या भिगांच्या चष्म्यांतून जे मानवी जीवनाचे आणि स्वभावाचे नानाविध नमुने त्यांनीं आयुष्यभर बारकाईनें न्याहाळून पाहिले, त्यांचें मोठे मार्मिक वर्णन त्यांनीं आपल्या लिखाणांत केलेलें आहे त्या दृष्टीनें, तीस वर्षांनंतर प्रसिद्ध होत असलेल्या त्यांच्या या लेखसंग्रहांतील व्यक्तिरेखा लोकांना रोचक वाटतील याबद्दल मला शंका नाहीं. त्यांचा जनसंपर्क आणि चतुरस्रता ध्यानांत घेऊन, १९६३ च्या जानेवारींत माझा मुक्काम त्यांच्याकडे असतांना त्यांनी 'तरुण भारता'च्या रविवारच्या साप्ताहिक अंकासाठीं नियमानें कांहीं तरी लिहावें, असें आम्ही ठरविलें. तदनुसार त्यांची 'धन' ही गोष्ट ता. १३ जानेवारी १९६३ च्या अंकांत प्रसिद्ध झाली, व ता. १७ मार्च १९६३ च्या अंकापासून 'राजाबाई टॉवरवरून' हें त्यांचें नावीन्यपूर्ण सदर सुरू झालें. तें सदर त्यांचें देहावसान होईपर्यंत चालू राहिलें. त्या सदरांत प्रसंगोपात निरनिराळ्या व्यक्तींवर लिहिलेल्या लेखांचा संग्रह या पुस्तकांत केलेला असून, 'तरुण भारता'व्यतिरिक्त इतर नियतकालिकांतून आलेले कांही लेख आणि त्याबरोबरच 'भटक्याची कमाई' या पुस्तकांतीलहि तीन लेख त्यांत समाविष्ट केलेले आहेत. या लेखसंग्रहाच्या संपादनाच्या आणि प्रकाशनाच्या कामांत श्री. गोपाळराव आणि सौ. निर्मला किराणे, श्री. चंद्रशेखर आणि सौ. मीनाक्षी फडणीस, प्रो. वि. ह. कुळकर्णी, श्री. अ. रा. तनखीवाले, पुण्याच्या 'तरुण भारता'चे संपादक श्री. बापूसाहेब भिशीकर, श्री. अरविंद ताटके आणि किंजवडेकर पितापुत्र यांची जी मदत झाली, तिचा उल्लेख कृतज्ञतापूर्वक करणें अवश्य आहे. श्री. भेंडे यांच्या आकस्मिक निधनानंतर वाचकांपुढें येत असलेल्या त्यांच्या या पोरक्या पुस्तकाचें कौतुक मराठी रसिकवर्ग सहृदयतेनें करील, असा मला विश्वास वाटतो.

नागपूर<br>
२ जानेवारी, १९६७

**ग. त्र्यं. माडखोलकर**

# असे हे उमाकांत
# अशी ही पडछाया !

श्री. उमाकांत भेंडे यांचा–आमचा परिचय हळूहळू जिव्हाळ्याच्या संबंधांत परिणत होत होता. ऋणानुबंधाच्या गांठी अधिकाधिक आणि अकल्पितरीत्या दृढ होत होत्या. आमच्या ईशावास्य प्रकाशन संस्थेला त्यांचें फार मोठें आणि मौलिक सहकार्य लाभणार होतें. अनेक कल्पना, योजना आणि मनोरथ चालू होते. पत्रव्यवहाराला खंड नव्हता. गांठी–भेटी तर चालूच होत्या. आमचा उत्साह आणि उमेद दिवसा–दिवसाला वाढत होती आणि, आणि एक दिवस वृत्तपत्रांत उमाकांत भेंडे हे अकस्मात् निधन पावल्याचें वृत्त प्रसिद्ध झालें ! प्रथम या बातमीवर आमचा विश्वासच बसेना. माझ्या डोळ्यांसमोर त्यांची ती भव्य आणि सुडौल मूर्ति तरळूं लागली. आठ दहा दिवसांपूर्वींच मुंबईला मी त्यांना भेटलों होतों. या भेटींत कांहींएक मनसुबे तयार झाले होते. आणि ध्यानीं-मनीं, स्वप्नांतसुद्धां नसतांना भेंडे गेल्याचें दु:खद वृत्त आज वाचावें लागत होतें !

वृत्त वाचतांच मनाला एक प्रकारची मरगळ आली, उत्साहाचा मोहोर झडून जाऊं लागला, एक वेळ मोठीं माणसें हवी तेवढीं भेटतात, पण मोठ्या मनाचीं माणसें भेटणें, फार फार दुर्लभ गोष्ट ! सुदैवानें मला तीं लाभलीं पण पचनीं पडलीं नाहींत. आभाळाहून मोठ्या मनाच्या या माणसानें माझ्या मनावर विलक्षण मोहिनी घातली होती श्रावणांतल्या सुभग आणि दृष्टिधुंद इंद्रधनुष्याप्रमाणेंच त्यांच्या व्यक्तिमत्त्वानें मी भारावलों होतों. माणुसकीच्या कस्तुरीचा सुगंध तर त्यांच्या लहानसहान हालचालींतूनसुद्धां दरवळत असावयाचा !

अखेर माणूस हा केव्हां ना केव्हां तरी जाणारच असतो. किंबहुना सदैव जाणाऱ्या या जगांत ‘ जाणें ’ ही अगदीं सहज आणि अटळ अशी घडणारी

१६०२२

घटना आहे. हें सारें खरें असलें तरी कांहीं कांहीं माणसांचें जाणें हें मात्र दीर्घकाळ जाणवत राहतें. त्यांच्या जाण्यानेंच त्यांचें 'असणें' हें मनावर अधिक ठसतें. उमाकांत गेले, एकाएकीं आणि अकस्मात् गेले पण मनाला कांहीं ही गोष्ट पटत नाहीं. कशीवशी बुद्धीची समजूत पटली तरी मनाची समजूत कोण आणि कशी करणार ?

उमाकांत गेले आणि त्यांची ही 'पडछाया' आतां थोड्या उशिरानें कां होईना पण प्रकाशांत येत आहे. खरें तर ही पडछाया त्यांच्या पहिल्या वर्ष-श्राद्धादिवशींच प्रसिद्ध होणें जरूर होतें. त्या दृष्टीनें आम्ही भगीरथ प्रयत्न केले, अडचणीच अशा आकल्पित येत गेल्या कीं सांगतां सोय नाहीं. आमच्या स्वाधीन नसलेल्या या अनपेक्षित अडचणींवर मात करून शेवटीं त्यांच्या दुसऱ्या वर्षश्राद्धाच्या वेळीं तरी हा ग्रंथ वाचकांच्या हातीं देतां येत आहे याचेंच आतां समाधान मानणें भाग आहे. आम्हांला याबद्दल जरी आनंद वाटत असला तरी हा आनंद मात्र निर्भेळ नाहीं. तो अनेकविध विषादपूर्ण घटनांनीं संमिश्र आहे. तरी पण आज ही पडछाया रसिकांच्या हवालीं सुपूर्द करून, दिल्या शब्दांतून मोकळें होतांना होणाऱ्या आनंदाबरोबरच एक प्रकारची हुरहूरहि मनाला वाटते आहे. पडछायेच्या निमित्तानें भेंडे यांच्याशीं होणारा सहवास दुरावणार म्हणूनहि कदाचित् असेल !

मी लिहिलेलें श्रीअक्कलकोटस्वामी समर्थ यांचें चरित्र नुकतेंच प्रसिद्ध झाले होतें हें चरित्र प्रसिद्ध होतांच त्यावर महाराष्ट्रांतल्या अनेक प्रतिष्ठित वृत्तपत्रांनीं उत्कृष्ट अभिप्रायहि दिले होते. एखाद दुसरा अपवाद वगळतां बहुतेक सर्वांनीं या अपूर्व चरित्राचें चांगलेंच स्वागत केलें यांत शंका नाहीं. नागपूरच्या तरुण भारताकडेहि आमचें हें चरित्र परीक्षणासाठीं गेलेंच होतें. स्वत: भाऊसाहेब माडखोलकर यांनीं या चरित्रावर लिहावें हा हेतु होता. पण स्वत: भाऊसाहेब यांनीं या चरित्रावर न लिहितां तें या विषयांतील मर्मज्ञ विद्वानांकडे त्यांनी पाठवून दिलें आणि आम्हांला तसें कळवून टाकलें. आमची उत्कंठा वाढली आणि एक दिवस टपालानें तरुण भारतचा अंक आमच्या हातीं आला. उघडून पाहतों तों त्यांत विस्तृत प्रमाणांत चरित्रावर आलेलें परीक्षण नव्हे समीक्षण ! समीक्षक म्हणून वर नांव होतें उमाकांत भेंडे !

या नांवामुळें कुतूहल आणखीनच वाढलें. आम्ही ताबडतोब हें समीक्षण बसल्या बैठकींतच वाचून काढलें. वाचून झालेला आनंद व्यक्त केल्यावांचून राहवेना म्हणून या चरित्रग्रंथाचे मान्यवर प्रकाशक प्राचार्य न. गो. सुरु यांना हें समीक्षण दिलें. त्यांनीं तें वाचलें आणि त्यांनाहि एक आगळाच आनंद झाला. एका रसज्ञ मार्मिक चोखंदळ व्यक्तीनें केलेलें हें समीक्षण त्यांचें व आमचें लेखन-प्रकाशनाचें श्रम सुफलित करून गेलें !

परीक्षण म्हणजे समीक्षण नव्हे हें त्याच वेळीं आमच्या लक्षांत आलें. परीक्षण म्हणजे आपातत: वरवर अवलोकन आणि समीक्षण म्हणजे सम्यक् ईक्षण ! सूक्ष्म दृष्टीनें अवलोकन. अशीं समीक्षणें आणि असे समीक्षक लाभणें हा या चरित्रग्रंथाचा एक अपूर्व योगच म्हटला पाहिजे. भाऊसाहेब यांनीं हा आमचा चरित्रग्रंथ उमाकांत भेंडे यांच्या जवळ देण्यांत फार मोठें औचित्य साधलें होतें असें शेवटीं कबूल करणें आम्हांला मुळीं भागच पडलें.

आणि यानंतर मनांत विचार आला कीं समीक्षक उमाकांत भेंडे यांचा परिचय लवकरांत लवकर कसा होईल ? हा विचार दिवसेंदिवस बळावत चालला, कारण असें कीं या चरित्रामागें माझा जो दृष्टिकोन होता तो नेमका ओळखून केलेलें हें समीक्षण होतें. समान दृष्टिकोनामुळें प्रत्यक्ष परिचयापूर्वीच एक तऱ्हेची ऋणानुबंधाची पार्श्वभूमि तयार होत होती.

अखेर एक दिवस त्यांच्या प्रत्यक्ष भेटीचा योग मुंबईला त्यांच्या निवासस्थानीं आला !

प्रथमदर्शनीच त्यांच्या प्रांजळवृत्तीचा ठसा माझ्या मनावर उमटला. त्यांनीं केलेलें स्वागत हें खऱ्या अर्थानें सुस्वागत होतें. एखाद्या सम्राटानें दारीं आलेल्या अतिथीचें मधुपर्कपूजा करून आतिथ्य करावें तसेंच उमाकांतांनीं माझें आतिथ्य मधुपर्क पूजेनेंच केलें. अस्सल पाश्चात्त्य वातावरणांत झालेलें हें अस्सल भारतीय स्वागत माझ्या मनावर कायमचें कोरलें गेलें. नंतर उमाकांत मला आपल्या वातानुकूलित अभ्यासिकेंत घेऊन गेले आणि मी चकितच झालों.

ती अभ्यासिका नव्हती, ती होती भारतीय संस्कृतीची निवासभूमि ! तत्त्वज्ञानाचें शयनागार, आणि साहित्यशारदेची विलासभूमि ! अस्फुट

सौंदर्याच्या मधाळ चांदण्यांत कलंदर रसिकता तेथें जणुं नृत्य करीत होती ! त्याग आणि भोग यांची तेथें असणारी जिवश्चकंठश्च अशी लोकविलक्षण मैत्री पाहून तर मला एखाद्या राजयोगी, तरीहि तपोधनसमृद्ध अशा ऋषीच्याच आश्रमाची आठवण झाली. अशी ती अभ्यासिका पाहून एका असीम आनंदानें मी मोहरून गेलों. मधांत बुडवून काढलेल्या शब्दांनीं ज्या वेळीं उमाकांत बोलूं लागले त्या वेळीं अमृततुषारांनीं ती अभ्यासिका रोमांचित होत असल्याचा मला भास होऊं लागला. फारा दिवसांनीं खऱ्या भारतीय मनाच्या लेखकानें केलेल्या अव्याज मधुर स्वागताचा आस्वाद घेत घेत बऱ्याच उशिरानें आमची ही पहिली मुलाखत संपली.

याच भेटींत आम्ही केवळ विचारानेंच नव्हे, तर मनानेंहि जवळ आलों. पुढें पुढें ही जवळीक इतकी वाढली कीं, मी, माझी संस्था, आणि उमाकांत यांत वेगळेपणा असा उरलाच नाहीं.

त्यांची गुणग्राहकता आणि लोकसंग्रह करण्याची अद्‌भुत हातोटी लक्षांत घेतां त्यांचा लोकसंग्रह अफाट वाढावा यांत कांहींच नवल नव्हतें. प्रत्येक क्षेत्रांत त्यांचा मित्रपरिवार इतका उदंड होता कीं सामान्य माणूस त्यानें स्तिमित होऊन जावा ! प्रत्येकाच्या सुखदुःखाशीं समरस होण्याच्या त्यांच्या या वृत्तींतूनच हा एवढा उदंड मित्रपरिवार विस्तारला होता.

अखंड प्रवास हें एक त्यांचें आवडतें व्यसन ! या व्यसनानें त्यांच्या विचारांना व्यापक अनुभूतीची एक विशाल ‘ बैसका ’ निर्माण झाली होती. मन तर आभाळाहून मोठें आणि सागराहूनहि खोल झालें होतें. मनाच्या अथांग सागरांत दुःखांचे मेरुमांदार अगदीं तळाला जाऊन बसले होते, आणि पृष्ठभागावर फक्त आमोद-प्रमोदांच्या तेवढ्याच लाटा उसळत होत्या !

असे हे पर्वतासारख्या व्यक्तिमत्त्वानें संपन्न असणारे उमाकांत भेंडे ज्याच्या म्हणून पाठीशीं उभे राहतील त्याला त्यांचा डोंगराएवढा आधार वाटला तर त्यांत नवल तें काय ? ईशावास्य प्रकाशन संस्थेला त्यांचा हा असा आधार लाभला होता.

असा हा आमचा आधार अकल्पित मृत्यूनें काढून घेतला, त्यामुळें आमच्या संस्थेचीच हानि झाली असें नव्हे तर ती त्यांच्या कुटुंबियांची,

त्याहून अधिक महाराष्ट्राची व त्याहीपेक्षां सर्वांत अधिक भारताची कधींहि भरून न येणारी हानि झाली यांत मुळींच शंका नाहीं. उमाकांतसारख्याचें व्यक्तिमत्त्व हें अखेर राष्ट्राचेंच व्यक्तिमत्त्व असतें. त्यांच्या निधनानें मला होणारें दुःख हें तर शब्द-सीमेपलीकडें आहे. पण त्यांच्या सहधर्मचारिणी श्रीमति लताबाई भेंडे यांच्या मनाचें मूक आक्रंदन कोण शब्दांकित करणार—करूं शकेल ? त्यासाठीं एखादा वाल्मीकीच हवा !

अशा वेळीं उमाकांत भेंडे यांनीं अल्पकाळांत प्रकृतीचें स्वास्थ्य नसतांनासुद्धां आमच्या संस्थेसाठीं किती कष्ट केले आणि प्रतिकूल वातावरणांत ढासळूं पाहणाऱ्या माझ्या मनाचा तोल कसा सांवरला हें सारें आठवलें कीं मन कसें सुन्न होतें !

श्रीतुकाराममहाराज यांची सार्थ व सविवरण अभंगगाथा प्रसिद्ध करावी म्हणून मी ती लिहीत होतों. उमाकांतांना ही गाथेची कल्पना इतकी आवडली कीं त्यांनीं ताबडतोब या गाथेच्या प्रसिद्धीची एक योजना आंखली. इतकेंच नव्हे तर त्यासंबंधीं एक माहितीपत्रक स्वतः छापवून घेतलें आणि आपल्या मित्रपरिवारांत तीं माहितीपत्रकें आणि मला बरोबर घेऊन ते घरोघरीं हिंडले. संस्थेला जेवढ्या प्रकारांनीं म्हणून साहाय्य करतां येणें शक्य होतें तेवढ्या प्रकारांनीं तें करण्याचा त्यांनीं मनःपूर्वक प्रयत्न केला होता.

त्यांच्या अभ्यासिकेंत त्यांच्याशीं संभाषणाचा योग येणें ही एक मला पर्वणीच वाटत असे. अशा स्वैर संभाषणांतूनच खरे उमाकांत प्रगटत असत. वेळेचें भान मला तर नसेंच, पण त्यांनाहि तें नव्हतें. जीवनाच्या अथांग महासागरांतून प्रयत्नपूर्वक गोळा झालेल्या विविध अनुभवांची मौक्तिकेंच जणुं दळदार शब्द-शिंपल्यांतून आपणाला उमाकांत दाखवीत आहेत असाच भास होत असे ! त्यांच्या शब्दांचा संस्पर्श झाला की ते ते अनुभव आपल्यासमोर सगुणसालङ्कृत असे उभे राहात असत ! अनेक भव्योदात्त कल्पना या मग कल्पना राहात नसत. त्या तत्क्षणींच साकार होत आणि म्हणत, 'चला आम्ही आलों'. कल्पिताहून अद्भुत प्रसंगांनीं हें संभाषण इतकें रंगत असे कीं सांगतां सोय नाहीं. अशा वेळीं कोण आणि कोणता विषय येईल याचा

मुळींच भरंवसा नसे. कालिदास, भवभूति, बाण, हे तर यावयाचेच पण तुकाराम, चोखा, राका, मुक्ताई यांचाहि संचार असे. केव्हां केव्हां पतञ्जलि, शंकराचार्य, रामानुज वगैरे आचार्य हेहि येत असत. यांच्याच साथीसाथ मग त्यांचे सद्‌गुरु काका पुराणिक, आणि मग गाडी अध्यात्माच्या रुळावर यावयाची. अशा वेळीं विरक्त उमाकांतांचें दर्शन होत असे.

सद्‌गुरुकृपेनें अध्यात्मांत त्यांची बरीच अंतरंग प्रगति झाली असल्याच्या खुणा प्रगट झाल्यावांचून राहात नसत. एवढेंच काय पण कांहीं योगसाधनाहि ते करीत असले पाहिजेत अशी माझी पूर्ण खात्री पटली आहे. त्यांच्या राहणीवरून त्यांच्या अध्यात्माचा थांग लागत नसावा. अलीकडे ते अधिकाधिक अंतर्मुख होत चालल्याची साक्ष त्यांनीं आपल्या एका स्नेह्यांना धाडलेल्या पत्रावरून पटते. एका पत्रांत उमाकांत म्हणतात—

“जीवनांत तरुणपणांत जीवनानंद मिळविला. त्यानंतर अंतर्मुख झालों, सहजानंद आंत प्रसवूं लागला. आतां परमानंद मिळविण्याकडे पराकोटीचा प्रयत्न चालू आहे. या आनंदमय स्थितींत स्मृतीसुद्धां विरतात, डोळ्यांसमोर तरळतो ईश्वरभाव !” त्यांचे हे उद्‌गार त्यांच्या अंतरंग प्रगतीबद्दल पुरेसे बोलके नाहींत का ? आंतून विरक्तभाव विलसत असला तरी मी त्यांना आंबलेविटलेलें कधींच पाहिले नाहींत. अपयशांतून यश खेंचून आणणारा हा मनस्वी पुरुषोत्तम पुरुषार्थी जीवनाचा भोक्ता होता. ते चवीनें जगले, आनंदानें जगले, आनंदासाठीं जगले.

दुसऱ्याचें होईल तेवढें भलें करणें हा तर त्यांचा स्वभावच होता, किंबहुना त्यांना हें जडलेलें एक असाध्य व्यसनच होतें. या स्वरूपांत तें जणुं ईश्वराचीच पूजा बांधीत असत.

कोणत्या ना कोणत्या अद्‌भुत कल्पना, भव्य योजना, महान संकल्प यांत ते सदैव गढलेलेच असावयाचे. अशा अनेकविध कल्पनांपैकींच एक कल्पना पडछायेच्या रूपानें आज आपल्यासमोर साकार होत आहे. ही पडछाया आमच्या संस्थेकडून प्रसिद्ध व्हावी ही त्यांची उत्कट इच्छा होती. त्यांनीं ती पुरी करून घेतली.

'पडछाया' हा विविध क्षेत्रांतीत विभिन्न अभिरुचींच्या व्यक्तींचीं शब्द-चित्रें रेखाटलेला ग्रंथ आहे. राजकारण, संगीत, साहित्य, नाटक, अध्यात्म इत्यादि बहुविध क्षेत्रांत यशस्वी झालेल्या नामवंत व्यक्तींच्या जीवनाची तोंडओळख करून त्या त्या व्यक्तींचा यथार्थ परिचय करून दिला आहे. शब्दांच्या कुंचल्यानें त्या त्या व्यक्तींचीं जीवनें रेखाटतांना कुठें अधिक गडद तर कुठें क्वचित् फिका रंग झाला असेल एवढेंच. एक प्रकारें हा त्या त्या व्यक्तीच्या कालखंडाचाहि इतिहास आहे. व्यक्तीचें जीवन हें काल, देश आणि परिस्थिति यांच्याशीं निगडीत असल्यानें व्यक्तींचा परिचय म्हणजेच पर्यायानें या तिघांचाहि तो परिचय असतो. यासाठींच या व्यक्ति-चित्रांना फार महत्त्व आहे. भूतकाळ वर्तमानाच्या स्वाधीन करण्याचें फार मोठें काम केवळ शब्दच करीत असतात. म्हणूनच शब्दचित्रें हीं पाषाण-शिल्पांहूनहि चिरंतन आणि सदैव अमर अशीं असतात. अशा चित्रांचा ठसा हृदया-हृदयांवर उमटतो आणि युगें लोटलीं तरी तो जाता जात नाहीं. 'पडछायें'त अशींच कांहीं सुंदर शब्दचित्रें आपणांस पाहावयास मिळतील.

रूढार्थीनें उमाकांत भेंडे हे कदाचित् नसतील साहित्यिक पण ते साहित्य जगलेले आहेत. साहित्य जगलेल्या माणसानें या व्यक्तिरेखा रेखाटल्या आहेत म्हणूनच त्याला महत्त्वहि आहे.

उमाकांत भेंडे हे खरोखरी भाग्यशाली पुरुष होते ! त्यांना मित्र म्हणून अनेक थोर नामवंत व्यक्ति लाभल्या, सर्वस्वी अनुरूप अशा सहधर्मचारिणी-लताबाई गृहिणी म्हणून त्यांच्या आयुष्यांत आल्या. भाऊसाहेब माडखोलकर यांच्यासारखे साहित्यमहर्षि त्यांना जीवश्चकंठश्च मित्र म्हणून लाभले आणि त्यांच्यामुळें त्यांचें सहकार्य आम्हांला लाभलें.

माझी विद्यार्थिनी कु. शकुंतला वैशंपायन, मीमांसातीर्थ आणि मुलगा चि. अशोक यांचें साहाय्य या पडछायेच्या बाबतींत अधिक झालें आहे. पड-छायेच्या बाबतींत सारें श्रेय खरें यांचेंच आहे. भाऊसाहेबांचें मार्गदर्शन, लताबाईंचा सहकार आणि इतर संबंधितांचे श्रम या सर्वांच्या समन्वयांतून हा ग्रंथ आज बाहेर येत आहे. या सर्वांचा मी मनःपूर्वक आभारी आहें— चिरकृतज्ञ आहे.

एकवीस

पडछाया आली आणि उमाकांत गेले हें खरें नाहीं. त्यांचा येथील प्रवास कदाचित् संपला असेल; प्रवास हें त्यांचें व्यसन होतें. असाध्य व्यसन होतें हें लक्षांत घेतां ते अज्ञात प्रदेशांत कुठे तरी दूर दूर पण प्रवासालाच गेले नसतील का?

— इति लेखनसीमासमुल्लसति

आश्वलायन, ६१ कर्वे रोड,
एरंडवणें, पुणें ४
दि. ७ नोव्हेंबर, १९६७.

श्रीपादशास्त्री किंजवडेकर

# अनुक्रमणिका


| | | | |
|---|---|---|---|
| १. | श्री. ना. ह. आपटे | तरुण भारत, नागपूर<br>दि. २–७–६५ | १ |
| २. | श्री. रामानंद चतर्जी | तरुण भारत, नागपूर<br>दि. २८–११–६५ | ७ |
| ३. | श्री. जगन्नाथ ऊर्फ नाना शंकर शेठ | तरुण भारत, नागपूर<br>दि. १५–८–६५ | १२ |
| ४. | प्रा. अनंत काणेकर | तरुण भारत, पुणें<br>दि. २६–७–६४ | १७ |
| ५. | शेठ वालचंद हिराचंद | तरुण भारत, नागपूर<br>दि. ७–११–६५ | २२ |
| ६. | श्रीमती अंजनीबाई मालपेकर | तरुण भारत, नागपूर<br>दि. ७–११–६५ | २७ |
| ७. | डॉ. वा. दा. गोखले | तरुण भारत, पुणें<br>दि. ३०–६–६४ | ३१ |
| ८. | श्री. मोतीलाल | तरुण भारत, नागपूर<br>दि. ८–८–६५ | ३६ |
| ९. | श्री. पु. रा. लेले | तरुण भारत, नागपूर<br>दि. १३–६–६५ | ४० |
| १०. | श्री. नाना कुंटे | तरुण भारत, नागपूर<br>दि. १५–९–६३ | ४६ |
| ११. | कवि कुसुमाग्रज | तरुण भारत, नागपूर<br>दि. १०–५–६४ | ५२ |
| १२. | सौ. हिराबाई बडोदेकर | तरुण भारत, नागपूर<br>दि. ६–६–६५ | ५८ |
| १३. | प्रा. वा. ल. कुलकर्णी | माणिक<br>दि. २७–१२–६६ | ६२ |

| | | | |
|---|---|---|---|
| १४. | श्री. विनायकराव पाटील | तरुण भारत, पुणें दि. ९-८-६४ | ६७ |
| १५. | श्री. गोविंद नारायण माडगांवकर | तरुण भारत, नागपूर एप्रिल १९६५ | ७१ |
| १६. | श्री. मिनू मसानी | — | ७६ |
| १७. | श्री. चं. वि. बावडेकर | तरुण भारत, नागपूर दि. ११-७-६५ | ८४ |
| १८. | सौ. सुहासिनी मुळगांवकर | तरुण भारत, नागपूर दि. १-८-६५ | ८९ |
| १९. | सर विन्स्टन चर्चिल | नंदादीप, मुंबई मे १९६५ | ९४ |
| २०. | उमादेवी आणि मॉरिस फ्रीडमन | तरुण भारत, पुणें दि. १९-७-६४ | १०० |
| २१. | श्री. विठ्ठलराव घाटे | तरुण भारत, नागपूर दि. १३, १७-६-६४ | १०७ |
| २२. | श्री. युसुफ मेहेरअल्ली | — | ११६ |
| २३. | श्री. चिमणलाल सेटलवाड | साप्ताहिक रोमांच दि. १२-९-६५ | १२१ |
| २४. | श्री. व्य. नं. कुलकर्णी | तरुण भारत, नागपूर दि. २३-५-६५ | १२६ |
| २५. | मीरा बेन | चित्रमय जगत्, नंदादीप, मुंबई दि. २१-९-६५ | १३१ |
| २६. | आमचे काकासाहेब | — | १३८ |
| २७. | कामराज नाडर | केसरी | १४५ |

| | | | |
|---|---|---|---|
| २८. | **श्री. पंढरीनाथ पाटील** | तरुण भारत, नागपूर दि. २-१-६६ | १५० |
| २९. | **बालगंधर्व** | तरुण भारत, नागपूर दि. २६-१-६४ | १५६ |
| ३०. | **श्री. पु. ल. देशपांडे** | — | १६० |
| ३१. | **श्री. लालबहादुर शास्त्री** | केसरी दि. १७-६-६४ | १६६ |
| ३२. | **सरहद्द गांधी** | — | १७४ |
| ३३. | **श्री. ग. त्र्यं. माडखोलकर** | — | १८६ |

# श्री. ना. ह. आपटे

: १ :

सहज साताऱ्याला गेलों. अजिक्यतारा, सज्जनगड हे किल्ले पाहायला मिळतील, सज्जनगडाला श्रीसमर्थ रामदासांच्या समाधीचें दर्शन घेऊन समर्थ होतां येईल, पीरवाडीला जाऊन श्रीसंभाजीमहाराज, श्रीकोंडिबा-महाराज यांच्या समाधीवर फुलें उधळतां येतील, श्री. काका पुराणिकांच्या सातारच्या वस्तींत काय काय घडून आलें तें अनायासें कळेल; तसेंच मग ढोळ्या गणपती, जलमंदिर, दत्तमंदिर, नवग्रहमदिर आणि श्रीपुर्णेश्वराचें नितांत सुंदर मंदिर हीं मंदिरें पाहायला मिळतील अशा मोठ्या उत्साहानें आणि आशेनें आम्हीं सातारा गांठलें. हीं सर्व दर्शनें घेतलीं. आत्मप्रचीति जी काय मिळायची ती मिळाली.

आत्मोन्नतीच्या आनंदांत एका गोष्टीची रुखरुख मनांत सुरू झाली. कोरेगांवचे वाङ्मयकार श्री. नारायण हरि आपटे ह्यांचें आम्हांला दर्शन होईल का ? परमेश्वराचें दर्शन झालें. आतां या शब्दसृष्टीच्या परमेश्वराचें

दर्शन होईल काय ? आमचे मित्र श्री. व्यं. न. कुळकर्णी म्हणाले, "जाऊंया कीं, एक दिवस कोरेगांवला ? भेटतील तेथें नानासाहेब तुम्हांला."

पण चार दिवस झाले तरी हालचाल नाहीं, जाण्या-येण्यासंबंधीं गोष्ट नाहीं. तेव्हां म्हटलं हें दर्शन हुकलं. एक दिवस श्री. व्यं. न. कुलकर्णी यांच्या घरीं जेवायला गेलों आणि श्री. कुळकर्णी हंसून म्हणाले, "साहेब, भोजन जरा उशिरांच होईल. कारण मी नानासाहेबांना आपल्या समवेत जेवायला बोलाविलें आहें. ते आले कीं आपण लगेच बसूं. जेवण तयार आहे."

अपार आनंद झाला. कोरेगांवच्या कथाकाराला भेटायला मन आतुर झालें होतें. औत्सुक्यानें दृष्टि दारांवर खिळली होती. बरोबर १२॥ वाजतां नानासाहेब आले. जमलेल्या सर्व मंडळीकडे सहास्य बघून त्यांनीं अभिवादन केलें व ते स्थानापन्न झाले. नानासाहेबांची देहयष्टि उंच, सडपातळ पण कणखर आहे. पंच्याहत्तर वर्षें वय झालेलें, पण ही व्यक्ति तरतरीत, दमदार आणि उत्साहपूर्ण आहे. कांति तुकतुकीत, चेहरा प्रसन्न, आणि बोलणें स्पष्ट, खणखणीत, पण थोडें किनरें.

ठसा प्रथमदर्शनीं मनावर पडला तो हा कीं एकनिष्ठतेनें, एकविधतेनें आणि एकात्म भावनेनें या महाभागानें आपलें चारित्र्य वाङ्मयाला वाहिलें आणि कोरेगांवच्या परिसरांत आपली प्रतिसृष्टि निर्माण केली. ज्याप्रमाणें थॉमस हार्डीनें वाङ्मयांत आपलें खेडें अजरामर केलें, आर. के. नारायण यांनीं आपली देहाती सृष्टि अमर केली, त्याप्रमाणें श्री. नानासाहेब आपटे यांनीं कोरेगांवचा वाङ्मयीन लौकिक वाढवून महाराष्ट्राला तें अर्पण केलें.

नानासाहेबांचा पोषाख साधाच. धोतर, किरमिजी रंगाचें खमीस, किरमिजी रंगाची टोपी आणि हातांत एक पिशवी. पिशवींत होती पांघरण्याची शाल ती त्यांनीं वामकुक्षीच्या वेळीं काढली आणि कशाचीहि तमा न बाळगतां ते अर्धा तास झोपीं गेले. त्यांच्या वर्तनांत आदब दिसली. तरी व्यर्थ औपचारिकपणा बिलकूल नव्हता. विचारलेल्या प्रश्नांना ते अस्खलित उत्तरें देत होते. त्यांत संयम होता. नियम होता. आदर्श चारित्र्याचे ते भोक्ते दिसले. भारतीय संस्कृतीबद्दल ते विलक्षण अभिमानी वाटले. हिंदुत्वाबद्दल

त्यांच्यांत जाज्वल्यता दिसली. भारतीय संस्कृतीबद्दल त्यांच्या निःसंदिग्ध कल्पना असल्या पाहिजेत असें वाटलें. मात्र आपल्याच मूल्यांचा वा मतांचा हेकेखोरपणा त्यांच्यांत दिसला नाहीं. पण तरीहि पटलेल्या तत्त्वप्रणालीला चिकटण्याचा आग्रहीपणा त्यांच्यांत असावा असें वाटलें.

ते बोलत होते. आम्ही ऐकत होतों. "सूत्रबद्ध शिक्षण मला मिळालें नाहीं," ते ओघानें सांगत होते, "हव्यास क्रांतिकारक होण्याचा; पण वृत्ति सात्त्विक, सोज्वळ माणसाची. त्यामुळें जागतिक क्रांतींत किंवा भारतांतील क्रांतिकारक चळवळींत भाग घ्यावा असा स्थायीभाव, पण विचारवंत प्रवृत्तीमुळें आणि कल्पकतेच्या संवेदनेमुळें वळलों वाङ्मयाकडे."

पायावर भोवरा, त्यामुळें नानासाहेबांनीं भारतभर भरारी मारली. फिरफिर फिरले. राजस्थान, बंगाल, व नेपाळचा दौरा केला. राजस्थानी भाषा आत्मसात् केली. बंगाली भाषा शिकले. शस्त्रास्त्रांचा अभ्यास नेपाळांत केला. आणि हें सर्व करीत असतांना, सुंदरता टिपली–निसर्गांतली आणि मानवांतलीहि. मनाची पकड कलाकुसरीची. त्या पकडीच्या जोरावर भटक्याचें जीवन संपल्यावर कोरेगांव गांव नक्की केलें आणि तेथें आपल्या वाङ्मयीन संसाराचा फुलोरा फुलविला.

आम्ही जेवावयास बसलों. ७५ वर वयाचे नानासाहेब, पण प्रकृति निकोप. आडदांड नव्हे, पण खणखणीत, खाणें व्यवस्थित. तरुणाला लाजवील असा भोजनाचा प्रकार. लयबद्ध खाणें. अतिरेक नाहीं–आततायीपणा नाहीं. नानासाहेबांच्या प्रत्येक कृत्यांत मला विवेक दिसला.

भारतीय संस्कृतीवर त्यांचें बोलणें चालू होतें. त्यावरून त्यांची भारतीय संस्कृतीची कांहीं ना कांहीं ज्वलन्त कल्पना असणार अशी खात्री झाली. त्यांनीं जी रूपरेखा चितारली ती १०० टक्के भारतीय होती. हृद्य होती. भारतीय स्त्रीबद्दल तर त्यांना विलक्षण आत्मीयता दिसली. स्त्रीबद्दल असीम आदर आणि तिची घडण शुद्ध भावावर व्हावी ही इच्छा, त्यामुळें स्त्रीवरचें त्यांचें प्रवचन कमालीचें प्रज्ञापूर्ण वाटलें. नानासाहेब अंतराळांत दृष्टि ठेवून विलास करणारे कवि नाहींत. ते आदर्शवादी आहेत. ज्ञानाला, आत्मज्ञानाला ते जितकें मानतात तितकेंच विज्ञानाला. सुंदर फूल त्यांना रिझवतें. उत्तम

बंगला त्यांना आवडतो. मानवाचे सर्व प्रकारचे हव्यास त्यांना योग्य वाटतात. मानव विज्ञानाच्या जोरावर निसर्गाला आपला गुलाम बनवीत आहे ही मानवी कृति त्यांना गुदगुल्या करते. मानवाची चंद्रावरची–मंगळावरची स्वारी मानवाच्या दुर्दमनीय कर्तुम्–अकर्तुम् शक्तीची त्यांना प्रचीति देते. तरी पण विज्ञानाच्या महिम्यानें ते वाहवून जात नाहींत. तर पुनः पुन्हां ते माणसाच्या 'स्वत्वा'कडे येतात. त्याच्या आत्मविकसनासाठीं त्यांच्या वाङ्मयांत विचार निर्माण करतात. म्हणूनच मला ते आदर्शवादी (Idealist) वाटले. भूतळावर पाय रुजवून ठेवावयाचेच; पण आकाशालाहि गवसणी घालायची.

नानासाहेबांची लेखणी आज अनेक साल अविरत चालू आहे. त्यांनीं स्फूर्तिदायक अशा ऐतिहासिक कादंबऱ्या लिहिल्या आहेत. संसारकथांच्या बाबतींत तर त्यांची कलम कोणीच धरूं शकणार नाहीं. लघुकथांचाहि प्रांत त्यांनीं व्यापला आहे. छानदार, झुबकेदार, दर्जेदार अशा लघुकथा त्यांनीं मराठी वाचकांना बहाल केल्या आहेत. सामाजिक कादंबऱ्यांत त्यांनीं आपला प्राण ओतला आहे. त्यांच्या कल्पनांच्या विलासांचा जल्लोष त्यांच्या अद्भुत व रम्य कथांत दिसून येतो. विद्यार्थी अथवा युवक नानासाहेबांचा जीव कीं प्राण. त्यांच्यासाठीं त्यांनीं 'सुखाचा मूलमंत्र' दिला आहे. 'आयुष्याचा पाया' कसा असावा हें सांगितलें आहे. 'जवानांचा जीवनधर्म' ही आधुनिक गीता त्यांनी युवकांच्या हातीं दिली आहे. नानासाहेबांचें जवानांवर विलक्षण प्रेम. त्यांना कार्यप्रवृत्त करणें, सत्प्रवृत्त करणें ही त्यांची जिद्द. स्त्री–पुरुष समाज उत्तम सामाजिक मूल्यांवरच जगूं शकेल ही त्यांची श्रद्धा आहे. ह्या श्रद्धेच्या जोरावरच त्यांनीं 'संसारांत पडण्यापूर्वी', 'गृहसौख्य' अशा प्रकारचीं घरगुती जीवनाचीं चित्रणें आपल्या संसार–कथांत विखुरलीं आहेत. त्यांचा लिहिण्याचा जोम, वेग, उत्साह मोठा विलक्षण आहे. भाषा साधी, सात्त्विक पण अर्थवाही–उगीच कांहींतरी लिहायचें म्हणून त्यांनीं लिहिलें नाहीं. त्यांच्या लिखाणांत ध्येयवाद आहे, आदर्शवाद आहे, सात्त्विकता आहे, चारुता आहे, मंगलता आहे. मन सुप्रसन्न व्हावें असें आहे. नानासाहेबांचें लिखाण लहानांपासून थोरांपर्यंत सर्वांनीं मोकळ्या मनानें भर दिवाणखान्यांत बसून वाचावें. हें वाङ्मय लपूनछपून वाचलें जाणार

नाहीं. हें वाङ्मय पौष्टिक, सद्भावपूर्ण गंगोदकाप्रमाणें निर्मल आणि मंगल आहे. जुन्या जमान्यांत आमच्या ऋषिवर्यांनीं आम्हांला वेद दिले, आरण्यकें दिलीं, उपनिषदें दिलीं. नानासाहेबांनीं आपल्या लोकवाङ्मयांत जुनी सूत्रें, संस्कृत वचनें नव्या झिलईनें, नव्या प्रावरणानें आपल्यासमोर कथारूपानें मांडलीं. हें वाङ्मय वाचतांना मनाची झेंप सत्प्रवृत्तींकडे वळते. हृदयाला भावना भिडतात आणि पुरुषांतलें 'पौरुषत्व' आणि स्त्रियांमधलें 'स्त्री'त्व चैतन्यमय, कृतिमय, कर्तृत्वमय होतें. उत्तम वाङ्मय, शंभर नंबरी सोनें असाच कस नानासाहेबांच्या वाङ्मयांतून लागेल.

निर्लोभी वृत्ति–विवेकपूर्ण वागणूक, अविश्रांत श्रम, विचारपूर्वक निर्मिलेली विचारसरणी हा नानासाहेबांचा गाभा आहे. त्यांचें व्यक्तित्व साधें आहे. बाळबोध आहे. पण गोड आहे. नानासाहेबांची बुद्धि वेचक आहे. सुंदर तें ग्राह्य, वाईट तें टाकाऊ अशी त्यांची वृत्ति आहे. नानासाहेबांचें हृदय पावित्र्यानें, सद्भावनेनें भरलेलें आहे. म्हणूनच त्यांच्या संवेदना सुमंगल आहेत, सुफल देणाऱ्या आहेत. हृदय आणि बुद्धीच्या लयबद्ध, तालबद्ध मीलनांत त्यांचे वाङ्मयतरंग उस्फारले आहेत. म्हणूनच त्यांचें वाङ्मय अनेक पिढ्यांना आदर्शवत् वाटेल.

कोपरगांवचा साधा संसार. साधी राहाणी. गृहिणी नाहीं. सहा मुलींची जोपासना केली. त्यांचीं लग्नें लावून दिलीं. त्यांचे संसार सुरळीत आहेत. त्यांचे वंशवेलहि वाढत आहेत.

आम्ही ज्या दिवशीं नानासाहेबांना भेटलों, त्यापूर्वीं पंधरा दिवस अगोदर त्यांच्या शेवटच्या मुलीचा बाळसेदार, छानदार, मोहक मुलगा वारला होता. नानासाहेबांचा स्वतःचा एकुलता एक मुलगा असाच पूर्वीं गेला होता. आतां हा कन्ह्य्या गेला. नानासाहेबांची वृत्ति स्थितप्रज्ञाची. ते आम्हांला भेटायला आले. त्यांनीं आमच्याकडे मनसोक्त गप्पा मारल्या. ते यद् रोचते जेवले. आम्हांला सांगितलें म्हणून नानासाहेबांचें दुःख कळलें. नाहीं तर त्यांना स्वतःला ना खेद ना खंत. स्वतः त्यांनीं जें तत्त्वज्ञान प्रतिपादिलें तेंच त्यांनीं आचरणांत आणलें.

नानासाहेबांच्या वाङ्यांत प्रायोगिक प्रयोजनें नाहींत. गूढगुंजन नाहीं, अथवा क्लिष्टता नाहीं. सर्व संभार सात्त्विक, सोज्वळ आणि सुरम्य.

त्यांच्या वाङ्मयवाचनानें मानसिक प्रवृत्तींना आदर्शाचें लेणें चढतें. चिंतामणि शोधण्याचा युवकांना ध्यास लागेल. सतीला पति देव वाटेल. भारतीय संस्कृतीचा धबधबा या शुचिर्भूत वाङ्मयाचें परिशीलन करतांना दिसेल. वासना विशुद्ध होतील आणि मन निष्पाप होईल.

एका साध्यासुध्या, सरळ प्रवृत्तीच्या, निष्पाप मनाच्या व्यक्तीच्या मानसिक मंथनांतून निर्मिलेलें हें घरगुती वाङ्मय तुम्हांला प्रासादिक स्वरूपांत मिळालें आहे. तुम्ही नानासाहेबांना लोभाचें प्रलोभन द्या. श्रीमंती त्यांच्या पायांवर ओता, ते एवढेंच म्हणतील, ' मी आहें हा असा आहें, असाच राहणार.' माझें कोरेगांव मला लखलाभ. तेथें बसून माझं चिंतन, मनन, तेथल्या मानसपूजें-तून तयार होईल तें माझं मानसमंदिर. मला नको लक्ष्मी, नको मानसन्मान. मानवजातीची सेवा करणें हेंच माझें कर्तव्य. मानवांतील देव जागविणें व जगविणे हें माझें ध्येय. ' वसुधैव कुटुंबकम् ' ही माझी भावना. माझ्या झोपडींतून मला हिमालय दिसत आहे. गगनांतील विशाल दृश्यें मी पाहात आहें. अंतःसंवेदनेनें मला जीवनमूल्यांची उकल होत आहे. या कोरेगांवच्या अंतर्वेदींतच माझें कार्य. इथेंच माझं मरण. येथेंच माझ्या मनांत ' मानवी आशा ' फुलल्या. येथेंच मला ' गृहसौख्य ' लाभलें. कोरेगांवांतच मला ' कर्मगति ' समजली. येथेंच मी जीवनाचा ' अमर संग्राम ' लढलों आणि आतां ' सुखाचा मूलमंत्र ' मिळाल्यामुळें मी कृतकृत्य झालों. म्हणूनच या कोरेगांवांतून मी आतां नव्या पिढीला—नव्या जवानांना ' जीवनधर्म ' देत देत कोरेगांव—धामां-तून निजधामाकडे जाणार आहें."

* * *

# श्री. रामानंद चतर्जी

: २ :

रामानंदजी चतर्जी आजच्या पिढीला माहिती आहेत कीं नाहीं देव जाणे! पण आमच्या पिढीचें ते दैवत होते. उत्तम पत्रकार, आदर्श संपादक, व्यासंगी गृहस्थ, रवीन्द्रनाथांचे सहचर आणि सहयोगी, तळमळीचे समाज-सेवक आणि 'मॉडर्न रिव्ह्यू' चे सव्यसाची संपादक. 'मॉडर्न रिव्ह्यू' म्हटला म्हणजे आम्ही त्यावर विद्यार्थीदशेत तुटून पडत असूं! कधीं एकदां हें मासिक येतें आणि आम्ही तें वाचून काढतों असें व्हायचें! इतकें विविध, माहितीपूर्ण, कलात्मक आणि विचारप्रवर्तक इंग्रजी मासिक पूर्वी झालें नाहीं व पुढें होणार नाहीं! आजहि या मासिकाचे जुने अंक मिळाल्यास आजच्या पिढीनें–आजच्या युवकांनीं ते वाचावे. उत्तम इंग्रजी, व्यासंगी लिखाण, विषयांची सांगोपांग माहिती आणि उच्च मूल्यें यांचीं चमचमीत मेजवानी म्हणजे रामानंदजी चतर्जींचें हें 'मॉडर्न रिव्ह्यू'. या मासिकानें एक वेळ वाङ्मयविश्वांत नांव गाजविलें.

शतसंवत्सऱ्यांचा सध्यां मोसम आहे. टागोर, श्री. माडगांवकर, बॅप्टिस्टा, नाना शंकरशेट, लाला लजपतराय अशा निरनिराळ्या क्षेत्रांतील विभूतिमत्व पावलेल्या थोर पुरुषांचे नुकतेच शताब्दि समारंभ झाले. त्याच मालिकेंतील श्री. रामानंदबाबू. त्यांचा जन्म १८६५ चा. पश्चिम बंगाल्यांतील बंकूरा गांवचा. पूर्वज शिक्षक पेशांतले, हुशार आणि विद्वान्. धंदा 'टोळ' चालविण्याचा, संस्कृत विषय शिकविण्याचा. या कुटुंबांतील श्रीनाथ सरकारी नोकरींत शिरले आणि जेल अधिकारी बनले. श्रीनाथ व श्रीमती हरसुंदरी देवींचें सहावें मूल म्हणजे आपले हे रामानंद.

रामानंदाचें प्राथमिक शिक्षण चुलत्यांच्या 'टोळ' मध्यें झालें. नंतर एका बंगाली शाळेत छत्रिशितीचा पाठ झाला. पुढें जिल्हा हायस्कूलमध्यें मॅट्रिकपर्यंतचें शिक्षण. कुशाग्र बुद्धि, मोठी महत्त्वाकांक्षा आणि श्रम करण्याची विलक्षण आवड. यामुळें रामानंदनें पहिला नंबर सोडला नाहीं. शिष्यवृत्त्या अनेक. परीक्षेच्या निकालांत प्रथम श्रेणि ठरलेली. १८८९ त रामानंदनें इंग्रजी विषयांत एम्. ए. ची पदवी घेतली. विश्वविद्यालयीन विद्यार्थी असतांना त्यांनीं विश्वविद्यालयांतील विद्यार्थ्यांना शिकविलें. इतकी तीव्र विलक्षण झेंप. नोकरीची हांव नाहीं. खडतर सेवाव्रत पत्करण्याची संपूर्ण तयारी. म्हणूनच जीवनाची सुरवात समाजसेवेनें आणि नंतर शिक्षणक्षेत्रांत पदार्पण. दोन्हीहि क्षेत्रांत महनीय कामगिरी. पण गर्व नाहीं, अभिमान नाहीं. गाजावाजा न करतां काम करण्याची प्रवृत्ति.

आपल्याकडे जसा आगरकर, टिळक, रानडे, गोखले अशा अद्वितीय व्यक्तींचा समुच्चय बनून वाङ्मयीन, शैक्षणिक आणि राजकीय जीवनांत त्यानं आमूलाग्र क्रांति घडवून आणली, त्याप्रमाणें रामानंदजींच्या काळांत शिवनाथ शास्त्री, आनंद मोहन बोस वगैरे अनेक मंडळींच्या सहकार्यानें रामानंदजींनीं त्यावेळच्या बंगाल्यांत अनेक क्रान्त्या घडवून आणल्या. समाजसेवेचें असिधाराव्रत शेवटपर्यंत आचरलें. सामाजिक बाबतींत प्रागतिकपणा. धर्मबाबतींत ब्राम्हो समाजाचीं मूल्यें आणि समाजांत ज्ञानदीप तेवत ठेवण्यासाठीं वर्तमानपत्रें, मासिकें, पुस्तकलेखन सतत चालू ठेवणें असा अविरत, अव्याहत उपक्रम रामानंदजींनीं वयांत आल्याबरोबर चालू ठेवला होता.

वर्तमानपत्रकार आणि साहित्यिक या नात्यानें जो मान महाराष्ट्रांत नरसिंह चिंतामण उर्फ तात्यासाहेब केळकरांना व काकासाहेब खाडिलकरांना, तोच मान रामानंदजींचा बंगाली वाङ्मयांत; पण त्यांच्या 'मॉडर्न रिव्ह्यू'नें अद्भुत काम केलें. हिमालयाएवढें कार्य केलें. त्यामुळें रामानंदांची कीर्ति सातासमुद्रापलीकडे पोहोंचली. म्हणूनच त्यांना साहित्याचार्य, संपादक-महाशय अशा पदव्या बहाल करायला हरकत नाहीं.

त्यांनीं 'दासीश्रम' काढून गरीबांची सेवा केली. 'दासी' मासिकाच्या कमाईतून हा आश्रम चालविला. अंधासाठीं बंगाली ब्रेलभाषा शोधून काढली. पुढें उत्तर प्रदेशांत गेल्यावर अनेक समाजसंस्थांशीं संघटन राखून खूप समाजसेवा केली. त्यांचा आत्मा गरीबांसाठीं तिळतिळ तुटे. समाजसेवा ते व्रत समजत. देशासाठीं वाटेल ते कष्ट सोसण्याची त्यांची तयारी होती. प्राणपणानें लढायला ते सतत तयार होते. गांधीजींचें स्वदेशी व्रत पसंत नसूनहि त्यांनीं तें शेवटपर्यंत निस्सीमपणें पाळलें.

'धर्मबंधु' या बंगाली वर्तमानपत्रांत प्रथम लिखाण. नंतर त्या पत्राचें संपादकत्व. 'दासी' मासिकाचें धुरिणत्व. या मासिकांत पहिल्या पानापासून शेवटच्या पानापर्यंत सर्व मजकूर एकहार्ती लिहून काढणें. पुढें 'मुकूल' हें मासिक रामानंदजींच्या प्रेरणेनें सुरू झालें. हें मुलांचें आवडतें मासिक बनलें. ब्राम्हो समाजाच्या मूल्यांच्या तत्त्वप्रणालीचा रामानंदजींच्या मनावर इतका परिणाम झाला कीं, त्या ब्राम्हो तत्त्वज्ञानाचा प्रसार करण्यासाठीं काढलेल्या 'इंडियन मेसेंजर' या साप्ताहिकाचेहि ते सहसंपादक होते. १८९६ त ते बंगाली मासिक 'प्रदीप'चे संपादक झाले. १९०१ त बंगालींत अत्यंत लोकप्रिय आणि प्रागतिक असे 'प्रवासी' हें मासिक रामानंदजींनीं काढलें. या मासिकानें रामनंदजींची कीर्ति शिगेला पोहोंचविली. १९०७ मध्यें या जागतिक कीर्तीच्या मासिकाचा जन्म झाला. या मासिकानें रामानंदजींना त्रिखंड कीर्ति मिळवून दिली. कला, समाजकल्याण, राजकारण, तत्त्वज्ञान आदि गंभीर विषयांवर रामानंदजींनीं आपल्या अभिजात लेखणीनें नवें लेणें चढविलें. 'विशाल भारत' हें त्यांचें हिंदी मासिक. हें श्री. बनारसीदास चतुर्वेदी रामानंदजींसाठीं चालवीत. हिन्दी वाङ्मयांत या विशाल भारतानें दिगंत कीर्ति मिळविली.

टी. सुंदरलाल यांचें 'इंडिया इन बॉण्डेज' हें पुस्तक प्रसिद्ध करून त्यांनीं सरकारचा रोष आपणावर ओढून घेतला. विचारपूर्वक मतें बनविणें, आपलें चुकलें तर प्रांजळपणें कबूल करणें, स्वकीयांचे व परकीयांचे दोष दिसले तर त्यांवर टीकाप्रहार करणें, योग्य वाङ्‌मयकारांना अथवा कलावंतांना प्रोत्साहन देणें, मनापासून मदत करणें, त्यांचें मार्गदर्शन करणें, सत्य, समता व सत्‌कर्तव्य या त्रयीची कास धरून मानवजातीची सेवा करणें हें रामानंदजींचें ध्येय होतें.

शिक्षणक्षेत्रांतहि त्यांनीं पदार्पण केलें तें आपल्या सिटी कॉलेजांत आचार्य बनून. पुढें ते अलाहाबाद येथें 'कायस्थ' पाठशाळेचे प्राचार्य म्हणून गेले. रवींद्रनाथ टागोर त्यांचे सन्मित्र. त्यांनीं रामानंदजींना शांतिनिकेतनाचे प्राचार्य म्हणून बोलाविलें. आपुलकीच्या भावानें ते टागोरांकडे गेले. त्यांच्या काव्यमय हृदयाला विहरण्यासाठीं शांतिनिकेतनचें काव्यमय वातावरण योग्य होतें. त्यांच्या शैक्षणिक तत्त्वांचे प्रयोग तेथें त्यांना करतां आले. गायन, नर्तन, चित्रकला, शिल्पकला या बाबतींतहि त्यांना उत्स्फूर्त आवड होती. नामवंत कलावंतांना त्यांनीं प्रोत्साहन दिलें. त्यांचा स्नेह जोडला. रवींद्रनाथ टागोर, नंदलाल बोस, ओ. सी. गंगोली, देवीप्रसाद रॉय चौधरी हे जागतिक कीर्तीचे कलावंत रामानंदांकडे स्नेहादरानें पाहात. आस्तिक्यानें त्यांनीं दिलेल्या सूचना आत्मसात्‌ करीत. स्वतः चित्रकार, शिल्पकार नसतांनाहि रामानंदजींनीं आपल्या लेखणीच्या द्वारें बंगाली कलेला फार वरचें स्थान दिलें.

रामानंदजींच्या जीवनांतील परमानंद म्हणजे रवींद्रनाथ टागोरांचा परमस्नेह. रवींद्रनाथ हा त्यांचा विठ्ठल, कृष्णसखा. वास्तविक दोघांचेहि स्वभाव एकमेकाला विरोधी. गरूडाची भरारी. काव्यमय कल्पनेच्या वारूवर आरूढ होऊन रवींद्रनाथजी निघाले कीं ते निमिषार्धांत तिन्ही विश्वांची यात्रा करून येत, पण शांतिनिकेतनच्या बाबतीत त्यांचें धोरण व्यवहारी. शांतिनिकेतन ही संस्था म्हणजे कवीची. पण तेथील रोजचा व्यवहार हिशेबी वृत्तीला धरून. उलट रामानंदजी तसे पृथ्वीवर पाय टाकून बसलेले; पण मूल्यें फार उंच आणि डोकें ढगांत. जेव्हां कलकत्ता विश्वविद्यालयाबरोबर शांतिनिकेतन संलग्न करण्याचा विचार निघाला तेव्हां रामानंदजींना तें जोखड वाटलें तर कविराजांना वाटलें प्रतिष्ठा वाढविण्याचें साधन. कविराज

रामानंदजीला म्हणाले, थोडें सबूरीनें घ्या. तर रामानंदजी ताडकन् म्हणते झाले, 'आपल्याला कलकत्ता विश्वविद्यालयाला शांतिनिकेतन जोडायचें असेल, तर माझा राजीनामा घ्या.' अशी ही खवळाखवळ नेहमींचीच. कविराज तडजोडीकडे. तर रामानंदजी तट् की फट् करणारे. एक घाव दोन तुकडे. या दोन विभूतींच्या विरोधांत मात्र आंतून प्रेमाचा झरा सतत वाहत होता.

रामानंदजी तसे पट्टीचे राजकारणी नव्हते. पण विश्वास हिंदुत्वावर–हिंदु संस्कृतीवर. म्हणूनच दोनदां हिंदुमहासभेचे ते अध्यक्ष झाले. कविमहाशयांनीं विचारलें, 'हें असें कां ?'

रामानंदजींनीं लगेच उत्तर दिलें, 'आंतला आवाज'. ज्या तत्त्वप्रणालीवर एकदां विश्वास बसला ती प्राण गेला तरी सोडायची नाहीं. हा खाक्या और होता. पण त्यामुळें कवि–संपादकांच्या मैत्रींत फरक पडला नाहीं. बाध आला नाहीं. त्यांची मैत्री कायम टिकली. रामनदांचें प्राणोत्क्रमण झालें तेव्हां 'राम राम' हे शब्द तोंडाबाहेर पडले नाहींत. 'रवींद्र रवींद्र' हें नांव घेत त्यांनीं प्राण सोडला.

लहानपणीचे अत्युत्तम संस्कार. युवक या नात्यानें बुद्धीचा विलास आणि देशसेवेची विलक्षण हाव. मध्यवयांत अनेक कार्यांत निमग्न असतां विचारवंतांच्या वृत्तीनें वागणें, साधनेवर संपूर्ण विश्वास. आपलीं मतें स्वत:च्या मनानें तयार झाल्यावर निर्भीडपणा. देश, शिक्षण, आणि पीडलेली प्रजा या त्रयीची अखंड सेवा, चतुरस्र बुद्धि आणि उत्तम वाङ्मयाचें इंग्रजींत, हिंदींत, बंगालींत प्रसाधन. वृद्धपणांत दृष्टि योग्याची, निरासक्त जीवन आणि निरलस सेवावृत्ति, मानसिक संतोष.

रामानंदजींचें जीवन म्हणजे एका सत्त्वपूर्ण, प्रतिभासंपन्न महायोग्याचें जीवन. त्यांनीं चुका केल्या त्या प्रांजळपणें कबूल केल्या. त्यांचें कार्यहि हिमालयाच्या उत्तुंग शिखराला पोहोंचेल एवढालें. त्यांनीं मागें ठेवला आहे उत्तम साहित्याचा सुगंध आणि सौरभ.

* * *

# श्री जगन्नाथ उर्फ नाना शंकरशेट

**: ३ :**

जगन्नाथ ऊर्फ नाना शंकरशेट म्हणजे अस्सल मुंबईकर. त्यांनीं मुंबईसाठीं तन, मन, धन अर्पण केलें. हिंदूचें सोनापूर त्यांनीं बांधलें. सोनापूरला लागून त्यांनीं भिंत बांधली. नाहीं तर हें सोनापूर ब्रिटिश राज्यकर्त्यांनीं कोठें फेकलें असतें हें सांगणें कठीण. गवालिया टँक आणि ग्रँट रोडचा मधला भाग याला नानांचा चौक म्हणतात. तेथेंच नानांनीं स्थापन केलेलें देऊळ आहे. तेथें हजारों लोक देवदर्शनासाठीं जातात. नानांच्या ईश्वरनिष्ठेचें तें स्मारक आहे. नानांच्या वेळच्या सामाजिक, राजकीय, धार्मिक व शैक्षणिक चळवळींवर नानांचें नांव लिहिलेलें आहे. त्या वेळची अशी एकहि बाब नाहीं कीं, जीवर नानांचा संस्कार नाहीं – मुलामा नाहीं. सुवर्णकार ज्याप्रमाणें

एकादा सुंदर अलंकार करतांना आपलें सर्व कौशल्य त्यांत ओततो, त्याप्रमाणें नानांनीं जातिवंत सुवर्णकाराच्या अभिजात कौशल्यानें त्यांच्या वेळची मुंबई घडविली. इतिहासांत नाना फडणवीस होऊन गेले, नानासाहेब पेशवे होऊन गेले, इतरहि क्षेत्रांत अनेक नाना होऊन गेले, पण आमचे मुंबईकर नाना एकच. ते म्हणजे जगन्नाथ ऊर्फ नाना शंकरशेट.

माझ्या लहानपणची माझीं दैवतें दोन. एक नाना व दुसरें एम्. आर्. जयकर. पालव–रोडवर नानांचा भव्य प्रासाद आणि जयकरांचा टुमदार बंगला. माझें घर जवळच गायवाडींत. येतां-जातां मला जयकर दिसावे म्हणून आमच्या वाडींतल्या हनुमानाला एक पैची खडीसाखर मी लांच म्हणून देण्याचें वचन देत असे. जयकराचा तो रूपवान्, रुबाबदार चेहरा पाहिला, त्यांची नटलेली–सजलेली मूर्ति पाहिली, त्यांचा काळा चष्मा वापरल्यामुळें प्रत्यहीं प्रभावी झालेलें व्यक्तित्व पाहिलें कीं, मन भरून येत असे. आणि वाटे आपण 'जयकर' व्हावें. नाना शंकरशेटचे चिरंजीव रावजी शेट आपल्या दोन घोडयांच्या गाडींत बसून फेरफटक्यास निघाले, आणि नानांच्या भव्य प्रासादाकडे अनिमिष नेत्रांनीं पाहिलें कीं, वाटे या भव्य प्रासादांत राहाणाऱ्या नानांच्या भव्य मूर्तीनें मुंबईसाठीं, महाराष्ट्रासाठीं, भारतासाठीं किती मोठें कार्य करून ठेवलें आहे? नानांना शंभर वर्षें परवां परवां पुरीं झाली. पण आजहि 'नाना' मुंबईच्या हवेंत, परिसरांत, कणाकणांत हजर आहेत असें वाटतें.

ईस्ट इंडिया कंपनीची आमदानी सुरू झाली होती. अशा वेळीं नानांचा जन्म १८०३ सालीं झाला. माता लहानपणीं वारली. त्यामुळें वडील शंकर-शेट यांनीं मातेच्या वात्सल्यानें आणि वडिलांच्या कर्तव्यतत्परतेनें नानांचें पालन केलें. १९ व्या वर्षी नानांचे वडील वारले. ज्या वयांत जवानीनें मुसमुसलेल्या युवकानें आपल्या वयाच्या तरुणांबरोबर मौज, मस्ती आणि मारामाऱ्या करण्यांत वेळ घालवायचा, त्या ऐन तारुण्यांत घरची जबाबदारी येऊन पडली आणि ती त्यांनीं मोठ्या चातुर्यानें, कुशलतेनें संभाळली.

नानांचें महनीय कार्य शिक्षणक्षेत्रांत. त्यावेळचा गव्हर्नर मौंट स्टयूअर्ट एलफिन्स्टन यांच्याशीं सहकार्य करून सार्वजनिक स्वरूपाचें विद्यालय

काढण्यांत त्यांनीं पुढाकार घेतला. मुलींचें शिक्षण झालें पाहिजे हा नानांचा आग्रह. आपल्या पालवरोडवरील प्रासादाच्या मागच्या बाजूला बंगलीत त्यांनीं मुलींची प्राथमिक शाळा काढली व त्याला जोडून स्टूडंट्स सायन्टिफिक आणि लिटररी सोसायटी ही मुलींची इंग्रजी शाळा सुरू झाली. ही शाळा पुढें कमळाबाईची शाळा म्हणून प्रसिद्धीस आली. कारण श्रीमती कमळाबाईनें ती नवरोजी लेन ठाकूरद्वार येथें उत्तम रीतीनें चालवून नांवारूपाला आणली. ही शाळा आपल्या स्वतःच्या इमारतींत आजहि मुलींच्या शिक्षणाचें कार्य करीत आहे. मराठी या मातृभाषेंत महाराष्ट्रांतील महाराष्ट्रीयांचें शिक्षण व्हावें हें नानांचें त्यावेळचें प्रागतिक मत. तसेंच संस्कृताचेंहि यथायोग्य शिक्षण दिलें गेलें पाहिजे असें त्यांचें म्हणणें. कारण भारतीय संस्कृतीशीं संस्कृतचें नातें आहे ही नानांची श्रद्धा. त्यांच्या संस्कृतप्रेमाचें स्मरण राहावें म्हणूनच, त्यांच्या चिरंजीवांनीं कै. नानांच्या स्मरणार्थ मुंबई विद्यापीठांत दोन 'नाना शंकरशेट संस्कृत शिष्यवृत्त्या' ठेवल्या आहेत. या संस्कृत शिष्यवृत्त्या मिळविण्यासाठीं महाराष्ट्रांत इतकी चुरस होते कीं पुसूं नका. या शिष्यवृत्त्या मिळविणाऱ्यांत शिवराम महादेव परांजपे, वामन दाजी ओक, महादेव मल्हार जोशी, सेनापति बापट, डॉ. चिंतामणराव देशमुख, श्रीमती सुलभा पाणंदीकर अशीं कांहीं नामवंत नांवें आहेत. मातृभाषा, संस्कृतभाषा यांबद्दल नानांना जितकी तळमळ आणि कळकळ तितकेंच त्यांना राष्ट्रभाषेबद्दल अत्यंत आस्तिक्य. शिवरायांचें स्वराज्य अस्त पावलेलें आणि आजच्या स्वातंत्र्याची पुसट कल्पनाहि नाहीं अशा वेळीं द्रष्टेपणानें राष्ट्राला भावी काळांत काय पाहिजें याचा विचार करणारे नाना एकमेवच.

नानांनीं ज्या मुंबईंत ज्ञानाचें रोपटें लावलें तें वाढत जाऊन त्याचा आज महावृक्ष झाला आहे. जे. जे. स्कूल ऑफ आर्टस्, एलफिन्स्टन कॉलेज, स्टूडंट्स सायंटिफिक अँड लिटररी सोसायटी, मेडिकल कॉलेज वगैरे त्या वेळीं निघालेल्या संस्था आजहि शिक्षणाचें विधायक कार्य करीत आहेत व त्यांच्या गाभ्यांतून आज अनेक नवीन विद्यालयें निर्माण झालीं आहेत व होत आहेत. मुंबईचें महानशीब म्हणून शिक्षणाची बाग लावणारे पहिले अभिजात बागवान नाना शंकरशेट मुंबईला मिळाले व त्यांनीं लावलेल्या बागेचें आज मुंबईंत महाविशाल शैक्षणिक नंदनवनांत रूपांतर झालें आहे.

सामाजिक बाबतींत नाना स्वसंस्कृतीला न विसरणारे पण प्रागतिक स्वरूपाच्या नव्या सुधारणा स्वीकारणाऱ्यांपैकीं होते. म्हणूनच परदेशीय राज्यकर्त्यांकडून कांहीं संस्कारक्षम व सुसंस्कृत प्रमेयें त्यांनीं उचललीं; पण ख्रिचन लोकांच्या धर्मोपदेशकांनीं जेव्हां दोन पारशी व दोन हिंदु मुलांना धर्मांतर करण्यास फूस लावली तेव्हां जांभेकर शास्त्र्यांबरोबर ते राज्य-कर्त्यांशीं लढले-झगडले. राज्यकर्त्यांकडून त्यांनीं वचन घेतलें कीं धर्माच्या बाबतींत सरकारचें धोरण अलिप्तपणाचें राहील; इतकेंच नव्हे तर ज्या हिंदु मुलांनीं धर्मांतर केलें होतें त्यांना पुन्हां हिंदुधर्मांत घ्यायला कांहीं हरकत नाहीं असा त्यांनीं जांभेकरशास्त्र्यांना हाताशीं धरून दावा धरला. केवढें हें मनोधैर्य ! केवढा हा महाप्रताप ! खूप विचार केला कीं असें वाटायला लागतें कीं, नाना हे आपल्या आजच्या प्रागतिक युगाच्या अगोदर जन्माला आले होते. त्यांची दृष्टि बुरसटलेली, बुजलेली नव्हती. हिंदु धर्मांतील सनातनीपणा त्यांच्यांत नव्हता. पण हिंदुधर्माचा त्यांना यथायोग्य अभिमान होता.

नानांची शैक्षणिक कार्याइतकीच महनीय कामगिरी म्हणजे राजकीय होय. एतद्देशीय राज्य विलय पावलें होतें. नवें राज्य परदेशीय. पाश्चात्यांचें होतें. पण एतद्देशीय लोकांचें अधिकारहक्क काय याची नानांना योग्य कल्पना होती. म्हणूनच आपल्या वेळच्या सर्व जातींच्या, धर्मांच्या लोकांबरोबर विचारविनिमय करून त्यांनीं २६ ऑगस्ट १८५२ मध्यें 'बॉंबे असोसिएशन ही संस्था स्थापन केली. तिचें रूपांतर पुढें ' बॉंबे प्रेसिडेन्सी असोसिएशन'-मध्यें झालें व आजची कॉंग्रेस यांतूनच निर्माण झाली. नवीन राजवट सुरू झाली असतां निर्भयवृत्तीनें नानांनीं आपले सहकारी डॉ. भाऊ दाजी लाड, दादाभाई नौरोजी वगैरे लोकांच्या मदतीनें आपलेकडे राजकीय नेतृत्व पत्करून प्रजेच्या हक्कांची पायमल्ली होऊं दिली नाहीं. परचक्राची गदा देशावर गुदरली असतांना स्वातंत्र्याच्या बीजांचें सिंचन त्यांनीं केलें आणि त्यांच्या या महत्कार्यामुळें 'स्वराज्याचा हक्क' भारतीयांच्या मनांतून लोपला नाहीं आणि विसाव्या शतकांत 'चले जाव' म्हणून ब्रिटिशांना साता समुद्रा-कडे लोटून आम्हांला स्वातंत्र्याचा झेंडा भारतांत फडकवतां आला. जिवंत-पणीं स्वतःचें स्मारक मुंबईच्या टाऊनहॉलमधील पुतळा स्वतःच्या डोळयानें

पहाणारा हा अस्सल मुंबईकर १८६५ त वयाच्या ६२ व्या वर्षी वारला. एक महायोगी पंचमहाभूतांत विलीन झाला.

नानांचें सर्व जीवन समृद्ध, कार्यमय आणि विशाल यश मिळविण्यांत गेलें. तरी पण त्यांच्यावरहि साडेसातीचा फेरा आला. १८५७ च्या बंडाचा पुकारा झाला आणि नानांवर गंभीर आरोप झाला कीं बंडखोरांना त्यांची फूस आहे. प्रवाद वाढत चालला. शत्रूंनीं नानांचा निःपात करण्यासाठी आपले अजस्र पंजे पुढें सरसाविले, पण नानांनीं सिंहगर्जना केली कीं "माझेवरचे आरोप सिद्ध करा. मी कठोर शिक्षा भोगायला तयार आहें". ती भीष्माची भेरी मुंबईत दुमदुमली, भारतांत निनादली. नानांच्या विरुद्ध असलेलें वातावरण निवळलें. नियतीनें नाना निर्दोष आहेत हा निर्वाळा दिला. नानांचा तो मोठ्यांतला मोठा जय होता.

नानांचा विशाल देह, तेजःपुंज चेहरा, प्रभावी व्यक्तित्त्व यांचें दर्शन घेतलें कीं असें वाटतें कीं, हा मुंबईचा महाभाग महाकर्मयोगी असावा. मुंबईच्या उद्धारार्थ त्यांचा जन्म असावा. नानांचा विशाल भालप्रदेश, अणकुचीदार नाक, भेदक डोळे आणि रुबाबदार मिशा त्यांच्या राजयोगित्वाची साक्ष देतात. त्यांच्या राजबिंड्या व्यक्तिमत्वाची छाप त्यांच्या देशबांधवांवर, राज्यकर्त्यांवर ठासून पडत असणार. नानांचा जन्मच हुकूम देण्यासाठीं होता. अधिकार भोगण्यासाठीं होता. खऱ्या अर्थानें ते 'लोकनेते' होते. नानांनीं आपल्या 'नाना कळा' दाखवून 'नानाविध' क्षेत्रांत खूप मोठें कार्य इंग्रजांच्या कारकीर्दीच्या प्रारंभाला केलें नसतें तर आजचा स्वातंत्र्याचा सुवर्णदिन आम्हांला अजूनहि पहायला मिळाला नसता.

म्हणूनच नाना मुंबईकरांचेच नाहींत तर ते अखिल भारताचे आहेत. आणि म्हणूनच त्यांची शंभरावी पुण्यतिथि भारतांत सर्वत्र साजरी होत आहे.

* * *

# प्रा. अनंत काणेकर

: ४ :

आमच्या मुंबईंत अनेक साहित्यिक आहेत. प्रत्येकाची तऱ्हा वेगळी. प्रत्येकाची लेखनाची रीत न्यारी. प्रत्येकाच्या विद्वत्तेची धारहि निराळी.

भारतरत्न डॉ. पां. वा. काणे घ्या. गाढ विद्वत्ता पण कमाल. प्रचंड कार्य पण संपूर्णतः प्रसिद्धिविन्मुख. कै. प्रा. कृ. पां. कुलकर्णीची वृत्ति संथ व धीरगंभीर. संशोधनाकडे विशेष कल. स्वतःबद्दल घमेंड नव्हती गर्व नव्हता कीं अहंमन्यता नव्हती. मामा वरेरकर मिष्किल खरे. भांडण उकरून काढण्यांत तर तरबेज, अवाच्या सवा बाता मारतील, पण वाङ्मय कसें नमुनेदार, घोटीव आणि प्रासादिक. अत्रेहि आतां मुंबईकरच. हास्याचा, विनोदाचा धबधबा. खट् केलं तर फट् म्हणतील. खिळाडू वृत्ति. वाङ्मयाच्या बहुतेक दालनांत अग्रेसरत्व. ह. रा. महाजनी घ्या. अबोल, अंतर्मुख आणि थोडेसे अरेरावी. लिखाणांत गांभीर्य जास्त. आणि आमचे प्रो. अनंत काणेकर कसे आहेत म्हणाल तर खेळकर, गोड आणि अजातशत्रु.

अनंत काणेकरांचें बालपण खडतर गेलें आहे. मीं तरुण वयांत त्यांना पाहिलें, त्यावेळीं ते प्रार्थना समाज समोरच्या कॉन्ट्रॅक्टरच्या चाळींत तळ-मजल्यावर मामा कुलकर्णीच्या हॉटेलमागें एका खोलींत राहत असत. त्यांची आई, मामा, मामी व मामांची एक चुणचुणीत पोरगी एवढें त्यांचें कुटुंब. आई नर्सचें काम करी. साधी पण करडी बाई. काणेकरावर तिचें अमर्याद प्रेम. धाकहि तितकाच.

मामांच्या हॉटेलच्या बाजूलाच खोली असल्यामुळें काणेकरांनीं मामांचीं अस्सल, खमंग व लज्जतदार बटाटा व कांदा भजीं भरपूर खाल्लीं असणार. त्यामुळेंच त्यांना तैलबुद्धि लाभली व त्यांच्या हातून चुरचुरीत मसालेदार नखरेल वाङ्मय लिहिलें गेलें असावें, असा त्यांच्या बरोबरच्या सहाध्यायांचा कयास आहे.

त्यावेळीं अनंत काणेकरांचें मित्रमंडळींतील नांव 'भावड्या' असें होतें. त्यांचे जिवश्चकंठश्च मित्र म्हणजे नारगोळकर. मोठा रुबाबदार, खट्याळ माणूस. पण मनाचा मोठा भला. आज त्यांनीं निष्णात वकील म्हणून चांगलें नांव कमावलें आहे. काणेकरांचे दुसरे उत्तम मित्र श्री. परूळकर. हे मला वाटतें, जज्ज म्हणून पुढें खानदेशांत वावरले. गृहस्थ चारुदत्ती थाटाचा आणि गोड वृत्तीचा. आजचे न्यायमूर्ति श्री. तांबे हे पण काणेकरांचे जानी दोस्त. साठे राजसी गृहस्थ. थाटमाट न्यारा, खर्च जगावेगळाच. मिजास माल-गुझाराची. असे होते अनंत काणेकरांचे अगदीं जवळचे सवंगडी.

पुढें कॉलेजांत त्यांचा खं. सा. दौंडकर, के. नारायण काळे, प्रा. वि. ह. कुलकर्णी वगैरे लोकांबरोबर परिचय झाला. फार सलगी नाहीं, दोस्ती नाहीं. पण ह्या लोकांशीं चांगलें नातें होतें यांत शंका नाहीं.

सेंट झेवियर कॉलेजांत प्रा. काणेकरांची गणना हुशार मुलांत असायची. आपला अभ्यास बरा आणि आपण बरे ही वृत्ति असायची. कविता उत्तम लिहावयाचे. ती वर्गबंधूंना खूप आवडायची. वर्गभगिनी तर बेहद्द खूप असायच्या काणेकरांच्या कवितेवर. त्यांच्या तंत्रशुद्ध गोष्टी मात्र थोड्या खटकायच्या. कळायला कठिण जायच्या. पण कविता चांगल्या ना? मग त्यांचें गद्यहि चांगलें असावेंच असा फोल हट्ट त्यांच्या कांहीं मित्रमैत्रिणींचा

२।३५६

होता. त्यांनीं जीं प्रवासवर्णनें लिहिलीं आहेत. तीं अत्यंत चवदार आणि खुमासदार आहेत. त्यांची गोडी अवीट आहे.

अनंत काणेकर कॉलेजांत असतांना थोडे लाजाळू, भिडस्त असे वाटत. त्यांच्या बुद्धिमत्तेची चमक त्यांच्या चेहेऱ्यावर दिसायची. सगळ्यांकडे सस्मित बघायचं, थोड्या लोकांशीं चांगला स्नेह ठेवायचा, नसत्या उठाठेवींत पडायचं नाहीं. नाहीं माहीत मस्करी कीं, नाहीं माहीत अतिरेक. बराचसा संयम, अभ्यासाबद्दल एकनिष्ठता आणि लवकर एकदां विश्वविद्यालयीन अभ्यास संपवून कांहीं तरी पेशा पकडण्याची धडपड. काणेकरांची झुकांड होती वकिलीकडे. पण दैवानें केलें त्यांना प्राध्यापक.

त्यावेळचे काणेकर आणि आजचे ५६–५७ वर्षांचे काणेकर यांत फारसा फरक नाहीं. फक्त केस पिकले आहेत. दांतहि मला वाटतें अधू असावेत. तरुणपणीं काणेकर काळेसावळे दिसायचे. केस काळेभोर, तोंडावर थोडें पुसट पुरळ, राठसर ओठ, बोलण्याची धाटणी घरगुती. पल्लेदारपणा नाहीं कीं ललकार नाहीं. बोलतांना नर्म हास्याची भिंगरी वाजायची. चेहरा रुबाबदार. नाक दबलेलें आणि डोळ्यांत बराच मिष्किलपणा, ज्ञात्यपणा आणि नखरेलपणाहि.

कॉलेज सुटल्यानंतर त्यांची धडपड सुरू झाली. कांहीं वर्षं इथंतिथं, हें तें करण्यांत गेला. सुरेखा नांवाच्या मुलीशीं लग्न झालें. थोडे दिवस दादर येथें संसार थाटला. यावेळीं अशा कांहीं घटना झाल्या असाव्यात कीं, त्यामुळें काणेकरांना दुःखाची झळ लागली असली पाहिजे. सुरेखाबाई एकाएकीं वारल्या. त्याचा काणेकरांच्या संस्कारक्षम मनावर परिणाम झाला असणार. ह्या धडपडींतून, दुःखांतून त्यांचें नवें व्यक्तित्व विकसलें.

त्यानंतर त्यांनीं वाङ्मयांत नांव कमावलें. त्यांची कविता सर्वत्र लोकप्रिय झाली. श्री. मो. ग. रांगणेकर यांच्याबरोबर संपादकीय काम केलें. त्यांच्या नांवाचा बोलबाला होऊं लागला. कु. दीक्षित या गृहितागमेशीं दुसरें लग्न केलें. प्राध्यापक म्हणून सिद्धार्थ कॉलेजांत नेमणूक झाली. जीवन संथपणें सुरू झालें. तसेंच तें संथपणें आज चालू आहे. काणेकरांच्या स्वभावाला धकाधकीचा मामला पसंत पडणार नाहीं. नवीन प्रयोग करण्याकडे त्यांची

वृत्ति नाहीं. सौ. काणेकर त्यांना उत्तमपैकीं गृहसौख्य देतात. काणेकर तसे अल्पसंतुष्ट असल्यामुळें प्राध्यापकाच्या जीवनांत त्यांना आपलें सारसर्वस्व मिळालें आहे. घरीं सुखी, व्यवसायांत सुखी, जगांत चांगली मानमान्यता. त्यांच्या मुली चांगल्या घरीं पडल्या. गृहस्थाश्रमी माणसाचें हें आदर्श चित्र आहे. काणेकरांचा संसार खरोखरीच आदर्श आहे.

काणेकरांचीं राजकीय, सामाजिक, वाङ्मयीन मतें, प्रमेयें, मूल्यें आहेत. पण त्यांत आग्रहीपणा नाही. आततायीपणा नाहीं. सगळा प्रकार खेळीमेळीचा. त्यामुळें उत्तर ध्रुवापासून दक्षिण ध्रुवापर्यंत सर्वांशीं समन्वय, संघर्ष व सहवास. भांडण नाहीं, तंटा नाहीं. गैरसमज नाही, हेवेदावे नाहींत, उखाळ्यापाखाळ्या नाहींत, कांहीं नाहीं. काणेकरांबरोवर आमचा वाद हा आहे कीं ते कोणाशींहि वाद करीत नाहींत. कोणाशीहि त्यांचा गैरसमज तो नाहीं. इतका समज त्यांच्यांत कसा आला हेंच मुळी कळत नाहीं. त्यांचं विश्वबंधुत्व मोठं अजब वाटतं, पण तें तसं आहे हें मात्र खरं.

हेंच पहा, त्यांचे सहाध्यायी कधींहि कितीहि वर्षांनीं भेटले तरी काणेकर त्यांना एकेरी नांवानें हटकल्याशिवाय राहणार नाहींत. आपुलकीनें दोन शब्द बोलल्याशिवाय पुढें जाणार नाहीत. एकदां तुमची ओळख झाली तर सहसा तुम्हांला विसरणार नाहींत. तुम्ही चहाला, जेवायला, गप्पांना बोलवा. जरूर येतील. नाहीं तर मोठ्या अदबीनें नाहीं म्हणतील. वागण्यांत उपजतच एक प्रकारची सुजनता आहे. कोणालाहि दुखवणें कठीण वाटतें या भल्या गृहस्थाला.

सर्वांत दोष असतातच. त्याप्रमाणें काणेकरांमध्येंहि आहेत. ते व्यासंगी नाहींत. पण त्यांची जी थोडीथोडकी पुंजी आहे ती डौलानें, ऐटदार पद्धतीनें वापरतात. ते खर्चाळू नाहींत. हात राखून राहणी, हें त्यांचें वैशिष्ट्य आहे. थोडा ऐटपणा त्यांच्या सटीला पूजला आहे. त्यामुळें अवाच्यासवा मेहनत ते करणार नाहीत; पण म्हणून त्याच्यांत कामचुकारपणा नाहीं. खाण्यापिण्याच्या बाबतींत त्यांना धरबंद नाहीं. पण स्वतःचा स्थायीभाव संयमाचा आहे. जबाबदाऱ्या अंगावर घेतील, पण जबाबदाऱ्यांच्या आहारीं जाणार नाहीत. भावनात्मक स्वभाव असूनहि भावनेच्या आहारीं जाणार नाहींत.

असा मोठा अजब स्वभाव आहे काणेकरांचा. हा कमावलेला स्वभाव नव्हे, उपजतच आहे. माणूसघाण्या नव्हे, पण माणसांशीं अति लाघवीपणा

नाहीं. लोचटपणा नाहीं. आपलें कल्याण कशांत आहे हें जाणण्याची अजब लकब स्वयंभू आहे. सर्वच कारभार सौम्य, सात्त्विक व सोज्वळ असा आहे.

प्रा. काणेकरांना दैववान् म्हणावेंच लागेल. नाजुकसाजुक, कलात्मक विशिष्ट प्रकारचें वाङ्मय त्यांनीं लिहिलें; पण कीर्ति अफाट मिळाली. सभा, साहित्य परिषदा आणि संमेलनांचीं अध्यक्षपदें त्यांच्याकडे चालत आलीं. काणेकर करडे वक्ते नव्हेत. बोलतील तें मोजकें, माफक आणि मजेदार. जगांत सर्वकडे फिरण्याची संधी त्यांना मिळाली आहे. त्यांतून त्यांचें भटक्या जीवनावरील जिवंत आणि जातिवंत वाङ्मय निर्माण झालें आहे. सरकारी, बिनसरकारी कमिटयांवर, अकादमीवर ते सारखें काम करीत आहेत. ५६–५७ पर्यंत जर हा मान तर म्हातारपणापर्यंत कसें काय याचा कयास केला तर असें वाटतें कीं, आमचा कालचा ' भावड्या ' उद्यांच्या जगांत राज-सभेंतहि जाऊन बसेल अथवा साहित्य अकादमीचा अध्यक्ष बनेल अथवा महाराष्ट्रांत होणाऱ्या नव्या ललितकला अकादमीचा सन्मान्य सभासद बनेल. प्रसिद्धि, मानसन्मान, मानाचे हारतुरे आणि गजरे त्यांच्या पायांशीं आणून पोहचविण्याचें सामर्थ्य त्यांचे कुंडलींत आहे याबद्दल शंका नाहीं.

कोणतीहि व्यक्ति कां, कशी व केव्हां पुढें येते हें सांगणें कठीण. कांहीं व्यक्ति पुढें येतात याचें कारण त्यांच्यांतील मोठेपणा. कांहीं व्यक्ति समाजांत प्रभावी ठरतात याचें कारण त्यांच्यांतील चांगुलपणा. कांहीं ना कांहीं वैशिष्टय असल्याशिवाय, वैयक्तिक गुण असल्याशिवाय माणूस पुढें येऊं शकत नाहीं. काणेकरांमध्यें अजातशत्रुत्व आहे. सर्वांशीं प्रेमानें वागण्याची कला आहे. मौलिक वाङ्मय लिहिण्याची ऊर्मि आहे. मोठेपणा आणि चांगुलपणा यांचा सुंदर मिलाफ आहे. म्हणूनच प्रा. काणेकर हे एकमेव प्रा. अनंत काणेकर आहेत. आजच्या मराठी वाङ्मयीन प्रभावळींत त्यांच्यासारखा दुजा सुस्वभावी, सुसंस्कृत आणि संस्कारक्षम साहित्यिक मिळणें कठीण आहे.

* * *

# शेठ वालचंद हिराचंद

: ५ :

उंच देहयष्टि पण पहाडी नव्हे. वर्ण काळासांवळा पण सुबक. डोळयांचें तेज लोकांवर प्रभाव पाडणारें. उत्तम शेतकरी जसा जमीन नांगरतांना शेतांत सरळ वाह्या मारतो तशी सरळ, स्पष्ट विचारांची व्यक्ति म्हणजेच वालचंद हिराचंद.

डोकीवर पांढरा फेटा. अंगांत पांढरा डगला. स्वच्छ धोतर. थोडा मराठी थाट. थोडा गुजराथी पेहराव. मराठयांचा ताठरपणा, गुजराथ्याचा लवचिकपणा व व्यवहारचातुर्य—यांचें मनोज्ञ मिश्रण, दृढनिश्चयी, विलक्षण आत्मविश्वासी आणि लाथ मारीन तेथें पाणी काढीन ही बेडर वृत्ति !

त्यांच्याच शब्दांतलें वालचंदशेटजीचें हें चित्र पहा—

" मी त्या दिवसाची वाट पाहात आहें, कीं ज्या दिवशीं भारतीय बनावटीच्या मोटारगाडया, ट्रामगाडया, आगगाडया, आगबोटी, विमानें, वाहतुकीचीं विविध साधनें, इंजिनें, विद्युत्साहित्य अन् परदेशांतून आणाव्या

लागणाऱ्या हजारों वस्तु येथल्या येथें निर्माण होत असलेल्या मला दिसतील... .."

द्रष्टया माणसाचें, साहसी व्यक्तीचें, उद्यमशील उद्योगपतीचें हें ध्येयवाक्य होतें. त्यांनीं तें आपल्या हयातींत खरें करून दाखविलें. वालचंद ग्रुप ऑफ इंडस्ट्रीज म्हणजे अनेक महान् कंपन्याचें एक जाळें आहे. या उद्योगसंघाकडून घरांपासून तो जहाजा-विमानांपर्यंत बांधणीचें काम होतें. मोटारपासून तो मशीनपर्यंत उत्पादन होतें. बोरघाटापासून तो मोठमोठाल्या धरणापर्यंतचें सारें बांधकाम होतें. साखरेपासून पेपरमिंटापर्यंत अनेक वस्तूंची निर्मिति होते. आणि या साम्राज्याचा लोकशाही बादशहा होता--वालचद हिराचंद. लोकशाही म्हणायचें कारण वालचंदजींनीं माणसें निवडलीं तीं गुणी; तंत्रज्ञ—यंत्रज्ञ नेमले ते आपापल्या क्षेत्रांत अत्यंत निष्णात. आपल्या अधिकाऱ्यांना स्वतंत्रता दिली. त्यांच्यावर जबाबदारी टाकली. प्रकल्प तयार केले ते बिन-बोभाट. व्यापारांत आघाडी मारली ती मजल दरमजल करीत. पण केव्हां केव्हां गरुडाच्या वेगवान् गतीनें. जबाबदाऱ्या स्वीकारल्या व त्या सांभाळायला सहकारी निर्माण केले. शीघ्रगतीनें निर्णय घेतले. शिताफीनें कामें उरकलीं. शिस्तीनें, सुयंत्रणतेनें आणि सुव्यवस्थेनें महान् प्रकल्प सहजलीलेनें पार पाडले. ' साहसे श्रीः प्रतिवसति ' हें वालचंद औद्योगिक समूहाचें ब्रीदवाक्य आहे. वालचंद म्हणजे साहस. साहस म्हणजे वालचंद.

हिंदुस्थान कन्स्ट्रक्शन कपनीचा कारभार द्या. बॅनर्जी नांवाच्या एका साधारण शिकलेल्या माणसाच्या हातीं. पण व्यक्ति अशी कीं, जगांतल्या नामवंत इंजिनिअर्सना माती चाखायला लावील. या कंपनीनें जेव्हां बोर-घाटचें टेंडर भरलें तेव्हां सर्वांची समजूत अशी कीं, या वालचंदच्या कंपनीला हें अवजड मोठालें काम कसलें मिळतें ? पण वालचद आणि त्यांचे सहकारी यांनीं क्लृप्ति योजली ती अजब आणि अकल्पित. ज्या मंडळींचा अथवा लहान सहान कंपन्यांचा आपल्याला त्रास होईल असें वालचंद शेटजीनीं अपेक्षिलें त्या त्या त्यांनीं विकत घेऊन टाकल्या. म्हणजे प्रतिस्पर्धित्व खलास. असा होता वालचंदजीचा व्यापारी धूर्ततेचा कावा आणि डाव.

ब्रिटिश आमदानींत हिंदी कंपन्यांना लष्करी काम मिळत नसे. पण वाल-चंदजींनीं विमानांचे भाग बनविण्याचें काम मिळविलें. या कामासाठीं त्यांनीं

एका ब्रिटिश अधिकाऱ्याला विलायतेहून बोलावून घेतले, खूप मोठ्या पगारावर. हेतु हा कीं सोनाराचे कान टोंचायला सोनारच बरा. ब्रिटिशांशीं बातचित ब्रिटिश माणसाकडून; पण बाकी या माणसाला अधिकार शून्य. कंपनीच्या कारभारांत ढवळाढवळ करण्याचा अधिकार नाहीं. हिंदी अधिकारी, शास्त्रज्ञ–तंत्रज्ञ यांना योग्य तो सन्मान देणारा–नव्हे त्यांना प्रत्यहीं, प्रोत्साहन देणारा त्या वेळचा एकच मालक. वालचंद हिराचंद. आतां हिंदुस्थान कन्स्ट्रक्शन कंपनी हें एक संस्थान आहे. या कंपनीतर्फे प्रांता-प्रांतांत मोठमोठालीं कामें चालू आहेत.

सिंदिया स्टीम नॅव्हिगेशन कंपनीचा इतिहासहि असाच रोमहर्षक आहे. वालचंद शेटजींनीं आगगाडीचा प्रवास करतांना ऐकलें कीं, लिबर्टी नांवाचें आरमारी जहाज विकावयाचें आहे. मुंबईंत उतरल्यावरोबर ते सरळ जहाज पहावयास गोदींत गेले. जहाज विकत घेणें नक्की केलें. पैशांची व्यवस्था केली. जहाज वालचंदजींच्या मालकीचें झालें. सिंदिया कंपनीचा जन्म झाला. या कंपनीचा सर्वच इतिहास काव्यमय आहे. सिंदियाचें काम करण्यासाठीं दलाल मिळत नसत. वालचंद शेटजींनीं आपली लंडनची कचेरी एका हॉटेलांत थाटली. स्वतःच ते एजंटाचें काम करूं लागले. आपल्या प्रवाशांची त्यांनीं जातीनें काळजी घेतली. मालवाहतुकवाल्यांच्या तक्रारीकडे स्वतः हजर राहून उत्तरें दिलीं. त्यांचेवर सर्वांत मोठें संकट म्हणजे ब्रिटिश नाविक कंपन्यांचा त्यांच्यावरचा जळफळाट आणि रोष. लॉर्ड इनकेप म्हणजे ब्रिटिश व्यापारी नाविक वाहतुक कंपन्यांचा सुलतान. त्याला पण वालचंदनें वाकविलें. आपल्याशीं तह करायला लावलें. वालचंद शेटजींनीं हिरिरीनें ब्रिटिश व्यापारी नाविक सत्तेला भोंकें पाडलीं नसतीं तर आजचा भारतीय जहा-जांचा जगभरचा संचार सुरू झाला नसता. आमच्या व्यापारी नाविक दलाचे वालचंदजी पितामह आहेत, हें कधींहि विसरतां येणार नाहीं.

त्यांचा वालचंदनगरचा साखर कारखान्याचा महान् प्रकल्प आहे. कांहीं नव्हतें तेथे त्यांनीं नंदनवन निर्माण केलें. जमीन वैराण. बघाल तिथं उजाड. पण वालचंदभाईच्या अंतःचक्षूंपुढें ऊंस तरारले आणि त्या उजाड जमिनींत ऊंसाचा पाऊस पडला. भारतीय साखरेचा धंदा फोफावला.

साखरच साखर ह्या देशांत पैदा होऊं लागली. रावळगांवच्या पेपरमिंटानें मुलांचें जग काबीज केलें आहे.

फियाट् गाडीचा प्रिमिअर ऑटोमोबील कारखाना म्हणजे वालचंद-शेटजींच्या व्यापारी बुद्धीचा कळस आणि अत्युत्तम विलास. आज या अजस्त्र कारखान्याच्या अवाढव्य विस्ताराकडे पाहिलें कीं वालचंदजींच्या कल्पक बुद्धीबद्दल आदर वाटतो.

असे अनेक इतर कारखानें व उद्योग वालचंदजींनीं निर्माण केले. कूपर कारखाना विकत घेतला. या प्रत्येक उद्योगधंद्याच्या मागें अचाट संकल्प-शक्ति, योजकता, सामर्थ्य आणि साहस होतें. ज्या ज्या धंद्यांत वालचंदजींनीं हात घातला तो तो धंदा त्यांनीं पहिल्या प्रतीचा केला. बिर्ला, डालमिया, जैन, टाटा, मफतलाल अशा उद्योगपतींनीं आपापलीं औद्योगिक साम्राज्यें निर्माण केलीं. या प्रत्येकाचीं कांहीं वैशिष्टयें आहेत. कांहीं खास गुणदोष आहेत. वालचंद औद्योगिक समूहाचें मुख्य वैशिष्टच म्हणजे सगळे अधिकारी शास्त्रज्ञ–तंत्रज्ञ भारतीय आहेत. त्यांना त्यांच्या क्षेत्रांत पूर्ण स्वतंत्रता आहे.

वालचंदजींबद्दल अशी दंतकथा सांगतात कीं, जीवनाला सुरुवात करतांना त्यांचा व वडिलांचा मतभेद झाला. वडिलांनीं सांगितलें कीं तुझें पटत नाहीं तर तूं तुझा स्वतंत्र उद्योग सुरू कर. त्या आशीर्वादपर वचनाचा आधार घेऊन वालचंदजींनीं व्यापार सुरू केला. वडिलांच्याकडूनच तीन वर्षांच्या बोलीनें ६ लाखांचें कर्ज घेतलें. सहा महिन्यांत कर्ज परत दिलें. त्यानंतर वडिलांकडून परत उसनवार पैसे घेण्याची वालचंदजींना जरुरीच पडली नाहीं.

या दंतकथेंत सत्य असेल–नसेल. पण ही दंतकथा प्रसृत होण्याच्यामागें वालचंद शेटमध्यें असामान्य कर्तृत्व होतें याची साक्ष आहे. एवढाच या गोष्टीचा मथितार्थ.

अनेक उद्योगांत गुंतलेले वालचंदजी रोज दोन सिनेमा बघतील. कधीं कधीं तर रांगेनें तीन. मराठी नाटकाला हमखास हजर. ही कृष्णमूर्ति बालगंधर्वांच्या नाटकाला पुढेंच बसलेली आढळे. नाटक, सिनेमा, नृत्य, चित्रकला या प्रत्येक कलेबाबत त्यांना प्रेम. त्या त्या कलेची प्रगति घडवून आणण्याचा त्यांचा कल. कलात्मक कार्यक्रमाला त्यांचेकडून भरपूर मदत होई. खाजगी

जीवनांत इतर सामान्य माणसांसारखें जीवन. पण व्यवहार म्हटला, व्यापार म्हटला कीं, त्यांचा चतुरस्रपणा, द्रष्टेपणा, खंबीरपणा, निश्चयात्मक भूमिका वगैरे आपोआप तयार होत असे. म्हणूनच भारतीय औद्योगिक इतिहासांत त्यांना क्रांतिकारक उद्योगपति अशीच संज्ञा द्यावी लागेल.

वालचंदजींच्या घवघवीत यशांत दैवाचा वाटाहि आहे. पण कर्तबगारीला फार मोठे गुण द्यावे लागतील. एका दृष्टीनें ते Genius होते यांत शंका नाहीं. पण ९८ टक्के अविश्रांत श्रम व दोन टक्के दैव ही हिस्सेवारी वालचंदशेटच्या जीवनाच्या यशाला लावावी लागेल. तें यश जगावेगळें होतें, सतत टिकणारें होतें, पिढ्यान्‌पिढ्या भोगण्यासारखें होतें.

वालचंदजींना ओसाड गांवांत सोडून दिलें असतें तरी त्यांनीं विश्वामित्रा-सारखी प्रतिसृष्टि तेथें निर्माण केली असती. दुर्दम्य आत्मविश्वास व आकाशाला गवसणी घालण्याची महत्त्वाकांक्षा अशा दैवी गुणांनीं भरलेला हा महामानव आपलें महान् कार्य उरकण्यासाठीच जन्मला होता.

अशा महाभागाला भारताचे शतशः प्रणाम असोत. वालचंद हिराचंदांचें जीवनकार्य याबाबत प्रसिद्ध लेखक श्री. गं. दे. खानोलकर यांनीं पुष्कळ अभ्यास करून एक सूत्रबद्ध, सत्यावर आधारलेला, एक अत्यंत उत्तम असा ग्रंथ नुकताच प्रसिद्ध केला आहे. तो प्रत्येक लहान-थोरांनीं वाचावा – मनन करावा. त्यामुळें आजच्या पिढीला एक आदर्श मिळेल.

महाराष्ट्राचा वालचंदजींना अभिमान होता. महाराष्ट्र त्यांनीं आपल्या कर्तबगारीनें उजाळला. त्यांनीं महाराष्ट्रांत निर्माण केलेली उद्योगरूपी दीप-माळ सतत तेवत राहील. त्यांचें उत्तम स्मारक म्हणजे त्यांचे उद्योगधंदे. त्यांचें आदर्श स्मारक म्हणजे त्यांचें चरित्र वाचून तयार झालेले खंबीर प्रवृत्तीचे द्रष्टे उद्योगपति.

ज्या महाराष्ट्रांत खंबीर प्रवृत्तीचा हा उद्योगपति निर्माण झाला त्या भूमीला मरण नाहीं.

* * *

# श्रीमती अंजनीबाई मालपेकर

: ६ :

श्रीमती अंजनीबाई मालपेकर यांना पांच वर्षांसाठीं रु. ३०० महिना असें मानधन महाराष्ट्र सरकारनें देण्याचें ठरविलें आहे. पूर्वी मध्यवर्ति सरकारनें श्रीमती अंजनीबाईंना नाटक अॅकेडमीचे मानवंत सभासद नेमून त्यांचा सत्कार-सन्मान केला आहे. अध्यक्षाच्या हातून त्यांचा सन्मान झाला आहे. त्या वेळीं योग्य तो सन्माननीय अहेरहि त्यांना देण्यांत आला आहे. पण आजचे हे तीनशें रुपये महिन्याचें मानधन म्हणजे स्वगृहीचा अहेर आहे. श्रीमती अंजनीबाईंवरच्या लोभाचें-प्रेमाचें तें प्रतीक आहे. असेंच मानधन त्यांना गोवा सरकारनें ताबडतोब दिलें पाहिजे. कारण श्रीमती अंजनीबाई मालपेकर या गोव्याच्या. महाराष्ट्राच्या गानकोकिलेनें जन्म घेतला मधुगुंजारवाच्या गोमांतकांत, पण आपल्या कोमल स्वरानें जिंकलें अखिल भारत.

आज श्री. अंजनीबाई मालपेकरांकडे पाहिलें कीं, त्यांचा शांत–प्रशांत चेहरा मनांत भरतो. अजूनहि त्यांची कांति तुकतुकीत आहे. एकच दांत पुढें दिसतो, पण चेहेरेपट्टी रुबाबदार, ठसकेबाज असणार याची साक्ष पटते. वय आज ८३, पण काठी ताठ आहे. आवाज आजहि सुस्पष्ट आणि खडा आहे. अंजनीबाई वाळल्या आहेत, केस विरळले आहेत, पांढरले आहेत. पण त्यांच्यांतील चैतन्य सतेज आहे. मन तरुण आहे. दुर्दमनीय आशावाद त्यांच्या कृतींत, वागणुकींत, वक्तव्यांत सारखाच फसफसतो आहे.

श्री. अंजनीबाईकडे आज कोण जात नाहीं ?– कोण येत नाहीं ? त्यांच्या कडे साहित्यिक येतात. संगीताची बैठक असते. कलावंताचें स्वागत होतें. रसज्ञांशीं गप्पागोष्टी होतात. दर्दी लोकांशीं कलात्मक कथांचा पाऊस पडतो. काव्यशास्त्रविनोदाला बहर येतो. आत्मज्ञानाच्या गोष्टी निघाल्या कीं अंजनीबाई तन्द्रींत बोलतात. अनुभवांचे बोल बोलतात. कलावंतांचा तर त्यांचें घरीं ताटवा फुललेला असतो. येईल त्या कलावंताला हें घर आपलें 'मायघर' वाटतें. येईल जाईल त्या कलावंताला अंजनीबाई तानेची, लकेरीची, ठेवणीच्या जागेची पुरचुंडी बांधून देतात. घ्या म्हणतात. त्यांचें पसायदान चालू. सकाळ-पासून रामरगाडा चालू. येणारा जाणाराला चहाखाणें चालू. "घ्याहो, घ्याहो, कोणी मुरारी घ्या. कोणी मुकुंद घ्या." खरा कलावंत कलावंताचा परामर्श कसा करतो हें पहायचें असेल तर तें अंजनीबाईंच्या घरीं पहावें. लहाना-पासून थोरापर्यंत, छोटयापासून मोठयापर्यंत, कलावंतापासून कलंदरापर्यंत, पंडितापासून मान्यवर मंत्र्यापर्यंत सर्वांना सारखा बहुमान. दुजाभाव नाहीं. 'जे जे दिसे भूत त्यासी मानीजे भगवंत.' अंजनीबाई संसारी, पण परमार्थांत सदा गुंग. द्रौपदीची थाळी त्यांच्या हाताला लागली आहे. त्यांतून रसरंगी भोजन त्या प्रेमी मंडळींना वाढत आहेत.

आजच्या त्यांच्या गरिबीवर पडदा टाका. भूतकाळांत जा. सौंदर्याची सम्राज्ञी, भूलोकांवरील अप्सरा, गंधर्वलोकांतून अवतरलेली ही गंधर्वदेवता त्या काळीं आपला प्रभाव गाजवून गेल्याचें दिसेल.

१८ वर्षे वयाची अंजनी मालपेकर म्हणजे त्या काळीं १०० टक्के सौंदर्याची खाण होती. डोळ्यांतील अद्‌भुत जादू, लोभस रूप. सुकुमार पण लुसलुसलेल्या शरीरांत तरळ लहरी. आणि तो मधुर आवाज. त्या सुमधुर

आवाजानें अंजनीबाईंनीं जग फुलविलें–नटविलें. बहरवून टाकलें. एक वेळ अशी होती कीं, त्या वेळीं भारतांतील गानप्रेमी लोक म्हणत, "अंजनीबाईंनीं गावें, आम्ही ऐकावें." आसेतु हिमालय त्यांच्या गाण्यावर लुब्ध असणारे लोक त्यांच्यावर सुमनें उधळीत. अंजनीबाईंना कटु अनुभव आले. गोड स्मरणिका लाभल्या. अनेक प्रसंग–अतिप्रसंग त्यांच्यावर गुदरले. त्यांतून त्या वाहेर पडल्या. श्रद्धामय जीवन, सुसंस्कृत मन आणि आपल्या पतीवर अगाध प्रेम यांमुळें त्यांनीं जग जिंकलें. कलेची एकनिष्ठ सेवा केली. पतीनें त्यांना अगणित संपत्ति दिली. स्वतःच्या गायनावर त्यांनीं अमाप–अलोट पैसा मिळविला. त्यांना गतयुगांतली वैभवसंपन्न संगीतसम्राज्ञी म्हटलें म्हणजे सर्व कांही त्यांत आलें. संगीतदेवी त्यांच्या घरीं राबली. तिच्या वरदहस्तांमुळें आणि वसतीमुळें स्वर्गीय संगीत पृथ्वीतलावर अंजनीबाईच्या मुखानें अवतरलें.

अंजनीबाईच्या गळ्यावर शत्रूंनीं अनिष्ट प्रयोग केला. गळा बसला. गाणें संपलें. पण केडगांवचे नारायण महाराज लाभले. चमत्कार घडला. आवाज परत आला. मधु वाणी पुन्हां लाभली. संगीताची झिळीमिळी घराघरांत निनादूं लागली. श्रद्धेचें, निष्ठेचें फळ बाईला मिळालें. बाईचें राहतें घर ' 'नारायणाश्रम ' झालें. बाईंना पृथ्वीवरील समृद्धि आणि परमार्थाची गोडी लाभली. आवाज होता त्यापेक्षां गप झाला. मधुरता मधुर झाली. स्वर्गीय स्वरकिन्नरीची लकेर अंजनीबाईच्या गाण्यांत साकार झाली. अंजनीबाईचें गाणें म्हणजे गुंजारव बनला. वसंतऋतूंतील वनश्रीचें वैभव, आकाशांतील सौंदर्यतेचा विलास, दर्यावरील फेसाळ अप्सरांचें भरतीच्या लाटांवरील नृत्य, कोकिळेचें कूजन या सर्वांचें मिश्रण म्हणजे अंजनीबाईचें संगीत. त्याला जरुरात नव्हती लाऊडस्पीकरची. तो आवाज जात्याच बुलंद बासरीचा स्वर. अवकाशांत भरून उरणारा.

आवाजाची जी खुमारी, दिलखुलासी, दिलचस्पी तीच शब्दाच्या फेकींत. बोलण्यांत. भाष्यांत. अंजनीबाई बोलतात तें ऐकत बसावेसें वाटतें. त्या शब्दांत नाद आहे, अर्थ आहे, प्रसाद आहे, प्रसन्नता आहे. पैलू पाडलेला हिरा तसा त्यांचा शब्द वैखरींत जणुं 'देव' बसला आहे. म्हणूनच बोलतात

तें वाक्य कानांत राहातें. अर्थ मनांत भरतो. परभणीच्या श्री. रंगनाथ महाराजांचें अमृतानुभवावरचें प्रवचन जसें श्रवण–मनन करण्यास अतीव गोड, तुकारामांच्या समाधीजवळ ओणव्या झालेल्या सुरकतलेल्या म्हातारीचें रांगड्या भाषेंतलें श्री तुकारामाच्या अभंगाचें विवरण जसें अंतःकरणाला मनस्वी भिडणारें, तसें अंजनीबाईचें गाणें. त्याला मोल नाहीं, तोल नाहीं. अंजनीबाईचें गाणें म्हणजे अंजनीबाईचें गाणें.

लहानपणीं अंजनीबाई–हिराबाई पेडणेकर ही जोडगोळी गिरगांवच्या शाळेंत जायची. अंजनी गोड, तेजस्वी, रूपमती. हिराबाई पेडणेकर मधुर-भाषिणी, मोहनरूपी. गिरगांवच्या रस्त्यावरून चालू लागल्या कीं लोक या निरागस, निर्मल पोरींकडे पहात. नेत्रांचें पारणें फिटे. मनापासून आशीर्वाद देत. या भूलोकींच्या अप्सरा–गानदेवता होवोत ! दोघीहि गानदेवता झाल्या. हिराबाईनीं आपल्या गायकीनें मान्यवर कलावंतांना–साहित्याचार्यांना भुलविलें. स्वतः नाटकें लिहून साहित्यांत सन्माननीय नांव मिळविलें. नामवंत साहित्यांच्या नाटकांतील पदांना चाली दिल्या. अंजनीबाईनीं एकच अचल-पद स्वीकारलें–संगीताचें. त्या संगीतसम्राज्ञी बनल्या. आज त्या संगीत साम्राज्यांत सर्वांच्याच ‘ गुरुमाता ’ आहेत. दोघीहि वंद्य. दोघीहि आपापल्या कलेंत थोर. थोरपणा बरोबर घेऊन आल्या. हिराबाई थोरपणा घेऊन गेल्या. आजचा मानसन्मान त्यांच्या नशिबांत नव्हता. श्रीमती अंजनीबाई मालपेकर ‘ गुरुमाता ’ आज आपल्यांत आहेत. त्यांच्या आश्रमांत त्यांची गायनाची ‘ दिव्य दीक्षा ’ चालू आहे. त्यांच्या ‘ मठांत ’ ‘ गुरुमंत्र ’ दररोज दिला जात आहे.

महाराष्ट्राच्या या नामवंत विदुषीचा मानसन्मान महाराष्ट्र सरकारनें केला याबद्दल त्यांचें अभिनंदन. त्यांचें आयुरारोग्य उत्तम राहो ही प्रार्थना. त्यांनीं शंभरावी उलटावी ही श्रीभगवन्ताकडे प्रार्थना.

* * *

# डॉ. वा. दा. गोखले

: ७ :

श्री. वासुदेव गोखले आणि मी जवळजवळ एकाच वेळीं मुंबईच्या नाथीबाई कन्या विद्यालयांत शिक्षक म्हणून लागलों. ते अनुभवी शिक्षक म्हणून प्रथम लागले. मी नवखा करकरीत मास्तर म्हणून.

मुख्यबाईनें त्यांना माझी तपासणी घेण्यास सांगितली. शिक्षकांच्या खोलींत आल्यानंतर ते म्हणाले, "तुमच्यासारख्या खुशालचेंडूनीं शाळेच्या वातावरणांत येण्याची जरुरी नाहीं." त्यांनीं मला आपादमस्तक न्याहाळलें. माझा छानछोकी पोषाख. माझी कुर्रेबाज चर्या. यांवर नजर टाकूनच त्यांनीं मला शेरा दिला होता. मला त्यांचा शेरा खटकला. गोखल्यांबद्दल माझ्या मनांत विकल्प आले. या गृहस्थाबरोबर आपलें पटणें कठीण. मनानें कौल दिला.

त्यानंतर मॅट्रिक वर्गाचे इंग्रजी व इतिहास असे वर्ग घेण्यास मला गोखल्यांनीं सांगितलें. माझ्या पद्धतीनें मी धडे शिकविले. माझी अशी खात्री

होती कीं, गोखले आणखी तोंडची वाफ दवडणार व मला शाळा सोडणें भाग पडणार.

गोखले संथपणें शिक्षकांच्या खोलींत आले. माझ्या शेजारीं बसले, हंसले. ते म्हणाले, " इंग्रजी आणि इतिहास अनुभव नसतांनाहि फार सफाईनें शिकवितां हो तुम्ही. "

बर्फ विरघळला. विकल्प विरले. गोखले एकदम जवळ आले.

थोड्याच दिवसानंतर ते एक दिवशीं मला म्हणाले, " हे पहा, तुम्ही आणि मी जोडीनें इंग्रजी व इतिहास शिकवीत आहोंत. पण मी बाईंना म्हणालों आहें कीं, पुढील महिन्यापासून तुम्ही सर्वच इंग्रजी व इतिहास मॅट्रिक वर्गाला शिकवाल. मुलींचे चेहरे पाहिलें कीं असें वाटतें तुम्हीच हें विषय शिकवावेत. "

गोखले व मी आणखी जवळ आलों. लवकरच मी त्यांना ' वासू ' म्हणूं लागलों. मला ते ' उमाकांत ' म्हणूं लागले. मैत्री जमली. विरोधांतून परस्पर प्रेम निर्माण झालें.

शाळेंत राम-लक्ष्मणाची जोडी म्हणून नांव पडलें. जगांत वासु-उमाकांतच्या जोडीबद्दल असूया उत्पन्न झाली. आम्ही कॉंट्रॅक्टरच्या चाळींत प्रार्थना समाजासमोर एकत्रित राहूं लागलों. माझें घर मुंबईचें, पण वासूसाठीं घर सोडलें. राहणें एकत्र, जेवण सोबत, अभ्यास बरोबर, विचारसरणी एक.

सकाळीं ५ वाजतां उठणें, व्यायाम करणें, दूध पिणें, खोलींत कोणी तरी एकानें झाडू मारणें, कपडे धुणें, रोज नित्यनियमानें भगवद्गीता वाचणें, सर्व दिवस शाळेंत शिकविणें, दोन तीन शिकवण्या संध्याकाळीं करणें. साधें रुचकर चविष्ट अन्न वासूनें बनविलेलें खाणें व पुन्हां वाचन, मनन, चिंतन सुरू. वासूचा पिंड विद्वानाचा—पंडिताचा. त्याला पुस्तकांचें अमर्याद वेड. तें त्यानं मला लावलं. मला वासू एकदां म्हणाला " उमाकांत, इंग्रजी, इतिहास या दोन्हीहि विषयांवर तुझें फार चांगलें प्रभुत्व आहे; पण तूं मराठी, संस्कृत-कडे दुर्लक्ष करूं नकोस. त्या आपल्या भाषा आहेत. तुझी तयारी असली तर मी नियमित संथा देईन. "

आणि मग संथा सुरू झाली. वासूनें वेद, उपनिषदें, शास्त्रें माझेकडून वाचून घेतलीं. मराठी लेखक चिपळूणकरांपासून तों वामन मल्हारांपर्यंत वाचून घेतलें. भागवत, दासबोध, तुकाराम गाथा, ज्ञानेश्वरी, सबंध संतवाङ्मय वासूनें माझेकडून आग्रहानें परत परत अभ्यासून घेतलें. त्याची आंतरिक ओढ अध्यात्माची. तें तत्त्वज्ञान त्यानें माझ्या गळीं उतरविलें. मला ईश्वर-वादी केलें. वासूमध्यें एक गुण मोठा. कोणाचेंहि मन सांभाळून संथा द्यायची. प्रेमानें आपलें ज्ञान वांटायचें. त्याचें वाचन अमाप. विचार प्रगल्भ. शिक-विण्याची हातोटी आदर्श आणि मेहनत यंत्रासारखी.

आम्हां दोघांत विरोध फार. मी आळशी, रसिक, खाण्यापिण्याच्या बाबतींत चोखंदळ. कपड्यालत्त्याच्या बाबतींत तर भलताच लहरी, उधळ्या. गायन-नाटक यांचा भोक्ता. वासू याच्या उलट. साधा आणि सरळ. मोह नाहीं. आवड नाहीं. हें पाहिजे तें पाहिजे हा आकस नाहीं. जें पुढें येईल तें खायचें– प्यायचें, दुकानदार देईल ते कपडे वापरावयाचे. चाकोरीच्या बाहेरच्या जीवनाची माहिती नाहीं. प्रयोग नाहीं. अतिरेक नाहीं. सुट्टी पडली कीं, वेंगुर्ल्याला नाहीं तर निरनिराळ्या क्षेत्रांना भेट. मी गेलों बरोबर तर ठीकच. नाहीं तर याच्या हृषिकेशपासून तों रामेश्वरपर्यंतच्या वाऱ्या चालूच. अजीजीनें मला चल म्हणायचा. आणि आग्रहानें स्वत: निघून जायचा. आत्मविकसन ही त्याची जिद्द होती. ती त्यानें शेवटीं साधली.

वासुदेव गोखले वेंगुर्ल्याचे. तीन भाऊ. एक नाटकांत प्रतिष्ठा पावला. शंकररावांनीं–दुसऱ्या भावांनीं–भिक्षुकी पत्करून घरकूल संभाळलें. तिसरा वासू. हुषार आणि उद्योगी. मोठा स्वावलंबी. एम्. ए. पर्यंत स्वत:च्या मास्तरकीला संभाळून शिकला. नतर पुण्याला त्यानें पी. एच्डी. केलें. प्रथम नाथीबाई कन्या विद्यालय, नंतर मुंबईचें नामांकित भर्डा हायस्कूल, मग अचार्य अत्र्यांच्या सांगीवरून टिळक ट्रेनिग कॉलेज व शेवटीं नाथीबाई विश्वविद्यालयाचें पुणें येथील कॉलेज. निरनिराळ्या संस्थांत काम. पण पेशा एकच–शिक्षकाचा. जन्मच ज्ञानदानासाठीं.

गोखल्यांचा संसार मात्र दु:खी. कॉंट्रॅक्टर चाळींमधून आम्ही ताराबाग इस्टेटमध्यें गेलों. कां ? तर त्यांची बायको आली. संसार सुरू झाला. पण

कोठें तरी गफलत होती. गोखलेची लय लागली नाहीं. बाईचा आजार, अबोलपणा. गोखलेंत विरक्तपणा. त्यामुळें घरीं आले कीं त्रस्त. संसाराची प्रीति त्यांनीं बंधु शंकरराव, पुतण्या बाळ, एक वेडसर पुतण्या, एक सुंदर पुतणी कमल यांवर उधळली.

उर्वरित प्रेम त्यांनीं रसाळ नांवाच्या एका युवकावर, माझ्यावर व नंतर एका बंगल्यावर व्यतीत केलं. गोखले उन्मनस्क वाटत. उदास वाटत. शापभ्रष्ट वाटत. एवढा चांगला गाढा विद्वान् पण हें संसाराचं अंगच तुटलेलं. तसा अल्प-संतुष्ट. अति काम करण्याच्या प्रवृत्तीमुळें संसाराचा आनंद लुटण्याची शक्तीच लुप्त. ज्याच्यावर जीव टाकला त्याचेकडून अनपेक्षित शिस्तभंग झाला तर मात्र गोखले त्रस्त व्हायचे. त्यांना फार वाईट वाटायचें. थोडे दिवस चरफडणें चालायचें, मग पुन्हां स्थितप्रज्ञता कायम.

मला नेहमीं वाटायचं कीं, वासुदेव हा एक शापभ्रष्ट योगी आहे. जुन्या आश्रमीय ऋषीप्रमाणें ते नेहमीं असायचे-व्रतस्थ. माझा त्यांनीं कांदा तोडला. मला मांस मच्छी सोडायला लावली. अचकट विचकट खाणं शक्यच नव्हतं. सिनेमा–नाटकें वर्ज्य. विद्यार्थी–विद्यार्थिनींबरोबरचे संबंध निरपेक्षतेचे. दूरचे. फार थोड्या लोकांना अति जवळ यायला ते देत.

एऱ्हवीं बोलणं मोजकं, विषयांची मांडणी मात्र सूत्रबद्ध. नवीन विषयांचा सांगोपांग अभ्यास. विनोद कमी. पण गंभीरतेचेंहि अतिक्रमण नाहीं. अध्यात्म विषयावर आले कीं फुलत असत. कांहीं तरी अंतस्थ अडचणी, दुस्तर परिस्थिति अथवा मनोविकार नसता तर वासुदेव साधु बनला असता. साधुत्वाचीं सर्व लक्षणें त्याच्यांत होतीं, पण तो साधु बनणें शक्य नव्हतं. कांहीं तरी आड येत होतं. तसेंच वाङ्मयासंबंधीं. वाङ्मय तोलून मापून यथायोग्य. वाङ्मयाचें परिशीलन प्रकांड पंडिताचें. टीका समतोल व न्याय-शुद्ध, पण स्वतंत्र निर्मितिशक्ति नव्हती. प्रतिभेचा उन्मेष नव्हता. कल्पकता कमी. स्वकपोलकल्पित वाङ्मय रचण्याची स्फूर्ति जराहि नाहीं. लिहिलें तें व्यासंगानें, अभ्यसनामुळें, विद्वत्तेच्या आधारें.

माझा व वासुदेव गोखलेचा संबंध आला त्यांत माझेकडून त्याला भावना मिळाली. मला त्याचेकडून ज्ञान मिळालं. पुण्याला गेल्यापासून त्याचं माझं मिळणं-जुळणं कमी झालं. पण स्नेह कायम राहिला.

ज्ञानवृद्ध, तपोवृद्ध, श्रद्धाळू, कामाळू डॉ. वासुदेव गोखले इहलोक सोडून गेले. साहित्य परिषदेचा मोठा कार्यकर्ता गेला. नवीन पिढीला साहित्याची, विद्वत्तेची ज्ञानाची संथा देणारा ऋषितुल्य पंडित पंचमहाभूतांत विलीन झाला. माझ्या एका जिवाभावाच्या सोबत्यानें आपली जीवनयात्रा संपविली. महाराष्ट्रांतील विद्वान् कमी झाला. वासुदेव गोखले मला नेहमीं म्हणत असे, ‘ उमाकांत, विरोधी दिशेनें आपण गेलों तरच जीवनांत यश मिळतें. जीवन-सागरांत मात्र पडलों कीं, बुडलोंच म्हणून समजावं. माझंच पहा—संसार वमन पावलाय, आत्मा फडफडतोय. ईश्वरमीलनासाठीं भटक भटक भटकतों आहें. पण अजून दिशा दिसत नाहीं. तूं लग्न करूं नकोस. ईश्वरनिष्ठ हो. ’

गोखलेचा संदेश मीं अव्हेरला. मीं लग्न केलें. वासुदेव लग्नाला आला. आयुष्यांत एवढा मोठा आहेर त्यानें प्रथमच दिला असेल. पण गेला तो विषण्ण वदनाने. ईश्वरभक्ति मात्र तो संपूर्णतः माझेकडे देणगी म्हणून देऊन गेला. तीच त्याची मोठी भेट—अविस्मरणीय भेट.

परवां वर्तमानपत्रांत वाचलं कीं, डॉ. वासुदेव गोखले अमृतानुभवावरची त्यांची टीका पुरी करतां करतां ईश्वरविलीन झाले. खरा ईश्वरसाक्षात्का-राचा अनुभव घेत घेत निजधामास गेले.

आमरण साधना करणारा साधक सिद्ध होऊन ईश्वरमय झाला.

* * *

राठा ग्रं ... स्थळप्रत.
अनुक्रम 8८०.६९२. दि: ५।२।७...
दाखल ... नों दि: २।३।६९

# श्री. मोतीलाल

: ८ :

१७ जून १९६५. रविवार सकाळची वेळ. मोतीलाल सकाळीं हॉस्पिटलच्या खोलींत उठतेवेळीं पडले. त्यांच्या भुंवईला थोडी चीर पडली. रक्त सांडलें अन् लगेच ते वारले. जीवन संपलें. आशावादी, खिळाडू, प्रेमी, उदारहृदयी, चित्रपटसृष्टीचा राजा, रुपेरी जगांतला चारुदत्त एकाएकीं अंतर्धान पावला.

मोतीलाल म्हणजे रुपेरी जगांतलें एक मोतीं. पाणीदार, प्रसन्न चेहरा, उमदा स्वभाव, रुबाबदार राहणी, आधुनिक कपडे, भाषापटुत्व, चित्रपटांत प्रवेश करणाऱ्यांचा वाली, आपल्या व्यवसायांतील सर्व गणगोतांचा सुहृद, क्रिकेटपटू, घोड्याच्या शर्यतींचा नादी असा हा माणूस ज्या दिवशीं सिने-सृष्टींत अवतरला त्या दिवसापासून सतत सारखी लोकप्रियता त्यानें मिळविली. नौदलामध्यें नोकरी करण्यासाठीं स्वारी मुंबईला आली होती. एका मित्राबरोबर चित्रपट कसा तयार होतो हें पाहण्यासाठीं सागर मुव्हिटोनमध्यें गेली. तेथें मोतीलालचें व्यक्तित्व के. पी. घोष या निर्मात्याच्या नजरेस पडलें.

नव्या शहरांत पाऊल ठेवलें आणि The lure of the city या चित्रपटांत घोष यांनीं मोतीलालला काम देऊन त्यांना चित्रपटसृष्टींत खेचलें. तेव्हांपासून मरेपर्यंत मोतीलालनें भारतीय हॉलीवुडची एकनिष्ठेनें, अंत:करणपूर्वक सेवा केली. त्या सेवेला मोल नाहीं.

मोतीलाल हे चित्रपटसृष्टीचे एकमेव मोतीलाल–त्यांच्यासारखा कलाकार परत होणार नाहीं. त्यांच्या कोठल्याहि कामांत एकाग्रता फार. सहजता भरपूर. नाहीं अतिशयोक्ति, नाहीं आततायीपणा कीं नाहीं अतिरेकीपणा. चित्रपटांतला मोतीलाल जितका हृद्य तितकाच मानवी जगांतलाहि. प्रत्येक चित्रपटांत आपलें व्यक्तित्व त्यानें प्रभावीपणें वापरलें, आणि तें वापरतांना अति सहजतेनें तो चित्रपटसृष्टींतल्या आपल्या भूमिकेंत सामावून गेला.

प्रत्येक वर्षी दोन अथवा तीन चित्रपटांत तो काम करीत असे. हें काम चांगलें, हें वाईट असला वावदूकपणा त्याच्यांत नव्हता. जें काम दिलें त्यांत ‘ प्राण ’ ओतायचा आणि तें हुबेहूब रंगवायचें. त्याचीं कांहीं चित्रें आपटलीं असतील; पण टीकाकारांनीं त्याच्या कामाबद्दल प्रशंसाच केली आहे. त्याची सर्वोत्तम कामें ‘ श्रीयुत संपत ’, ‘ देवदास ’, ‘ ये रास्ते हैं प्यार के ’, ‘ लीडर ’, ‘ वक्त ’ आणि ‘ ये जिंदगी कितनी हसीन है ’ या चित्रपटांत पहावयाला मिळतात. त्यांच्यांतला कलाकार येथें दक्ष आहे, जिवंत आहे, जातिवंत आहे.

त्याचें शेवटचें चित्र ‘ छोटी छोटी बातें ’ हें होय. या चित्रपटांत तो निर्माता आहे, डायरेक्टर आहे, कलाकारहि आहे. आपल्या जीवनांतील उत्कट अनुभवांवर त्यानें हा चित्रपट आधारलेला आहे. त्यांत आशा आहे. निराशा आहे. भावना आहे. सहृदयता आहे. मानवाबद्दल मनस्वी प्रेम आहे. मानवी वर्तनाबद्दल साशंकता आहे. जीवन जगण्यासाठीं आहे हा मोतीलालचा सिद्धांत त्यांत प्रतीत होत आहे.

दुर्दम्य आशावादावर मोतीलाल जगला. जिवंत असतांना त्यानें आपल्या कलेची, गुणांची, धनाची उधळपट्टी केली. त्याच्या जीवनाची संध्याकाळ धूसर, ढगाळलेली होती. पण त्यामुळें तो डगमगला नाहीं. गडबडला नाहीं. रंजीस आला नाहीं. निराशेच्या भोवऱ्यांत हिसके खात असतांना त्यानें आपली जीवनयात्रा, विवेकपूर्ण, आणि निर्विकार अशी ठेवली होती. आपल्या

'छोटी छोटी बातें' या चित्रपटावर त्यानें शिलकींतला शेवटचा पैसा लावला होता. हा चित्रपट प्रसृत होण्यापूर्वी मोतीलालला मृत्यु आला. मोतीलालला जीवनांतील अनपेक्षितपणाचा पुरा अनुभव होता. तेव्हां आपलें चित्र आपल्या डोळ्यांनीं रुपेरी पडद्यावर लागलेलें आपण पाहिलें नाहीं म्हणून त्याला दुःख होणार नाहीं, खंत वाटणार नाहीं. 'मला वाटलं होतं मी नियतीवर मात करीन. पण नियतीनंच माझ्यावर मात केली. जीवनांत हार-जीत तर चालूच आहे'. मरतां मरतां खिलाडूपणें मोतीलालनें वरील उद्‌गार काढले असतील.

मोतीलालजीच्या खाजगी जीवनांत रसग्राहीपणा होता. उत्तम गोष्टींची त्याला आवड होती, त्याची दृष्टि सौंदर्यान्वेषी होती. भावनापूर्ण जीवनाला तो आसुसलेला होता. म्हणून जेथें जेथें त्याला भावना मिळाली, जेथें जेथें त्याला लय लागली, जेथें जेथें त्याची संवेदना संलग्न झाली तेथें तेथें तो लीन झाला. नीतिनियमाला झुगारून त्यानं आपल्या हृदयाची तार छेडली.

असीम सौंदर्याचा भोक्ता म्हणून त्यानं आपल्या घरीं आपल्यासाठीं म्हणून एक 'हस्तिदंती मिनार' बांधला होता. या मिनारांतून तो विश्वांतले रंग पहात असे. विश्वांतील चलदृश्ये न्याहाळीत असे. आकाशांतले ढग, झाडावरचे पक्षी, पानें, फळें, रस्त्यावरचीं माणसें, मुलें–सर्वांकडे त्याचें लक्ष असे. हें आपलें आवडतें दालन ते आपल्या खास मित्रांना आग्रहानें दाखवीत. तेथें अनेक विषयांवर गप्पा मारीत. विनोदाचे फवारे उडत. जगांतल्या प्रत्येक घटनेवर मोतीलालची खास टीका ऐकायला मिळत असे. त्याच्या स्वतःच्या आवडत्या चित्रपटसृष्टीबद्दलचे खुसखुशीत किस्से ऐकायला मिळत असत.

खास बैठकींतली मंडळी आली कीं मोतीलालजीच्या बोलण्याचालण्याला ऊत येत असे. मंडळीचा निरोप घेतांना मोतीलाल डोळे मिचकवायचे. हंसत-हंसत म्हणायचे, 'माझ्या जिगर मैत्रिणीला भेटल्याशिवाय जाऊं नका बरें.' या या......ही बघा माझी जानी "दोसदारीण"– आपल्या मातोश्रींची ही अशी ओळख. मग अतिप्रेमानें तिला आपल्या बाहुपाशांचा विळखा. तिची लाजून लाजून पुरेवाट. 'माझा मुलगा कीं नाहीं फार चावट आहे....त्याचें कांहीं तरीच हें......' असें म्हणून ती माउली मोतीलालच्या विळख्यांतून दूर सरे.

या हास्यरसाच्या राजांत कोठें तरी आंत आंत खंत होती. औदासिन्य होतें. पण हा बदसूर तो लपवी, छपवी. जगाचे निर्घृण आघात, अपघात, उल्कापात त्यानें सहन केले होते. मनाच्या गाभ्यांत त्यांच्या 'कळा' त्यानें दडपून टाकल्या होत्या. म्हणून जगाला दिसला तो मोतीलाल निगर्वी, निर्मल आणि निरागस. जगानें त्याचें बिघडविलें म्हणून तो जगाचा सूड घेणारा नव्हता. संयमानें सगळें गिळायचें आणि जीवनांत चांगलें तें द्यायचें. चित्रपटावर टिकून राहणारें मोतीलालचें चित्र जगाला आल्हाददेईल, आनंद देईल. आपल्यांतलें सर्वस्व त्यानें कलेंत ओतलें आहे. म्हणून काल, आज व उद्यांच्या नटांत तो अग्रेसर कलाकार म्हणूनच मानला जाईल.

Motital was not moral or immoral. He was non-moral. He was a gentleman in the universal sense. He needed little, but gave more. He died a pauper. But lived like a prince. "

मोतीलालच्या एका जिवश्चकंठश्च मैत्रिणीची हुंदक्यासरशी सहजस्फूर्त प्रसवलेली ही श्रद्धांजली आहे.

* * *

# श्री. पु. ग. लेले

: १ :

सोमवारीं रात्रीं मी गोव्याहून परत आलों. प्रवास आरामगाडीचा होता. हाडें मात्र खिळखिळीं झालीं होतीं. साहजिकच प्रवासाच्या त्या शीणानें झोंप गाढ लागली होती. तोंच माझ्या खोलींत येऊन कोणीतरी म्हटलें, "पी. आर." गेले आणि माझे डोळे खाडकन् उघडले. 'पी. आर.' कसे जातील! – मी मनाशीं म्हणालों. वर्तमानपत्रें उघडलीं. 'पी. आर. लेले' गेल्याची वार्ता खरी होती. प्रत्येक वर्तमानपत्रांत ती बातमी पहिल्या पानावर छापलेली होती.

मीं डोळे बंद केले. गतकाळांत शिरलों. लेल्यांची ती कृश, हडकुळी, लांबट तोंडाची, उंच मानेची, आवूळ चेहऱ्याची, भेदक दृष्टीची मूर्ति माझ्या डोळ्यांसमोर उभी झाली. गिरगांवच्या रस्त्यावर, मुंबईच्या कॉंग्रेस भवनावर, टी. ए. वाघ कंपनींत ते हटकून सकाळीं भेटायचे. 'काय, कसं काय?' असें खटकेबाज, रेकस आवाजांतलें त्यांचें अभिवादन असे. सोबत किंचित् हास्य.

संपला अभिवादनाचा प्रकार. त्यानंतर बात नाहीं. आपल्या रस्त्यानें ते मुकाट निघून जात. तुम्हीं तुमच्या रस्त्यानें तसेंच जावें. कधीं मधीं मात्र रस्त्यांत अथवा दुकानांत खटकेबाज वादविवाद करतांना आढळून येत. मग एरव्हीं संयमी आणि मितभाषी असलेला हा माणूस तापायचा, तावातावानें ओरडायचा, हातवारे करायचा, आणि वेचक शब्दांत बोचक बोलायचा; मात्र ह्या वादाचा फड उत्तम रंगायचा. चिरफाड महाभयंकर, तत्त्वाला बाध नाहीं. इतिहासाला कलाटणी नाहीं. सत्याशीं प्रतारणा नाहीं. मुद्देसूद मांडणी, तर्कपूर्ण वाद, लढाऊपणा पूरेपूर. भीति नांवाला नाहीं. कोणाची क्षितीहि नाहीं. आगेपिछे नाहीं. लांडीलबाडी तर नाहींच नाहीं.

पी. आर. कोकणांतून आले. पुण्याला शिकले. बडोद्यास अभ्यासासाठीं राहिले. आणि शेवटीं मुंबापुरी ही त्यांनीं आपली कर्मभूमि केली. वृत्तीनें अभ्यासू, कायद्याचें ज्ञान उत्तम, त्यामुळें अन्यायाची चाड. त्यांनीं राज्यघटनेवर एक उत्तम पुस्तक लिहिलें आहे. रंगभूमीची त्यांना अतिशय आवड, नव्हे तें त्यांचें प्रथम वेड. मला वाटतें महाराष्ट्रीय रंगभूमीची संपूर्ण माहिती असणारा त्यांच्या दर्जाचा लेखक महाराष्ट्रांत तरी निर्माण झालेला नाहीं. एरव्ही कर्कश, कणखर आणि तर्कटी असा हा गृहस्थ रंगभूमीच्या साम्राज्यांत शिरला कीं सहृदय आणि हळुवार बनायचा. रंगभूमीच्या घटना, कलाकारांचीं मनें, नाटक कंपन्यांतील अनेक भानगडी, कलाकारांच्या कर्तृत्वाचें तोलन मोठ्या दिलदारपणें करायचा. त्यांत कधीं कधीं खवचटपणा जास्त असायचा हें सोडून द्या. नुकतेच प्रसिद्ध झालेले त्यांचे ग्रंथ 'नाटककार खाडिलकर' आणि 'महाराष्ट्राचें दुसरें वेड' हे चाळले तर या क्षेत्रांतील त्यांचा अधिकार किती मोठा होता याची साक्ष पटेल. 'खाडिलकर' म्हणजे नाट्यसाम्राज्यांतील त्यांचें एकमेव दैवत. खाडिलकरांच्या नाटकांचें सूक्ष्म परिशीलन, त्यांच्या नाटकांतील खटके, गाण्यांतील खोची, नाटकामागील इतिहास, खाडिलकरांच्या स्वभावाचें यथायोग्य वर्णन त्यांनी चोखंदळ व रसज्ञ लेखणीनें केलेलें आहे. 'महाराष्ट्राचें दुसरें वेड' हें त्यांच्या लेखांचें संकलन असलें तरी नाट्यवाङ्मयावरील त्यांचें प्रेम, त्या क्षेत्रांतील लोकांबद्दलचा त्यांचा आदर आणि नाट्यसृष्टींतील गमती लालित्यानें सांगण्याची

त्यांची कला त्यांच्या उपजत कलाप्रिय मनाची साक्ष देते. 'नाटककार खाडिलकर,' हा लेल्यांचा ग्रंथ म्हणजे त्यांनीं खाडिलकरांच्या विभूतिमत्वाला वाहिलेली श्रद्धांजलीच आहे.

कधीं त्यांचें कोणाबरोबर बिनसेल तें सांगणें कठीण. असें बिनसलें म्हणजे लेले जमदग्नीचाच अवतार! मग काय लिहितील अन् काय नाहीं तें सांगणें कठीण. तुमच्या नांवें पांचजन्य फुंकतील. तर्पण सोडतील. हें सर्व सहन केलेंत तर सर्व कांहीं विसरतील. पुन्हां पूर्ववत् व्यवहार सुरू. बाहेरून माथेफिरू पण आंतून कापा, रसाळ फणस. पटवून घेतलें तर त्यांच्याशीं पटत असे. शत्रूंच्या बाबतींत पी. आर. लेले कठीण–कणखर. एकदां एकाद्याला शत्रु मानला कीं, मग त्याचें तोंडहि ते बघणार नाहींत. त्यांच्या नांवाचा सरळ उच्चार करणार नाहींत, इरसाल शिवी उच्चारल्याशिवाय त्यांना बरेंच वाटत नसे. मामा वरेरकरांची त्यांची मैत्री. पण कुठें तरी बिघडलें. त्यानंतर लेलेंनीं मामांचें नांव टाकलें. एकाद्या वादांत त्यांनीं भाग घेतला म्हणजे ते वाघासारखे भांडत. पण त्या भांडणांत मुद्देसूदपणा आणि पटाईत वकिलाची शैली असे. 'पी. आर'नीं एकाद्याची हजेरी घ्यायला सुरुवात केली कीं समजावें आज पुरी तासंपट्टी आहे. हजामत सफा. त्यामुळें त्यांचेवरहि तितकेच भयंकर हल्ले होत असत. पण हा हाडका शिलेदार ते सर्व सहन करीत असे.

पी. आर. लेल्यांचें शरीर म्हणजे अनेक रोगांचें आगर. गुजराथेंतील नामवंत लेखक ज्योतींद्र दवे आपल्याबद्दल म्हणतात, 'मी जन्मापासूनचा सदाचा रोगी आहे. कोठलाहि रोग मला नाहीं असें वाटत नाहीं. अनेक रोग माझ्या शरीरांत ठाण मांडून बसल्यामुळें डॉक्टरांना मला नक्की काय होतें तें सांगतां येत नाहीं. त्यामुळें केवळ द्यायचें म्हणून ते औषध देतात. आणि त्यांतून माझा रोग बरा होण्याऐवजीं वाढतो मात्र. आतां मला असें वाटायला लागलें आहे कीं अतिरोगामुळे मी निरोगी होत चाललों आहें. ६५ वें वर्ष उटल्यानंतर बऱ्याचशा संस्थांनीं मोठे समारंभ घडविले. या संस्थेच्या चालकांना वाटत होतें कीं, मी मरणार. पण बहात्तरी झालीं, मी जीवंत आहें आणि आतां माझी खात्री होत चालली आहे कीं मी शंभरी

उलटणार. कारण अतिरोगामुळें मी अमर होणार.' ज्योतींद्रभाईंनीं विनोदानें काढलेलें (आपल्याबद्दल) हे उद्गार आमच्या पी. आर. ना लावण्यासारखे आहेत. पण ७८ व्या वर्षीं अतिरोगी लेले एकाएकीं हृदयरोगानें मेले. कुथत नव्हे, एकदम आजारी पडून. सौभाग्यवतीची निगा–राखतां तिला मागें ठेवून गेले. निमिषार्धांत अंतर्धान पावले. नवल आहे–सदा भांडणारा–लढणारा हा झुंझार योद्धा मृत्यूपुढें नमला.

घरगुती लेले हा मात्र अजब प्राणी होय. खाण्यापिण्याच्या बाबतींत त्यांच्या अनेक घालमेली. हें निषिद्ध. तें चालत नाहीं. हें पाहिजे. तें पाहिजे. तिखट माफक, मीठ कमी. अशा अनेक अटी. विलक्षण पथ्यें. त्यामुळें जेवणाला कुणाच्या घरीं बोलावलें म्हणजे यजमानाची तिरपिट उडे. एकदां माझ्या घरीं मीं लेल्यांना जेवायला बोलावलें. चुकलेंच माझें; पण चूक सुधारण्यापूर्वींच लेले हजर. मलाच घरीं यायला उशीर झाला. लेले गेल्यानंतर मी पांच मिनिटांनीं आलों. यायला उशीर झाला. आल्यावर एक लांबलचक चिठ्ठी मिळाली. त्यांत लिहिलें होतें, " श्री ...आपण जेवणाचें आमंत्रण दिलें. मी वेळेवर आलों. तुम्ही गैरहजर. मुलाला विचारलें, 'कोणी लेले नांवाचा माणूस जेवायला बोलावला आहे का ?' त्यानं सांगितलें, 'मला माहीत नाहीं.' सौभाग्यवतीची चौकशी केली. त्याहि घरीं नाहींत. भोजनाचा हा तुमच्याकडचा और प्रकार आहे. मी रात्रीं जेवत नाहीं; पण अपवाद म्हणून तुमच्याकडे जेवणार होतों. दुपारीं जेवलों नाहीं. आतांहि उपवास आपल्या नांवें घडला. त्याचें पुण्य तुम्हांला." दुसऱ्या दिवशीं सकाळीं येऊन पुन्हां माझी सडकून निर्भर्त्सना. सर्द झालों मी. पण लेल्यांचा हा असा खाक्या ! सर्वांनाच अशा प्रकारचा प्रसाद केव्हांना केव्हां मिळत असे.

'महाराष्ट्राचें दुसरें वेड' हें वेड लावणारें नाट्यप्रेमी आगळें पुस्तक आहे. मराठी रंगभूमीच्या इतिहासांत पी. आर. यांनीं आपल्या जीवनाच्या संध्याकाळीं लिहिलेलीं ही दोन्हीं पुस्तकें फार मोलाचीं आहेत. या पुस्तकांत दुराग्रह आहे, खोडसाळपणा आहे, नामवंत टीकाकारांची चिरफाड आहे. तरीपण यांत महाराष्ट्रीय रंगभूमीचें उत्तम सिंहावलोकन आहे. नाट्यावर श्री. पी. आर. लेले यांचें जसें अविरत प्रेम, तसेंच राज

कारणावरहि त्यांचा भर. त्यांचा कल टिळकांकडे, मन महात्मा गांधीकडे आणि भर लोकशाहीवर–समाज-कल्याणावर. ते हिरिरीनें राजकारणांत पडले म्हणूनच पत्रकार बनले, टीकाकार बनले आणि लोकहितासाठीं त्यांनीं आपली लेखणी झिजविली. टिळकांच्या व्यक्तिमत्वाबद्दल त्यांना विलक्षण आदर. त्यांच्यापासून लेल्यांनीं झुंझारवृत्ति बाणविली. महात्मा गांधीजींच्या तत्त्वज्ञानावर त्यांचा अढळ विश्वास. एका वेळचे नखशिखान्त पाश्चात्य पोषाख घालणाऱ्या लोकांनीं एकदा खादी अंगावर चढवली ती नेहमीं-साठींच. कॉंग्रेस तत्त्वप्रणालीवर संपूर्ण श्रद्धा. आणि तरीहि कॉंग्रेसच्या राज-कारणावर ते टीकाहि करीत. परवांच 'तरुण भारतां'त 'मंत्र्यांची जमात' म्हणून मीं या सदरांत लेख लिहिला. लगेच लेल्यांचें पत्र आलें, 'उत्तम लेख, मला आवडला'. एऱ्हवीं संयमी मनुष्य. किंचित् मन उघडें करणारा. पण लिखाणांत–नाटकांत रमला कीं, 'दोन शब्द' उघडपणें लिहिल्याशिवाय राहणार नाहीं. प्रशंसा करणें त्यांच्या स्वभावांत नव्हतें. पण कोणाचेंहि लिखाण आवडलें कीं समतोलपणानें त्यांनीं समालोचन केलेंच म्हणून समजावें.

राजकारण, राजकारणी माणसें, स्वातंत्र्यापूर्वीचा काळ, स्वातंत्र्यानंतरचा काळ यांबद्दल लेले यांचे विचार मननीय होते. त्यांची भूमिका विचारवंताची होती. प्रज्ञा तत्त्वज्ञाची होती. साधकबाधक विचार करून तत्त्वें शोधून काढ-णाऱ्या शोधकाची त्यांची दृष्टि होती. 'ब्लिट्झ' मध्यें त्यांचें राजकीय लिखाण दर सात दिवसांनीं हल्लीं येत असे. त्यांत चोखंदळपणा, तत्त्वनिष्ठा, निस्पृहता, बोचकपणा, आणि निर्भयता दिसून येत असे. ते कधीं राजकारणी नेते झाले नाहींत. राजकारणाचे बारकावे, प्रवाह व प्रवाद मात्र त्यांना नीट समजत आणि त्यांवर ताशेरे झाडण्यास ते कमी करीत नसत. पत्रकार या नात्यानें त्यांचा दर्जा फार मोठा आहे. स्तंभलेखक या नात्यानें राजकीय घडामोडींवर फार वरच्या दर्जाचें लिखाण त्यांनीं लिहिलेलें आहे.

व्यक्ति अनेक अर्थांनीं विक्षिप्त. शरीराची व्यंकटी विलक्षण, देह रोगांनीं पछाडलेला, वृत्ति विक्षिप्त, वागणुकींत ताळमेळ नाहीं, बोलभांडपणा सटवीला पुजलेला, एकदां शत्रु कीं जन्माचा शत्रु असा हा वेगळा, आगळा माणूस

अनेक दोषांनीं भरलेला असला तरी सरस्वतीचा एकनिष्ठ उपासक होता. सरस्वतीदेवीची पूजा त्यानें इमानें इतबारें केली. आपल्या वकूबानें आपलें वाङ्मय निर्माण केलें. आपलें वाङ्मयरूपी स्मारक आपणच करून ठेवलें. स्मारक चिरंजीव आहे. अमर आहे. कारण त्यांत सत्यकथन आहे. कधीं-मधीं दिलाच्या दिलरुब्यांतून गोड, मंजूळ ध्वनि बाहेर पडले आहेत. हा दिलाचा दिलरुबा सोमवारीं पी. आर. लेले फार खेचायला गेले. कांहीं सूक्ष्म स्वर काढायला गेले. तार तुटली आणि लेले यांचें अवतारकार्य संपलें.

* * *

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे.
860890
दि: 2.12.198

# श्री. नाना कुंटे

: १० :

लोकशाहीच्या या जमान्यांत कित्येक साहेब आहेत; तर कोणी राव आहेत पण नानासाहेब ुंटे आपल्याला फक्त ‘ नाना ’ कुंटे असें संबोधतात. खरे लोकशाहीवादी ते आहेत असा चांगला ग्रह होतो. त्यांच्याबद्दल पदव्यांचें आणि डिग्र्यांचें भारूड अधिकाऱ्याच्या नांवापाठीं पाह्यला सांपडलें, म्हणजे जीव गुदमरतो. ‘ रेक्त गृहस्थ आहेत ’– मन निर्वाळा देतें.

नाना कुंटेना तुम्ही भेटायला गेला कीं ‘ बसा ’– थोडा कणखर, थोडा कर्कश आवाज तुमच्या कानांवर आदळतो. समोर बसलेले नाना कुंटे तुम्हांला हंसून नमस्कार करतात. मिष्किल हंसतात. ‘ हं बोला ’– म्हणतात.

तुम्ही श्री. नाना कुंटे यांचेकडे पाहतां. सर्वसाधारण त्यांचेसंबंधीं मत चांगलें होतें. आपल्याला फक्त ‘ नाना कुंटे ’ म्हणवणारे हे गृहस्थ नाना कुंटेच आहेत, निगर्वी आहेत, स्पष्ट बोलणारे आहेत. काम संपलें कीं ‘ चला बाहेर ’ म्हणून सुचविणारे आहेत. त्यांच्या ठिकाणीं आस्था आहे; पण अघळपघळपणा

नाहीं. कामांत आटोपशीरपणा आणि उरक आहे, थोडीशी कर्कशताहि जाणवते. संयमहि दिसतो. रागीट असणार असेंहि वाटतें. बोलण्यांत आत्मीयता खरी, पण अतीतपणा ठेंचाळतो. अगदीं जवळ यायला देत नाहींत, पण दूरहि फेकीत नाहींत.

बुद्धिमत्तेची चमक डोळ्यांत दिसते. बोलण्यांतील सफाई व वेचक शब्द वापरण्याची संवय जाणवते. ओलावा आहे. भावना आहे. पण स्वभाव सौजन्यशील नसला, तरीहि व्यवहारचतुर आहे. कामाशीं काम हा खाक्या. पण, रंगांत आले, तर खुल्या दिल्यानें लंब्याचौड्या गप्पाहि मारतात. स्वभावांत कठणाई आहे, व्याजोक्ति आहे, विदारक प्रवृत्ति आहे, टीकात्मक वृत्ति आहे; पण त्याबरोबरच समजसपणाहि आहे. अंतःकरणांत गोडवा आहे. कर्तव्याची जाणीव विशेष आहे. कर्तृत्वास निरपेक्षपणाची बैठक आहे.

नाना कुंटे यांचें व्यक्तिमत्व हें असें आहे. कर्तृत्व आहे, धडाडी आहे, कुर्रेबाजपणाहि आहे. संवेदनाशील वृत्ति आहे. पण चिकित्सकताहि जरा जास्तच आहे. लोकशाहींतील समता, समन्वयता, सोशिकपणा आहे. पण बुद्धिनिष्ठ अहंकाराचा उंचावाहि स्वभावांत आहे. त्यामुळें गृहस्थ प्रभावी वाटतात, पण हवेहवेसें मात्र वाटत नाहींत. जवळचे वाटतात, पण जवळ जाववत नाहीं. त्यांच्याशीं आपण समरस होऊंच शकत नाहीं. पण ते मात्र तुमच्याशीं समरस होऊन तोलानें व मोलानें जें करावयाचें–जें त्यांना योग्य आणि न्याय्य वाटतें– तें करून मोकळे होतील.

१९०८ तला अलिबागचा जन्म. जॉन एल्फिन्स्टन हायस्कुलांत शिक्षण. मग विल्सन कॉलेज. बी. ए., एलएल. बी. पर्यंत विश्वविद्यालयीन पदव्या. कुशाग्र विद्यार्थी. पिंड चौकस, चतुरस्र, विद्वानाचा. पण आकस समाजसेवेची; इच्छा असिधाराव्रताची–देशसेवेची. द्वैतांत अद्वैत. म्हणूनच स्वदेशसेवेकडे कल. रामकृष्ण आणि विवेकानंद हें अध्यात्मिक आदर्श, तर राजकीय अध्यात्मांत महात्मा गांधींचें नेतृत्व आणि गुरुभाव. अधिष्ठान नक्की केल्यानंतर मग त्यांत चंचलता नाहीं, बदल नाहीं, धरसोड नाहीं. जीवनांतले माननीय महागुरु तीन. एक वडील–त्यांनीं सुसंस्कृतपणा, स्वातंत्र्य आणि सुविचार दिले. श्री. कौंडिण्य या एका सरकारी नोकरानें म. गांधींच्या 'यंग इंडियाची'

संथा दिली. आणि प्रथमत: पार्लमेंटरी सेक्रेटरी होऊन सचिवालयांत आपल्या कमऱ्यांत खुर्चीवर विराजमान झाल्यावर काय काय करायचें तें त्यांना त्यांच्या शिपायानें शिकविलें ! या तीनहि गुरूंना नाना कुंटे रोज त्रिवार नमस्कार करतात ! त्यांच्या पुण्याईनें आणि आशीर्वादानें आपलें यशस्वी जीवन अधिक यशस्वी होत आहे, असा त्यांचा दावा आहे.

स्वातंत्र्य-चळवळींत ते हिरिरीनें पडले. कारावास त्यांनीं भोगला. महात्मा गांधींच्या तत्त्वप्रणालीवर त्यांचा बुद्धिनिष्ठ विश्वास आहे. त्यांनीं अज्ञातवास सोसला आहे. वनवास भोगला आहे. आणि संसारांतीलहि अनंत अडचणी अनुभवल्या आहेत. त्यामुळेंच त्यांच्यांत थोडासा भकासपणा आला आहे. पण तो शारीरिक, मानसिक नव्हे. मनानें ते कणखर आहेत, घट्ट आहेत, निर्धारी आहेत. भावना आणि बुद्धि यांचा सयन्वय करून ते जीवन कंठीत आहेत.

त्यांच्या या जीवनांत साथ देणारी त्यांची पत्नी सुविद्य आहे. प्रसिद्धि-विन्मुख आहे. सतीचें वाण समजून नाना कुंटे यांचा संसार त्या सांभाळीत आहेत. त्या अल्पसंतुष्ट आहेत, समाधानी आहेत, स्वकार्यरत आहेत. मुख्य म्हणजे त्या नाना कुंटे यांच्याशीं समरस आहेत. त्यांच्या नि:स्वार्थी, निरपेक्ष आणि निरलस तपस्येवर तर नाना कुंटे यांची राजकीय, सामाजिक, बौद्धिक इमारत उभी आहे. ससारांत सौभाग्यवति कुंटयांचा स्वार्थत्याग उजवा तर राजकारणांत नांना कुंटयाचा सेवाभाव उजळ. पण एकमेक एकमेकांना पूरक. नाना झुंजार वृत्तीचे पण शांततावादी; तर सौभाग्यवती शांत वृत्तीच्या पण जीवनांतल्या वादळांशीं झुंझारवृत्तीनें लढाई देणाऱ्या, हा नाना–नानींचा योग्य सुयोग आहे. समसमा संयोग आहे.

असहकारितेंतून नाना कुंटे सरकारांत आले. १९४६ मध्यें ते पार्लमेंटरी सेक्रेटरी झाले. त्या वेळच्या मुख्यमंत्र्यांचे–बाळासाहेब खेर यांचे. १९५२ तें १९५६ ही त्यांची स्पीकर या नात्यानें कारकीर्द. १९५७ मध्यें निवडणुकींत अपयश व राजकारणसंन्यास. मराठी ग्रंथसंग्रहालय, एशियाटिक सोसायटी, ट्रेड युनियन चळवळ यांकडे नंतर त्यांचें मन वेधलें. या क्षेत्रांतहि त्यांनीं भरीव कामगिरी केली आणि १९६२ मध्यें जानेवारी महिन्यांत ते महाराष्ट्र

गृहनिर्माणमंडळाचे अध्यक्ष झाले. इथेंच त्यांची प्रगति थांबेल, असें वाटत नाहीं. प्रत्येक विषयाची सखोल माहिती करून घेणें, कामाची एक विशिष्ट धाटणी ठेवणें, प्रत्यहीं निष्ठावंत कार्यकर्त्यांच्या अभिनिवेशानें अपथ्यकर व अरुचकर न बोलणें, आपल्या अधिकारांचें सर्व निर्बंध सांभाळून बहुजन-समाजाची सेवा करणें हा नाना कुटे यांचा 'धर्म' आहे. या 'धर्म'प्रवृत्तीचा इसम एकादी निवडणूक हरेल, पण बिनीचा सरदार म्हणून कांहीं ना कांहीं विधायक कार्य करीतच राहील.

श्री. वर्तक अध्यक्ष म्हणून व श्री. देसाई कमिशनर म्हणून या दोघांनीं अस्तित्वांत नसणारें हें गृहनिर्माणमंडळ सुरू केलें. या द्वयीचें काम भरीव आणि भरपूर असें आहे. राक्षसाची भूक आणि जागेची निकड हे प्रश्न सारखेच. घरटंचाई हा प्रश्न सोडवतां येणारच नाहीं, असें शहाण्यांना वाटतें. तो प्रश्न माणसाला तरी ग्रासून टाकील किंवा माणूस तरी या महान् प्रश्नाला ग्रासील, अशी भयानक परिस्थिति सध्यां आहे. मुंबईंत मुंगीला राहायला जागा मिळेल कीं नाहीं, याची वानवा. तर माणसाची कथा काय? नाना कुंटे यांचेकडे सोंपविलेलें 'गृहनिर्माणमंडळ' बुद्धिबळांतील भुलभुलावणी. अथवा न सुटणारें कोडें. पूर्वीं नाना कुंटे यांनीं पार्लमेंटरी सेक्रेटरी असतांना गृहव्यवस्थेचें (accommodation) खातें सांभाळलेलें होतें. त्यामुळें अनुभव होता. पण गृहनिर्मिति म्हणजे चक्रव्यूह ही स्थिति. तेव्हां नाना कुंटे हा प्रश्न निदान मुंबईपुरता तरी सोडवतील का असें ते गृहनिर्माणखात्याचे अध्यक्ष असतांना वाटें. त्यांच्यासारख्या जबाबदार, कार्यप्रवृत्त, विचारी, निर्धारी माणसाच्या कोशांत 'अशक्य' हा शब्द नसावा. त्यांनीं प्रत्यहीं भीमबळ, आत्मिक बळ वापरून महाराष्ट्राचा हा गृहनिर्मितीचा प्रश्न सोडविण्याचा प्रयत्न केला. तरी पण कोठें माशी शिंकली देवाला माहीत. नानाच गृहनिर्माणमंडळातून बाहेर पडले.

नानांनीं मुंबईचा गृहप्रश्न सोडविला नाहीं तरी कुठलाहि प्रश्न सुटणार नाहीं असें मला वाटत नाहीं. मानवाची दुर्दमनीय शक्ति आकाशाला गवसणी घालूं शकते, अशक्याला शक्यतेचें स्वरूप देते. मानवी प्रमेयें प्रायः सुखानें सुटणारीं नसलीं, तरी प्रगल्भ विचारानें, शास्त्रीय कृतीनें आणि असाधारण

अंत:संवेदनेनें मानवी बुद्धि शेवटीं ती सोडवूं शकते. नाना कुंट्यांच्याकडे विचारशक्ति आहे आणि चित्शक्तीहि आहे, तिचा उपयोग गृहनिर्मितीच्या या अकाळविकाळ प्रश्नाचें उत्तर शोधून काढण्यास झाला असता; पण निसर्गापुढें कोणाचेंहि चालत नाहीं.

मी नानांकडे या नाहीं त्या कारणास्तव जात असतों. प्रत्येक वेळेला या मुंबईच्या घरप्रश्नावर मी त्यांना भंडावून सोडतों. प्रत्येक वेळेला ते म्हणत, 'पाहूं', 'बोलूं', 'एकदां मोकळ्या गप्पा मारूं' आणि मग मिष्किलपणें हंसून मला ते अलगत बाहेर काढतात.

एकदां मी म्हणालों, " नुकतेच अर्थमंत्री श्री. बर्वे या घरप्रश्नावर युसुफ मेहरअल्ली सेंटरमध्यें बोलले. त्यांचें म्हणणें असें कीं, मुंबईपुरता तरी हा घरप्रश्न अशक्य कोटींतला झालेला आहे. वस्ती वाढत आहे. त्या-प्रमाणें घरें तयार होणें आजच्या परिस्थितींत तरी शक्य नाहीं. तोडगे आहेत. शहराकडला माणसांचा लोंढा थांबवा. लहानशीं स्वयंपूर्ण शहरें मुंबापुरीच्या जवळपास बांधा. तेथें लोकसमुदायाला रोखून धरा. शहरांतल्या मोठमोठाल्या औद्योगिक वसाहती दूरवर नेऊन पुन्हां वसवा. या सुधार-णांनीं मुंबईवरला ताण कमी होईल; पण तरीहि यामुळें घरप्रश्न सुटेलच असें निश्चित कांहीं सांगतां येणार नाहीं. आपलें काय म्हणणें आहे यावर ?"— मी नाना कुंटे यांच्याकडे पाहून शेवटीं विचारणा केली.

ते थोडा वेळ स्तब्ध होते. कांहीं वेळानें त्यांची नजर भिंतीवरल्या महा-राष्ट्राच्या नकाशावर खिळली. " इकडे या " ते म्हणाले. खुर्चीवरून ते उठले. मला त्यांनीं नकाशाकडे नेलें.

" हें पहा उरण, अलिबाग, रेवदंडा, रेवस, नोवा बेट !"— नाना कुंटें यांचीं बोटें सरसर या प्रदेशावर फिरत होतीं. मला कांहींच समजेना हें काय चाललें आहे तें. पण मनांत म्हटलें गप्प बसावें आणि ऐकावें. " हा टापू किती आहे ठाऊक आहे तुम्हांला ? एक हजार चौरस मैल. आज येथें खोपोली व भिरा हीं विद्युत्केंद्रें आहेत. या दोन्हींहि केंद्रांतून ९०० दशलक्ष गॅलन पाणी वाहात आहे. येथें पाँच नद्यांचा समूह आहे. त्यामुळेंहि पाण्याचा पुरवठा विपुल आहे. नळ जोडून या प्रदेशाला पाणी द्या. आबादीआबाद होईल.

जमीन उत्तम. पाणी जेवढें लागेल तेवढें. रस्त्यांची सोय तातडीनें होऊं शकेल. हवा उत्तम. निसर्गसौंदर्य हृदयंगम. हा एवढा मोठा प्रदेश मुंबईच्या जवळ आहे. उरण–मुंबई पूल बांधला, तर येथें वाहतूक सहजसाध्य आहे. हें आज नाहीं उद्यां करावेंच लागेल. आज केल्यास बरें होईल. तुमचा मुंबईचा घरप्रश्न संपूर्णतः सुटेल. तुमच्या अनेक दिवसांच्या प्रश्नांच्या भडिमाराला हें माझें वैयक्तिक उत्तर आहे."

"उरण–मुंबई पूल बांधा". नाना कुंटे द्रष्टयाच्या चष्म्यांतून बोलत होते, "मुंबईचा विस्तार पूर्व व दक्षिण या दिशांकडे वाढवा. जागा, पाणी, विद्युत्शक्ति विपुल आहे. जमिनीच्या किंमती ठरवून टाका. औद्योगिक वसाहती अनेक होऊं शकतील. घरांसाठीं हवाशीर जागा खुल्या होतील. मोकळ्या हवेचा, निसर्गाचा वरदहस्त असणारा, सर्व दृष्टींनीं सोयीस्कर. भाजीपाला, दूधदुभतें मुबलक मिळेल असा हा प्रदेश आहे. मुंबईच्या परिसराचा हा भाग आहे. कर्तृत्वशक्ति असणारा कोणी द्रष्टा महाभाग हें कार्य हातांत घेऊन ह्यासाठीं जीव तोडून काम करील, तर हें स्वप्न तो सत्यसृष्टींत आणून पोंचवील. बस्स. येथें माझें उत्तर संपलें".

नाना कुंटे मागें वळले. आपल्या खुर्चीवर येऊन बसले. त्यांच्या कमऱ्यांत स्तब्धताच स्तब्धता. त्यांच्या स्वप्नानें तेथेंच मूर्त स्वरूप धारण केलेलें होतें. मला तो पलीकडला टापू दिसत होता. पाणी खळाळत होतें. विद्युत्शक्ति रसरसत होती. घरकुलांत बालवालकें हुंदडत होतीं. उद्योगधंद्यांचे भोंगे निनादत होते. मुंबई–उरणचा पूल दर्यावर आपलें प्रभुत्व गाजवीत होता. समुद्राचें पाणी खळाळत होतें. निसर्गाची अतीव रम्य चलत् दृश्यें माझें मन मोहून टाकीत होतीं.

मी उठलों. माझें हृदय भरून आलें. मी नाना कुंटे यांना अभिवादन केलें व म्हटलें, "आपण हा आमच्या मुंबईकरांच्या घरकुलांचा प्रश्न सोडवाल खास !"

मी बाहेर आलों. माझ्या मागें नाना कुंटे यांच्या मिस्किल हास्याचें खळाळणें मला सोबत करत होतें.

# कवि कुसुमाग्रज

: ११ :

गोव्यांतील मराठी साहित्य संमेलनाचे अध्यक्ष, क्रांतदर्शी कवि, निष्णात निबंधलेखक, उच्च पातळीवरचे कादंबरीकार, सर्व रंगरसपूर्ण नाटककार, उत्तम भाषांतरकार व अभिजात लेखक ही या अप्रसिद्ध राहूं इच्छिणाऱ्या विभूतीची ख्याति. तेव्हां म्हटलें ही व्यक्ति आहे तरी कशी ? म्हणून मुंबई साहित्य संघांतील कुसुमाग्रजांच्या सत्कारप्रसंगीं न चुकतां हजर राहिलों. अगदीं दुसऱ्या रांगेंत बसलों, म्हणजे म्हटलं त्यांचं व्यक्तित्व व प्रभाव जवळून न्याहाळतां येईल. डोळ्यांत ठसठशीत भरेल.

केळेवाडींतल्या साहित्य संघाच्या वैभवशाली डॉ. भालेराव नाट्यगृहांत शिरण्यापूर्वी मनांतल्या मनांत त्यांच्या वाङ्मयाची आठवण केली. त्यांचें ‘ कांहीं वृद्ध कांहीं तरुण ’ हें कथांचें पुस्तक आठवलें. मी जेव्हां हा कथासमुच्चय वाचला तेव्हां तो मला हापूस आंब्यांचा रस वाटला. निर्मल आकाश, निरभ्र ढग, शीतल चांदणं आणि शांत सात्त्विक वातावरण तसं कुसुमाग्र-

जोंच्या कथांचें वातावरण. सत्य, शिव, सुंदर यांनीं ओतप्रोत भरलेलें. त्यानंतर 'जान्हवी' कादंबरीची आठवण झाली. असामान्य कथा. आत्मनिष्ठ महंत, ध्येयनिष्ठ वासुदेव, अवखळ पण विचारी जान्हवी, कलंदर, रगेल चित्रकार यांच्यांतील शरीर व मन यांच्या विकार–विचारांचे संघर्ष मोठ्या काव्यपूर्ण रीतीनें कुसुमाग्रजांनीं रंगविले आहेत. मानवी तत्त्वज्ञानाच्या दोन बाजू. संपूर्ण त्याग व विवेक आणि रगेल वृत्तीनें जीवनाचा उपभोग. निष्ठुर न्यायाधीशाच्या निरपेक्षतेनें त्यांनीं या बाजू मांडल्या आहेत. मानवी स्खलनाचें रूप, तत्त्वनिष्ठांच्या मनाचें विश्लेषण, मानव 'मानव' आहे हा निष्कर्ष सांगतां सांगतां कुसुमाग्रजांनीं एक सुंदर कथा गुंफली आहे.

शालिमार बागेची अपूर्वाई, अद्वितीयता, असाधारणता, स्वर्गीयता, सुमनोहरता त्यांच्या काव्यांत ओतप्रोत भरलेली आहे. 'स्वगत', 'मराठी माती', 'विशाखा' यांतील कवनें त्यांच्या मधुमय, नाजूक, निरागस हृदयाची साक्ष देतात. आकाशांत केव्हां केव्हां पांढुरके, निळसर, काळसर, लालसर ढग सायंकाळच्या वेळीं इतस्ततः विखुरलेले दिसतात. ते पाहातांच हृदयांत मृदुल भावना, सुरेल ताना, मनोहर रासक्रीडा सुरू होते. त्यांचें काव्य विविध रसांनीं संपूर्ण भरलेलें आहे. आजच्या कवींत महाकवि बनण्याची स्वयंभू शक्ति या महाभागांत आहे.

त्यांचीं नाटकें, नाटिका, भाषांतरित 'ऑथेल्लो' यांत अभिजात चमक आहे. नजाकत व लुफ्त आहे. शेक्सपियर हाताळावा शिरवाडकरांनींच. शेक्सपियरला हिंदी पेहराव चढवावा शिरवाडकरांनींच.

असे हे गृहस्थ कविराजहि आहेत व कुशल कलाकारहि आहेत. वि. वा. शिरवाडकर ऊर्फ कुसुमाग्रज ऊर्फ तात्यासाहेब. उमदा चेहरा, बुद्धीची चमक दर्शविणारा भालप्रदेश, विश्वांतले सौंदर्य लुटणारे डोळे, रुबाबदार नाक, हंसरा मुखवटा, उपजत शालीनता–विनय, जन्मजात बोलका अबोलपणा आणि मनाची पकड घेणारें व्यक्तिमत्व. बुद्धिचापल्य पहिल्या प्रतीचें, भावना उच्च प्रकारची, जीवनाचीं मूल्यें हिमालयाच्या उंचीएवढीं उंचावलेलीं. इतरांबद्दल सहिष्णुता, त्यांच्या तत्त्वप्रणालीबद्दल आदर, विचारवंताची भूमिका, बोलणें, चालणें, वागणें सभ्य, सच्छील गृहस्थाचें. कोठें धुसफूस नाहीं,

उथळपाथळ व आग्रह नाहीं. थाट नाहीं. नखरा नाहीं. सगळा संथ कारभार. सीधा व्यवहार.

जीवनांत अवगाहन करावें, प्रयोग करावे, अनेक प्रकारचे अनुभव घ्यावे हा कुसुमाग्रजांच्या स्वभावाचा गाभा आहे. मनन सदा चालू. वाचन अव्याहत सुरू. चिंतनप्रवृत्ति सखोल. वृत्ति आत्मनिष्ठाची. कांहीं तरी शोधून काढावयाचें आहे हा ध्यास. अवकाशांतील अंतिम तत्त्वांचा कानोसा घेण्याची तीव्र ओढ. स्वभावच मनोविश्लेषणाचा–मनोव्यापाराचें अन्वेषण करण्याचा. पण कवीचें हृदय, आदिमातेची ममता, सोज्वळ मन, म्हणून राजहंसाची झेप आणि नजरेंत दिसतें तें सगळें भव्य, उदात्त आणि विशाल. खाद्य मोत्यांचा चारा–उच्च, सात्त्विक प्रकारचें पौष्टिक भोजन. साध्याहि विषयांत त्यांना आनंदाची–परमानंदाची अनुभूति मिळते. असीम औदार्य. माणसाच्या स्खलनाकडे पाहण्याची दृष्टि सहानुभूतीची. आसमंतांतलें सौंदर्य, सुमनोहरता, आणि सुरेलता लुटण्याची–टिपण्याची संवेदनाशील वृत्ति. एकांताची आवड. आत्मनिष्ठतेचा हव्यास. सौंदर्य नुसतें पचवत नाही तर त्या सौंदर्याचा आविष्कार करण्याची सृजनशक्ति. असा हा हिमालयवासी राजहंस सह्याद्रीच्या खोऱ्यांत उतरलेला आहे.

लोक म्हणतात शिरवाडकर प्रसिद्धिपराङ्मुख आहेत. या त्यांच्या प्रसिद्धिपराङ्मुखतेचें व सभा–सम्मेलनें, शिबिरें येथें न जाण्याचें एवढें स्तोम माजविलें गेलें आहे कीं, या विन्मुखतेचें प्रसिद्धिपुराण महाभारताहून जाडजूड होईल. मला वाटतें प्रत्येक साहित्यकारांत, कलाकारांत कांहीं तरी तऱ्हेवाईकपणा असतो अथवा तो लादला तरी जातो. भाऊसाहेब खांडेकर आणि फुरसें यांचा त्यांच्या Lucodermaशीं कांहीं संबंध आहे कीं नाहीं देव जाणे. पण त्या वेळीं हें फुरसें प्रकरण गाजलें. भाऊसाहेब माडखोलकर 'मी आतां मुंबईला मेलों आहें. मला कुत्रेंदेखील विचारीत नाहीं' म्हणत मीरा कहे प्रभूसारखं पालूपद उच्चारीत असतात. पण मुंबईतला प्रत्येक साहित्यप्रेमी मुंबईकर त्यांच्याकडे बोटें दाखवून 'हे ते माडखोलकर' म्हणून म्हणतो. जॉन्सन म्हणे रस्त्यावरून जातांना प्रत्येक खांबाला हात लावायचा मग पुढें जायचा. बर्नार्ड शॉ रस्त्यांत, हाईड पार्कमध्यें पाय वर व डोकें खालीं असा

पवित्रा घ्यायचा आणि लोक जमले कीं, तो सरळ उभा राहून आपल्या फेबियन सोसायटीचें व्याख्यान सुरू करी. डॉ. केतकर स्वत: तयार केलेला ज्ञानकोश पाठीवर घेऊन विक्री करीत घरोघरीं फिरत. प्रसिद्ध संतभक्त आजगांवकर विडीचे झुरके घेत रस्त्यांत, आळींत, ओटीवर जिथं मिळेल तेथें संतवाङ्मयाचें व्यासपीठ उघडीत. प्रतिभावान् लोकांत कांहींना गंड येतो–असतो. त्यांना त्रास होऊं नये अथवा त्यांचा कार्यभाग व्हावा म्हणून त्यांना चेहऱ्यावर हा नाहीं तो 'मुखवटा' बसवावाच लागतो. पण अतीच डिवचलें तर मात्र सांपडतात आंतल्या बाजूला फणसाचे गरे. निदान कुसुमाग्रजांच्या अंत:करणांत तरी फणसाचे गरे नक्कीच आहेत.

या कविमहाशयांत कवीचा लाजाळूपणा आहे. भिडस्तपणा आहे. म्हणून कुसुमाग्रज नाशिक बरें आणि आपण बरे या वृत्तीनें आपलें जीवन जगताहेत. व्यासंगाला झगडा उपयोगाचा नाहीं. काव्याला तळमळ हवी. पण जीवनाची तळमळ नको. कथाकाराला चिंतन हवें. मानवी मनाची उकल पाहिजे, पण धकाधकीचा मानवी संघर्ष नको. त्यांत हळुवार मन मरायचें एकादे वेळीं. म्हणूनच हा सुस्वभावी गोड मनुष्य मानवाशीं शिवाशिवीचा खेळ खेळतो आणि मानवापासून दूर राहण्याचा प्रयत्न करतो. मनावर उत्कट प्रेम करूनहि त्यापासून दूर राहण्याचें नाटक करतो. नाटक करतो असें म्हणण्याचें कारण त्यांचेकडे कोणी गेला तर माणुसघाण्याप्रमाणें ते तुम्हांला घराबाहेर हांकलणार नाहींत. उलट तुमचें आदरातिथ्य करतील. ऊठबस करतील. तुमच्याशीं काव्यशास्त्रविनोद करून तुम्हांला रिझवितील. हंसासारखा गोड माणूस, पण हरिणासारखा पळपुटा. नाहीं कामाची भ्रांत कीं नोकरीचा हव्यास. जें मिळतें त्यांत समाधान, शांति. लहानसं घरकूल पण तेथें आनंद आणि दैवी विपुलता भरपूर भरलेली. जणुं जन्मच गोडवेपणासाठीं, स्वयंप्रकाशासाठीं. लोक म्हणतात, शिरवाडकर आळशी आहेत. गैरसमजामुळे तर माणसांची उंची वाढीला लागते. बहिर्दृष्टीनें पाहिलें तर शिरवाडकर आळशी, संथ, सुस्त वाटतील. पण त्यांचें सूक्ष्म अवलोकन केलें तर ते तत्त्वपिपासु आहेत. अंतरींची त्यांना ओढ आहे, मानवी मनाचा ठाव घेण्याची त्यांच्या मनाची ठेवण आहे. जें दृश्य नाहीं तें त्यांच्या द्रष्टेपणाला दिसतें आणि त्यांच्या काव्यबागेंत बहरतें. ते आळशी असते तर २२–२३ पुस्तकें प्रसिद्ध करूं शकले नसते. म्हणूनच

पुन्हां एकदां असें म्हणावेंसें वाटतें कीं, बाहेरून सुस्तावलेला हा गृहस्थ आंतून जागृत आहे. ऋषीचीं अवकाशांतील अंतीम तत्त्वें जाणण्याची जी झेप तीच याची. फरक एवढाच कीं नाशिक येथील शिवाजी रस्त्यावरच्या वसति-स्थानांतल्या गवाक्षांतून त्यानं अंतराळांतील नाना कळा पाहिल्या आहेत, अनुभवल्या आहेत. त्यांचाच आविष्कार म्हणजे त्यांचें समृद्ध वाङ्मय. त्यांना माणसें पाहिजे आहेत, मित्र पाहिजे आहेत, मुलें पाहिजे आहेत, स्त्रियाहि हव्या आहेत. एऱ्हवीं अबोल माणूस संभाषणांत खुलतो. कधीं कधीं व्यास-पीठावरून स्वतःची अमृतमय ज्ञानेश्वरी श्रोत्यांना ऐकवतो. आपले प्रगल्भ विचार न घाबरतां, न चाचरतां लोकसमुदायाच्या गळीं उतरवितो; म्हणूनच शिरवाडकर मदारी आहेत. जें आपण नाहीं म्हणतो तें त्यांच्यांत आहे. जें आहे तें प्रकर्षानें आहे. ज्ञानाची, अनुभवाची, चिंतनाची, मननाची, द्रष्टेपणाची सूज आलेला हा माणूस आहे. भावनेचें दोंद इतकें अथांग भरलेलें आहे कीं, हा मानवरूपी कविराज अमृताचे काव्यबोल अमर करीलच. पण मराठी साहित्य संमेलनाच्या व्यासपीठावरून साहित्य महाराष्ट्राला गंगोदकाचे घुटके पाजील, वेदवाक्यें सांगील, सुनीतें ऐकवील, सनातनी मूल्यांचा पाठ देईल. एरव्हीं समाजापासून दूर पळणारा हा महाभाग हिमालयासारखा पेटला म्हणजे हृदयांना पाझर फोडील—चैतन्याचा भंडारा वाटील.

सौ. कुसुमाग्रज मात्र खऱ्या अर्थानें प्रसिद्धिविन्मुख आहेत. बर्नार्ड शॉंना एकदां त्यांच्या भक्तानें प्रश्न विचारला, ' श्रीमती बर्नार्ड शॉंना तुम्ही मागें मागें कां ठेवतां ? ' त्यांच्या नेहमींच्या पद्धतीनें त्यानें लगेच उत्तर दिलें, ' माझी नायको श्रीमती बर्नार्ड शॉ आहे ही काय कमी प्रसिद्धि तिला मिळत आहे ? ' सौ. शिरवाडकरांबद्दल असेंच कांहींतरी उत्तर आपल्याला श्री. शिरवाडकरांकडून मिळेल. संसार सुखाचा. आपला पति कोण व कसा आहें याची साक्षात् जाणीव. उत्तम भोजन म्हणजे आदर्श वाङ्मयाच्या निर्मितीला प्रोत्साहन. मूक संवादांनीं—मूक भावनांनीं पतीला स्फूर्ति देणें, कष्ट-सायास आपणाकडे, वाङ्मयाची निरलस सेवा कुसुमाग्रजांकडे अशी मला वाटतें त्यांच्या घरकुलांत वांटणी असावी. वाङ्मयाची अधिष्ठात्री देवता वाङ्मय लिहीत नाहीं, पण आपल्या प्रसादरूप भोजनांतून, खाद्यपेयांतून

प्रासादिक वाङ्मय लिहिण्याचें चैतन्य देऊं शकतें. स्त्रीची पतिराजाच्या वाङ्मयसंसारांत आणखी दुसरी भूमिका काय असूं शकणार ?

साहित्य संघाच्या रंगमंचकावरून आपलें सौजन्यपूर्ण भाषण करतांना त्यांची मला जी व्यक्तिरेखा भासली ती जशीच्या तशी लिहून काढली. माझ्यासारखीच कुसुमाग्रजांची प्रतिमा साहित्यप्रेमी मुंबईकरांच्या मनावर उमटली असेल असें मला वाटतें. प्रभा आणि प्रतिभा यांचा संगम म्हणजे कुसुमाग्रज. त्यांना दीर्घायुष्य लाभो, वाङ्मयसृष्टींत ते अमर होवोत, त्यांचे-कडून महाकाव्याचें दान आम्हांला मिळो आणि त्यांच्या तत्त्वचिंतनांतून नवगीता प्रसवो असें पसायदान मी नम्रपणें मुंबईकरांच्या वतीनें विश्वात्मक देवाकडे मागतों.

* * *

# सौ. हिराबाई बडोदेकर

: १२ :

" ह्या हिराबाई " –श्री. राजाराम हुमणे माझे घरीं श्रीमती हिराबाईंना घेऊन आले त्या वेळीं परिचय करतांना म्हणाले.

" त्यांची ओळख साऱ्या जगाला आहे "–मीं हंसत म्हटलें. तेव्हां राजारामभाऊहि हंसले. श्रीमती हिराबाईहि हंसल्या. तें मंदमधुर स्मित–हिराबाईंच्या स्वभावांतील संयम त्या हंसण्यांतहि प्रतीत होत होता.

त्यानंतर पुष्कळ वेळां श्रीमती हिराबाई माझ्या घरीं आल्या. आमचा घरोबा वाढला. त्या आमच्याकडे येतात. आम्ही त्यांच्या घरीं पुण्यांत जातों. अति जवळचा संबंध आल्यामुळें नंतरहि मी असेंच म्हणेन कीं, हिराबाई साध्या आहेत, संयमी आहेत, सोज्वळ आहेत.

त्यांचा एरंडवणें रोडवरील बंगला आंतून पाहिला कीं, हिराबाईंचा नीटसपणा, नेटकेपणा पटकन् डोळ्यांत भरतो. प्रत्येक वस्तु योग्य जागीं. स्वच्छपणा कमालीचा. साधेपणाचीहि कमाल. जितक्या हिराबाई साध्या तितकेंच त्यांचें

घर साधें. त्यांचें व्यक्तित्व ज्याप्रमाणें मनावर सात्त्विक ठसा उमटवितें त्याप्रमाणें त्यांच्या घराची वास्तूहि सात्त्विक आणि प्रासादिकच आहे. या घरांत त्यांची बोलकी बहीण श्रीमती कमलाबाई सदानकदा तुम्हांला किस्से सुनवील. हिराबाईचे साधे, सरळ चिरंजीव आदब राखून दुरूनच तुमची चौकशी करतील. आणि त्यांच्या सुंदर सूनबाई त्यांच्या घरगुती आतिथ्यानें तुम्हांला तोषवितील. या घरांतील शांत, शीतल व्यक्तित्व आहे मात्र हिराबाईंचें. त्या विनोद करतील तो नर्म, हंसतील विवेकपूर्ण, लकेर मारतील हळुवार आणि नाजुक आणि बोलतील तेंहि अर्थपूर्ण.

हिराबाई गातात विनासायास. गाण्याच्या मैफलींत रंग भरतात तन्मयतेनें. रंगभूमीवर त्या भामिनीचें काम करीत असतांना, मैफलींत गात असतांना अथवा घरीं रियाझ करीत असतांना प्रत्येक ठिकाणीं त्यांची तन्मयता कायम असते आणि म्हणूनच त्यांच्या गायनांत श्रोता रमतो. तन्मयता हा हिराबाईचा स्थायीभाव आहे. त्यामुळेंच कोठल्याहि प्रकारचे नाटयगुण नसूनहि केवळ उत्तम गायकीच्या जोरावर त्यांनीं मराठी रंगभूमि गाजविली.

आपल्या शिष्यशिष्यणींना शिक्षण देतांनाहि त्यांची ही तन्मयता कायम असते. मनापासून त्या आपलें गायन शागीर्दांना शिकवितात. हात राखून शिकवावयाचें त्यांना माहिती नाहीं. “ब्रह्मनादाचें हें भांडार मुक्त हस्तानें तुम्ही लुटा”, असें हिराबाई आत्मीयतेनें आपल्या शिष्यवरांना सांगतात. राजाराम हुमणे यांच्या दहा वर्षांच्या मुलीला गायन शिकवितांना त्यांची तन्मयता तितकीच प्रखर असते. इथें कमी–तिथें जास्त हें हिराबाईंच्या गांवीं नाहीं. त्यांनीं गळयांत नवरत्नांचीं भांडारें भरून ठेवलेलीं आहेत.

तीन बहिणी आणि दोन भाऊ असें हें हिराबाईचें कुटुंब. हिराबाई, कमलाबाई आणि सरस्तीबाई या तीन बहिणी. कै. सुरेशभाऊ आणि पापासाहेब हे दोन बंधु. कडक शिस्तवान मातोश्रीच्या हाताखालीं एकमतानें रहाणारें हें कुटुंब. सुरेशबाबू संगीतशास्त्रांतील महापंडित. थोडक्या आयुष्यांत अमाप कीर्ति मिळविली. लवकर गेले. पापासाहेब कुशाग्र विद्यार्थी. वकील झाले. लय लागत नाहीं. त्यामुळें जीवनांत सर्वत्र कठिणाई. हिराबाईचें विश्वच संगीताचें. हृदय स्वरांनीं भरलेलें. शरीरांतल्या नसानसांत मधुर

कूजनाच्या लहरी भरलेल्या. कमळाबाईमध्यें नाटच, बोलकेपणा, अवखळ-पणा या त्रयींचा मिलाफ, तर सरस्वतीबाईंमध्यें वडील बहिणीच्या पावलावर पाऊल टाकून पुढें जाण्याची बहीणभक्ति. हिराबाईंची तान बाहेर पडली कीं ती सरस्वतीबाईंनीं पुरी केलीच. हिराबाईंनीं त्यांच्या पद्धतीनें एकादा राग आळविला कीं सरस्वतीबाईंनीं तन्मयतेनें त्याचें अनुकरण केलेंच. ज्याला मुलाहिजा नाहीं असें गायन हिराबाईंच्या गळयांतून निघालें कीं सरस्वती-बाईंनीं तें त्यांच्या मुलायम पद्धतीनें आळविलेंच. एकीच्या ठिकाणीं निसर्गदत्त आवाजांत परमेश्वराच्या परमोच्च पदचरणांवर प्रासादिक पुष्पांची रास रचून पूजा बांधण्याची स्फूर्ति, ओज, आणि लकब; तर दुसरीच्या आवाजांत बासरीच्या नाजुक-साजुक स्वरांची मधुरता, सुंदरता आणि सहजता. एकमेकी-साठीं एकमेकीचा जन्म. संगीत मैफलीत दोघीजणी एकत्रित आल्या, सवाल–जवाब सुरू झाला कीं आंबरस–पुरीचेंच जेवण. मातोश्री हयात असतांना प्रत्येकीचें व्यक्तित्व लपलेलें, छपलेलें. पण पुढें प्रत्येकजण प्रकर्षानें प्रसिद्धला, विकसला. कुटुंबच प्रकर्षानें प्रसिद्धलें, विकसलें. गुणी उत्तम गायकीचें आगर!

पण या घराण्याचें ‘दैवत’ हिराबाई. प्रेमानें त्यांचें घर त्यांना ‘चंपूताई’ म्हणतें. तर जग त्यांना श्रीमती हिराबाई बडोदेकर म्हणून ओळखतें. घराण्या-साठीं खस्ता खायच्या चंपूताईंनीं. जिथें कमी पडेल तेथें भर घालायची चंपूताईंनीं. सर्व भावंडांची देखभाल करायची चंपूताईंनीं. कै. सुरेशभाऊ यांच्या मुलामुलींचा सांभाळ करायचा त्यांनींच. लग्नें लावून द्यायचीं हिरा-बाईंनींच. मुलांचा धंदा-उदीम सांभाळायचा चंपूताईंनीं आणि हें सर्व विराट-रूपी घर सांभाळावयाचें तें तक्रार न करतां. न रागावतां; कोणाकडे न बोलतां सर्व कारभार निमुटपणें बिनबोभाट. जणुं जन्मच सर्वांच्या सुखा-साठीं. स्वतः दुःख साहून, मन मारून, शरीर थकवून हिराबाईंनीं गळयाचें माधुर्य मिळविलें आणि ईश्वरी संगीत सुनवून परमानंद साकार केला.

हिराबाई आहेत कृष्णवर्णी. रूप साधारण, डोळयांत चमक. पण त्यांच्या-तील गाणारी गायिका भारदस्त आहे.

त्यांची गुरुभक्तीहि अपार, एकनिष्ठ, आणि अनन्यसाधारण. अब्दुलकरीम खां साहेबांच्या मिरजेच्या कबरीसमोर दरवर्षी त्या वर्षश्राद्धदिनीं गायिल्या-

शिवाय राहात नाहींत. ती हाजिरी दिलीच पाहिजे. हें गुरुवर्यांचें ऋण फेडलेंच पाहिजे. गुरुवर्यांच्या मिरज येथील स्मारकासाठीं त्यांनीं जिवाचें रान करून पै पै पैसा जमविला आहे आणि आपल्या गुरुजींच्या—अब्दुलकरीम खां साहेबांच्या—स्मरणार्थ स्मारक हॉल बांधला आहे. गुरुवर्यांसाठीं त्यांनीं झोळी हातांत घेतली आहे. आसेतु हिमाचल गायनाचा दौरा करतांना त्यांच्या अविचल गुरुनिष्ठेचा विसर पडत नाहीं.

महाराष्ट्राची गायनक्षेत्रांतील दैवतें विष्णुबुवा, बखलेबुवा, वझेबुवा, पंढरपूरकरबुवा, तसेंच भावड्या, बालगंधर्व, केशवराव, दीनानाथ, अंजनीबाई, केशरबाई, मोगूबाई, हीं आहेत. या गायकांच्या प्रभावळींत हिराबाईचें स्थान फार मोठें आहे. त्यांची सेवा मौलिक आहे. आपलें अचल ध्रुवस्थान त्या टिकवून राहिलेल्या आहेत.

आमचेकडे दत्तजयंतीला आमच्या गुरूंच्या महोत्सवांत हिराबाईंनीं गावें, ही आमची इच्छा. कसें विचारावयाचें हा आमच्यापुढें प्रश्न. उत्सवापूर्वी हिराबाई आमचेकडे अचानक आल्या. बोलतां बोलतां त्या म्हणाल्या, " हे पहा ! या वर्षी मी आणि सरस्वती आम्ही दोघीहि महोत्सवाच्या दिवशीं आमची सेवा आपल्या घरीं पेश करणार आहोंत. तुमची या सेवेला संमति राहील ना ?"

किती विनम्र भाव ? किती विनय ? भारताची मान्यवर गायिका परवानगी मागते "मी गावें ना ?" या विनम्रतेला तोड नाहीं. भक्तिपूर्ण भावनेनें त्या महोत्सवाच्या रात्रीं या दोघी भगिनी—भगवंताच्या प्रसादानें परिपूर्ण असलेल्या गायिका – गाईल्या, त्यांनीं देव आळविला. स्वर–सम्मोहानें श्रोतृवृंदासमोर देव उभा केला आणि देवरूपी जनताजनार्दनाकरवीं आशीर्वाद मिळविला. हिराबाईचें—सरस्वतीबाईचें गाणें अमर आहे. महाराष्ट्र काय, भारत त्यांना व त्यांच्या गायनाला विसरूं शकत नाहीं.

* * *

# प्रा. वा. ल. कुलकर्णी

: १३ :

नुकताच मी औरंगाबादेस जाऊन आलों. ऐतिहासिक स्थळें पाहिलीं. समाज सेवकांचें दर्शन घेतलं. पण खरी तळमळ होती प्रा. वा. ल. कुलकर्णी यांना भेटण्याची. तसा आमचा जुना परिचय; पण औरंगाबादच्या परिसरांत भेटून मराठवाड्यांतील 'वा. ल.' मला पाह्यचे होते.

बिब्बीचा मकबरा पाहिला. तेथून मराठवाडा विश्वविद्यालयाचा कांहीं भाग दिसला. लगेच विचार केला कीं आतांच 'वा. ल.'ना भेटायचं. मराठवाडा विश्वविद्यालयाच्या विस्तृत कँपसमध्यें आमची गाडी शिरली. पहिल्याच इमारतींत चौकशी केली, प्रा. वा. ल. कुलकर्णी साहेब कोठें बसतात म्हणून. मराठीचा विभाग जेथें आहे तेथेंच अमची गाडी उभी राहिली होती. इमारत सुबक आणि आधुनिक आहे. आम्ही उजव्या हाताकडून वळलों. तेथें प्रथम सेमिनारची खोली लागली. मग प्राध्यापकांच्या

हाताखालीं काम करणाऱ्या सहकाऱ्यांच्या खोल्या. पुढें छोटीशीच कचेरी. पलीकडची डाव्या हाताकडची सुसज्ज खोली प्राध्यापक वा. ल. कुलकर्णी यांची.

“ या या ”, ते हंसत म्हणाले. त्या हास्यांत मोकळेपणा होता. मला त्यांच्या चेहऱ्यावर समाधान दिसलें. त्यांच्या शरीरावरून त्यांना स्वास्थ्य लाभलें हेंहि स्पष्ट होत होतें. त्यांच्या त्या टवटवीत चेहऱ्यावरून असेंहि वाटत होतें कीं मराठवाड्यांत मराठीची सेवा त्यांना मानवली होती.

खुर्चीत रेलून बसलेले प्रा. वा. ल. पुन्हां म्हणाले, “ केव्हां आलांत ? बरं झालं हं, आपण अगत्यानें भेटायला आलांत तें. घरीं आलं पाहिजे संध्याकाळीं. चहापान, कॉफीपान करूं आणि गप्पाहि मारूं.” तीच आदब, तोच विनम्र भाव, तेंच अगत्य. साधें पण मन:पूर्वक आतिथ्य. प्रा. वा. ल. कुलकर्णी हे एक सरळ वृत्तीचे, सालस, सात्त्विक गृहस्थ आहेत. पहिल्यापासूनचा जो त्यांचा स्वभाव तोच आतांहि मला दिसला. आतां आत्मविश्वास वाढला आहे. पूर्वीं अंतर्मुख होते. आतां बहिर्मुखतेचेंहि प्रमाण बरें आहे.

आमच्या बऱ्याच विषयांवर गप्पा झाल्या. पूर्वींच्या आठवणी उजळल्या. विल्सन हायस्कूलमध्यें शिक्षक म्हणून काम करीत असतांनाचे दिवस. किती कुतरओढ झाली असेल त्या वेळीं ? मग हायस्कूल आणि कॉलेज असा शिकवायचा दुहेरी बोजा. त्यामुळें शरीरावर, बुद्धीवर किती ताण. पण अशीहि भगभग सहन केली. म्हणून तर ‘ वा. ल. ’ एवढ्या मोठ्या पदाला चढले आहेत. आणि या वर्षी तर त्यांना साहित्यसम्मेलनाचें अध्यक्षपद-महाराष्ट्राचा मानाचा मुजरा मिळाला आहे. हा मान म्हणजे त्यांच्या श्रमाचें चीज आहे. खडतर जीवन जगल्यानंतर मिळालेला देवाचा प्रसाद आहे.

खुर्चीत रेललेले प्रा. वा. ल. कुलकर्णी जोधपुरी कोटांत उठून दिसत होते. त्यांचा विशाल भालप्रदेश, त्यांच्या प्रगल्भ चोखंदळ बुद्धीची साक्ष देत होता. त्यांचा मोकळेपणा मला मोहित करीत होता. हा मोकळेपणा मुंबईंत दिसत नव्हता. मुंबईंत ते लाजरे, बुजरे वाटायचे. “ वा. ल. ” चांगल्या मूडमध्यें होते. त्यांच्या बोलण्यांत बुद्धीचा तीक्ष्णपणा होता. पण जराहि अतिरेक नव्हता. मराठी वाङ्मयांतील दोषांचें त्यांना योग्य आकलन होतें. पण त्यांचेंच

म्हणणें योग्य आहे, असा त्यांचा आग्रह नव्हता. त्यांचेकडून वैयक्तिक टीका जराहि ऐकायला मिळाली नाहीं. कोणालाहि पाडून बोलणें त्यांच्या सात्त्विक स्वभावांत सांपडत नाहीं. पुन्हां आपल्या बुद्धीबद्दल विभ्रम नाहीं, अतिशयोक्ति शक्यच नाहीं. तसे 'वा. ल.' शब्दाचे कद्रूच. थोडक्या शब्दांत भला मोठा आशय सांगण्याची हातोटी त्यांना चांगली साधलेली आहे. पांचशें पानांचा आशय तें शंभर पानांत सांगतील. अघळपघळपणा एकदम नापसंत. त्यांनीं खालील पुस्तकें लिहिलीं आहेत. हें सर्व टीकात्मक लिखाण आहे. उंसाचा रस काढणारा जसा चेचून उंसाच्या कांड्यांतला संपूर्ण रस काढून चिपाड फेकून देतो, तसेंच प्रा. वा. ल. एखाद्या लेखकाचें अथवा त्याच्या पुस्तकाचें सार केवळ थोड्या शब्दांत, मित भाषेंत टिपून ठेवतात. पाल्हाळ नाहीं. शब्दांची फैर नाहीं. कांहीं नाहीं. पण त्यांच्या लेखांत ओज आहे, तेज आहे. लज्जत आहे. लवचिलपणा आहे. रस आहे. पण सर्व कांहीं प्रमाणबद्ध. अति कमी शब्दांत लिहिलेलें हें टीकावाङ्मय मराठी वाङ्मयांत तोलाचें आहे–मोलाचें आहे. म्हणून साहित्य संमेलनाचा मुकुट त्यांच्या माथ्यावर चढलेला आहे.

प्रा. 'वा. ल.' चीं आतांपर्यंत प्रसिद्ध झालेलीं पुस्तकें अशीं––

वामन मल्हार जोशी–वाङ्मयदर्शन,

वाङ्मयांतील वादस्थळें ( २ आवृत्ति ),

वांङ्मयीन मतें आणि मतभेद,

वाङ्मयीन टीपा आणि टिप्पणें,

वाङ्मयीन दृष्टि आणि दृष्टिकोण,

साहित्य आणि समीक्षा,

श्रीपाद कृष्ण कोल्हटकर–वाङ्मयदर्शन,

खाडिलकर–एक अभ्यास.

त्यांचीं आगामी पुस्तकें दोन :–

मराठी ज्ञानप्रसारकाचा इतिहास आणि वाङ्मय विचार,

मराठी वाङ्मयांतला वाङ्मयीन विचार.

आतांपर्यंत प्रा. वा. ल. कुलकर्णी यांनीं सारीं आठ पुस्तकें लिहिलीं. आणखी दोन तयार होत आहेत. म्हणजे एकंदर दहा पुस्तकांचा जन्मदाता. हीं सर्व पुस्तकें त्यांच्या प्रगल्भ अभ्यसनांतून तयार झालेलीं आहेत. या पुस्तकांमागें सखोल अभ्यासाची तपस्या आहे. तौलनिक विचारांची परंपरा आहे. या ग्रंथांमुळें वाद निर्माण झाले असतील पण कोणाहि टीकाकारानें प्रा. वा. ल.नीं बेजबाबदार भाष्य केलें आहे असें म्हटलेलें नाहीं. कोठेंहि प्रा. वा. ल. नीं खूप विचार केल्याशिवाय एकहि विधान केलेलें नाहीं. व्यक्ति घ्या अथवा वाङ्मय घ्या, त्याबद्दल आदर असेल तर लिहायचें. अतिरेकीपणा नाहीं. शब्दांची उलथापालथ नाहीं. एकहि विधान उगाच केलें जाणार नाहीं. कशिदा काढणारी निष्णात बाई जशी कौशल्यानें आपल्या कशिद्यांत दोरे भरते, रंग भरते आणि तिच्या कलाकृतीकडे पाहिलें कीं आपल्या डोळ्यांचें पारणें फिटतें, तसेंच प्रा. वा. ल. कुलकर्ण्यांचें लिखाण आहे. त्यांत पांडित्य आहे, पण पांडित्याचा विलास नाहीं. त्यांत प्रगल्भता आहे, पण काथ्याकूट नाहीं. त्यांत टीका आहे. पण त्या टीकेंत आकस नाहीं. आपलें व्यक्तित्व त्यांनीं आपल्या लिखाणांत राखलें आहे. त्यांची टीकात्मक वाङ्मयाची स्वतंत्र अशी कल्पना आहे. त्याबरहुकूम त्यांची शैली बनली आहे. त्या शैलींत भाषाप्रभुत्व आहे. विवेकपूर्ण शब्दसंपदा आहे. विचारांची फेर उच्च प्रकारची आहे. कोणावर कठोर प्रहार केले असले तरी त्यामुळें आघात होणाऱ्या व्यक्तीला जराहि वाईट वाटणार नाहीं. दुःख होणार नाही. उलट तोहि असें म्हणेल की, "वा. ल. म्हणतात ना, मग तें बरोबर आहे."

त्यांचीं आगामीं पुस्तकें सत्यान्वेषण व सत्यशोधन या दृष्टीनें महत्त्वाचीं आहेत. विविधज्ञानविस्तारापूर्वीचा "मराठी ज्ञानप्रसारक". या ज्ञानप्रसारकानें किती महनीय कामगिरी केली आहे त्याची साद्यंत माहिती प्रा. वा. ल. कुलकर्ण्यांनीं आपल्या कसलेल्या शैलीनें वर्णन केली आहे. उपेक्षित महाराष्ट्राला कथन केली आहे. "मराठीतील वाङ्मयीन विचारांची उत्क्रांति" हें पुस्तक अनेक दृष्टींनीं क्रांतिकारक ठरेल. तें प्रा. "वा. ल."नींच लिहावें असा नियतीचा संकेत दिसतो. त्यांच्या आतांपर्यंतच्या सर्व ग्रंथांपेक्षां

या ग्रंथाचें स्वरूप कांहीं आगळें आहे. तो ग्रंथ मराठी वाङ्मयांत तरी चिरकालिक महत्त्वाचा मानला जाईल अशी अटकळ आहे.

संवेदनाशील व सुसंस्कृत मनाचा लेखक, उदारमतवादी, न्यायबुद्धीनें वाङ्मयाकडे पहाणारा, मन:प्रवृत्ति शुचिर्भूत, त्यामुळें शुचिर्भूत तेवढेंच लिहावयाचें. बाकी सर्व त्याज्य. लेखन नीटस, संयमपूर्ण, सुस्पष्ट व कोरीव. ही तर प्रा. वा. लं. ची Speciality. त्यांची ग्रंथसंपत्ति फार नाहीं, पण जी आहे त्यांत मौलिकता आहे. प्रसाद आहे. मराठी वाङ्मयांतील आदर्श टीकाकार म्हणूनच भावी पिढी त्यांना ओळखील.

जन्म ६ एप्रिल १९११ चा. जन्मस्थान खानदेशांतील चोपडें. १९१५ त वडील वारले. पुढलें जीवन स्वावलंबनी. प्रथम शिक्षण नाशिकला. शेवटचें शिक्षण विल्सन कॉलेजला. दादर हायस्कूलमध्यें शिक्षक म्हणून काम. पुढें विल्सन हायस्कूल व विल्सन कॉलेजमध्यें शिक्षक, प्राध्यापक म्हणून काम. १९६० जानेवारीपासून मराठवाडा विश्वविद्यालयांत मराठी विभागाचें धुरीणत्व त्यांचेकडे आलें. मराठवाड्याला एक व्यासंगी, सव्यसाची वाङ्मयपंडित लाभला. संतांच्या भूमीकडे एका सालंकृत, सात्त्विक विद्वानानें आपली शुचिर्भूत प्रज्ञा खर्च करण्यासाठीं प्रयाण केलें. वेरूळ, अजिंठा हीं कोरीव लेणीं इतिहासप्रसिद्ध आहेत. प्रा. वा. ल. कुलकर्णी यांचाहि मराठी विभाग तितकाच कोरीव, आकर्षक व अभिजात होईल यांत शंका नाहीं. मराठवाड्याचें नशीब मोठें !

* * *

# श्री. विनायकराव पाटील

: १४ :

अगदीं अलीकडेच माझा विनायकराव पाटलांशी परिचय झाला. माझ्या घरीं त्यांच्या येण्याचा दिवस ठरल्यानंतर माझें त्यांच्याबद्दचें कुतूहल वाढलें. दोन प्रहरीं ११–१२ ला ते येणार होते. वेळ जवळ येत चालली तशी उत्सुकता वाढली. स्वारी कशी असेल, काय बोलेल याबद्दल उगाच तर्ककुतर्क मनांत सुरू झाले. राजकारणांतील-माणसें कशीं असतील कोण जाणे. समाजसेवक कसे असतील कोणाला माहित !

अकराच्या ठोक्याला विनायकराव आमच्या घरीं आले. परिचय झाला. ते खोलींत आले. स्थानापन्न झाले. एक 'भला गृहस्थ' पाहून माझें मन प्रसन्नलें.

विनायकरावांना मी पुन्हां एकदां निरखून पाहिलें. वाटलें, लोकसंग्रहवादी यशवंतराव चव्हाणांनीं मोठा उमदा माणूस महाराष्ट्र काँग्रेसच्या अध्यक्ष-पदासाठीं धुंडून काढला आहे. गृहस्थ बी. ए., एलएल्. बी. आहेत. बोलण्याचालण्यांत आदब आहे. आस्था आहे. नाशिक, बडोदें, पुणें येथील

पाणी चाखलेला गोड मनुष्य आहे. गुरुजी आहे. गुरुजी म्हणून सेवावृत्तीनें आदर्श जीवन जगणारा चांगला समाजसेवक आहे. विनायकरावांना न्याहाळतांना डोळ्यांसमोरून त्यांचा इतिहास गेला.

विनायकरावांचें व्यक्तित्व सोज्वळ, सात्त्विक आणि सत्प्रवृत्त असें वाटलें. त्यांचा चेहरा प्रसन्न आहे. भालप्रदेश बुद्धिमत्तेची साक्ष देणारा आहे. डोळे स्नेहार्द्र व कनवाळू वाटले. ते निमगोरे आहेत. बोलणें नम्र आहे. आवाजांत अंत:करणाचा पीळ आहे. शुभ्र खादींत ते खुलून दिसतात. सुबक बांधा, शालीन स्वभाव, उत्तम संस्कार, उच्च संस्कृति या सर्वांच्या मिश्रणानें त्यांचें व्यक्तित्व घरगुती, गोड, हवेंहवेंसें वाटतें. त्या व्यक्तित्वांत आत्मीयता, निरलसपणा, निरुपद्रवता आहे. म्हणूनच पहिल्या परिचयांत विनायकराव हृद्य वाटतात.

जीवनाच्या रामरगाड्यांतून बरींच माणसें घनचक्करी संग्रामांत ओढलीं जातात आणि या घनघोर वादळांतून आपला मार्ग काढून अग्रेसरत्व मिळवितात. कांहीं अद्वितीयत्वच घेऊन आलेलीं असतात. विनायकराव या दोन्हींतील महाभाग नव्हेत. त्यांचा प्रकारच निराळा. त्यांनीं स्वत: ठरविलें होतें कीं, शिक्षकाचा पेशा संभाळून राष्ट्रसेवा करावी. पण दैव मोठें बलवत्तर. त्या दैवानें त्यांना यशवंतरावजींचा स्नेह दिला. त्या स्नेहांतून विनायकरावांचें राजकारणांत पदार्पण झालें. विनायकराव महाराष्ट्र राज्यांतल्या काँग्रेस कमिटीचे मुख्य बनले. मोठमोठ्या विभूतींनीं भूषविलेली ही गादी विनायकरावांना दैवानें दिली. त्यांना हाव नव्हती, इच्छा नव्हती. त्या बाजूला त्यांचें मन नव्हतें. पण दैवानें त्यांचा हात पकडला आणि मागच्या खुर्चीवर अगत्यानें बसणाऱ्या या महाभागाला दैवानें महाराष्ट्र काँग्रेसमध्यें प्रमुख स्थान दिलें.

महाराष्ट्र काँग्रेसचें अध्यक्षस्थान प्राप्त होणें हें सहजसाध्य नव्हतें. पण पूर्वपुण्याईच्या जोरावर ते त्या स्थानावर विराजमान झाले लोकांनीं त्यांचा सात्त्विक चेहरा पडताळून पाहिला आणि त्यांना प्रेमानें कवटाळायला प्रारंभ केला अस्सल प्रेमाचा खराखुरा अनुभव विनायकरावांना मिळाला आहे.

" राजकारणांतले सध्याचे रागरंग कसे काय वाटतात ? " मी विचारणा केली. लगेच विनायकराव त्यांच्या सफाईदार, गुळगुळीत भाषेंत उत्तरले,

"राजकारण नेहमींच गढूळ असतें, हें तुम्हांला माहीत आहे. साध्य मिळविण्यासाठीं साधनशुचिता असावी लागते. अशी साधनशुचिता सध्यां फार व्यस्त प्रमाणांत आहे. व्यक्ति वाईट आहेत, होत चालल्या आहेत म्हणून संस्थेला दोष देऊ नका. व्यक्तींनीं आपलीं पापें धुवून काढून आदर्श सेवकांच्या डौलानें कामें केलीं पाहिजेत."

विनायकराव थांवले. विचारमग्न दिसले. कोठेतरी अंतराळांत ते पाहात होते. कसला तरी ते कानोसा घेत होते. सत्त्वाला हात घालायचा, तत्त्वाचा विचार करावयाचा ही मुळीं त्यांची प्रवृत्ति दिसली. बाहेरून साधासुधा, सरळ बाण्याचा दिसणारा हा गृहस्थ विचारपूर्वक बोलणारा आहे. आदर्श-वादी आहे, तत्त्वसंशोधक आहे याची मला खात्री पटली.

मग अनेक घटनांवर, सद्यःस्थितीवर भाष्य झालें. त्यामुळें विनायकरावां-बद्दल माझा आणखी चांगला ग्रह झाला. वाटलें, हे गृहस्थ धीट नाहींत, पण विचारी आहेत. भावनाप्रधान आहेत, पण विवेकापासून अलिप्त नाहींत. हळवे आहेत, पण स्वभावांत स्थिरता आहे. अपशब्द किंवा शिवराळ-पणा यांच्या मनाला दुखवील. टीका यांच्या मनावर घाव करीत असणार. राजकारणांतील त्रांगडीं यांना त्रस्त करीत असणार. त्यामुळें नको हा त्रास, नको हें दुःख असें वाटत असणार.

पण आग्रहाला बळी पडणारे, नाहीं म्हणणें जड वाटणारे, निगर्वी व अजातशत्रु असल्यामुळें जरी ते अधिकार सोडत नसले तरी त्यांच्या मनावर मात्र फार परिणाम होत असणार खास. ते आपल्यावरच रागावतील, कावतील, मनांत उद्वेग पावतील. धकाधकीच्या मामल्याला योग्य नसणारा हा गृहस्थ राजकीय होमकुंडांत सदाचाच पडलेला राहणार हें मात्र स्पष्ट दिसत आहे. या शामळू माणसाला हुसकावायला दुसरा पाटील पुढें सर-सावला तरी विनायकराव पदभ्रष्ट होतील असें वाटत नाहीं.

विनायकरावांत दोष आहेत. राजकीय माणसांत नसावेत असे दोष आहेत. शरीर पोलादी नाहीं. त्यांत रोगटपणा आहे. बुद्धि तल्लख आहे. ते इंग्रजी व मराठी भाषा कलावंताच्या सजावटीनें बोलूं लागतात. पण या बुद्धींत लढाऊपणा नाहीं. झुंझारशक्ति नाहीं. मनांत विश्वभाषा आहे. मानवता आहे.

आदर्शाचा हव्यास आहे. उदात्तता आहे. औदार्य आहे, पण भित्रेपणाहि आहे. अनेक गोष्टी त्यांच्या मनाला लागून राहतात. मनाला बोचतात. त्यामुळें लोकनत्याच्या अभिनिवेषानें ते समाजाला खेचून पुढें नेऊं शकत नाहींत. अजीजीनें हांक मारून लोकशाहीच्या समबंधुत्वानें ते जनसमूहाला दिशा दाखवूं शकतील. शरीर दुबळें असल्यामुळें ते झंझावाताच्या वेगानें काम करूं शकत नाहींत. पण स्वतःच्या गतीनें जेवढें करतां येईल, जेवढें उरकतां येईल, तेवढें काम उत्कृष्टपणें करतील. आपल्या सहाध्यायांबरोबर प्रेमानें शिळोप्याच्या गप्पा मारतील. पण मतभेद आले तर काय करूं आणि काय नको म्हणून बावचळतील. मन कच्चें आहे. अनुभवाचा कणखरपणा यायला उशीर आहे. अनुभवानें कणखरपणा आला तर बरें होईल.

राजकारणाची लढत खेळण्यासाठीं लागणारा खिळाडूपणा, लढाऊपणा, रगेलपणा त्यांच्यांत जराहि नाहीं. राजकीय 'हलाहल' प्राशन करण्याची ताकद त्यांच्यांत नाहीं. मनाचा बेफिकीरपणा अजून तरी साधत नाहीं. वय लहान आहे. शिक्षणाच्या सात्त्विक क्षेत्रांतून ते चाणाक्याच्या कुटिल साम्राज्यांत आतांच कोठें उतरत आहेत. आजच्या त्यांच्या सतेज कांतींत थोडी निष्प्रभता आहे. राजकीय नेत्याची स्थिरता, आणि स्थितप्रज्ञता अजून त्यांच्यांत आलेली नाहीं. पण त्यांच्या संवेदनाशील प्रवृत्तींत नवीन गुणांचें संगोपन होणार नाहीं असें म्हणतां येणार नाहीं. ते अभ्यासू आहेत. डोळस आहेत. विचारवंत आहेत म्हणूनच त्यांना भूतकालांतील दोष बाजूला सारून नवीन व्यक्तित्व निर्माण करतां येईल. अनुभवांचा संस्कार वाया न घालवतां त्यांनीं प्रगतिपथावर जपून पावलें टाकलीं तर मुख्यमंत्र्यांच्या आवारांत ते प्रवेश करतील यांत शंका नाहीं.

* * *

# श्री. गोविंद नारायण माडगांवकर

: १५ :

ता. १५ मार्च १९६५ रोजीं सारस्वत घराण्यांतील गोविंद नारायण माडगांवकर या थोर सारस्वताच्या मृत्यूला शंभर वर्षे पुरीं झालीं. ते एक विद्वान् व व्यासंगी वाङ्मयकार आणि समाजसेवक होते. मुंबईंत 'मुंबईकर सारस्वत' म्हणून खास समाज होता व आजहि आहे. पूर्वी हे मुंबईकर सारस्वत समृद्ध, थाटामाटानें राहाणारे, आणि सुविचारी असे होते. त्या वेळीं त्यांचीं आपापसांत लग्नें वगैरे होत असत. लोहार चाळींतील जांभूळवाडी, कांदेवाडींतील शेणवीवाडी येथे त्यांची खास वस्ती असे.

प्रथमत: मुंबईकरांची मुलगी मुंबईकरांतच दिली जात असे. बेटीव्यवहार फक्त आपसांत आणि रोटीव्यनहार सर्व सारस्वतांत हा शिरस्ता होता. या मुंबईकर सारस्वत जातींत गोविंद नारायण माडगांवकर यांचा जन्म १८२५ मध्यें झाला. १८६५ त त्यांचा मृत्यु झाला. म्हणूनच १५ मार्च हा या महाभागाचा शतसांवत्सरिक स्मरणदिन आहे.

माडगांवकर हे मूळचे गोव्याचे. त्यांचा देव दामोदर. धंदा तपकिरीची पूड विकण्याचा. शिवाय औषधीहि ते विकत असत. तपकीर हा शब्द कसा आला याचा तपशील मिळत नाहीं. ब्राझिलमधून गोव्यास तंबाकू यायचा व तेथें तपकिरीची पूड बनविली जात असे. तपकिरीचा धंदा वाढविण्यासाठीं माडगांवकरांचें घराणें मुंबईंत आलें व येथें त्यांनीं तपकिरीचा आणि औषधीचा धंदा उत्तम रीतीनें सुरू केला. मुंबईंत आल्यावरच त्यांनीं माडगांवकर हें आडनांव लावायला सुरुवात केली व मुंबईकर सारस्वत बनले.

हें घराणें प्रथमपासून प्रागतिक विचारांचें असलें पाहिजे. पुढें ह्या घराण्यांतील मंडळींनीं प्रार्थना समाजाची कास धरली. गोविंद नारायण माडगांवकर यांनीं उत्तम शिक्षण घेतलें असणार यांत शंका नाहीं. त्या वेळच्या शिक्षण संस्थेंत त्यांचें नांव नमूद केलेलें आहे. गोल चेहरा, भारदस्त अंगकाठी, विशाल भालप्रदेश, अणकुचीदार नाक आणि भेदक दृष्टि असें त्यांचें व्यक्तित्व असावें असें त्यांच्या चित्राकडे पाहिल्यानंतर वाटतें. त्यांचें शरीरहि भरभक्कम असावें. पेशवाई थाटाचा बाराबंदी आंगरखा आणि मस्तकावर घेरदार, रुबाबदार पागोटें, अशी त्यांची ती भरदार आणि भारदार छबी पाहिल्यावर त्यांचें व्यक्तित्व किती प्रभावी आणि प्रसन्न असावें याची कल्पना येते.

त्या वेळीं मिळूं शकलें तेवढें शिक्षण गोविंद नारायण माडगांवकर यांनीं घेतलें होतें. त्यांच्या भावी काळांतील कर्तृत्वावरून ते हुशार, कुशाग्र व व्यासंगी असले पाहिजेत असा निष्कर्ष काढतां येतो. त्या वेळच्या विद्याखात्यांतील शिक्षणसंबंधीं कामगिरीहि त्यांनीं चांगल्या प्रकारें बजावली असावी. समाजांत व सरकारांत त्यांना मानमरातब विशेष असावा व्यापार-उदीम सांभाळून त्यांनीं इतर क्षेत्रांत बरीच कामगिरी केली असावी. विशेषतः वाङ्मयक्षेत्रांत ते फार चमकले. तें त्यांचें आवडतें क्षेत्र होतें. त्यांच्या युगांतील छत्रे, जांभेकरशास्त्री व पाठारे हे नामवंत विद्वान व लेखक म्हणून कीर्तीस पावले. त्याचप्रमाणें गोविंद नारायण माडगांवकर यांचेंहि नांव वाङ्मयक्षेत्रांत त्या काळीं उल्लेखनीय होतें. त्यांनीं एकंदर पंधरा ग्रंथ लिहिले. बहुतेक ग्रंथांत त्यांची प्रवृत्ति आत्मनिरीक्षणाकडे व नवीं तत्त्वें

शोधून काढण्याकडे दिसून येते. नीति, धर्म, सदाचार, सत्प्रवृत्ति यांवर त्यांचा विशेष कटाक्ष असे. ब्रिटिशांची अव्वल आमदानी त्या वेळीं सुरू झाली होती. तरीपण मिंधेपणाचा लवलेशहि गोविंद नारायण माडगांवकरांच्या वाङ्मयांत दिसत नाहीं. उलट उत्तम, प्रागतिक विचार, स्वातंत्र्याच्या उत्तम कल्पता, इंग्रजांच्या गुणावगुणांचें आकलन त्यांना फार चांगलें होतें. समाज सुधारला जावा, शिक्षित व्हावा ही त्यांची तळमळ होती. त्यासाठीं त्यांनीं अनेक प्रकारचें प्रयत्न केले.

त्यांचें 'मुंबईचें वर्णन' हें पुस्तक अनेक दृष्टींनीं छानदार आहे. त्यांत त्यांचें सूक्ष्म अवलोकन, विनोदीवृत्ति, एतद्देशीय लोक म्हणजे पारशी, मारवाडी वगैरेंच्या चालीरीति, विशिष्ट वर्गांतील लोकांचें स्वभावदर्शन, चायना टाऊन मधील 'चंडोल' पिणाऱ्या लोकांची बारीकसारीक माहिती, मुंबई नगरीची साद्यंत वर्णनें इतकीं बहारदार, रोमहर्षक आणि चिकित्सक आहेत कीं तीं आजहि वाचावींशीं वाटतात. हें पुस्तक श्री. न. र. फाटक यांनीं संपादन केलें आहे व हल्लींच महाराष्ट्र सरकारच्या प्रकाशन खात्यानें प्रसिद्ध केलें आहे.

महाराष्ट्रीय माणसानें हें पुस्तक संग्रहीं ठेवावें. यांत व्यक्तींची, समाजांची व संस्थांचीं वर्णनें रेखीव आलीं आहेत. माणसांचीं व्यंगें गोविंदरावांनीं अचूक हेरलीं आहेत. जातीजमातींचीं वर्णनें त्यांनीं हळुवार लेखणीनें केलेलीं आहेत. या चित्रणांत वास्तवता आहे. तजेलदारपणा आहे आणि इतकीं वर्षें पसार झालीं तरी हीं चित्रें आजहि नितांत मनोहर आणि हृद्य वाटतात. पांचशें कुटुंबांचें आणि १०,००० माणसांचें हें मुंबई बेट! पळसे, पाठारे आणि कोळ्यांचें हें वसतिस्थान वाढतां वाढतां आजच्या विशाल स्थितीला कसें पोहोंचलें हें बघण्यासारखें आहे. म्हणून सर्व महाराष्ट्रीयांनीं एकदां तरी हें मुंबईचें वर्णन वाचावें. गोविंदरावांची ज्ञानेश्वरीवरची 'ज्ञानदेवी' ही आवृत्ति आज दुर्मिळ असली तरी ज्ञानेश्वरीवरील ग्रंथांत तिचें स्थान महत्त्वाचें आहे.

प्रतिष्ठा, मानमान्यता, सरकारदरबारांत आब व वजन आणि समाजाची निरलस सेवा असें थोडक्यांत गोविंद नारायणांच्या कार्याचें वर्णन करतां

येईल. व्यापार उदीमांतहि त्यांनीं चांगला पैसा मिळविला असणार. कारण त्यांच्या घराण्यांतील गोरेगांवची जमीन परवां परवां विकली गेली. चिकित्सकसमूह या संस्थेपाती ही सॉलिसिटर एम. वी. माडगांवकरांची. यांचे धाकटे बंधु श्री. श्रीधरपंत माडगांवकर हे व्यापारांत आहेत. तिसरी पाती न्यायाधीश माडगांवकरांची. हे पूर्वीच्या मुंबई हायकोर्टाचे न्यायमूर्ति होते. त्यांचा मुलगा विक्रम माडगांवकर. आतां तो मुंबईंत स्थायिक झालेला आहे मुलीनें एका सरदारजीशीं लग्न केलें होतें. तें मोडलें. आतां ती कोठें राहातें माहीत नाहीं घराणें सुधारकी, बुद्धिमान, प्रार्थना समाजाशीं निष्ठेनें वागणारें आणि तसें संपन्न. ती संपन्नता अजूनहि घराण्यांत आहे.

मुंबईला जें वैभव १८ व्या १९ व्या शतकांत चढविलें त्याचें पाठारे प्रभु व सारस्वत कुटुंबांना श्रेय दिलें पाहिजे. शेणव्याच्या वाडींत, किंवा जांभुळ-वाडींत या मुंबईकार सारस्वतांच्या बंगलेवजा कोठ्या होत्या. सारस्वत पुरुषांची नोकऱ्यांकडे प्रवृत्ति. सारस्वत बायका दिसायला नीटस आणि ठस-ठशीत. सारस्वत लोक पुढें मोठमोठ्या हुद्यावर चढले. डॉ. भाऊ दाजी लाड हे मुंबईत एकेवेळचे नामवंत डॉक्टर होते. त्यांनीं अनेक क्षेत्रांत नांव कमा-वलें. पुढें न्यायमूर्ति तेलंगहि बऱ्याच क्षेत्रांत चमकले. पण रानडे, तेलंग, चंदावरकर या पिढीला आपल्या उदाहरणानें स्फूर्ति दिली असेल तर ती गोविंद नारायण माडगांवकर यांनींच. त्यांच्यांत बोलघेवडेपणा नव्हता. त्यांचा उपदेश सुका नव्हता. त्यांच्यांत खरी कळकळ होती; म्हणूनच त्यांनीं आपल्या कार्याचा उज्ज्वल प्रकाश पुढील पिढीसाठीं ठेवला. त्या प्रकाशाच्या उजाळ्यानें महाराष्ट्रांतील पुढील पिढी वैभवाला पोहोंचली, प्रतिष्ठासंपन्न झाली आणि नामवंत झाली.

डॉ. प्रियोळकर हे सर्व महाराष्ट्राला इतिहास संशोधक म्हणून माहीत आहेत. त्यांच्या प्रेरणेनेंच १५ मार्चला मुंबई महाराष्ट्र ग्रंथसंग्रहालयानें गोविंद नारायण माडगांवकरांची शतसांवत्सरी श्री. बाळासाहेब देसाई यांच्या अध्यक्षतेखालीं साजरी केली. डॉ. प्रियोळकरांनीं कै. गोविंद नारायण माडगांवकर यांच्यासंबंधीं खूप माहिती संकलित केलेली आहे. ती ते लव-करच पुस्तकरूपानें प्रसिद्ध करणार आहेत. गोविंद नारायण माडगांवकरांचें

व्यक्तिमत्व थोर होतें. ते गाढे विद्वान् होते व त्यांच्या हातून मोठी विधायक कामगिरी झाली. यामुळें त्यांच्या चरित्राबद्दल महाराष्ट्रांत कुतूहल आणि उत्कंठा असणार याबद्दल शंका नाहीं.

अधिक संशोधन केल्यावर गोविंद नारायण माडगांवकर यांचा काळ, त्यावेळची परिस्थिति, त्यांचें कार्य, त्यांचे सहाध्यायी या सर्वांवर प्रकाश पडेल. त्यांच्या नंतरच्या पिढींत चिपळूणकर, शिवराम परांजपे, रानडे, टिळक, आगरकर, गोखले हे झाले. या पिढीवर किती मोठी छाया, या पूर्वपिढींची पडली, त्यामुळें त्यांचें कार्य किती मोठें झालें या सर्वांचें आकलन होईल. पूर्वपिढी सकस, सामर्थ्यवान् असली म्हणजे भावी पिढी प्रभावी, तेजपूर्ण आणि कर्तृत्ववान् निघते. प्रत्येक युगांत एक दोन व्यक्ति तरी स्फुलिंगासारख्या चमकून जातात. गोविंद नारायण माडगांवकर हे त्यांपैकीं होते. त्यांचे ग्रंथ संकलित करून प्रसिद्ध व्हावे. कारण आजच्या युगांतहि त्यांच्या तत्त्वचिंतनाचा आणि लेखांचा नवीन पिढीला फार उपयोग होईल. त्यांचें वाङ्मय म्हणजे आमच्या समाजाला अक्षय ज्ञानदानाची पाणपोई आहे. त्याचा उपयोग आजच्या पिढीला होईलच ही खात्री आहे.

* * *

# श्री. मिनू मसानी

: १६ :

" या भेंडे ", हें मिनू मसानींचें नेहमीं प्रत्येक वेळेला स्वागत. " काय काम आहे ? " लगेच दुसरा प्रश्न. मनापासून लगेच म्हणतील, " काम झालेंच पाहिजे. "

" करीनच. " पहिल्या वेळेला माझ्या मुलीला ' टाटा स्कूल ऑफ सोशल सायन्स ' मध्यें प्रवेश पाहिजे होता. त्यावेळचं त्यांचं हें आस्थिक्य. दुसऱ्या वेळेला मुलाला तिथं प्रवेश पाहिजे होता म्हणून गेलों. " या भेंडे ", तेंच स्वागत. " काम झालंच पाहिजे ", तेंच अभिवचन. काम दोघांचेंहि केलें. हा मोठेपणा. त्याचा गाजावाजा नाहीं, कुठें बोलवाला नाहीं, यांच्याकडून कांहींहि अपेक्षा नाहीं. असे मोठे मनमिळाऊ, दिलदार आणि अगत्यप्रिय मिनू मसानी आहेत.

मिनू मसानींबरोबर माझी पहिली ओळख युसुफ मेहेरअल्ली यांनीं करून दिली. युसुफ माझा जानी दोस्त, मसानींचा लंगोटी यार. त्यामुळंच इथून आमच्या स्नेहाला सुरुवात झाली. तो स्नेह आजहि कायम टिकला आहे.

त्याचं कारण मिनू मसानी एक तर सर्वांशींच अत्यंत मर्जीनं आणि आस्थिक्यानं वागतात. होतां होईल तों इतरांचें काम करण्याचा ते निःस्सीमपणें प्रयत्न करतात आणि कुठेंहि तुम्ही भेटलांत, रस्त्यांत, सभेंत, एखाद्या समारंभाला तरीहि ते आस्थिक्यानं येऊन तुमची चौकशी करतील. हा त्यांच्यांतील आपुलकीचा जो गुण आहे तो मोठा मजेदार आहे. आणि त्यामुळें त्यांच्याबद्दल बहुतेक मंडळींमध्यें एक विलक्षण प्रेम सदैव दिसतें. मिनू मसानींना तुम्हीं एकदां पाहिलं कीं, त्यांच्या बिरुदावलींत तुमचं नांव पडेल आणि मग तुम्ही त्यांना विसरलांत तरी ते तुम्हांला विसरणार नाहींत.

'पद्म–प्रकाशन' संस्थेतर्फे मीं त्यांना 'समाजवाद' या विषयावर एक पुस्तक लिहा अशी विनंति केली होती. लगेच त्यांचं उत्तर त्यांनीं मला एक–दोन दिवसांत कळविलं. त्यांत त्यांनीं लिहिलं कीं 'समाजवाद, फेरविचार' हें पुस्तक मी लौकरच लिहून पाठवीत आहें. तें पुस्तक आम्हीं पद्म प्रकाशन संस्थेतर्फे छापलं. त्या पुस्तकाचा त्या वेळीं फारच गाजावाजा झाला होता. मिनू मसानींचं पुस्तकाचं लिखाण अत्यंत उद्बोधक आणि विचारप्रवर्तक असतं. त्याचप्रमाणें त्यांनीं ही लहानशी पुस्तिकाहि तयार केली. परंतु त्याच्यांत विचारांची मांडणी इतकी प्रखर होती कीं, त्याचा विचारवंत लोकांनाहि विचार करावा लागला. आणि म्हणून या पुस्तकाच्या दोन आवृत्त्या एका पाठोपाठ लगोलग संपल्या.

असें आपले हे मिनू मसानी टाटा कंपनीमध्यें पब्लिक रिलेशन खात्याचे मुख्य म्हणून काम करतात. एकदां बोलतां बोलतां आम्हीं परस्परांत असा विचार केला कीं, टाटांनींच कांहीं विशिष्ट विषयांवर चांगलीं पुस्तकें कां काढूं नयेत ? विचार मनांत आला मात्र, लगेच मिनू मसानींनीं त्या विचाराला चालना दिली आणि त्यासंबंधीं त्यांनीं एक कार्यक्रम आंखला. या कार्यक्रमाप्रमाणें पट्‌कन पहिलें पुस्तक त्यांनींच तयार केलें, "तुमचें अन्न (युवर फूड)". दुसरें पुस्तक तयार करून घेतलें, "तुमचे रस्ते (यूवर रोडस्)". ही दोन्हींहि पुस्तकें तुम्हीं पाहिलीं तर त्यांत तुम्हांला आधुनिकत्व, व्यवस्थित मांडणी, अतिशय सुंदर चित्रें आणि उत्तम छपाई दिसून येईल. टाटांच्या पब्लिक रिलेशन खात्याशीं यामुळें माझा घनिष्ट

संबंध आला. पण त्याच्यापेक्षांहि मिनू मसानींशीं माझा स्नेहसंबंध वाढला. कोणतेंहि काम करतांना ते लहानसहान गोष्टींचाहि विचार करतात. सजावट कशी करावी यावर वादविवाद, पुस्तकाचं वरचं जॅकेट कसं असावं याबद्दल ऊहापोह, किती आवृत्त्या काढाव्यात याच्याबद्दल पुन्हां पुन्हां विचार, चित्रकार कोणते असावेत याबद्दलहि पुन्हां पुन्हां नवीन नवीन सूचना. आणि पुस्तक सर्वांत उत्तम प्रकारचं निघावं म्हणून सारखा ध्यास. या पुस्तकांवर मिनू मसानी यांनीं जी मेहनत घेतली ती पाहिली म्हणजे असं वाटतं कीं, हा गृहस्थ कुठल्याहि गोष्टीला वाहून घेतलें म्हणजे मनापासून वागतो. तें काम करण्यामध्यें जराहि हलगर्जीपणा करीत नाहीं. मेहनत, पैसा, विचार या सर्व बाबतींत तो तपोभावानें वागतो आणि लोकांना योग्य तें वाङ्मय हातांत मिळविण्यासाठीं खूप प्रयत्न करतो. आणि एवढं करूनहि त्यांच्याशीं वागणूक अत्यंत चांगली. कधीं राग नाहीं, रोष नाहीं, रुसवा नाहीं. गोड बोलून पण व्यवस्थित रीतीनं काम करून घेण्याची विलक्षण हातोटी.

'पद्म–प्रकाशन' संस्थेतर्फे प्रसिद्ध झालेल्या पुस्तकांमुळें माझा मिनू मसानींशी स्नेह दृढतर झाला, वाढीस लागला. यापूर्वीच त्यांनीं आपल्या पत्नीशीं घटस्फोट घेतला होता. या वेळीं माझ्याकडे कार्यवाह म्हणून कुमारी शकुंतला श्रीवास्तव ही बाई काम करीत होती. ही त्या वेळचे हिंदुस्थानचे अन्नमंत्री श्री. जे. बी. श्रीवास्तव यांची सुकन्या. केवळ हौस म्हणून ती हें काम करीत असे. टाटांच्या प्रसिद्धि खात्याच्या पुस्तक प्रसिद्धीच्या निमित्तानें 'पद्म–प्रकाशन संस्थे'तर्फे तिला अनेक वेळां मिनू मसानी यांचेकडे जावें लागत असे. याचीच परिणति प्रथमतः दोघांच्या ओळखींत, नंतर स्नेहांत आणि नंतर शेवटीं प्रेमांत झाली. दोघांतहि आपण एकमेकांस अनुरूप आहोंत अशी भावना उत्पन्न झाली आणि एक दिवस मिनू मसानी मला भेटले आणि म्हणाले, "भेंडे, शाकीशीं ( शकुंतला ) मीं विवाह करण्याचं ठरविलं आहे, तुझी त्याला सम्मति आहे ना ?" मी हंसलों. मनांत म्हटलं, माझ्या संमतीचा प्रश्नच कसा काय येतो ? पण मोकळेपणानं एकदम त्यांना म्हटलं, "मिनू मसानी, आपली निवड योग्य आहे. दोघेहि सुखी व्हा असा माझा तुम्हांला आशीर्वाद आहे". दोघांचेंहि लग्न झालं. सिलोनला त्यांना

मधुचंद्रासाठीं मोठ्या थाटानं टाटासाहेबांनीं नेऊन पोहोंचविलं. मधुचंद्राहून परत आल्यावर तें जोडपं मला भेटलं. दोघांनीहि मला फार सुंदर फुलांचे गुच्छ दिले. त्यांच्या चेहऱ्यांवरचं हास्य, आनंद पाहून मी उल्हसित होऊन म्हणालों, " मिनू मसानी, तुमचा सुखी संसार सुरू झाला आहे, सदैव सुखी रहा हीच माझी ईश्वरचरणीं प्रार्थना ". आज मिनू मसानी आणि सौभाग्यवती शकुतला मसानी एक आदर्श जोडपं आहे. मुलांबाळांनीं भूषित असं त्यांचं घर आहे. आणि सांसारिक सुखाच्या दृष्टीनें मिनू मसानींना योग्य अशी पत्नी मिळाल्यामुळे त्याच्या जीवनाला एक प्रकारचा फुलोरा आलेला आहे.

शांकी मसानी अथवा सौ. शकुतला मसानी या एका गर्भश्रीमंत घराण्यांतील षोडषा असूनहि मोठ्या साध्या व बाळबोधी वळणाच्या आहेत. चित्रकला, नृत्यकला यांची त्याना आवड आहे. दोन्हीहि कलांमध्यें त्यांनीं विशेष प्रावीण्य मिळविलेलें आहे. लहान मुलांसाठीं त्यांनीं छानदार पुस्तकें लिहिली आहेत. पण विशेष म्हणजे पत्नी या नात्यानं त्यांनीं आपला संसार अतिशय सुंदर, छानदार, व्यवस्थित आणि गोड ठेवलेला आहे. भारतीय स्त्री या नात्यानं भारतीय स्त्रियांचे उत्तम संस्कार त्यांच्यांत दिसतात. आणि म्हणूनच पाश्चात्य पद्धतीनं वाढलेल्या मिनू मसानींना आपल्या एकनिष्ठतेनं आणि एकाग्र बुद्धीनं त्या रिझवीत आहेत, आनंद देत आहेत. घरकुलामध्यें मिनू मसानी हे फारच सुखी आहेत.

मिनू मसानी हे एक कुशाग्र विद्यार्थी, विचारवंत लेखक, शास्त्रीय पद्धतीनं विषयांची मांडणी करणारे एक व्यासंगी गृहस्थ आहेत. ते बॅरिस्टर आहेत, एम्. ए. कँटब ( केम्ब्रीज ) आहेत. शैक्षणिकदृष्टया त्यांचं विकसन योग्य प्रकारानं झालेलं आहे. ते श्री. आर्. पी. मसानी या मुंबईच्या विश्वविद्यालयाच्या एका उप-कुलगुरूंचें ( व्हाईस चान्सेलर ) चिरंजीव होत. पारसी कुटुंबांत जन्म. अतिशय व्यासंगी कुटुंब. श्री. आर्. पी. मसानी यांनीहि आपली ग्रथसंपदा फार चांगली तयार केलेली आहे. मिनू मसानींनीं जरी आपलें पहिलें पुस्तक 'आमचा हिंदुस्थान ( आवर इंडिया )' या हिंदुस्थानवरील पुस्तकानें प्रथितयश लेखक म्हणून नांव मिळविलें असलें तरी पण त्यांनीं अमाप पैसासुद्धां मिळविलेला आहे. मिनू मसानींचा पिंड

विचारवंताचा. आरामखुर्चीमध्यें ( ईझी चेअर ) बसून जगांतील अनंत आणि अतर्क्य घटनांवर विचार करणारे ते सुशील आहेत, सौम्य आहेत पण कष्टाळूहि आहेत. त्यांचा व्यासंग फार मोठा आहे. विनोद भूषणावह असूनहि ते आपल्या विनोदाचा दिमाख दाखवीत नाहींत. बोलतां चालतां भावनेनं इतका खेळकर कसा, इतका उल्हसित कसा, साध्यासुध्या गोष्टीवरसुद्धां याला इतका विचार कसा काय, यांबद्दल नवल वाटतं. मिनू मसानी आपल्या घरकुलांत जितके रममाण असतात तितकेंच ते विद्यार्थी आणि विद्यार्थिनी जगांत समरस होऊं शकतात. मात्र मुलांच्या सहवासांतून तर ते गप्पाष्टकांचे सुंदर सुंदर फवारे उडवूं शकतात. पण इतकंहि करून त्यांच्या व्यक्तिमत्वाचा ठाव घेण्याचा आपण प्रयत्न केला तर असं वाटायला लागतं कीं, यांची भूमिका प्रार्थनेसारखी, व्यासंगी माणसाची, विद्वज्जनाची, तत्त्वज्ञानाची. त्यांच्याकडे पाहिलं, पहात राहिलं तर असं वाटत कीं, या माणसाच्या मनांत गुंडाजन चालू आहे, विचारांचा बांध नाहीं. विचारांत कितीहि संकटें आलीं तरी मनांत विचारांच्या अनेक सरिता वाहात असतात आणि या विचारांच्या सरितांच्या संगमांतून नवीन नवीन पुस्तकांचे आराखडे तयार होत असतात. मिनू मसानी हे फारच किरकोळ आहेत. त्यांची शरीरयष्टि फार भरदार नाहीं, तसेंच फार बारीकशी नाहीं. डोळे सतेज आहेत, चेहरा हंसरा आहे, आवाज मृदुमय आहे. रागावणं त्यांना माहीत नाहीं. कपडे ते परीटघडीचे घालतात. सगळा आवच गर्भ-श्रीमंतीचा. पण त्यांत दिखाऊपणा नाहीं. जन्मच मुळीं चांदीच्या चमच्यानें. जीवनात नेहमींच चांदीचं ताटच वाढत आलेलं आहे. टाटांकडे नोकरी. नंतर डायरेक्टरशिप्, नतर टाटांचे डायरेक्टर आणि नंतर आतां स्वतंत्र कंपनी. असं त्यांच्या जीवनाचं विकसन आहे. त्यांचा पिंड राजकारणाचा आणि त्यांचा राजकारणाचा अभ्यास खोलवर आहे. राजकीय तत्त्वप्रणाली-बद्दल तर त्यांनीं फारच दूरवर विचार केलेला आहे. आणि त्यामुळं प्रागतिक मन, कदाचित् क्रांतिकारक मन त्यांचं आहे असच म्हणावं लागेल. राजकीय विचारांच्या दृष्टीने ते नेहमींच इतर राजकीय पुढाऱ्यांपेक्षां दोन पावलें पुढेच असतात. त्यांच्या विचारांची झेपच मुळी अशी आहे कीं, ते जमिनीवर वावरत नाहींत. विचारांना ते अंतराळात नेऊन पोहोंचवितात. ज्या वेळेला

त्यांच्या बरोबरीचा राजकीय वृत्तीसारखी ज्ञानासारखी महनीय असते त्या वेळीं ते आपल्या मनांतील विचारांना शिखरावर चढवितात. त्यामुळें त्यांच्या विचारांचें अग्रेसरत्व स्पृहणीय असतें. हेवा करण्यासारखें देदिप्यमान असतें. पण त्यांच्यांत पुढारीपणाचा आकस नाहीं, त्यांत जाज्वल्य आधिपत्य नाहीं. लोकांना शब्दानें हलवण्याची त्यांची शक्ति नाहीं. वैचारिक मनानें ते विचार करायला लावतात. तत्त्वप्रणालि मांडतांना हमखास शास्त्रीय दृष्टीनें आपल्या विषयाची मांडणी करतील. भाषण करतांना त्यामध्यें कधींच आवेश, हेलकावे किंवा आंदोलनें नसलीं तरी त्यामध्यें शुद्ध भाव, आत्यंतिक ताळमेळ, आणि व्यवस्थितपणा यांचा विचार करून ते मांडतात. म्हणून तर राजकीय क्षितिजावरील ते एक विचारवंत राजकारणी इतकेंच त्यांच्याबद्दल म्हणतां येईल; पण तोलामोलाचे पुढारी असा मात्र त्यांच्याबद्दल बोलबाला करतां येणार नाहीं. कदाचित् त्यांच्या एकंदरीत परिस्थितीमुळें त्यांच्यावर अशा प्रकारचा बांध पडलेला असेल. जवाहरलालजी भारतांतील सगळ्या लोकांना हलवूं शकत. तशा प्रकारचें कर्तृत्व, व्यक्तिमत्व त्यांचें नाहीं. ते साधे, सोज्वळ आणि सुसंस्कृत असे आहेत. त्यांचं व्यक्तिमत्वच तसं आहे. विचारवंताच्या पद्धतीनें ते लोकांना, सबंध समाजाला किंवा देशाला हलवूं शकणार नाहींत.

एका विशिष्ट प्रकारानें जीवन जगणें याला रुळावलेले ते आहेत. कमींत कमी सुख ते सोडूं शकणार नाहींत. ते राजकीय चळवळींत जाऊन आलेले असले तरी त्यांची परीटघडी मोडलेली नाहीं. स्वतःच्या जीवनाची होळी करून तत्त्वार्थानें राजकारणाची गोडी लावून घेणें त्यांना शक्य होणार नाहीं. ही त्यांच्या मनाची प्रवृत्ति असूंच शकत नाहीं. पण राजकारणांतसुद्धां तत्त्वज्ञानाची, राजकीय विचार करणाऱ्यांची जरुरी असते. जर राजकारणांत अत्युत्तम तत्त्वप्रणालि तयार करावयाची असेल तर अथवा समाजवाद या विषयावर समाजापुढें विचारांची मांडणी करावयाची असेल तर मिन मसानी फारच चांगल्या रीतीनें करूं शकतील इतकी त्यांची योग्यता मोठी आहे.

पार्लमेंटमध्यें ते आज एक वर्ष सभासद आहेत व तेथील त्यांचें भाषण जर वाचलें तर असं वाटतं कीं भाषण करण्यापूर्वीं या गृहस्थानें आपली

जबाबदारी ओळखून प्रत्येक लहानसहान गोष्टीचा विचार केलेला आहे. आणि ते म्हणतात त्या बाबतींत योग्य तो पुरावा त्यांनीं सादर केलेला आहे आणि आपल्या भूमिकेच्या मागें कुठली तत्त्वप्रणालि आहे त्याचे संदर्भ नामांकित विचारवंत लोकांच्या ग्रंथांतून त्यांनीं सुपूर्त केलेले आहेत. विचारवंतांना त्यांचीं भाषणें आवडल्याशिवाय राहात नाहींत. ज्यांना राजकारणाचा अभ्यास करावयाचा असेल त्यांनीं तर अशीं त्यांचीं भाषणें जरूर वाचावींत असा माझा त्यांना आग्रह आहे.

सध्यां मिनू मसानी हे स्वतंत्र पार्टीचे ( पक्षाचे ) अध्वर्यु आहेत. त्यांचा पहिला पिंड कॉंग्रेसचा आहे. कॉंग्रेसमध्यें असल्यामुळें कॉंग्रेसचें तंत्र त्यांना फारच उत्तम रीतीनें माहीत आहे. पण कॉंग्रेसमध्यें असतांनासुद्धां ते दोन बोटें इतर कॉंग्रेसजनांच्यापासून दूर होते. त्यांच्या समाजवादाच्या विचारप्रणालीमुळें, तत्त्वप्रणालीमुळें ते कॉंग्रेसमध्यें असूनहि प्रागतिक किंवा क्रांतिकारक वाटत असत. आजहि त्यांच्यांत असलेल्या तत्त्वप्रणालीचा विचार केला तर त्यांचें हें अग्रेसरत्व त्यांनीं कायम ठेवलेलें आहे, असेंच म्हणावें लागेल. पण स्वतंत्र पार्टी ही जुन्या जाणकारांची आहे, जुन्या संस्थानिकांची आणि श्रीमंतांची पार्टी आहे हें कधींच विसरतां येणार नाहीं. असें म्हटलें जातें कीं, राजकीय क्षेत्रांत क्रांति घडविण्यालासुद्धां बड्या गर्भश्रीमंतांची जरूरी भासते. त्याप्रमाणें गर्भश्रीमंतांतील विचारवंत लोक केवळ बुद्धीनें अग्रेसर असल्यामुळें नवीन तत्त्वप्रणालि शास्त्रीय पद्धतीनें तयार करून या स्वतंत्र पार्टीची स्थापना झाली असली तरी आणि या दृष्टीनें या पार्टीचे ग्रह असले तरी विचारवंत मसानी या पार्टीचे विचारी अध्वर्यु आहेत याबद्दल तर वाच्यता करायला नको. बहुजन समाजाची सेवा करून आपण विचारवंतांचा एक लहानसा संघ या दृष्टीनेंच स्वतंत्र पार्टीचा आपणांस विचार करावा लागेल. त्याच दृष्टीनें आपणांस त्या पार्टीकडे पहावें लागेल. आजच्या राजकारणांत कॉंग्रेसला थोडासा धक्का देणारी, विरोध करणारी अशी ही एकच शक्ति आहे. या भारतांतील माणसें राजाप्रमाणें सदैव राहिलीं आहेत. तसेंच या पार्टीतील माणसें राजप्रासादांत राहणारीं आहेत, उद्योगपति आहेत, पैसेवाले आहेत, विचारवंत लोक आहेत. यांच्या बुध्दीची मात्र तल्लख वृत्ति व जाज्वल्यपणा विलक्षण आहे. राजगोपालाचारी हे तर या पार्टीचे महाअध्वर्यु

आहेत. हे राजगोपालाचारी म्हणजे तल्लख बुद्धीची परिणति. विचारवंत लोकांचे मेरुमणि आणि राजकीय तत्त्वप्रणालीचे ते एक द्रष्टे आहेत. स्वतंत्र पार्टीला इतका मोठा नेता मिळाला याचेंहि मुख्य कारण मिनू मसानी हेंच आहे. त्यांनींच राजगोपालाचारींचें मन वळवून त्यांना आपल्या स्वतंत्र पार्टीकडे खेंचलेलें आहे. बुद्धिमान् अशा राजगोपालाचारींना बुद्धिवादी मसानींच्या बुद्धीचा कस लागला असल्यानें आणि त्यांच्या राजकीय संहितेबद्दल त्यांना आदर वाटल्यामुळेंच दोघांनाहि बहुजन समाजाच्या काँग्रेसला केवळ तत्त्वप्रणालीच्या जोरावर, विचारांच्या जोरावर ठोकर देण्याची तयारी केली आहे. स्वतंत्र पार्टीचा दोष एवढाच आहे कीं, त्यांची सर्व मंडळी थाटामाटामध्यें राहणारी, मोटारगाड्या ठेवणारी आहेत. हवाई जहाजांतून प्रवास करणारी आहेत. पण त्या मंडळींची बुद्धि तल्लख आहे आणि तल्लख बुद्धीचे राजगोपालाचारी आणि मिनू मसानी हे त्यांचे अध्वर्यु आहेत. म्हणून विरोध नसणाऱ्या आपल्या भारतांत सर्व विरोधी पक्ष बहुतेक एक तर संघटनारहित, जातीयवादी आहेत हें नाकबूल करतां येणार नाहीं.

पण मला जर तुम्हीं विचारलें कीं, मिनू मसानींच्या बाबतींत तुम्ही काय सांगाल ? तर मी इतकंच म्हणेन कीं, एक उमदा गृहस्थ, अत्यंत सहृदय माणूस, सर्वांशीं सद्भावनेनें आणि संयमानें वागणारा इसम आहे आणि राजकीय क्षेत्रांत खोलवर विचार करणारा, प्रत्यहीं राजकीय तत्त्वप्रणालि निर्माण करणारा एक विचारवंत विद्वान आहे. मिनू मसानी ही व्यक्ति पाहिली तर साधी आहे, बघितली तर, म्हटलं तर अद्वितीय आहे. स्वतंत्र पार्टीचे प्रणेते म्हणून ते काँग्रेसचे विरोधक असले तरी निस्सीमपणें देशभक्त आहेत, सच्चे देशाचे सेवक आहेत, हें मात्र विसरतां येणार नाहीं.

* * *

# श्री. चं. वि. बावडेकर

: १७ :

सध्यां एकसष्टीचा धूमधडाका मुंबईत सुरू आहे. एकसष्टींत उतरलेले सर्व वृद्ध मात्र तरुण दिसतात. त्यांचा उत्साह दांडगा. कांहींचें उगीच कोठें थोडेसे केस पिकलेले आहेत. कामाचा उरक मात्र भलताच. माणसाची आयुर्मर्यादा भारतांत वाढत चालली आहे. त्यामुळें आतां एकसष्टीपेक्षां एकाहत्तरावी साजरी करणें उत्तम. पण रूढिप्रिय भारतीय एकसष्टी साजरी केल्याशिवाय रहात नाहीं. मुबईच्या तरुण वृद्धांपैकीं चं. वि. बावडेकर हे एक आहेत. खांडेकरांचे नामवंत शिष्य, वि. सी. गुर्जर आणि 'मखमालीचा पडदा' लिहिणारे वसंत शांताराम देसाई यांचे सन्मित्र, 'विविधवृत्तां'तले बिनीचे लेखक, 'आलमगीर', विविध–वृत्तांतील स्तंभांचे खंदे आणि फर्डे स्तंभलेखक, 'आलमगीर' या साप्ताहिकाचे पितृतुल्य निर्माते, मुंबई साहित्य संघाचे एक अध्वर्यु, निष्णात टीकाकार असे आमचे चंद्रकांत बावडेकर आहेत.

"विविधवृत्तां 'त ते काम करीत असतांना ठराविक वेळीं आपल्या गवालिया तलावावरच्या घरांतून ते निघत. डोक्याला काळी टोपी. त्यांतून कांहीं पांढरे केस डोकावताहेत, डोळे सूजमीट. त्या डोळ्यांवर जाड भिंगांचा चष्मा, शर्टावर किरमिजी रंगाचा कोट, व्यवस्थित, चापचोप धोतर, पायांत चपला–अशा थाटानें स्वारी चालत चालत ठाकूरद्वारीं 'विविधवृत्ता'च्या कचेरींत वेळेवर हजर होई. लक्ष्मीनारायण प्रेसच्या तळमजल्यावर शिरल्याबरोबर कै. श्री. तटणीसांचें ऑफिस आणि वर पहिल्या मजल्यावर बावडेकर, नाडकर्णी व इतर कांहीं लोकांची कचेरी. येथेंच खरा वाङ्मयाचा, राजकारणाचा कीस निघे. ऐकणीय गप्पा ऐकायला मिळायच्या.

नाडकर्णी, बावडेकरादि सर्व मंडळी एकमार्गी. कचेरींत आले कीं कोट काढायचा, जरा हुश्श करायचं, मग चं. वि. बावडेकरांची फर्मास सिगरेट निघायची. समोर कोणी बसलेले असतील तर त्यांना "सिगरेट ओढतां का ?" म्हणून विचारायचें. 'हो' म्हटलें तर त्या गृहस्थांना सिगरेट द्यायची. नाहीं तर आपली सिगरेट पेटवावयाची आणि कोंकणी पद्धतीनें झुरके मारून ती ओढायची. हे झुरके मारतां मारतां मग हुकमी लिखाण. त्यांत तेजाळ शब्द, अग्निमय वाक्यें आणि मुद्याचें प्रभावी समर्थन.

वर्तमानपत्रांचा इतिहास जेव्हां लिहिला जाईल तेव्हां 'विविधवृत्ता'चा वृत्तांत देतांना 'आलमगिराचा' उल्लेख इतिहासकाराला करावाच लागेल. आलमगिरांतील सगळंच लिखाण 'चं. वि.' चें असें म्हणणें सत्याला धरून होणार नाहीं. पण त्यांतील जास्तीत जास्त लिखाण चं. वि. बावडेकरांचें आहे. ह्या लिखाणांत धार असे. ज्वालामुखीचा दाह असे. वादळ असे. जमालगोटा असे. आणि हें सर्व शांत वृत्तीच्या साध्या प्रवृत्तीच्या गृहस्थानें–चं. वि. बावडेकर यांनीं लिहिलेलें लिखाण असायचें. कोणाला सांगितलें कीं आलमगिराचें टोकदार, तीक्ष्ण, खोचदार स्तंभलेखन हें चं. वि. बावडेकरांचें होतें तर तें बहुतेकांना खरें वाटणार नाहीं. साधुसमाजावर हत्यार, ज्योतिष्यांवर कुऱ्हाड, भोंदु राजकारणावर भयंकर प्रहार असा चं. वि. बावडेकरांचा 'अवतार' त्या वेळच्या 'आलमगीर' या स्तंभांत दिसत असे. 'विविधवृत्त' वाचणारा खास वाचकवर्ग त्या वेळीं असे. तो आलमगिराचा

‘ बडगा ’ वाचण्यासाठीं आतुरतेनें वाट पाही. विविधवृत्त गेला पण तो नाहींसा होण्यापूर्वी ‘ आलमगीर ’ या साप्ताहिकाला चं. वि. नीं जन्म दिला. स्वराज्य-प्राप्तीनंतर सर्व वर्तमानपत्रांचे साप्ताहिक अंकच इतके गोंडस, बाळसेदार निघूं लागले कीं, खास साप्ताहिकाला वैशिष्टय राहिलें नाहीं. बरींच त्या वेळचीं साप्ताहिकें गुंडाळलीं गेलीं. पण चं. वि. बावडेकरांनीं आपलें साप्ताहिक ‘ आलमगीर ’ हिरिरीनें चालू ठेवलें. अजूनहि त्यांच्या लेखणींत पूर्वीची रग आहे, धमक आहे, चमक आहे हें आलमगिरांतील निरनिराळ्या वाग्युद्धांवरून दिसत आहे.

चं. वि. बावडेकरांचा पिंड साहित्यकाराचा. ललित लेखनानें त्यांनीं आपल्या वाङ्मयीन अवताराला सुरुवात केली. त्यांचें सुरुवातीचें लिखाण नाजूक–साजूक आहे. त्यांत लालित्य आहे. त्यांच्या युगांत तरी त्यांनीं वाङ्मयीन विश्वांत मोठ्या आशा उत्पन्न केल्या. पण नियतीनें त्यांना पत्रकाराच्या रामरगाड्यांत उतरविलें. ते एकदां उतरले तें तेथेच राहिले. पत्रकाराचा मामला म्हणजे झकाझकीचा. त्यामुळें आखाडा, मल्लयुद्ध, तलवारीचे हात, मलखांब, कसरत हें रोजचें जीवन. या झकाझकीच्या झंझावाती जीवनांत चं. वि. बावडेकरांनीं पत्रकाराचें वाङ्मय निर्माण केलें, पण ललित वाङ्मयाला ते अंतरले.

याचा अर्थ असा नव्हे कीं त्यांनीं ललितवाङ्मय लिहिलेंच नाहीं. कधीं कधीं मधून मधून त्यांनीं ललितक्षेत्रांत येऊन आपली चमकदार शैली दाखविली आहे. कांहीं सुरस व सरस भाषांतरें केलीं आहेत. वाङ्मयाचा त्यांचा अभ्यास सखोल आहे. वाङ्मयीन टीकाकार या नात्यानें त्यांचा दर्जा फार मोठा आहे. पण पत्रकार झाल्यानंतर वर्तमानपत्राला, साप्ताहिकाला एक सव्यसाची स्तंभलेखक मिळाला. समाजकंटकांवर शब्दरूपी बडगा हाणणारा एक कलंदर वर्तमानपत्रकार निर्माण झाला.

वर्तमानपत्राचे स्तंभलेखक, साप्ताहिक चालविणारे वर्तमानपत्रकार आणि राजकारण, समाजकारण यांचें योग्य परिशीलन करणारे सूक्ष्म टीकाकार, मुंबईच्या साहित्य संघाचे संयोजक असे चं. वि. बावडेकरांच्या रूपाचे निरनिराळे पैलू आहेत. यांतला उजवा कोठला, डावा कोणता हें सांगणें कठीण. प्रभावी

व्यक्तित्व नसूनहि त्यांनीं आपला ' प्रभाव ' आपल्या क्षेत्रांत निर्माण केला आहे. वर्तमानपत्राच्या इतिहासांत त्यांचें नांव वरच्या प्रभावळींत नमूद होईल.

खाजगी जीवनांत ' चं. वि. ' हे साधसुधे गृहस्थ आहेत. बोलणें माफक, रहाणी साधी, बाळबोध. अल्पसंतुष्ट, संथ जीवन. वर्तमानपत्राच्या कचेरींत धकाधकीचा मामला असेल तोच. पण घरांत वादळी वारे नाहींत. रजत-माला वाव नाहीं. ऋजुता, सात्त्विकता आणि सहनशीलता यांवर संसाराची सफलता. एऱ्हवीं वाग्युद्धांत लढाऊ वृत्तीनें लढणारा हा वीर घरकुलांत शिरला कीं, शांतरसाला आवाहन करतो. नरमाईनें सर्वांशीं व्यवहार करतो. आपल्या सौभाग्यवतीला सद्भावानें वगवितो. मुलींच्यावर मायेची पांखर घालतो.

पत्नी आहे गरीब हाडाची. कष्टीक, आनंदी आणि सोशिक. सदान्कदा आपल्या संसारांत मग्न. आपल्या पतीची इमानेंइतबारें सेवा करायची, मुलींचे, काबाडकष्ट उपसायचे हें तिला माहीत. या पलीकडच्या दुनियेची तिला जराहि माहिती नाहीं. घरकूल आणि आपण. आपण आणि घरकूल. एवढाच जीवनाचा ' नक्षा ' तिला माहीत आहे. चं. वि. चा संसार मोठा गोड आहे.

त्यांच्या मुली सुविद्य आहेत. लग्न करून आपापलीं घरकुलें सांभाळीत आहेत. वाङ्मयाची त्यांना आवड आहे. पण त्याहूनहि त्यांचें संसाराकडे जास्त लक्ष आहे.

चं. वि. बावडेकर ही ज्ञात व अज्ञात अशी व्यक्ति आहे. ' आलमगीर ' म्हणून ते महाराष्ट्रांत महशूर आहेत; पण त्यांच्या घरकुलांतील बावडेकर जगाला अप्रसिद्ध आहेत. त्यांचें राजसी व तामसी स्वरूप त्यांच्या आलम-गिरांत दिसतें. तर त्यांच्या गृहीं ते सात्त्विक स्वरूपांतच दिसतात. युद्धाला सतत तयार असणारे वर्तमानपत्रकार बावडेकर हे एक असामी; तर घरच्या सुखदु:खांत निमग्न असणारे ' गृहस्थधर्मी ' बावडेकर हे निराळे. गृहस्थ या नात्यानें धोपटमार्गी; तर वर्तमानपत्रकार या नात्यानें प्रयोगशील आणि हजरजबाबी, युयुत्सु आणि ' खटाशीं खट ' आणि ' शठाशीं शठ ' या वृत्तीनें वागणारे.

आतां चं. वि. बावडेकरांचे केस पिकलेले आहेत. क्वचित् तें त्यांची काळी टोपी परिधान करतात. त्यामुळें त्यांचे विखुरलेले केस सदा उडत असतात. कोट गेला. आता कुडतें, धोतर आणि चपला. सकाळीं आलमगिराची कचेरी. संध्याकाळीं वा रात्रौ साहित्य संघ. बाकी वेळ घर. सिगरेटशिवाय व्यसन नाहीं. सिगरेट मात्र जीव कीं प्राण. एकसष्टीचा बाक नाहीं. ताठरपणा कायम. लेखणींतला 'अंगार' कमी नाहीं. साठी झाली तरी यष्टि ताठ आहे. जीवेत् शरदः शतम् असा भगवंताचा आशीर्वाद आहेच. कारण लेखणीनें 'डंख' मारला तरी या माणसाच्या मनांत दुःख नाहीं, विष नाहीं. वाईटपणा नाहीं. चं. वि. बावडेकर या व्यक्तींत मूलतः द्वेष नाहीं. फूत्कार नाहीं. अन्यायाची मात्र फार चीड आहे. समाजकंटकांची घृणा आहे. चं. वि. ना तुम्ही विचारा "चं. वि. तुमचें हें आजचें जीवन बदललें तर चालेल का ?" चं. वि. कडाडून म्हणतील, "माझ्या जीवनांत जराहि बदल झालेला मला खपणार नाहीं. मी रहातों तसाच मला जगूं द्या. नाठाळाच्या माथा मारूं दे मला सोटा या वृत्तीनें मला जगूं द्या".

* * *

# सौ. सुहासिनी मुळगांवकर

**: १८ :**

२० व्या शतकांत दोन प्रतिभावान् व्यक्तींनीं मराठी रंगभूमीवर क्रांति घडवून आणली. या दोघांनीं 'एकपात्री' रंगभूमि तयार केली. हीं दोन माणसें म्हणजे सौ. सुहासिनी मुळगांवकर आणि श्री. पु. ल. देशपांडे. त्यानंतर अनेक एकपात्री कार्यक्रम रंगभूमीवर आले, परंतु सौ. सुहासिनी मुळगांवकर व "पी. एल्." यांच्या कार्यक्रमाची लज्जतच कांहीं और ! या दोघांनीं मराठी रंगभूमीला नवा साजशृंगार चढविला. नवीन वळण लावलें. नवा ढंग मराठी रंगभूमीवर सुरू केला.

जुनी रंगभूमि म्हणजे लांबलचक नाटकें. हीं जुनीं नाटकें करणारे कलाकारहि फार मोठालीं माणसें. त्यांनाच म्हणून तीं नाटकें पेललीं. गंधर्व नाटक मंडळी, ललितकलादर्श संगीत नाटक मंडळी, बळवंत संगीत मंडळी या सर्व मंडळींत मोठे नट असत आणि त्यांची अद्वितीय कामें पाहिलीं कीं वाटायचें हीं महान् कामें या महान् कलाकारांनींच करावीं; येरागबाळांचें तें काम नाहीं. पण आमच्या सौ. सुहासिनीबाईंनीं कमाल केली. त्यांनीं सौभद्र, मानापमान,

आणि त्यानंतर आतां स्वयंवर हीं तडफदार नटांनाहि न पेलणारीं नाटकें सहज लीलेनें 'एकपात्री' करून दाखविलीं. त्यांचें तंत्र नवीन आहे. त्या हीं नाटकें सहजतेनें करतात, पद्धतशीरपणें करतात आणि रसिकजनांकडून 'वाहवा' मिळवितात. 'पी. एल.' देशपांडे यांचा खाक्या निराळा. त्यांनीं 'बटा॰ ट्याची चाळ', 'असा मी असा मी' हीं आपलीं स्वरचित एकपात्री 'कथानकें' लावलीं. अमाप कीर्ति आणि खूप पैसा मिळविला. उत्तम कथानकाला फार मोठा संच लागतो वगैरे प्रथांना त्यांनीं चाट दिली. एक कसलेला नट रंगभूमीवर येतो. ३–३॥ तास आपल्यांतल्या नाटयानें, कलेनें, कथनानें प्रेक्षकांना मंत्रमुग्ध करतो. तो दाखवितो तें प्रात्यक्षिक अपूर्व आणि ते वेडेपिसे झालेले प्रेक्षकहि अपूर्व !

सौ. सुहासिनीबाईंनीं नाटकें घेतलीं जुनीं. त्यांतील कांहीं भागांची काटछाट केली. आणि त्या नाटकांतील आठ दहा कामें स्वतःच करून एकपात्री नाटकें सादर केलीं. या नाटकांतील निरनिराळीं पात्रें त्यांनीं स्पष्ट उभी केलीं. त्यांचे संवाद खटकेबाज पद्धतीनें म्हटले. आणि त्यांतलें संगीत रसाळपणें गायिलें. जुन्यांच्या भूमिकांची त्यांनीं आठवण करून दिली. आपलें 'व्यक्तित्व'हि त्यांनीं प्रत्येक 'पात्रांत' ओतलें. त्या त्या पात्रांत त्यांनीं नवा 'रस' भरला.

सौ. सुहासिनींचा जन्म खानदानी घराण्यांत झालेला. पिता नामवंत गायक. माता सुविद्य व बहुश्रुत, त्यामुळें स्वतः सुहासिनी सुसंस्कृत आणि सालंकृत आहेत. लहानपणीं त्या सेंट कोलंबो हायस्कूलमध्यें शिकल्या. त्या वेळीं त्या लाजाळू, मागें मागें राहणाऱ्या, थोडयाशा अंतर्मुख अशा होत्या. त्यांनीं शाळेंतल्या नाटकांत भाग घेतला असेल, पण त्या वेळीं नाटयकलेंत त्या अग्रेसरत्व मिळवितील असें कोणासहि वाटलें नाहीं.

दिसायला चुणचुणीत, डोळे मोठ्या आकाराचे, बांधा उंच अशी ती सुहासिनी नानाच्या चौकांत दिसली म्हणजे तिच्याकडे लक्ष जायचें. त्या व्यक्तित्वांत आकर्षण जरूर होतें. तशी थोडीशी घुमी. त्यामुळें तिचें अंतरंग कळत नसे. पण घरीं मात्र गायनाचे संस्कार सारखे घडत गेले असणार. अवलोकन फारच सूक्ष्म असणार. त्या सुप्तावस्थेंत अनेक गुणांचा प्रादुर्भाव त्यांच्या स्वभावांत व व्यक्तित्वांत झाला असणार.

खेळांकडे प्रवृत्ति विशेष होती. बॅडमिन्टन, टेबलटेनिस यांवर विशेष प्रेम. या खेळांत खूप प्रावीण्य मिळविल्यामुळे त्या खेळांच्या क्षेत्रांत फार पुढें येतील असें भविष्य वर्तविलें गेलें असतें तर तें खोटें ठरलें नसतें. पण नाट्याच्या दालनांत प्रतिभावान् कलाकार म्हणून ती चमकेल असें त्या बाल्यवस्थेंत कोणीहि म्हटलें नसतें. त्यांचें एम. ए. पर्यंतचें शिक्षण सुसंगत झालें. वाङ्मय –खास संस्कृत वाङ्मय त्यांनीं उत्तम रीतीनें आत्मसात् केलें. त्यांतूनहि त्यांच्यांतील नाट्यरसाचा परिपोष झाला. तरुण वयांत प्रकर्षानें त्या कलेकडे वळल्या. रंगभूमीचा त्यांनीं एकनिष्ठतेनें अभ्यास केला असणार. मराठी नाटकांतील निरनिराळ्या पात्रांची रंगभूमीवरील चित्रणें त्यांनीं अभ्यासलीं असणार आणि या त्यांच्या तपस्येनें, व्रततुल्य अभ्यासानें त्यांनीं आपल्यांतला कलाकार निर्माण केला असणार. गायन, हावभाव, उच्चारांचे चढउतार वेगवेगळ्या स्वभावाचें वैशिष्ट्यपूर्ण रेखाटण करण्यासाठीं अविरत श्रम घेतले असणार. म्हणूनच त्यांचें ' सौभद्र ' रसिकांसमोर आल्याबरोबर महाराष्ट्रानें त्यांच्यांतील कलाकार मान्य केला. आणि उत्तेजनाची, प्रोत्साहनाची त्यांना टाळी दिली. त्या पहिल्या टाळीनें ' सौभद्र ' गाजलें. ' मानापमान ' लोकांनीं उचलून धरलें आणि यापुढें ' स्वयंवर ' रंगभूमीवर आल्यावर त्या एकपात्री नाटकाचेंहि हार्दिक स्वागत होईल.

सौ. सुहासिनीबाई आपल्या भूमिका समजून, उमजून करतात. त्यांच्या भूमिकेमागें विलक्षण श्रम असतात. त्यांचें स्वभावदर्शन अप्रतिम असतें. त्यांचें पाठांतर पहिल्या प्रतीचें असतें. आपल्यांतील कला वाढविण्यासाठीं त्या प्राण ओततात. कलात्मक ज्ञानांत भर घालण्यासाठीं चारी दिशा भटकून आपल्या बिरुदावलींत विशेष भर घालतात.

वडिलांकडून त्यांनीं गायन उचललें असलें तरी जिथें मिळेल तिथें त्या आपली गानपिपासा पुरी करीत आहेत. सडोलीकरांकडे त्यांनीं गायनाची तालीम घेतली. श्रीमति मोगूबाई कुरडीकरांकडे त्यांना अभिजात गायकी लुटतां आली. सौ. हिराबाई, सौ. सरस्वतीबाई यांच्या गायन कार्यक्रमाला त्या हटकून हजर असतात. जें जें त्या ऐकतात तें तें त्यांच्या हृदयीं वसतें आणि त्यांच्या गायनांतून तें ओसंडतें. आज त्यांचें गायन स्वयंपूर्ण, स्वतंत्र

आणि मधुर असें आहे. त्या गाण्यांत मोहकता आहे. साज आहे, रंग आहे, ढंग आहे, चुणचुणीतपणा आहे. अनेकांचें ऐकून त्यांनीं आपले स्वर तयार केले आहेत. हे स्वर भरदार आहेत. भरघोंस आहेत. अतीव गोड आहेत.

त्यांनीं पचविलेलें संगीत आज गानलोलुप महाराष्ट्राला रंजवीत आहे. त्यांच्या नाट्याचा, गायनाचा, कलेचा दर्जा दिवसेंदिवस वाढत आहे. महाराष्ट्राच्या राष्ट्रीय कार्यक्रमालासुद्धां त्यांचें 'वंदे मातरम्' पाहिजे असतें. आज सौ. सुहासिनीबाईंना स्वतंत्र व्यक्तित्व प्राप्त झालें आहे. महाराष्ट्र रंगभूमीची 'गंधर्वा'नंतरची एकमेव गंधर्वकन्या असें त्यांचें वर्णन करावें लागेल.

सौ. सुहासिनीबाईंचे यजमान सुरेश मुळगांवकर हेहि खेळाडू, संगीतप्रेमी आणि तबलानवाझ आहेत. हे दोन जीवनसाथी गायनवादनाची साथ करूं लागले म्हणजे जीवनांतील रससंगतीला कांहीं न्यारा ढंग आणीत असणार! ही जीवनजोडी एकमेकांच्या लयींत ब्रह्मनादाचा आस्वाद घेत असणार! हा जो समसमा संयोग झालेल्या आत्म्यांच्या झंकारांतून नवनवोन्मेषशालिनी नाट्यप्रभा निर्माण झाली नाहीं तरच नवल!

म्हणूनच मला या आदर्श जोडप्याला सांगावेंसें वाटतें कीं, 'तुम्ही रंगभूमि एकपात्री नाटकानें जिंकलीत. पण या मराठी रंगभूमीला आणखी एक वळण द्या. नाटक, नृत्य आणि संगीत असा एक मिश्रित Musical Extravaganza रंगभूमीवर सादर करा. मराठी रंगभूमीवर या तुमच्या अभूतपूर्व कृतीनें नवें लेणें घडेल. नवा साज चढेल. मराठी रंगभूमीचा प्रागतिकपणा वाढेल.'

असा Musical Extavaganza त्या स्वत: लिहूं शकतील. श्री. यशवंतराव देव त्यांना या बाबतींत मदत करूं शकतील. सुधीर फडके मराठी रंगभूमीवर हा नवा प्रयोग करण्यास अधीर होतील. रविशंकर तर हा नवा कार्यक्रम झालाच पाहिजे असें मत देतील. सौ. सुहासिनीबाईंनीं अशा प्रकारच्या Musical Extravaganza ला जन्म देऊन महाराष्ट्र रंगभूमीचें वैभव वाढवावें ही त्यांना नम्र विनंती.

सौ. सुहासिनी यांना रूप आहे. कंठ आहे. त्यामुळेंच त्यांचा जन्म कलेसाठीं आहे हें त्रिवार सत्य आहे. पण त्या आदर्श कन्या आणि आदर्श

पत्नीहि आहेत. प्रेमळ माता आहेत. क्रीडाप्रेमी आहेत. बहुश्रुत आहेत. सुविद्य आहेत. त्यांचा व्यासंग मोठा आहे.

घरांत त्या गृहिणी, पत्नी, माता ह्या निरनिराळ्या भूमिका पार पाडतात. तशीच त्यांची रंगभूमीवरील भूमिकाहि विविध रूपी आहे. त्यांत आस्था आहे. आत्मीयता आहे. त्याच हिरिरीनें, तळमळीनें त्यांनीं Musical Extravaganza मराठी रंगभूमीवर सादर करावा. त्यांना न भूतो न भविष्यति एवढें यश मिळेल. मराठी रंगभूमीवर हा क्रांतिमय कार्यक्रम करण्याचा अग्रहक्क सौ. सुहासिनीबाईंचाच आहे.

* * *

# सर विन्स्टन चर्चिल

**: १९ :**

चर्चिल हा राजश्री होता. उमरावांचा उमराव होता. त्याच्या एकाच व्यक्तींत अनेक व्यक्ति होत्या. तो संपूर्णतः पारंगत अथवा विशारद कशांतहि नव्हता. पण बुद्धि, धैर्य आणि कल्पकता या बाबतींत मात्र परमेश्वराची त्याच्यावर फार कृपा होती. नेत्याचें काम तो लीलेनें करी. आपल्याला नेतेपणांत अपयश येईल, आपल्यावर खूप टीका होईल या गोष्टींचें त्याला आकलन होतें. प्रत्येक कृतीला जगाची संमति मिळेल असें त्याला कधींच वाटलें नाहीं. त्यानें अधिकाराचीं सर्व वस्त्रें व उपवस्त्रें वापरलीं. फक्त तो कँटरबरीचा आर्चबिशप् झाला नाहीं. पण कोठल्याहि आर्चबिशप्‌ला आत्मविश्वास नसेल इतका चर्चिलला होता कीं, देव त्याचें ऐकत असे व देवदूत त्याच्यावर प्रेमाची पांखर घालीत असत.

वय नव्वद. गात्रें गलित झालेलीं. पण मन दणकट. पांच युद्धांत प्राणानें लढलेला वीर शिरोमणि आतां प्राणाशीं लढत होता. जिवाभावानें लढत होता. यमाची पंधरा दिवस पिछेहाट करीत होता. पण वार्धक्यामुळें शेवटीं धारा-

तीर्थावर पडला. अमरपदाचें अजिंक्यपद मृत्यूकडून हरवून मग चर्चिल अंतर्धान पावला. मरतांनाहि विजयश्रीची माळ घेऊन मरण !

जागतिक इतिहासांत इतकी प्रभावी व्यक्ति मिळणें कठीण. चर्चिलमध्यें जगांतला इरसालपणा होता. बंधनापलीकडे वागणें ही त्याची जिद्द. चिडला तर जमदग्नीचा अवतार. शांत असला तर वात्सल्यानें भरलेला. ब्रिटनचे प्रतीक Bull-Dog तस्सा तोंडावळा, त्याची निर्भयता, त्याचीच झुंझारवृत्ति. अट्टल दारूबाज. सकाळच्या न्याहारीबरोबर दारू. दोन प्रहरीं जेवतांना दारू. रात्रीं जेवतांना आस्वादपूर्ण दारूचे पेग. प्रातःकाळीं ३।४ वाजेपर्यंत काम करीत असतांना मधून मधून मदिराप्राशन. दर्दी चिरुटबहाद्दर. अभिजात शोकिन. हा कोठल्याहि साच्यांत न बसणारा माणूस. सीमातीत, स्वयंभू, स्वयंस्फूर्त, स्वयंप्रेरित, मानवांतला Superman चर्चिल!

गांवचा बेगुमानपणा, बेदरकारपणा, बेफामपणा चर्चिलमध्यें सामावलेला होता. त्याच्या धीरोदात्तपणाची, निर्भयतेची तर कमाल होती. चराचरांतील भावनोत्कट उद्रेक, बुद्धीचा सहजस्फूर्त स्फुल्लिंग आणि शरीराचें दुर्दमनीय आणि अतुल सामर्थ्य यांचा रोमहर्षक समन्वय या लोकविलक्षण विभूतींत झाला होता. चर्चिलला युगपुरुष म्हणावें का ? हा शब्द आज लुंग्यासुंग्या माणसाला लावण्यांत येतो. या संज्ञेनें चर्चिलला मापतां येणार नाहीं. चर्चिल म्हणजे गगनचुंबी महामेरु. प्रतिभावान् महारथी. त्याचें विजिगीषु व्यक्तित्व जगभर पसरलें होतें. नव्वद वर्षांच्या जीवनांत त्यानें हिमालयाएवढी कामगिरी केली आहे. कायावाचामनेंकरून तो इंग्लंड, अमेरिका, जगासाठीं झिजला आहे. हिटलर, मुसोलिनीनें जग वैराण वाळवंट बनविलें असतें. चर्चिलनें जगाला नंदनवन बनविलें. त्याची दोन युद्धांतील महान् कामगिरी हेंच त्याचें जिवंत स्मारक.

'ब्रिटिश साम्राज्याचें दिवाळें वाजविण्यासाठीं माझा जन्म नाहीं' ही त्याची भारताबद्दलची दर्पोक्ति त्या वेळीं भारतीयांच्या मनांत सलली तरी आमच्या स्वातंत्र्यानंतर चर्चिलच्या मनांत किल्मिष राहिलें नाहीं आणि भारतीयांचीं मनें त्याचे बाबतींत कलुषित राहिलीं नाहींत. राजकीय देवाणघेवाणांत कधींकधीं कटु शब्द तोंडांतून निघून जातात. आज जगाच्या श्रद्धांजलींत भारतहि मुक्तकंठानें या महाभागाच्या समाधीवर स्तुति-सुमनें उधळीत

आहे. वीरशिरोमणि, असामान्य मानव, जगाच्या स्वातंत्र्याचा, समतेचा संरक्षक, विनोदमूर्ति, मुत्सद्दी, शब्दसृष्टीचा ईश्वर, सहृदय विजेता, पराजयांत अपराजित, मित्रमंडळींत गोष्टीवेल्हाळ आणि स्नेहाला सदा जागरूक. जगानें वाहिलेली ही श्रद्धांजली आहे.

चर्चिलचा जन्म इतिहासप्रसिद्ध घराण्यांत. हाडांत आणि पेरांत, रक्ता-मांसांत इंग्रजी आणि अमेरिकन रक्ताची सरभेसळ. वडील रॅन्डोल्फ चर्चिल अस्सल ब्रिटिश. तर आई शंभर टक्के अमेरिकन. या मुलाचें विशाल डोकें शाळेच्या खुरट्या झोपडीत मावेना म्हणून त्यानें जगाच्या खुल्या मुलुखांत, आकाशाच्या अवकाशांत ज्ञानाचे, विद्वत्तेचे, आत्मप्रचीतीचे परमाणु वेंचले. जगाच्या पाठीवर भ्रमंति करतांना त्यानें परमानंद लुटला, सौंदर्यावर अमाप प्रेम केलें. सर्व प्रकारच्या, सर्वसुखाच्या अनुभूति घेतल्या.

चर्चिल म्हणजे शब्दभांडाराचा ईश्वर. अमर वाङ्मयाचा निर्माता. सर-स्वतीच्या गळ्यांतला ताईत. लेखणीनं लिहिलं तें ब्रह्मवाक्य. तोंडानें बोलला तें वेदवाक्य. पावसाचा वर्षाव जसा अविरत, तसा चर्चिलच्या लिखाणाचा वर्षाव. त्यानें लिहिलेल्या युद्धवार्ता म्हणजे आधुनिक महाभारत. त्यानें लिहि-लेली चरित्रें म्हणजे चरित्रनायकांचे चलत्चित्रपट. त्याची लेखणी म्हणजे कृष्णकन्हय्याची बांसरी. त्यांत लय आहे. गत आहे. गीत आहे. शुभ्र, धवल, धीरगंभीर गंगौघ. त्याचें अतुलनीय गद्य म्हणजे खंडकाव्य. त्यानें इंग्रजी भाषा समृद्ध केली आहे.

चर्चिलचा मोठेपणा हा जन्मसिद्ध होता. कोठल्याहि शाळेंत शास्त्रशुद्ध शिक्षण न घेतां तो उपजत विद्वान् होता. इंग्रजी भाषेचा तो प्रभु होता. एकहि डिग्री रीतसर मिळालेली नसतां जगांतील अनेक विश्वविद्यालयांनीं त्याचेवर सन्माननीय पदव्यांची खैरात केली होती. प्रसिद्धि तर त्याच्या सटीला पूजलेली. चर्चिल म्हणजे चर्चा.

अनेक बाबतींत चर्चिल सुदैवी. पत्नी त्याला मिळाली ती लाख मोलाची. तिनं चर्चिलला अनन्यभावाने संभाळलें. त्याच्या जीवनांत प्रेमाचा पाऊस पाडला. १९०४ मध्यें क्लेमेन्टाईनशीं त्याचें लग्न झालें. ‘तेव्हांपासून माझें आनंदपर्व सुरू झालें.’ एवढ्या सूत्रवाक्यांत चर्चिलनें आपल्या वैवाहिक जीवनाचा सोनेरी सारांश दिला आहे.

चर्चिलच्या महत् कार्याचा उदोउदो झाला म्हणजे त्याला विरोध नव्हता, त्याला शत्रू नव्हते असें नाहीं. त्याच्या हितशत्रूंनीं त्याला नामोहरम करण्याचा जीवापाड प्रयत्न केला आहे. त्याच्या टीकाकारांनीं विदूपक म्हणून त्याची बोळवण केली आहे. कांहींनीं त्याला 'आत्मप्रौढीचा खंदक' म्हणून पदवी बहाल केली आहे. त्याच्या कट्टर दुष्मनांनीं त्याला 'युद्धपिपासू--रक्तपिपासू' म्हणून त्याची संभावना केली आहे. हें सर्व चर्चिलनें हंसत हंसत ऐकलें आहे. आणि त्याच्या बुलडॉगी हंसण्यांत तें सर्व विरलं आहे. राहतां राहिलं त्याचं जगप्रसिद्ध 'V' चिन्ह आणि जळती सिगार.

दुःखाचे डोंगर चर्चिलवर गडगडले आहेत. त्यानें निवडणुकींत आपटी खाल्ली आहे. राष्ट्राला दिग्विजय मिळाल्यानंतर तो निवडणुकींत सपशेल पडला आहे. इतरांच्या अपयशांचें खापर त्याचे डोक्यावर मारण्यांत आलें आहे. समाजाचे निर्घृण आघात सोसून, लोखंडाचे चणे खाऊनच त्याची बेगुमान झुंझारवृत्ति तयार झाली होती. त्याच्यांत विनम्र भावहि उत्पन्न झाला होता. बाळसेदार निरागसपणा दिसत होता. विश्वभावानें त्याचें हृदय तुडुंब भरलें होतें.

गांधीजींनीं हिमालयाएवढ्या चुका केल्या. चर्चिल दोषरहित नव्हता. त्यानें आपल्या चुका प्रांजळपणें कबूल केल्या आहेत. मानवजात आज त्याच्या समाधीवर कृतज्ञतेचीं फुलें उधळीत आहे. त्या फुलांच्या सुगंधांत त्याचे प्रमाद झांकून जातील. भावी पिढ्यांच्या समोर त्याचा आदर्श उभा राहील तो महापुरुषाचा !

कालिदासाचें काव्य, ज्ञानेश्वरांचा प्रासादिकपणा आणि एकनाथांचा रसाळपणा एकत्रित करून चर्चिलचें गुणगान करूं या म्हटलें तरी तें अमृतबोल यथातथ्य वर्णनाला कमी पडतील. चर्चिल, एकमेव एक. त्याच्या सम तोच.

चर्चिलचें राजकीय व सामाजिक तत्त्वज्ञान, साधेपणा व व्यवहार यांवर आधारलेलं होतं. तो स्वातंत्र्याचा भोक्ता होता. न्यायाला मानणारा होता. मानवावर त्याचें अगाध प्रेम होतें. मानवजातीसाठीं त्यानें आपलें सर्वस्व अनेक वेळेला पणाला लावलें होतें. त्याची तत्त्वप्रणालि लोकानुवर्ति होती.

मानवजातीचें कल्याण हें ध्येय, हा उद्देश. त्या बाबतींतले विचार साधे, सोज्वळ पण बाळबोध. मानवी संहारांतून त्यानें मानवी जीवन अभय केलें. या कार्यासाठींच चर्चिलचा जन्म, तेंच चर्चिलचें अवतारकार्य.

विसावें शतक हें संहाराचें शतक. दोन महाभयंकर युद्धें. लाखांनीं माणसें कापून निघालीं. अशा वेळीं दैवानें आणि देवानें जगाला विन्स्टन चर्चिल दिला. समर्पण केला. त्यानें मानवजातीचें संरक्षण केलें. दुर्जनांचा संहार केला. विसाव्या शतकांतला 'अवलिया' म्हणून त्यानें 'ध्रुवपद' मिळविलें.

मानवजातीवर चर्चिलचें अमर्याद प्रेम. माणुसकी हा स्थायीभाव. हेंच प्रेम त्याचें पाळलेल्या कुत्र्या-मांजरांवर. त्याचीं कुत्रींमांजरं त्याला भेटलीं नाहींत तर तो तडफडायचा. त्यांच्या आजारांत या मूक प्राण्यांना तो औषधोपचार करील. प्रेमानें जवळ घेईल.

एका बाजूला धरणीकंप होत असतांना तो धीरानें वागेल, तर कुत्र्या-मांजराला इजा झाली कीं तो धाय मोकलून रडेल. लहर लागली तर चार गोष्टी आपल्या विरुद्ध सांगून मनमुराद हंसेल, मस्करीकुस्करी करण्यांत अट्टल. तुम्हांला हंसवून हंसवून पोट दुखायला लावील. वेळप्रसंगीं जळत्या आगींत उडी टाकील. होरपळून निघेल, पस्तावेल. चूक झाली, प्रांजळपणें कबूल करील. पुन्हां तेंच वर्तन दुबारा करील. नाहीं लाज, नाहीं विधिनिषेध.

एलिझाबेथ आणि व्हिक्टोरिया या दोन राण्यांच्या काळाचा चर्चिलमध्यें समन्वय होता. एलिझाबेथ काळाचा उन्मेष आणि व्हिक्टोरियाच्या काळचें वैभव यांच्या मिश्रणांतून चर्चिलचें ऐसपैस व्यक्तिमत्त्व तयार झालें होतें. त्यामुळें त्याच्यामध्यें हिऱ्याचें तेज होतें, पांचूची प्रभा होती, माणकाची शीतलता होती, मोत्याचा सोज्वळ प्रकाश होता. जीवनाचा आस्वाद घेतां घेतां त्यानें अनेक मंत्रिपदें भूषविलीं. पण प्रकर्षानें त्यानें जर कोठलें मंत्रिपद भूषविलें असेल तर तें युद्धमंत्र्याचें. युद्धांत चर्चिल खरा दर्दी. युद्ध लढतांना त्याला चेव चढे. त्याची जिद्द वाढे.

आकाशांतून बॉम्बचा वर्षाव होत असतांना तो आपल्या लोकांना उत्तेजक शब्दांत उन्मादकारक संदेश देई. १९४० मध्यें तो इंग्लंडचा मुख्य प्रधान झाल्याबरोबर त्यानें जो संदेश दिला तो इंग्रजी लोक, नव्हे जगभर पसरलेलें

स्वातंत्र्याचे भोक्ते विसरूं शकणार नाहींत. तो गर्जला, " रक्त, श्रम, आंसू आणि घाम या पलीकडे मी माझ्या राष्ट्राला कांहींहि देऊं शकत नाहीं. " किती जळता संदेश आणि किती मोजक्या शब्दांत!

पन्नास वर्षें त्यानें इंग्लंडचें पार्लमेंट गाजवलें. जागविलें. लोकसभेंत चर्चिल व्यक्ति म्हणून उरला नव्हता. तो संस्था बनला होता. त्याच्या प्रभावी व्यक्तित्वावर त्याचा पक्ष खूष होताच; पण पार्लमेंटमधील पक्षोपपक्ष त्याला सन्माननीय सदस्य मानीत. त्याची वाकलेली पण हंसरी मूर्ति पाहिली कीं, पार्लमेंटचे सर्व सभासद त्याची मानसपूजा करीत.

पार्लमेंटचा उत्तम आणि आदर्श सभासद. फावल्या वेळांत चित्रकार, सदान्कदा भटक्या आणि जीवनाचा पुरेपूर आस्वाद घेणारा राजर्षि.

देवानें या महाभागाला उदंड आयुष्य दिलें. अवकाशांत दिसणार नाहींत इतके रंग त्यानें आपल्या जीवनांत उधळले, त्याच्या रोमांचकारी जीवनाची कथा संपली. चर्चिलची चिरनिद्रा सुरू झाली.

त्याच्या समाधींतून तो स्वातंत्र्य, समता आणि न्याय या त्रयींचें रक्षण करील. त्याच्या समाधींतून निघणारीं स्वयंप्रेरित स्फुल्लिगें जगांतील झोटिंग-शाहीचें निर्मूलन करतील.

त्याची स्फूर्ति अनेक पिढ्यांना पुरेल. त्याची पुण्याई मानवजातीचें रक्षण करील, त्याच्या वाङ्मयांतून लोकशाहीचा उषःकाल जगांतील सर्व खंडांत उगवेल. युगें न् युगें टिकेल.

* * *

# उमादेवी आणि मॉरिस फ्रीडमन

: २० :

दि. १२ जुलै १९६४ चा ‘ तरुण भारत ’ हातांत पडला. त्यांतली सातवी बोधक सत्यकथा वाचली. गत स्मृति उजळल्या. मन मागें गेलें आणि पोलिश विदुषी श्रीमति वंडा ज्ञानोस्का ऊर्फ उमादेवी मनश्चक्षूंसमोर साकारली. त्याबरोबर मॉरिस फ्रिडमनचीहि आठवण झाली.

श्रीमति उमादेवी तशी कृश बाई. चेहरा हंसरा, डोळ्यांत तेज, बोलण्यांत अजब लकब, उच्चार स्पष्ट. ‘ आपल्या मित्रानें—मॉरिस फ्रिडमननें मला आपल्याकडे पाठविली आहे. ’ सोफावर बसतां बसतां ती म्हणाली.

मी त्यांच्यासमोर बसलों. त्यांना नमस्कार केला व हंसून म्हणालों,

‘ मग आपला काय हुकूम आहे ? ’

## उमादेवी आणि मॉरिस फ्रिडमन

"माझी विनंती अशी आहे कीं, मला 'हत्ती-देव' दाखवा. त्या देवतेचें मला मनोभावें दर्शन घ्यावयाचें आहे." उमादेवी अदबीनें बोलल्या. त्या वेळीं हिंदुस्थानांत त्या नव्यानेंच आल्या होत्या.

'हत्ती-देव !' मी मनापासून हंसलों. मग एकदम गंभीर झालों. आश्चर्याचा मला जबरदस्त धक्का बसला होता. कारण उमादेवी गणेश-चतुर्थीला माझ्या घरीं आल्या होत्या आणि 'हत्ती-देवाचें' दर्शन पाहिजे म्हणून म्हणत होत्या. काय हा योगायोग !

आमचेकडे गणपति आणीत नाहींत; तेव्हां मीं उमादेवींना माझ्या सौभाग्यवतीच्या मामांच्या घरीं नेलें. तेथें दिवाणखान्यांत गणपतीची मूर्ति चौरंगावर विराजमान झाली होती व सभोंवार सुंदर आरासपान केलेलें होतें.

उमादेवीनें हात जोडले. डोळे मिटले. गणपतीचें आकंठ दर्शन घेतलें. किती वेळ तेथें स्तब्धता नांदली ! मग उमादेवी माझेकडे वळून बोलूं लागल्या,

"भेंडे, पर्शियन गल्फमधील बंदरांत माझी बोट उभी होती. पहांटेला ४ ते ६च्या दरम्यान मला या देवाचें–'गणपति'चें दर्शन झालें. हिंदुस्थानांत जाण्याचा मला आदेश मिळाला. मी येथें आलें. मॉरिसनें आपलें घर दाखविलें. मला माझा 'हत्ती-देव' मिळाला."

उमादेवीनें षोडशोपचारें गणपतीची पूजा केली. बाईनें पाचूच्या रंगाची साडी परिधान केली होती. साडीचा कांठ तांबडा होता. तिच्या गोऱ्या रंगाला ती साडी खुलून दिसली. पदराशीं चुळबूळ करीत तिनें श्रीगणपतीची यथासांग पूजा केली आणि मला पुन्हां आश्चर्याचा धक्का बसला. बाईनें हिंदुधर्मीय पद्धतीनें व्यवस्थित पूजा केली होती.

मीं पृच्छा केली, "उमादेवी, ही पूजेची हिंदु पद्धति आपल्याला कोणी शिकविली ?"

त्या पटकन् म्हणाल्या, "उपजत पूर्वसंस्कारानुसार हिंदुत्वाचे असणार !" व मग डोळे मिचकावून त्या हंसल्या.

१६०२३

नंतर उमादेवी मुंबईतच पेडर रोडवर जेथें आयकर अधिकाऱ्यांची आज वसाहत आहे तेथें इतर पोलिश लोकांबरोबर राहिल्या. बाईंचा आहार शाकाहारी. राहणी हिंदुत्वनिष्ठ. वाचन भगवद्गीतेचें व भारतीय तत्त्वज्ञानाचें.

आमच्या घरीं तिचें येणें जाणें वाढलें. आमच्या घरीं आली कीं आपल्या पद्धतीनें जमिनीवर मांडी घालून बसण्याची तिला फार आवड. चहा प्यायची तर हिंदी पद्धतीनें. बशींत चहा ओतायचा व मग फुंकर घालून प्यायचा. आपण पाश्चात्त्य पद्धतीनें कपांतून चहा घेत असलों तर म्हणावयाची, "अहो, आपला भारत आहे गरम देश. इकडे हे पाश्चात्त्य चाळे कशाला ? बशीचा उपयोग करा नं. अम्मळ थंड करून चहा प्या." स्वयंपाकघरांत अथवा देवखोलींत आम्ही घरची मंडळी चपला घालून जात असूं. ती लगेच ओरडायची—"अहं ! चपला बाहेर काढा, मग आंत जा. ती बाहेर खराब झालेली जुतीं तुम्ही कुठेंहि घरांत कशी काय नेतां ! स्वच्छ हात–पाय धुऊन मग तुमच्या स्वयंपाकघरांत अथवा देवघरांत जा ना."

आमचे रीतिरिवाज ही पाश्चात्त्य बाई आम्हांला शिकवायची. आम्हांला मात्र अपमानल्यासारखें वाटत नसे. कारण ती आर्जवी शब्दांत, अजीजीनें सांगायची. उमादेवीचें जेवण अस्सल ब्राह्मणी थाटाचें. कांदा नाहीं. लसूण नाहीं. सात्त्विक भोजन. मागच्या जन्मीची ती ब्राह्मण असावी ! इतकी शुचिर्भूत.

पोलिश व भारतीय लोक यांची एकमेकांना ओळख व्हावी म्हणून आम्ही इंडो – पोलिश संघ मुंबईंत सुरू केला. त्याचे अध्यक्ष राष्ट्रपति डॉ. राधाकृष्णन् हे होते व स्वतंत्र पार्टीचे मिनू मसानी कार्यवाह होते. श्री. मॉरिस फ्रिडमन व इतर बरीच पोलिश आणि भारतीय मंडळी कार्यकारी मंडळांत होती. एके रविवारीं पोलिश मंडळी आपल्या देशांतील नृत्य, गायन, नाट्य आम्हांला करून दाखवीत. दुसरे रविवारी हिंदी कार्यक्रम केला जात असे. हे कार्यक्रम मिनू मसानींकडे, माझे घरीं किंवा कन्हैयालाल मुन्शींच्या घरीं होत असत. उत्तम कार्यक्रम. खाण्यापिण्याचीहि चंगळ. आणि या सर्व कार्यक्रमाचीं सूत्रें असत आमच्या उमादेवींच्या हातीं. लहानसहान गोष्टींकडे त्यांचें संपूर्ण लक्ष. कार्यक्रमाबद्दल तर भलता उत्साह. खाण्यापिण्याच्या बाबतींतहि बाई फार चोखंदळ. मराठी आणि गुजराती समाजांतील सगळ्या खाद्यपदार्थांची त्यांचेकडे यादी. आणि त्यांतून अगदीं वेचून काढलेले पदार्थ 'आपल्या घरीं तयार करा' म्हणून या बाईचा प्रेमाचा आग्रह.

यानंतर उमादेवी, मॉरिस फ्रिडमन, आप्पासाहेब पंत ( इंडोनेशियांतील आपले वकील ) व मी अशा चौघांनीं मिळून आम्हीं इंडो–पोलिश प्रकाशन संस्था काढली व या संस्थ्येतर्फे पोलिश वाङ्मयाचा भारतीयांमध्यें प्रचार करून दिला. या काळांत उमादेवींना फार आस्था. उत्तम उत्तम पोलिश काव्यें, गोष्टी, कथा ती शोधून काढी व आम्ही त्यांचें प्रकाशन करीत असूं. या कामांत ती दंग असतांना तिला खाणेंपिणें सुचत नसे कीं, ती विश्रांति घेत नसे. खूप श्रम झाले तरी सदा प्रसन्न चेहरा.

त्या वेळीं कोल्हापूरला पोलिश लोकांचा मोठा कँप होता. तेथेंहि उमादेवी जायची. तेथील लोकांना उपदेशाच्या दोन गोष्टी सांगायची. युद्धकालांतील त्यांच्या वनवासांत त्यांचें सांत्वन करायची. युवकयुवतींना मार्गदर्शन करायची. आपल्या गोड भाषेंत त्यांना भारत–दर्शन घडवून द्यायची. पोलिश आणि भारतीय संस्कृति फार जवळची आहे असें ती म्हणायची. आमच्या समजुती, संवयी, आचार विचार तुमच्याशीं जुळते आहेत असें म्हणावयाची. तिनें पोलिश लोकांना भारतीय लोकांसमीप आणलं. कित्येक लग्नें भारत–पोलिश लोकांत घडवून आणलीं. माझ्या पत्नीला ती नेहमीं म्हणे, "लताबाई, तुम्ही या बाईला हिंदी स्वयंपाक शिकवा. मग तिचें एका भारतीयाशीं जमवून देऊं लताबाई, ही मुलगी भारतीयांत केव्हांच खपेल. तिला जरा साडी नेसायला शिकवा ना. कुंकू कसं लावायचं त्याचं प्रात्यक्षिक द्या ना." हें करा ना, तें करा ना—उमादेवींचें कार्य सारखें चालू.

उमादेवीनें दोन भिन्न–देशीय समाज एकत्र आणण्याचें कार्य मोठ्या आस्तिक्यानें केलें. तिच्यांत रुसवा नसे. फुगवा नसे. कामाचा उरक चांगला. प्रेमळपणा उतू जात असे. भारतीय संस्कृतीवर तर अतीव प्रेम. कामाचा व्याप मोठा असूनहि या बाईनें आपलें आत्मिक विकसन मात्र कधीं सोडलें नाहीं. मोठी अंतर्निष्ठ. देव मिळवावा ही इच्छा. पण समाजसेवा चालू. कार्यरत असतांनाच तिचें मन थिऑसफीकडे झुकूं लागलें. मधूनमधून ती अडचारला जाऊं लागली. दुसरें जागतिक युद्ध संपण्यापूर्वी उमादेवीनें मुंबई सोडली. अडचारला कायमचें राहण्याचें ठरवलें. अडचारच्या प्रशांत वातावरणांत, प्रगल्भ ग्रंथसंग्रहालयांत आणि तेथील शांत आणि शीतल परिसरांत तिच्या

वक्रतुंड लंबोदरानें तिच्या आत्म्याची आस पुरी केली. उमादेवी अड्यारला रमल्या आहेत. आमच्या जगाला विसरल्या आहेत. जाण्यापूर्वी आमचा तिनें प्रेमाचा निरोप घेतला. इंडो–पोलिश संघातर्फे आम्हांला आभारपत्र दिलें व पोलिश हातमागाच्या चादरी आहेर म्हणून वांटल्या.

## मॉरिस फ्रिडमन

उमादेवीबरोबरचे दुसरे गांधीभक्त, साधुतुल्य, सज्जन गृहस्थ म्हणजे मॉरिस फ्रिडमन. माणूस ठेंगू, किरकोळ प्रकृतीचा. हडकुळाच. डोळे सदा अंतराळांत शोध घेत असलेले. विवेक आणि वैराग्य सटीला पूजलेला. या गृहस्थाची व माझी पहिली मुलाखत आप्पासाहेब पंतांनीं करून दिली. ते म्हणाले, 'आमचा मॉरिस म्हणजे एक हिरा आहे, असा भला माणूस मिळणं कठीण.' बऱ्याच अनुभवानंतर आप्पासाहेब म्हणतात तें खरं हें माझ्या प्रत्ययास आलं. मॉरिस म्हणजे शंभर नंबरी सोनं. साधु आहे तो. मन, बुद्धि, शरीर त्यांनीं मानवसेवेसाठीं वाहिलीं आहेत. आज ऋषि व्हॅली स्कूलमध्यें तो मानवतेवर आपले प्रयोग करून नवी भारतीय पिढी निर्माण करीत आहे. मी तिची रोज मनोभावानें पूजा करीत आहे.

काय असेल तें असो, पण उमादेवीबद्दल आदर वाटत असेल तर या मॉरिसबद्दल आम्हांला आत्यंतिक प्रेम वाटत असे. त्याच्या साधेपणावर आम्ही बेहद्द खूष होतो. त्याच्या आदर्श जीवनाबद्दल आम्हांला कौतुक होतें.

मॉरिस एकदां आजारी पडला. मेहरअल्ली, मसानी या मंडळींनीं त्याच्या आग्रहामुळें त्याला डॉ. जसावालाच्या निसर्गोपचाराच्या रुग्णालयांत दाखल केलें. अहिंसेच्या त्याच्या अट्टाहासामुळें त्याच्या प्राणावर बेतलें. अमुक औषध घेतलें तर मॉरिस बरा होईल असें डॉक्टरांचें म्हणणें. मॉरिसचें म्हणणें, "त्या औषधींत हिंसा करून कांहीं सत्त्व घातलें आहे तीं औषधी मी घेणार नाहीं."

माझी दुसऱ्यांदा मॉरिस फ्रिडमनची भेट श्रीमति हिरा पेटिट या सुप्रसिद्ध पेटिट घराण्यांतील बाईंच्या घरीं झाली. तेथील वातावरण संपूर्णतः पाश्चात्त्य. पण फ्रिडमनची खोली म्हणजे नखशिखांत भारतीय राहणीचा

नमुना. खोलींत गादी पसरलेली. त्यावर स्वच्छ चादर आणि पंचा नेसलेला व आखूड हाताचें छोटेखानी बनियन पेहरलेला मॉरिस तेथें पाय दुमडून ' गांधीयन ' पद्धतीनें कांहींतरी लिहीत बसलेला.

' यावे ', मॉरिसची ती आत्मीयतेची हांक होती. ' बसा. इतके दूर नको. इथें जवळ. ' अतिप्रेमानें मॉरिस जवळ जवळ येण्याची गळ घालतो. आणि त्याच्या ह्या आतिथ्यानें तो तुम्हांला आपलासा करतो. एरवीं अबोल मॉरिस एखादा आध्यात्मिक विषय काढला कीं, सौम्यपणें, नम्रपणें आपली त्या बाबतींतील तत्त्वप्रणालि समजावून देई. त्याची भूमिका शास्त्रज्ञाची. पण भूक तत्त्वज्ञानाची. त्यामुळें त्याच्या शोधक अंतर्निष्ठेंत शास्त्रज्ञाचा कांटेकोर-पणा, तार्किक कठोरपणा आणि उलट भावनेचा अतीव सुंदर आविष्कार असा मनोज्ञ समन्वय होता. गांधीजींचा आदर्श शिष्य, अहिंसेचा महान् साधक आणि सत्यान्वेषणांत सदैव रत असा मॉरिस फ्रिडमनचा पिंड. लीनता साधूची. मन मेणासारखें मऊ. सेवाभाव परिणत स्वरूपाचा.

मॉरिस फ्रिडमन, श्रीमति हिरा पेटिट व मी गोरेगांवचे फकीरबाबा कमू-बाबा यांचेकडे एकदां गेलों. बराच वेळ थांबल्यावर बाबांनीं मला हांक मारली. आम्ही आंत गेलों. कमूबाबांची, मॉरिस फ्रिडमन व श्रीमति हिरा पेटिटची मीं ओळख करून दिली. बाबा त्याचेकडे पाहात राहिले. हंसत राहिले.

' कमूबाबा ', मॉरिस फ्रिडमन म्हणाले, ' ईश्वर कसा जाणावा, कोठें शोधावा ?' फ्रिडमनच्या बोलण्यांत आस्था होती. आदर होता.

बाहेर पाऊस मुसळधार पडत होता. पलीकडे शेत कसं हिरवगार दिसत होतं. बाबांचे डोळे त्या हिरव्यागार गालिच्यावर खिळले होते. त्यांचे डोळे आकाशाकडे वळले. याच वेळीं आकाशांत इंद्रधनुष्य उमटलें.

बाबांची नजर आमचेकडे फिरली. बाबा उद्गारले, ' हिरवेगार शेंत पाहिलं कीं मन कसं आनंद पावतं. आकाशांत इंद्रधनुष्य पाहिलं कीं मन प्रसन्नावतं. हेंच ईश्वरदर्शन. ज्यामुळें मन आनंदेल, प्रसन्न होईल तेथें ईश्वर आहे. परमानंद इति परमेश्वर. '

बाबांनीं थोडक्यांत एका उदात्त प्रमेयाची फार झोकदार व्याख्या दिली होती. थोडा वेळ स्तब्धता नांदली. मॉरिस एकदम पुटपुटला, ‘ कोणती सेवा केली तर देव मिळेल ? ’

‘ निरागस, निष्कपट, निर्मल बालकांची आपण निरपेक्ष सेवा करा. आपल्याला देव मिळेल. ’ सूत्ररूपानें बाबांनी मॉरिसला देव समजावला.

एऱ्हवीं आनंदी वृत्तीचा मॉरिस फ्रिडमन फार गंभीर बनला. कांहींतरी आंतरिक साक्ष त्याला पटलेली दिसली. ‘ बाबा, मी लहान बालकांचीच संपूर्ण सेवा करीन. ’ असें बाबांना त्यांनीं अनाहूत वचन दिलें व तेव्हांपासून ऋषि व्हॅली शाळा ही त्याची कर्मभूमि झाली. मुलांची सेवा म्हणजे देवसेवा हें त्याचें ब्रीद बनलें.

मधूनमधून मॉरिस फ्रिडमन मुंबईला येतो. भेटतो. आस्थेनें चौकशी करतो. श्रीमति हिरा पेटिटचा हात धरून म्हाताराम्हातारी चालू लागतात. मॉरिस फ्रिडमनला पाहिलं कीं, मनावर मूर्ति उमटते साधूची. फ्रिडमन खऱ्याखुऱ्या अर्थानें साधु आहे. स्वत:चा उद्धार त्यानें केला आहे. आतां तो जगाचा उद्धार करीत आहे. खरंच एवढा निर्मल, निरहंकारी, तत्त्वनिष्ठ, सज्जन माणूस माझ्या तरी पाहण्यांत नाहीं.

उमादेवी आणि मॉरिस फ्रिडमन हीं पोलिश माणसें. भारताला त्यांनीं आपला देश मानला आहे. येथेंच ते स्थायिक झाले आहेत. आत्मसाधना हा दोघांचा ध्यास. मार्ग मात्र भिन्न. एक आश्रमवासी बनली आहे, तर दुसरा शिक्षणक्षेत्राच्या आवारांत उत्तम मानव घडविण्याचा प्रयत्न करीत आहे.

ग. वि. केतकरांची ‘ बोधक सत्यकथा ’ वाचली आणि माझ्या मनांतली स्मृतिचित्रें उफाळून आकारलीं. त्यांतून उमादेवी आणि मॉरिस फ्रिडमन हीं दोन व्यक्तिचित्रें मनाच्या पडद्यावर अवतरलीं. तीं जशीच्या तशीं तरुण भारताच्या वाचकांसमोर मांडीत आहें. माणसें साधींच, पण तत्त्वचिंतनामुळें, त्यांच्यांतील उत्कट भक्तिभावामुळें त्यांच्यावर आत्मिक कांति चढली आहे. म्हणूनच ह्या दोन्हींहि व्यक्ति ईश्वरी प्रभेनें चकाकत अहेत.

* * *

# श्री. विठ्ठलराव घाटे

: २१ :

त्या दिवशीं 'चंद्रिका' हा श्री. चंद्रशेखर कवींचा कवितासंग्रह प्रसिद्ध व्हायचा होता. तन्निमित्त कर्नाटक पब्लिशिंग हाऊसचे श्री. मंगेशराव कुळकर्णी यांनीं प्रकाशक या नात्यानें एक गोड समारंभ मुंबई ग्रंथसंग्रहालयांत जुळवून आणला होता. कै. माधवराव पटवर्धन व श्री. घाटे यांचीं 'चंद्रशेखर यांची कविता' या विषयावर भाषणें होणार होतीं. कै. पटवर्धनांचें विद्वत्ताप्रचुर व ठसकेबाज भाषण झालें. त्यानंतर श्री. घाटे भाषण करण्यास उठले. त्यांचें भाषण अतिशय चुरचुरीत खुसखुशीत झालें. त्यांत घरगुती प्रसंगांचीं खुमासदार वर्णनें होतीं, चंद्रशेखरांचें व्यक्तिदर्शन अति गोड शब्दांत केलें होतें. आणि विनोद भरपूर भरला होता. श्री. घाटे यांचें त्या दिवशींचें वक्तव्य म्हणजे भोजनोत्तर भाषणाचा एक उत्कृष्ट नमुना मला वाटला. इन्स्पेक्टर या नात्यानें मुंबईंत आल्यानंतर जाहीररीत्या बोलण्याचा, मला वाटतं, हा त्यांचा पहिलाच प्रसंग. सभागृहांत त्या दिवशीं हजर असणाऱ्या सगळ्या

शिक्षणप्रेमी लोकांचीं मनें त्यांनीं हिरावून घेतलीं. श्री. घाट्यांचें तें भाषण बरेचजण अजून विसरले नाहींत. मी त्यांपैकीं एक आहे.

श्री. घाटे यांना पाहण्याचा हा माझा पहिला प्रसंग. त्यानंतर लवकरच माझ्या ऑफिसच्या कामानिमित्त मला त्यांना भेटावं लागलं. शिपायाबरोबर मीं माझें कार्ड आंत पाठविलें. निरोप आला, बसा म्हणून.

बसलों. तब्बल १॥ तास बसलों. कंटाळलों. रागावलों, अगदीं जायला निघालों. एवढ्यांत आमंत्रण आलं आंत या म्हणून. रागारागांतच आंत गेलों मी.

"अहो भेंडे, माफ करा हं. मी फार कामांत होतों. आतां सांगा पाहूं तुमचं काम." श्री. घाटे बोलले. नंतर चांगले अर्धा तास ते माझ्याशीं बोलले, अगदीं आपला अधिकार विसरून बोलले आणि ज्या वेळीं मी खोलीच्या बाहेर पडलों त्या वेळीं तर मुद्दाम मला थांबवून म्हणाले, "हें पाहा, मी येथें नेहमींच फार कामांत असतो. तेव्हां विशेष कांहीं असल्यास तुम्ही माझ्या घरीं भेटत चला." एकतर माझ्याशीं फारच चांगल्या रीतीनें ते बोलल्यामुळें माझा राग पार विरून गेला होता. पण त्यांच्या शेवटच्या वाक्यानें तर राहतां राहिलेला रागाचा कांहीं अंशहि निघून गेला.

त्यानंतर त्यांच्या घरीं व ऑफिसांतसुध्दां कामानिमित्त मला बऱ्याच वेळां जावें लागलें. केव्हां पुस्तकासंबंधीं, तर केव्हां कांहीं खासगी शाळांच्या समितीचा सदस्य म्हणून अनेक वेळां मला त्यांच्याकडे जावें लागलें. प्रत्येक वेळीं त्यांनीं माझ्या पुस्तकांचे गुणदोष मला दाखविले आहेत व ज्या शाळांच्या कार्यकारी मंडळींचा सदस्य म्हणून मी गेलों असेन त्या त्या शाळेच्या परिस्थितीसंबंधीं त्यांनीं मोकळ्या मनानें चर्चा करून योग्य तो उपदेश दिला आहे.

मला वाटतं, श्री. घाटे शिक्षक, मुख्याध्यापक, प्रकाशन संस्थेचा प्रतिनिधि, शिक्षणाशीं संबंध असलेला कुणीहि इसम यांची गांठभेट घ्यायला केव्हांहि तयार असतात. ऑफिसांत आणि घरीं जवळ जवळ आपलें दार सगळ्यांना मोकळें ठेवलें आहे. इतक्या मोकळेपणानें वागणारे हे पहिले शिक्षणाधिकारी असें म्हटल्यास अतिशयोक्ति होणार नाहीं. सरकारी शिक्षणा-

धिकारी म्हणजे त्यांच्यांत तुटकपणा भरपूर. श्री. घाटे यांनीं हा शिरस्ता मोडला व शिक्षणव्यवसायांतील सगळ्यांशीं ते स्नेहभावानें वागायला लागले.

श्री. घाटे यांना मी ' नवमतवादी ' इन्स्पेक्टर म्हणतो. याचें कारण पूर्वीचे इन्स्पेक्टर आणि श्री. घाटे यांच्या व्यक्तित्वांत, व्यासंगांत आणि दृष्टिकोनांत जमीनअस्मानचा फरक आहे. पूर्वीचे बहुतेक इन्स्पेक्टर ' जड ' असत. त्यांचा व्यासंग दांडगा, विद्वत्ता मोठी, शैक्षणिक ज्ञान श्रेष्ठ पण गांभीर्य जास्त. बोलायला हे मितभाषी, वर्गांत जाऊन संगमरवरी पुतळ्यासारखें बसणारे आणि यांची शिक्षकांना आणि विद्यार्थ्यांना भलतीच दहशत. यांची तपासणी म्हणजे शिक्षकांना आणि मुलांना एक दिव्यच.

उलट श्री. घाटे हे विद्वान्, व्यासंगी असूनहि ' जड ' नाहींत. ते शिक्षकां-बरोबर आणि विद्यार्थ्यांशीं समरस होऊन त्यांच्याशी 'हितगुज' करूं शकतात. ते वर्गांत पुढं बसून शिक्षकांना बावचकविण्याऐवजीं आणि विद्यार्थ्यांना भेडसा-वण्याऐवजीं, मागल्या बाजूला गुपचूप येऊन बसतात. सर्व वर्गाचें योग्य तें निरीक्षण करतात, शिक्षकांचा ' पाठ ' लक्ष देऊन ऐकतात आणि आपलें मत ठरवितात. श्री. घाटे यांचें राज्य मुंबईच्या शाळांत सुरू झाल्यापासून पूर्वींची सुलतानशाही बंद होऊन तपासणी एका विशिष्ट शास्त्रीय पद्धतीनें होऊं लागली. श्री. घाटयांचा दृष्टिकोन स्वतंत्र आणि क्रांतिमय असा आहे व त्यामुळें त्याची तपासणी जास्त शास्त्रशुद्ध व शैक्षणिक तंत्राला धरून अशी होते. ते शाळेचे मार्गदर्शक आहेत, त्यांची भूमिका उपदेशकाची आहे. त्यांची वृत्ति फार सहानुभूतिमय आहे. त्यामुळेंच शिक्षकांना त्यांच्याबद्दल आदर वाटतो, भीति वाटत नाहीं. त्यामुळेंच शाळांना तपासणी हवीशी वाटते. श्री. घाटे यांनीं दोषदर्शन केलें तरी त्यांना वाईट वाटत नाहीं. कारण तें ' छिद्रान्वेषी ' दृष्टीनें केलेलें नसतें.

श्री. घाटे साहित्यिक आहेत. शैक्षणिक विषयावर अधिकारवाणीनें लिहि-णारे लेखक आहेत, बालवाङ्मयाचे निर्माते आहेत. ते क्रमिक–पुस्तकांचे उत्कृष्ट कर्ते आहेत. ' कांहीं म्हातारे व एक म्हातारी ' हें त्यांचें पुस्तक मराठी वाङ्मयांत केव्हांहि अविस्मरणीय ठरेल. या म्हाताऱ्यांत एका म्हातारीनं वयोवृद्धांना, बालकांना, सगळ्यांना मनस्वी हंसवलं आहे.

"Teaching of History in Indian Schools" हा त्यांचा इतिहास हा विषय कसा शिकवावा या संबंधींचा शास्त्रीय ग्रंथ आहे. शिक्षणशास्त्रावर आपल्याकडील लेखकांनीं फारच कमी ग्रंथ लिहिले आहेत. आमच्याकडे शिक्षणशास्त्रावर खोलवर विचार केलेली माणसें नाहींत अशांतला प्रश्न नाहीं; पण अशा व्यासंगी माणसांत लेखनशक्ति कमी. श्री. घाटे यांनीं आपल्या या ग्रंथांत इतिहास शिकविण्याचा नवीन दृष्टिकोन काय असावा, आधुनिक पद्धति काय आहेत यासंबंधीं विचार प्रगट केले आहेत. श्री. घाटे यांनीं पुरस्कार केलेलीं सर्वच तत्त्वें शास्त्रज्ञांना पसंत पडतील असें माझें म्हणणें नाहीं, पण या त्यांच्या ग्रंथावरून एक गोष्ट निर्विवाद होते ती म्हणजे श्री. घाटे यांचा या विषयाचा व्यासंग. साधारणत: भक्कमशा अधिकाराची जागा मिळाली कीं माणूस आळशी बनतो. I. E. S. मधील कित्येक माणसें मला माहीत आहेत कीं ज्यांनीं या भक्कम पगाराच्या जागा मिळाल्यावर आपलें वाचन, मनन सोडून दिलें. श्री. घाटे यांनीं आपला व्यासंग अजूनहि चालू ठेवला आहे. याबद्दल खरोखरच त्यांची प्रशंसा केली पाहिजे. कारण इन्स्पेक्टर या नात्यानें त्यांना अतिशय काम असतें. यापुढेंहि शिक्षणशास्त्रावर अनेक ग्रंथ लिहून ते हिंदुस्थानच्या शिक्षणशास्त्राच्या दालनांत मौलिक भर घालतील अशी आशा आहे.

श्री. घाटे यांना मीं 'क्रमिक पुस्तकांचे उत्कृष्ट कर्ते' असें म्हटलें आहे., क्रमिक पुस्तकें संपादणें म्हणजे एक साधी गोष्ट आहे असें बरेचजणांना वाटतें. पण वाटतें तितकी कांहीं ती सोपी गोष्ट नाहीं. क्रमिक पुस्तकें लिहून श्री. घाटे यांनीं थोडेंफार धन जवळ केलें असलें तरी विद्यार्थ्यांना योग्य प्रकारचें वाङ्मय दिल्याबद्दल पालक या नात्यानें आपण सर्वांनीं त्यांचे आभारच मानले पाहिजेत. आपलें प्राथमिक शाळांतील, दुय्यम शाळांतील क्रमिक पुस्तकरूपी वाङ्मय अतिशय जुनाट व हल्लींच्या परिस्थितीशीं विषम असें असायचें. श्री. घाट्यांनीं आपल्या पुस्तकांत आधुनिकत्व आणलें आहे. त्यांचीं क्रमिक पुस्तकें आजच्या परिस्थितीला धरून आहेत. बाल-बुद्धि-विकसनाला योग्य अशीं आहेत, शिक्षणशास्त्राच्या सिद्धांतांना धरून आहेत.

आम्ही गतानुगतिक लोक असल्यामुळें जुनं तें आम्हांला सोनं वाटतं; बापानें वाचलेलीं पुस्तकें मुलानें वाचलीं पाहिजेत हा आमचा आग्रह. विजे-

वर चालणाऱ्या गाड्या सुरू झाल्या तरी आम्ही पूर्वीच्या आगगाड्यां-संबंधीं धडा वाचणार. युध्दाचें तंत्र संपूर्ण बदललें असलें तरी आम्ही पुरातन काळच्या युध्दाचें वर्णन वाचणार. पण ही दुराग्रही दृष्टि सोडली पाहिजे. जगांत जसा झपाट्यानें बदल होत आहे तसा बदल आमच्या क्रमिक पुस्तकांतहि झाला पाहिजे. आमच्या शाळाकॉलेज–वाङ्मयाला एक प्रकारचें प्रातिनिधिक व आधुनिक स्वरूप आलें पाहिजे. श्री. घाटे यांनीं जें क्रमिक पुस्तकांचें वाङ्मय निर्माण केलें आहे तें असें प्रातिनिधिक व आधुनिक स्वरूपाचें आहे. आजचा जमाना श्री. घाटे यांनीं त्यांत आणला आहे. त्यांची सर्वांत बहुमोल कामगिरी जर कोणती असेल तर हीच. पुढील पिढीचें त्यांनीं त्या दृष्टीनें योग्य मार्गदर्शन केलें आहे यांत शंका नाहीं.

मला श्री. घाटे यांची सर्वांत उत्कृष्ट कृति कोणती म्हणून विचारलें तर मी त्यांच्या 'कांही म्हाताऱ्यां'कडे बोट दाखविणार नाहीं, किंवा 'Teaching of History' या ग्रंथाकडेहि अंगुलीनिर्देश करणार नाहीं. मी त्यांचें 'माझें पुस्तक' ( बालवर्ग ) हें सर्वांत उत्तम पुस्तक म्हणेन. तें एक अतिशय गोड पुस्तक आहे. ४–६ वर्षांच्या मुलांना मराठी भाषा तुम्हांला शिकवायाची असेल तर या पुस्तकाइतकें सुंदर पुस्तक तुम्हांला सांपडणें कठीण. कित्येक छोट्या बालकांना मी तें शिकविलें आहे. त्यांना तें आवडलें; मला तें इतकें आवडलें कीं कांहीं पुसूं नका ! या 'माझ्या पुस्तकांत' मांडणी इतकी छान आहे, धडे इतके आकर्षक आहेत, चित्रें इतकीं मोहक आहेत आणि भाषा इतकी सोपी, साधी, गोड, बालबोध आहे कीं ती पांच मिनिटांत लहानग्या बाळाच्या जिभेवर बसते. वाङ्मयाच्या प्रांतांत श्री. घाट्यांची योग्यता काय ठरेल ती ठरो, पण 'माझें पुस्तक' ह्या क्रमिक पुस्तकाच्या निर्मितीनें श्री. घाटे यांनी बालकांना जो मेवा दिला आहे त्याची माधुरी, मुलें कधींहि विसरणार नाहींत. 'माझें पुस्तक' ही त्यांची महनीय कामगिरी आहे. क्रमिक पुस्तकांचे श्रेष्ठ निर्माते हीच पदवी श्री. घाटे यांना या छोटेखानी पुस्तकाबद्दल बहाल करावी लागेल.

कांहीं वर्षांपूर्वी श्री. घाटे यांनीं बोर्डी येथें Refresher Course भरविला. हा कोर्स भरविण्यांत त्यांचा मुख्य हेतु हा होता कीं, शिक्षक मंडळी

एकत्र यावी. त्यांनीं शैक्षणिक प्रश्नांची चर्चा करावी व त्यांना शिक्षणतज्ज्ञां-कडून शैक्षणिक विषयावर शास्त्रीय माहिती सुलभ व्हावी. हा Course फार गाजला. फार परिश्रम घेऊन श्री. घाटे यांनीं सर्व कार्यक्रम आंखला होता. ही गोष्ट खरी आहे कीं, बाई सोनाबाई हकिमजी हायस्कूलची उत्साही मंडळी हरेक कामांत मदत देत होती; तरी पण प्रत्येक गोष्टीची प्रेरणा श्री. घाट्यांकडून होत असे. सगळ्या व्यवस्थेकडे श्री. घाटे यांचें जातीनें लक्ष असें.

आपल्याकडे Social Contacts फार कमी होतात. त्याचें कारण, संमेलन किंवा एकत्र बैठकी एकाच पेशाच्या लोकांतहि फार कमी होतात, त्या दृष्टीनें श्री. घाटे यांची ही योजना Social Contact च्या दृष्टीनें फारच उपयुक्त होती. सहा-सात दिवस एकत्रच राहणें झाल्यामुळें साहजिकच शिक्षकांची एकमेकांशी ओळख झाली व त्यामुळे त्यांच्यांत स्नेहभाव उत्पन्न झाला.

त्याचप्रमाणें शिक्षणशास्त्र विशारदांनीं आपले विचार शिक्षकांसमोर मांडल्यामुळें व प्रत्येक पाठ घेऊन दाखविल्यामुळें त्यांच्या ज्ञानांत भर पडली. प्रत्येक विषयावरचे आधुनिक विचार त्यांना कळले. आपण काय केले पाहिजे याचें त्यांना चांगलें आकलन झालें.

ही योजना श्री. घाटे यांनीं दरवर्षी चालू ठेवली असती तर शिक्षक-वर्गाचा अतिशय महत्त्वाचा फायदा झाला असता. पण पैशाच्या मदतीच्या अभावी त्यांची अपूर्व आणि उपयुक्त अशी योजना पहिल्या वर्षाच्या यशस्वी कार्यक्रमानंतर बंद पडली.

दुसरी त्यांची कामगिरी 'मुंबई भौगोलिक संघा'चे अध्यक्ष या नात्यानें. ह्या संघातर्फेंहि दरवर्षीं एक Course व Summer School हीं भरलीं जातात व त्या वेळीं हजर राहणाऱ्या शिक्षकांना भौगोलिक विषया-संबंधी सांगोपांग माहिती दिली जाते. भूगोल या विषयाकडे शाळांतून फारच दुर्लक्ष होतें; पण संघानें जें कार्य चालविलें आहे त्यामुळें भूगोल विषयाला महत्त्व येऊन, त्याबद्दल शिक्षकांत व मुलांत जास्त आवड व कुतूहल उत्पन्न झाल्यावाचून राहणार नाही. श्री. घाटे यांच्या प्रोत्साहनामुळेच हें कार्य

संघातर्फे उत्तम रीतीनें पार पडत आहे. कारण जसा इतिहास हा त्यांचा जिव्हाळयाचा विषय आहे तसा भूगोल हा विषयहि त्यांचा अतियश आवडता आहे आणि मला भीति वाटते कीं मुंबई सोडून गेल्यानंतर हा संघ बंद पडणार नाहीं. कारण संघाचे कार्यकर्ते अति उत्साही लोक आहेत. तरी पण त्यांत पूर्वीचें चैतन्य आणि जोम राहाणार नाहीं.

मुंबई शिक्षक-संघालासुद्धां श्री. घाटे यांनीं सारखी मदत केली आहे. ते महत्वाच्या सर्व कार्यक्रमाला हजर असतात. इतकेंच नव्हे तर वेळोवेळीं चालकांना त्यांनीं निरनिराळया त्यांच्या कार्यांत सक्रिय सहानुभूति दाखविली आहे.

थोडक्यांत मला एवढेंच श्री. घाटयांबद्दल म्हणतां येईल कीं, मुंबई डिव्हिजनमधील शैक्षणिक क्षेत्रांतील प्रत्येक लहानमोठ्या कार्यांत त्यांनीं आपल्या अमदानींत अंत:करणपूर्वक, झीज सोसून हातभार लावला आहे. शाळांची तपासणी हेंच आपलें कार्य, इतकी संकुचित दृष्टि न ठेवतां श्री. घाटे यांनीं आपली पूर्वाश्रमींची ‘ शिक्षक ’ ही भूमिका न विसरतां, जी कांहीं विधायक शैक्षणिक कामगिरी करतां येईल ती केली आहे व त्याबद्दल मुंबई डिव्हिजन शिक्षकवर्ग त्यांचा केव्हांहि ऋणी राहील.

श्री. घाटे यांजकडे वरवर पाहिलें असतां वाटतें कीं, ते गंभीर वृत्तीचे गृहस्थ असावेत. पण जरा जास्त काळजीपूर्वक त्यांचें अवलोकन केलें तर ते विनोदप्रिय, उपहासप्रवृत्तियुक्त, मिष्किल, दिलदार आणि उदार अंत:करणाचे गृहस्थ आहेत असें पटल्यावांचून राहात नाहीं. माझा त्यांचा दाट परिचय नाहीं, पण जो कांहीं संबंध आलेला आहे त्यावरून मात्र मला असें वाटतें. कोणत्याहि गोष्टीची वा इसमाची विनोदात्मक बाजू त्यांना लवकर दिसते. बोलतांना सहज त्यांच्या तोंडून उपहासात्मक टीका निघून जाते. थोड्या अंशीं ते लहरी असावेत अशी माझी कल्पना आहे. पण कोणाचेंहि नुकसान करायचे नाहींत. कुणालाहि उगाच त्रास द्यावयाचे नाहींत. कुणाच्याहि उगाच वाटेला जायचे नाहींत–असा त्यांच्या मनाचा रोख असतो असा माझा कयास आहे.

‘श्री. घाटे यांना माणसांची चांगली पारख आहे. त्यांच्या आयुष्यांत आलेल्या प्रत्येक व्यक्तीबद्दल त्यांनीं आपल्या मनांत खूणगांठ बांधलेली असते. पण

त्यांचा असा मात्र बाणा आहे कीं प्रत्यक्ष शत्रूवरहि उपकार करायचे. होता होईल तों लोककल्याणासाठीं झटायचं ही आपली भूमिका जवळजवळ त्यांनीं ठरवून टाकली आहे', असें त्यांचे एक निकटचे स्नेही मला हल्लींच म्हणाले होते. त्यांच्या चेहरेपट्टीवरून हाच निष्कर्ष निघतो.

श्री. घाटयांचे अनेक मित्र माझ्या परिचयाचे आहेत. ते मला नेहमीं सांगत असतात कीं, घाटे यांच्यासारखा मित्र मिळणें कठीण. लहानमोठे हा श्री. घाटे यांचा प्रश्न नाहीं. सर्व मित्र त्यांना सारखे. सर्वांवर त्यांची सारखी भक्ति. सर्वांशीं स्नेहसंबंध कायमचा.

श्री. घाटे, सौ. घाटे व त्यांचीं मुलें यांना दोनतीन वेळां मी एकत्र पाहिलें आहे. सौ. घाटे यांचा प्रसन्न पण अधिकारी चेहरा, सार्वजनिक कार्यक्रमप्रसंगीं आत्मविश्वासपूर्ण आणि सोज्वळ वागणूक पाहून कोणालाहि त्यांच्याबद्दल आदर वाटेल. त्यांचीं मुलेंसुद्धां इतकीं खेळकर दिसतात कीं त्यांची सौ. घाटे यांनीं 'माता' आणि 'शिक्षिका' या नात्यानें फारच चांगली जोपासना केली असावी असा तर्क केल्यास अयोग्य होणार नाहीं. सुविद्य पत्नीचा लाभ झाल्यामुळें श्री. घाटे यांना घरच्या जबाबदारींतून बरीचशी मोकळीक मिळत असावी व त्यांच्या शैक्षणिक कार्यांतसुद्धां त्यांना सौ. वत्सलाबाईची मदत मिळत असली पाहिजे.

श्री. घाटयांच्या जीवनाकडे सर्व बाजूंनीं दृष्टि टाकली तर ते एक सुदैवी आणि कर्तृत्ववान् गृहस्थ आहेत असेंच म्हणावें लागेल. शिक्षणखात्यांत अतिशय महत्त्वाचा हुद्दा, सुविद्य, सुशील आणि कर्तृत्ववान् अशी पत्नी, आणि गोड मुलें; महाराष्ट्रीय, गुजराथी, पारशी, मुसलमान अशा अनेक समाजांतील मित्र; वाङ्मयांत चांगलें स्थान; शैक्षणिक शास्त्रज्ञांत वरचा दर्जा आणि लोकप्रियतेचा अपूर्व वर्षाव--म्हणूनच मी म्हटलें कीं, श्री. घाटे सुदैवी आहेत आणि कर्तृत्ववानहि आहेत. लोकोत्तर गुण असल्याशिवाय माणसाला लोकप्रियता मिळणें कठीण. श्री. घाटे यांनीं जी लोकप्रियता मुंबई डिव्हिजनमध्यें मिळविली आहे तिला त्यांच्या अंगचे हिऱ्यामोत्यासारखे गुणच कारण होत.

ता. १ जूनला श्री. घाटे गुजराथला जाणार. श्री. घाटे जितके मुंबई डिव्हिजनला प्रिय आहेत तितकेंच ते गुजराथेंतहि लोकप्रिय होतील. श्री. घाटे

जितकें महाराष्ट्रीयांशीं समरस होतात तितकेंच गुजराथी बंधूशींहि समरस होऊं शकतात; याचें कारण ते जातीनें महाराष्ट्रीय असले तरी गुजराथशीं त्यांचा पूर्वीपासून निकटचा संबंध आला आहे. गुजराथी भाषा ते चांगल्या रीतीनें बोलूं शकतात व गुजराथी वाङ्मयांतील कांहीं लेखक त्यांचे जिवा-भावाचे मित्र आहेत. मुंबईची त्यांची कारकीर्द यशस्वी झाली आहे व गुजराथेंतहि ते उत्तम रीतीनें यशस्वी होतील अशी माझी खात्री आहे.

शिक्षणक्षेत्रामध्यें अनुभवी आणि वयोवृद्ध अशा एका शिक्षणशास्त्रज्ञांना मी हल्लींच प्रश्न केला, " कां हो, श्री. घाटे यांनीं शिक्षणक्षेत्रांत जें यश मिळविलें आहे त्याचें इंगित काय ? "

ते म्हणाले, " मला वाटतं श्री. घाटे हे जन्मतः शिक्षक आहेत. आजहि ते आपल्यांतील 'शिक्षकाला' विसरले नाहींत. मोठा अधिकार मिळाला म्हणून ते हुरळून गेलेले नाहींत. हातांत सत्ता आहे म्हणून ते सुलतानशाही करीत नाहींत. त्यांच्या लोकप्रियतेचे इंगित हेंच कीं ते 'शिक्षक' ही आपली भूमिका कधींहि विसरलेले नाहींत व विसरणार नाहींत. शिक्षणासंबंधीं त्यांना कळकळ आहे. शिक्षणासंबंधीं त्यांना अतिशय सहानुभूति आहे आणि आपली सरकारी नोकरी असूनसुद्धां त्यांची वृत्ति एका निस्सीम समाजसेवकाची आहे. "

मला वाटतं वरील शब्दांत श्री. घाटे यांच्या यशाचें मोठें मार्मिक पृथःकरण करण्यांत आलें आहे. हो, हें अगदीं खरें आहे कीं, श्री. घाटे यांचा जन्म शिक्षणकार्यासाठीं झालेला आहे आणि त्या क्षेत्रांत ते बहुमोल, भरीव आणि दांडगी कामगिरी केल्याशिवाय कधींहि राहाणार नाहींत.

* * *

# श्री. युसुफ मेहेरअल्ली

: २२ :

मी युसुफ मेहेरअल्लींना जेव्हां प्रथम भेटलों तेव्हां ते मरिना रुग्णालयांत मरणोन्मुख होऊन पडले होते. थोडचाशा कष्टी चेहऱ्यानेंच डॉ. जसावाल्यांनीं मला मेहेरअल्लींच्या खोलींत जायला परवानगी दिली.

मी खोलींत गेलों. असहाय स्थितींत मेहेरअल्ली बिछान्यांत पडून होते. नाकांत कसली तरी टचूब होती. जवळच एक सुवदना परिचारिका उभी होती. परिचारिकेनें सुमधुर हास्य करून मला अभिवादन केलें. मेहेरअल्लींना कोणाची तरी चाहूल लागली. त्यांची दृष्टि माझ्याकडे वळली.

जिवावरचें दुखणें होतें तें, तरी पण मेहेरअल्लींनीं स्वभावसुलभ मंद हास्य केलें. मी जवळ गेलों. त्यांनीं हात पुढें केला. मी हात मिळविला. आजारी माणूस पण त्या हस्तांदोलनांत किती सखोल भाव होता, किती जोराची पकड होती ती. मेहेरअल्लींच्या हळुवार मनाची, गोड स्वभावाची तेव्हांच मला साक्ष

पटली. हास्याची प्रभा पडून आधींच गोड असणारा चेहरा त्या आजारांतहि अतीव गोड दिसला मला. मृत्यूच्या दाढेंत असतांनासुद्धां चेहऱ्यावर एवढी प्रभा फांकावी हें नवल होतें, पण जिवंत राहाण्याची ज्यांची दुर्दमनीय आशा, त्यांच्या चेहऱ्यावर हास्य चमकणार नाहीं तर काय ?

माझी मेहेरअल्लींची दुसरी गांठभेट सांताक्रूझला राहणाऱ्या त्यांच्या मित्राकडे झाली. त्या वेळीं माझ्यापेक्षां पद्म प्रकाशनचे मोरारजी पदमसी यांच्याशींच त्यांचें जास्त बोलणें झालें. मी बाहेरच बसलों होतो. माझ्यासाठीं मेहेरअल्लींनीं चारपांच जगद्वंद्य चित्रकारांचीं पुस्तकें चाळण्यासाठीं पाठवून दिलीं.

मोरारजींचा संवाद संपल्यानंतर मी खोलींत गेल्याबरोबर त्या पुस्तकांपासूनच मेहेरअल्लींनीं बोलायला प्रारंभ केला. त्यांच्या भाषणांत पाश्चात्त्य चित्रकला, भारतीय चित्रकला, अखिल जगांतील नामांकित चित्रकार, सगळ्या गोष्टींचा उल्लेख आला. अशीं पुस्तकें आपल्याकडे निघालीं पाहिजेत असा मेहेरअल्लींनीं आग्रह धरला केवळ मोरारजींच्या घाईमुळें नाइलाजानें मला तो आकर्षक संवाद सोडून निघावें लागलें. पण पांच मिनिटांत एक गोष्ट मात्र घडली : मेहेरअल्लींच्या गप्पांवर मी भलताच खूष झालों.

त्यानंतर मेहेरअल्लींच्या स्वत:च्या घरीं अथवा मिनू मसानींच्या घरीं वास्तव्य असतांना बऱ्याच वेळा त्यांच्या माझ्या गांठीभेटी घडल्या. मेहेरअल्लींच्या फार फार जवळ मी गेलों; आणि वाटायला लागलं, असंच आणखीन् त्यांच्या जवळ जावं ! मेहेरअल्लींच्या स्नेहाची गोडी कांहीं अवीट आहे. वर्धिष्णु चंद्राप्रमाणें ही गोडी दिवसेंदिवस वाढतच जाते.

मेहेरअल्लींच्या गप्पा म्हणजे और चीज आहे. त्यांच्या खोलींत शिरल्यापासून तों तुम्ही बाहेर पडेपर्यंत गप्पांच्या गाजरांची पुंगी वाजवत वाजवत ते तुम्हांला गुंग करतात. या गप्पांत कुणाची नालस्ती नाहीं, निंदा नाहीं. गोड गप्पा. शून्यापासून तों 'नेति नेति' पर्यंत अनेकविध विषयांवर आपल्या रसाळ भाषेंत मेहेरअल्ली गप्पा मारून तुम्हांला रिझवतील, आनंदवितील, रंगवितील. गप्पा मारण्याची अजब जादू मेहेरअल्लींकडे आहे. आजारीपणांतहि

हा ओघ जोरानें घोघवतो, तर त्यांची प्रकृती नीट असतांना ते कोठल्या गतीनें गप्पा मारत असतील—कल्पना करवत नाहीं.

दुसरा त्यांचा असाधारण गुण म्हणजे त्यांचा दुर्दमनीय उत्साह. दोन वर्षें ते आज बिछान्याला खिळलेले आहेत. पण तुम्ही त्यांच्या जवळ जा; अचानक तुमच्यासमोर अशा अगणित कल्पना मांडतील कीं, हें करूं कीं तें करूं असें तुम्हांस वाटेल. मेहेरअल्लींची ही मख्खी आहे कीं, ते आपल्या स्वत:तील दुर्दमनीय उत्साह तुमच्यांत उत्पन्न करतात. पांच मिनिटांत ते तुम्हांला कार्यप्रवृत्त करतील. सारखें तुमच्या मागें लागून आपले इष्ट हेतू साध्य करून घेतील. बिछान्यांतल्या बिछान्यांत पडून अविरत, उत्साहपूर्वक काम करण्याची त्यांची हातोटी पाहिली कीं विस्मयानें माणूस थक्क होतो.

बिछान्यांत पडल्या पडल्या ते पांचपन्नास पुस्तकांचे आराखडे तयार करतील. आपल्या अनेक मित्रांना 'हें करा, तें करा' म्हणून सांगून कार्यप्रवृत्त करतील; तुरुंगांत खिचपत पडलेल्या राजकीय कैद्यांना पुस्तकांचीं पार्सलें पाठवतील; परदेशीय मित्रांना हिंदुस्थानांतील प्रकाशनें भेट म्हणून पाठवतील. खूप खूप वाचन करतील. भावांच्या मुलांबरोबर थोडा वेळ खेळतील. अहमदभाईशीं—आपल्या भावाशीं—त्याच्या व्यवहाराच्या गोष्टी करतील. बहिणींबरोबर विनोद करतील, नवीन विकत घेण्याच्या पुस्तकांच्या याद्या करतील आणि पद्म प्रकाशनाकडून आलेलीं हस्तलिखितें वाचून त्यावर आपलीं मतें तडकाफडकीं लिहून टाकतील. काय ही आटापिट ! केवढा हा कामाचा डोंगर ! आणि हें सारं शरीरांत सतत वसणाऱ्या व्याधींशीं झगडतांना !

मेहेरअल्लींच्या अगणित मित्रांची गणती करणें जवळजवळ अशक्य आहे. कोण, कोठें त्यांचा मित्र आहे हें सांगणें कठीण ! मी अमुक एका गांवाला जाणार म्हणून सांगितलं कीं ताबडतोब मेहरअल्लींनीं दिलीच आपल्या मित्रांची यादी. त्या गांवच्या गमती ते पांच मिनिटांत सांगून मोकळे होतील. मीं एकदां अमेरिकेला जाणार म्हणून मेहेरअल्लींना म्हणालों. त्याबरोबर अमेरिकेवर भाष्य सुरू झालं. केवढी म्हणून मला माहिती दिली ! माझ्या या मित्रावर, त्या मित्रावर चिठ्ठ्या देईन म्हणून पुन: पुन्हा मला अभिवचनें दिलीं ! सर्व

जगभर मुळीं त्यांच्या मित्रांचा मेळावा आहे. आपल्या मनमिळाऊपणामुळें त्यांनीं सगळं जग आपल्या पायाशीं आणलं आहे.

मेहेरअल्लींच्या सभोंवारचा पुस्तकांचा संभार पाहिला कीं साहजिकच मनांत विचार येऊन जातो की हा गृहस्थ या पुस्तकांकडे नुसतं पाहूनच विद्वान बनला आहे कीं काय ? खरी गोष्ट अशी आहे कीं, मेहेरअल्लींनीं हीं सारीं पुस्तकें चाळलेलीं आहेत, हाताळलेली आहेत, वाचलेलीं आहेत. पुस्तकांचा संचय करणं आणि पुस्तकं वाटणं हें मेहेरअल्लींचं मोठं व्यसन आहे. मुंबईतल्या कोठल्याहि पुस्तक विक्रेत्याकडे चौकशी केली तर मेहेरअल्ली आपल्या ह्या आवडत्या व्यसनावर केवढा अवाढव्य खर्च करतात तें सहज कळून येईल. मेहेरअल्लींचा व्यासंग गाढा आहे, वाचन चौफेर आहे, बुद्धिमत्ता चपल आणि चतुरस्र आहे. एखादें पुस्तक अथवा कांहीं विशिष्ट माहिती तुम्हांस कोठेंहि मिळाली नाहीं कीं सरळ मेहेरअल्लींकडे जा, पटकन् तुम्हांस ते पुस्तक देतील अथवा आपल्या रसाळ शब्दांत सगळी माहिती देतील.

मेहेरअल्ली ज्या वेळीं शरीरानें सुदृढ होते त्या वेळची त्यांची लोकप्रियता अलौकिक होती. आज ही लोकप्रियता कमी झाली आहे असें नाहीं; ती कायमच आहे. मेहेरअल्लींना आजहि भेटायला येणाऱ्या अनेक माणसांना घालवून देणें एक दुस्तर काम असतें. विद्यार्थ्यांचे तर ते जीव कीं प्राण आहेत. विद्यार्थ्यांना त्यांच्याशिवाय चैन पडत नाहीं, आणि त्यांना विद्यार्थ्यांचा मेळावा आपल्या सभोंवार असल्याशिवाय बरें वाटत नाहीं.

त्यांची लेखणी लालित्यमय आहे. एखादा कठीण विषयहि ते गोड शब्दांत विशद करून सांगतात. त्यांची लिहिण्याची गति वेगवान् आहे. आजपर्यंत त्यांच्या हातून झालेलें लिखाण मार्मिक, मोलवान् आणि मधुमय आहे. त्या लिखाणांत चुरचुरीतपणा आणि रुचकरपणा आहे. इंग्रजीवरील त्यांचें प्रभुत्व इंग्रज वाङ्मयकारांनींहि कबूल केलें आहे.

त्यांचें वक्तृत्वहि असामान्य आहे. त्यांत सगळे रस तुम्हांला सांपडतील. आज त्यांच्या आजारामुळें मेहेरअल्लींना सभा सुटल्या आहेत. पण पुनश्च एकदां ते पूर्वीसारखे भाषणांचे दौरे काढूं लागले कीं तरुण आणि तरुणी त्यांच्या भाषणांवर तुटून पडतील.

समाजसत्तावाद हा मेहेरअल्लींचा आत्मा आहे. मानवजातीवर, मानवजातीच्या गुणावगुणांवर त्यांचें विलक्षण प्रेम आहे. गरीब–श्रीमंत, लहान–मोठा हे भेदभाव ते पाळत नाहींत. त्यांना सर्व सारखें. बोलायचं गोड, रागवायचं गोड, अबोला गोड, शत्रुत्वहि गोड–असा मेहेरअल्लींचा खाक्या आहे. काव्य-शास्त्र-विनोदावर ते जगले आहेत. जीवनांत आजारानं त्यांना बेजार केलं आहे, पण त्यांनीं आपल्या आशावादी, निरलस, उमद्या स्वभावामुळें आजारालाच बेजार करून टाकलें आहे. कलात्मकता आणि कल्पनाशक्ति यांच्या संलग्नतेमुळें ते लग्नाच्या वाटेला गेलेले नाहींत. मेहेरअल्ली हे सर्वज्ञ नाहींत पण सर्वज्ञाते आहेत; बहुश्रुत आहेत, बहुविध कार्यकर्ते आहेत.

मेहेरअल्लींचें विशेष वैशिष्टय म्हणजे त्यांचा उमदा चेहरा. त्यांची काया काळवंडली, शरीर कोमेजलें तरी चेहऱ्यावरची कांति कायम आहे. आणि या कांतीची प्रभा ज्याच्या ज्याच्या चेहऱ्यावर पडली तो तो मेहेरअल्लींचा जानी चहाता बनला आहे.

कोणी करारीपणामुळें अथवा क्रूरपणामुळें लोकांवर आपली हुकमत गाजवतो. पण गोडवेपणामुळें लोकांवर हुकमत गाजविणारे मेहेरअल्लींसारखे फारच थोडे! प्रेमानें आपल्याकडे लोकांना खेंचण्यास ईश्वरदत्त देणगी लागते. असली ही देणगी असल्यामुळेंच मेहेरअल्लींचें नांव आज घरोघर ऐकूं येतें.

असला हा अजातशत्रु गृहस्थ बिछान्याला खिळलेला आहे हें खरोखरीच दुर्दैव आहे. मेहेरअल्लींच्या सगळया चाहत्यांना या त्यांच्या दुखण्याबद्दल खंत वाटते. खंत वाटत नाहीं एकाच माणसाला–मेहरअल्लींना! त्यांचं तें लिखाण, ती बातचीत, वाचन, मनन आणि राजकारण सगळं सगळं चालू आहे आणि चालू राहणार! या बाबतींत देवावरहि त्यांनीं मात केली आहे!

* * *

# श्री. चिमणलाल सेटलवाड

: २३ :

परवां आमच्या P. E. N. Centre मध्यें 'समाज व कायदा' या विषयावर मोतीलाल सेटलवाड यांचें विद्वत्तापूर्ण आणि विचारपरिप्लुत असें व्याख्यान ऐकत असतां मला त्यांचे पिताजी सर चिमणलाल सेटलवाड यांची आठवण झाली.

लिबरल फेडरेशनचे कार्यवाह श्री. व्ही. आर्. भेंडे यांनीं सर चिमणलाल सेटलवाड यांची व माझी ओळख करून दिली. श्री. व्ही. आर्. भेंडे कारवार-कडचे. मी मुंबईचा. पण भेंडे नांवामुळें आमच्यांत दिलजमाई झाली. सर चिमणलाल सेटलवाड लिबरल फेडरेशनचे अध्यक्ष, त्यामुळें श्री. भेंड्यांकडून माझा म्हणजे भेंडे नंबर दोनचा सर चिमणलालांशीं परिचय करून देण्याचा योग.

"सर चिमणलाल आपलें आत्मचरित्र लिहून राहिले आहेत", श्री. व्ही. आर्. भेंडे म्हणाले, "तें पद्म प्रकाशनातर्फे तुम्ही प्रसिद्ध कराल का?" सर चिमणलालांच्या समोरच श्री. भेंडेंनीं ही पृच्छा केली.

मी बोलणार इतक्यांत सर चिमणलाल आपल्या खणखणीत आवाजांत अस्खलित मराठींत म्हणाले, "हें पाहा भेंडे, मला बोलण्याचा सराव आहे, लिहिण्याचा नाहीं. तेव्हां चरित्र यशस्वी होईलच ही माझी खात्री नाहीं. पण तुम्हांला तोटा होणार नाहीं हें मात्र मी कसोशीनें पाहीन."

सर चिमणलालांसारख्या माणसानें तोटा होणार नाहीं हें अभिवचन दिल्यानंतर मला मागेंपुढें करण्याची जरुरी काय ? "साहेब, आपलें चरित्र मी आनंदानें पद्म प्रकाशनतर्फे छापायला तयार आहे", असें मी ठासून सांगितलें.

त्या दिवसापासून मी रोज सर चिमणलालांकडे संध्याकाळीं चार वाजतां जाऊं लागलो. त्यांच्या गोल मेजावरचा एक सभासद झालों. रोज त्यांच्या-बरोबर चहापान करूं लागलो.

सर चिमणलाल सेटलवाड हे बुटके वामनमूर्ति. चेहरा डोक्याकडे भव्य, ओठांकडे निमुळता. केसांचें ओळप ठाकठीक. भालप्रदेश मोठा. डोळे किल-किले, पण तेजस्वी. नाक अणकुचीदार. शरीरयष्टि ताठ. बोलणें स्पष्ट आणि खणखणीत. स्वभावांत कुर्रेबाजपणा, बेछूटपणा. पुष्कळ निर्भय वागणूक. सणसणीत उत्तर देण्याची प्रथा. विलक्षण बेडरपणा आणि इतकें असूनहि ज्योतिषशास्त्रावर विलक्षण विश्वास. एखादी केस घ्यायची असेल अथवा केसवर बाहेरगांवीं जावयाचें असेल तर प्रथम ज्योतिष्याकडून वास्तपूस्त, मग निर्णय आणि गमन. घरींच ज्योतिषी कायमचा ठेवलेला.

आत्मविश्वास मात्र विलक्षण. त्यांच्यासंबंधीं ऐकलेली गोष्ट—सर चिमण-लालांकडे एका मोठ्या संस्थानाचे महाराज आले. त्यांनीं एका मोठ्या कंपनीला एक कोट रुपये कर्जाऊ दिले होते. त्या कंपनीची स्थिति बरोबर नव्हती. म्हणून महाराजसाहेबांना घोर लागला होता. त्यांचे कोट रुपये परत मिळतील कीं नाहीं याची शंका होती.

महाराजसाहेबांनीं सर चिमणलालांचा सल्ला विचारला. नेहमींच्या शिरस्त्याप्रमाणें सर चिमणलालांनीं आपली फी प्रथम मागून घेतली. आपल्या सेक्रेटरीबाईला बोलावलें व त्यांनीं खालील मजकूर तिला निवेदित केला—

'सर चिमणलाल सेटलवाड यांनीं या केसचा साद्यंत अभ्यास केला आहे. त्यांचें विचारपूर्वक मत असें आहे कीं हा लढा कोर्टांत गेला तर वादीला एक कोट रु. ताबडतोब मिळतील.'

"हें पाहा", सर चिमणलाल त्या महाराजसाहेबांना म्हणाले, "हा कागद तुमच्या विरुद्ध पक्षाच्या हातांत पडेल अशी व्यवस्था करा. मग पाहू पुढें काय होतें तें."

महाराजसाहेबांच्या खिशाला चाट लागली होती लठ्ठ फीची आणि हातांत पडलें होतें चिटोरें तीन ओळींचें.

पण त्या तीन ओळींच्या चिटोऱ्यानें काम केलं कोटीचं. प्रतिवादीच्या हातांत तो कागद पडतांच त्या कचेरींत धावपळ सुरू झाली. नामवंत वकिलांचा सल्ला घेतला गेला. बहुतेकांनीं सांगितलें कीं, सर चिमणलालांनीं म्हटलं आहे ना कीं तुम्ही केस हरणार. सर चिमणलाल जाणतात काय होईल तें. निमूटपणें एक कोट रुपये देऊन टाका. त्या कंपनीनें महाराजांचे पैसे दिले. महाराजांनीं खुशींत येऊन सर चिमणलालांना आणखी हजारोंनीं पैसे दिले.

असा होता सर चिमणलालांचा दरारा. असा होता त्यांच्या शब्दाला मान. त्यांचा मताचा असा होत असे सन्मान.

दुसरीहि अशीच एक केस मला आठवते. माझ्या पत्नीची एक सुस्वरूप अशी हॉस्पिटलमध्यें काम करणारी मेट्रन मैत्रीण होती. तिला एका व्यक्तीबरोबर लग्न करायचें होतें. पण तिचा पहिला नवरा होता. तो वेडा होता. तेव्हां पहिला नवरा असतांना दुसरा करणं त्या वेळच्या कायद्याप्रमाणें अशक्य. याला उपाय काय ?

मी सर चिमणलालांना विचारलें. ते हसले व म्हणाले, "शुद्ध व्यभिचार– Adultery होईल. तिचा प्रियकर जेलमध्यें जाईल. पण ही बाई सुस्वरूप आहे म्हणता ? आणा पाहू तिला मजकडे ! तिला पाहून मग ठरवूं या काय करायचें तें."

मी त्या बाईला सर चिमणलालांकडें आणली. त्यांनीं तिला पाहिली. हंसून माझ्याकडे पाहिलें. मान हलविली. तिला मी सुंदर म्हटलं होतं.

त्याची पोच सर चिमणलालांनीं नेत्रानें मला दिली. ते खाकरले व गंभीर होऊन म्हणाले, "भेंडे, या बाईंना सांगा मी नुसत्या सल्ल्याचे दोन दोन हजार रुपये घेतो."

तें वाक्य ऐकल्याबरोबर बाई मुसमुसून रडूंच लागली.

"रडायला काय झालं?" धमकावणीच्या स्वरांत सर चिमणलाल म्हणाले, "ह्या प्रियकराचें तुमच्यावर निस्सीम प्रेम आहे ना? मग त्या प्रेमासाठीं सहा महिने–वर्षभर खडी फोडली तर झालं काय? लेकाचे प्रेम करतात पण त्याग करायची तयारी नाहीं?"

सर चिमणलालांची सरबत्ती होती ती. बाई हुंदके देऊन रडायला लागली. ती आली होती सांत्वनासाठीं आणि तिच्या पाठीवर बसत होते रपाटे.

तिला सर चिमणलालांनीं मनसोक्त रडूं दिलं. त्यांची ताठर वृत्ति बदलली. ते दयार्द्र बुद्धीनें त्या सुस्वरूप बाईकडे बघत म्हणाले, "जा, बाई जा. तुमच्या प्रियकराशीं खुशाल लग्न करा. तुमचा संसार सुखाचा होईल हा माझा आशीर्वाद आहे. जर कमी जास्त झालं तर माझ्याकडे या. मी तुमचा कज्जा फुकट चालवीन. चला, नाहीं तर माझी वृत्ति बदलेल आणि मी फीची मागणी करीन. चलो!"

असे होते सर चिमणलाल. बाहेरून कणखर, आंतून दयाशील. बाईनें लग्न केलें. कायदेशीर नव्हेच तें. पण सर चिमणलालांच्या आशीर्वादानें काही बालंट आलेंच नाहीं. तिचा संसार सुखी आहे.

सर चिमणलालांचें आत्मचरित्र Reflections and Recollections या नांवाखालीं प्रसिद्ध झालें. सर चिमणलालांच्या व्यक्तित्वांत, वाणींत, वकिलींत जो दम होता, आब होता तो त्यांच्या लिखाणांत नव्हता.

मी त्यांना म्हटलं, "साहेब आपलें पुस्तक पडेल!"

सर चिमणलाल म्हणाले, "पुस्तक पडेल याची मला अटकळ होतीच. पण तुम्हांला झळ बसणार नाहीं एवढी मी काळजी घेतली आहे."

त्यांनीं मेजाचा डाव्या बाजूचा खण उघडला व त्यांतील कांहीं कागद माझ्या सुपूर्द केले. मी ते कागद वाचूं लागलों. भारतांतील त्या वेळच्या

संस्थानिकांच्या सर चिमणलालांच्या ग्रंथाच्या १५०–२०० प्रती अशा मागण्या होत्या व सोबत चेक जोडलेले होते. मोठ्या ऑर्डरी आणि आगाऊ रक्कम होती !

सर चिमणलाल सेटलवाडच्या पुस्तकाच्या—Reflections and Recollections च्या १०,००० प्रती थोड्याच दिवसांत संपल्या. कोण म्हणेल सर चिमणलालांचें पुस्तक पडलें म्हणून ?

* * *

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थलप्रत.
अनुक्रम 8C0C90 वि: पारे
नों. दि. 2/3/6

# श्री. त्र्यं. न. कुलकर्णी

: २४ :

> " या ... राव किती वर्षांनीं आपण भेटतो आहोंत ? "
> हंसत हंसत पंडितरावांनीं मला नमस्कार केला.
> कोणाहि माणसाला गौरवायचें कसें ही मख्खी पंडितराव
> छान जाणतात.

मी सातारला गेलों होतो. सतत स्मरण एकाच गोष्टीचें. आमचे पंडित-राव तेथें आहेत म्हणून. रजताद्रिमध्यें सामान ठेवलें आणि त्यांचें बिऱ्हाड गांठलें. त्यांच्या घरीं हें असें मनापासून स्वागत. माझेंच स्वागत असें झालें असें नव्हे तर सर्वांशींच त्यांची ही अशीच वागण्याची पद्धत. अभिवादन आणि-अंत:करणपूर्वक आतिथ्य. आज २५ वर्षे मी पंडितरावांना पाहतों आहे. वागण्याच्या लकबींत और लाघवीपणा आहे. त्यामुळें ते स्नेह टिकवतात.

पंडितरावांच्या तीन ' मुद्रा ' माझ्या मनावर ठसठशीत उठल्या आहेत. महाद्वारचे पंडितराव. कोल्हापुरांत राहणारे. महाद्वार प्रेसचे मालक. महाद्वार

मासिकाचे संपादक. मोठा गोंडस अंक काढावयाचे. नव्या नव्या लेखकांना खूप प्रोत्साहन द्यायचे. महात्माजींचा खून झाला. महाद्वार वाडा जळाला. प्रेस आगींत भस्म झाला. महाद्वार मसिकाच्या अंकाची राख झाली. पंडितराव जीवनांतून उखडले गेले. कोल्हापूरचा अंक संपला.

नंतर पंडितराव मुंबईंत भेटले. गत जीवनाबद्दल हळहळ नाहीं. भावी जीवनाबद्दल भय नाहीं. जर्मनीला जाण्याची तयारी. खूप उत्साह. जबर आशा. नव्या जीवनाबद्दल नवीन स्वप्नें. पंडितराव जर्मनीला गेले. त्यांचें तेथलें नवें पर्व सुरू झालें. वर्तमानपत्रकार, वक्ते, जीवनाचे असीम भोक्ते, भारतीय व जर्मन जीवनाचे भाष्यकार असे त्यांचे निरनिराळे पैलू जर्मन वास्तव्यांत प्रकर्षानें पुढें आले. एक तप पंडितरावांनीं जर्मनींत काढलें. नातेवाइकांना वाटलें पंडितराव भारताला विसरले. अनेकांनीं अनेक कंडचा पिकविल्या. पंडितराव परत येणार नाहींत. तेथल्याच जीवनांत आतां ते रमले आहेत वगैरे वगैरे. पण तब्बल एक तपानंतर पंडितराव स्वतंत्र भारतांत अवतरले. जर्मनीच्या वास्तव्यांत अनुभवलेलें जीवन त्यांनीं ‘ रोमांच ’ या त्यांच्या चुरचुरीत पुस्तकांत चित्रित केलें. ‘ रोमांच ’ हें पुस्तक वाचायला घेतलें म्हणजे अंगावर ‘ रोमांच ’ उभा राहतो. हें पुस्तक वाचतांना तुम्हांला गुदगुल्या होतात. तुम्ही पंडितरावांबरोबर हंसतां, रडतां, गंभीर होतां, मदिरा पिता, मदिराक्षीकडे कुतुहलानें पाहात बसतां, जर्मन जीवनांत समरस होता. हें तन्मयतेनें लिहिलेलें पुस्तक आहे. त्यामुळें तें वाचकांना भुरळ पाडतें. तुम्हांला जर्मन जीवनांत मिसळून टाकतें. इतकें आपल्या विषयाशीं, जर्मनींतील सौंदर्याशीं जर्मनींतील परिस्थितीशीं एकजीव करून सोडणारें दुसरें पुस्तक मीं वाचलें नाहीं. जर्मनींतील वास्तव्यांत पंडितरावांनीं जें मंथन केलें त्यांतील हें ‘अमृत’ ‘रोमांच’रूपानें आम्हांला सादर केलें आहे. येथें दुसरा अंक संपला.

तिसरी मुद्रा पुन्हा भारतांत. साताऱ्यांत संसार. जर्मनीच्या यांत्रिक जीवनांतून सुटलेला हा मुमुक्षु सातारला येऊन विसावला. पंडितराव आणि सातारला अवतरले हें ऐकूनच मी चकित झालों. शहरच्या सर्व मौजमजेला चटावलेला माणूस हिमालयांतील आश्रमांत प्रवेशावा तसेंच हें पंडितरावांचें उफराटें वर्तन. रस-रंगाचे अनेकविध अनुभव घेतल्यानंतर स्वास्थ्याची, शांतीची अत्यंत आवश्यकता होती. सातारचें जीवन संथ गतीचें, शांततेचें.

पण पंडितराव बाहेरून गतिशून्य जीवन जगताहेत असें भासवीत असले तरी आंतून मात्र ते गतिमान् होते. समुद्राला भरती आली म्हणजे जसा वरून संथपणा दिसतो तसाच संथपणा पंडितरावांत वरकरणी दिसत होता. पण आंतून नवनवीन आशा-आकांक्षा उफाळत होत्या. बाहेर पडण्यासाठीं आटोकाट प्रयत्न करीत होत्या.

डिसेंबर–जानेवारी १९६५त मात्र पंडितरावांत अचानक कायापालट झाला आणि निमिषार्धांत त्यांनीं नव्या गतिमय गोष्टी साधल्या......सातारा सोडण्याचा निर्णय घेतला. पुण्यांत संसार थाटायचें ठरविलें. आणि महाराष्ट्रांत नवीन साप्ताहिक काढणार याची दवंडी त्यांनी महाराष्ट्रभर पिटली. ज्वालामुखी जसा अनेक वर्षें झोपी गेलेला असतो पण एक दिवस जागा होतो आणि रसरशीत लाव्हा पाझरतो, तसें आतां पंडितराव नव्या दमाचे, नव्या रक्ताचे, नव्या उद्रेकाचे, नव्या उन्मेषांचें नववाङ्मय पाझरणार आहेत. अनेक वर्षें आत्मनिष्ठ–अंतर्मुख बनलेला हा बहुरूपी वाङ्मयकार आतां महाराष्ट्राला नववाङ्मय देणार आहे. सातारच्या सुस्त वातावरणांतून पुण्याच्या गतिमान् वातावरणांत पदन्यास करणारे पंडितराव महाराष्ट्राला नववाङ्मयरूपी पंचारती ओवाळण्यास सिद्ध झाले आहेत. अशी आहे पंडितरावांची ही त्रिमुद्रा. जीवनतत्त्वें कोणतीं याचा वेध घ्यायचा आणि जीवनरसांत सचैल रासक्रीडा करूनहि अलिप्त राहावयाचें हा योग पंडितरावांनीं आपल्या एकंदर जीवनांत साधला आहे.

पंडितराव आहेत साधे आणि सरळ. चेहऱ्यावर सदा हास्य विलसतें. रडव्या चेहऱ्याचे पंडितराव मी पाहिलेले नाहींत. एऱ्हवीं उथळ, विनोदप्रिय, हलके हलके बोलणारे हे गृहस्थ तसे विश्वाच्या गाभ्यांत हात घालून तेथलीं रत्नें हुडकून काढणारे मदारी आहेत. त्यांच्या मेंदूंत सदा विचारांची भरारी भरलेली असते. नव कल्पनांचा तेथें पूर आलेला असतो. विलासमय काव्यविश्वाचा तेथें बहर दिसून येतो. एवढें करूनहि पंडितरावांचे पाय मातींत घट्ट रुतलेले आहेत. ते गरुडाची उंच भरारी मारतील आणि लगेच मुंगीच्या सूक्ष्म कारागिरीनें आपलें वाङ्मयरूपी वारूळ तयार करतील.

पंडितराव लिहितील तें नाजूक साजूक. कलाकृतीच्या सजावटीनें आपल्या वाङ्मयांत रूप, रंग भरतील. कोठल्याहि प्रमेयाचा साधकबाधक विचार

करतील. अंतर्निष्ठ राहून प्रत्येक तत्त्वप्रणालीचा आदि व अंत शोधून काढतील. बुद्धि शोधकाची, हृदय भावनापूर्ण आणि कृति कलाकाराची. असें जीवन पंडितराव जगत आहेत. तसा त्यांचा वाङ्मयसंसार घरसंसारासारखाच बाळबोध आहे. पण घरसंसारांत जसा रेखीवपणा आहे, भावनोत्कटता आहे, आनंद आहे तसाच त्यांनीं तो आपल्या वाङ्मयांतहि प्रतीत केला आहे. म्हणूनच त्यांच्या त्रुटित वाङ्मयांतून गुलाबाचा वास दरवळत आहे.

नाटकाची नांदी करून ते नटराजाला दुर्वांची जुडी वाहण्यास पुढें झाले होते, पण ऐन वेळी त्यांचें पूजापात्र हिरावून घेतलें गेलें आणि रंगभूमीच्या दालनांत शिरतां शिरतां त्यांना अंधारांत चांचपडत राहावें लागलें. पण नट-राजाचा वरदहस्त त्यांना मिळालेला आहे. त्यांची रंगमंदिरांतील पूजा चालूं आहे. शुद्ध भावा दुसरा नंदादीप लवकरच उजळणार आहें. तो उजळेल तेव्हां रंगभूमीला न्यारा रंग चढेल अशी खात्री वाटते.

पूर्वीं पंडितराव सडपातळ होते. आतां ते घरसौख्यामुळें जाडजूड झाले आहेत. त्यांचा भालप्रदेश भव्य आहे. डोक्यावरचे केंस विरळ होत आहेत. पंडितरावांनीं आतां चाळीशी गाठली आहे. डोळ्यांत मिस्किलपणा आहे. दृष्टींत कुणाचाहि ठाव घेण्याची शक्ति आहे. जीवनाचा सूर आशावादी आहे. वर्तन प्रयत्नशील आहे. स्वतः खूप दुखवले गेले तरी दुसऱ्याला दुखवण्याची त्यांची रीत नाहीं. प्रासादिक वाणीनें तुम्हांला जर्मनी पुराण तन्मयतेनें सांगतील आणि तुम्ही केलेलें प्रवचन श्रद्धेनें ऐकतील. प्रत्येकांत चांगुलपणा आहे त्याचा ठाव घ्यावा, प्रत्येकाच्या चांगल्या कृतीचा गौरव करावा, थोडें सांगावें जास्त ऐकावें. वृत्ति रसज्ञाची, रसग्रहण भाविकाचें, वाचन, मनन, चिंतन मुमुक्षूचें. पंडितराव म्हणजे एक गोड माणूस. गोडी द्यायची गोडी घ्यायची हा त्यांचा हव्यास.

साताऱ्याला असतांना आम्ही खूप हुंदडलो. रांगत्या मुलाच्या अवखळपणानें ते माझ्या समवेत हुंदडले. भक्तिमय भावनेनें आम्ही सर्व देऊळें फिरलों. पाश्चात्त्य देशांत एक तप व्यतीत केलेल्या या इसमानें जागरूकतेनें सर्व देवांचें दर्शन घेतलें. नामस्मरणापासून तो आस्तिक्यभाव या विषयांवरच्या ऊहा-पोहावर चित्त केंद्रित करून जितकें त्यांनीं अध्यात्म टिपलें तितकेंच नियोजना-

सारख्या विषयावर बोलतांनाहि त्यांनीं आधुनिकत्वाची ग्वाही दिली. पंडितरावांचा दृष्टिकोन साधकाचा, आत्मविश्वास सिद्धाचा आणि जीवनाचा कल साध्याकडे आहे. म्हणून माणूसकी असलेला उमदा गृहस्थ असें त्यांचें सुटसुटीत वर्णन करावें लागेल.

मोठीं माणसें पुष्कळ मिळतात. चांगलीं माणसें विरळा. पंडितराव चांगले गृहस्थ आहेत हें सांगणें न लगे.

* * *

# मिरा बेन

: २५ :

मिरा बेन यांचें पूर्वाश्रमीचें नांव—मॅडेलीन स्लेड. एका ब्रिटिश अ‍ॅडमिरलची ही कन्या. सुखवस्तु घराण्यांत जन्म. पित्याच्या आधिकारामुळें सदा उंची जीवन. सुसंस्कृत लोकांशीं संबंध. उच्च समाजांतील व्यक्तींशीं जवळचा समागम.

पूर्वाश्रमीं निसर्गाचा सहजसुंदर संघर्ष. कुत्रीं, मांजरें, गाई, घोडे यांचा सुकाळ. त्यामुळें या प्राणिमात्रांवर अकृत्रिम प्रेम. तितकेंच प्रेम झाडांवर, फळांवर, फुलांवर. एकांताची विशेष आवड.

आईबापांनीं स्वातंत्र्य दिलें. त्या स्वातंत्र्याचा उपयोग मॅडेलीननें योग्य प्रकारें केला. आपला आत्मविकास स्वत:च घडविला. प्राथमिक शिक्षण जें घेतलें असेल तें. पण बाकी विकसन सुबुद्धीनें, स्वभावनेनें, स्वयंस्फूर्तीनें झालेलें. म्हणूनच वयांत आल्यानंतर ही युवती निरागस वृत्तीची, अंतर्मुख,

भावनाविवश, सुसंवेदनायुक्त अशी झाली. स्वयंप्रेरणेनें उद्दीपित झालेलें तिचें मन एका अज्ञात आदर्शाकडे धांवत होतें.

आई कामसू. तशीच मॅडेलीन. घरगुती कामाचा हव्यास. बहीण न्होना. तिचा शिक्षणाकडे ओढा. ती राहात असे विद्यार्थिनीगृहांत. त्यामुळें मॅडेलीनचें एकाकी जीवन. मनाचें विकसन जास्त. कारण लहानपणापासून निसर्गाशीं संलग्नता. प्राणिमात्राशीं, पृथ्वीमातेशीं आणि वृक्षवल्लरींशीं तादात्म्य. घरची अभिजात संस्कृति. बिथोवेनच्या गीतरचनेवर अकृत्रिम प्रेम आणि हृदयाचा आदर्शाकडे असीम भाव यामुळें तरुण वयांतच उच्च तत्त्वांची आवड. सेवेकडे मनाचा भाव आणि हृदयाची ओढ मानवताधर्माकडे.

वडिलांच्या वैभवांत तिनें मानवी प्रकृतींचे अनेक मासले पाहिले. मासले-वाईक माणसांना ती भेटली. राजेशाही थाटामाटाची दुनिया पाहिली—अनुभवली. बिथोवेनच्या गायनावरील अमर्याद प्रेमामुळें तिनें गायनाचें प्रचारकार्य करण्यासाठीं लडनमध्यें कॉन्सर्ट योजिला. पण तिच्या हृदयांतील आर्त स्वर अजूनहि अज्ञात अवकाशांतला मधुर बांसरीचा नाजूक स्वर ऐकण्यास उत्सुक झाला होता.

एवढ्यांत तिच्या कानांवर रोमे रोलॉं या फ्रेंच तत्त्वज्ञान्याची कीर्ति येऊन आपटली. हृदयांत या रोमे रोलॉंचा पडसाद उत्पन्न झाल्यावर त्याला भेटलेच पाहिजे, त्याची मुलाखत झालीच पाहिजे. त्यांच्याशीं विचारविनियय झालाच पाहिजे असा तिच्या मनानें ध्यास घेतला. त्या अवस्थेंतच रोमे रोलॉंच्या परिसरांत येऊन ती राहिली. तिनें फ्रेंच भाषा शिकण्याचा ध्यास धरला. रोमे रोलॉंच्या नयनसुंदर वातावरणांत ती तन्मयता पावली.

रोमे रोलॉंशीं आपली मुलाखत झाली तर आपल्याला आत्मिक मार्ग मिळेल अशी तिच्या मनाची खात्री होती. तिनें रोलॉंना पत्र लिहिलं, 'मी भेटूं कां ?' आणि त्यांचं लगेच आमंत्रण आलं कीं 'चहाला या.' मॅडेलीनच्या आनंदाला पारावार राहिला नाहीं.

मॅडेलीन रोमे रोलॉंशीं भेटण्यास त्यांच्या सुंदर कोठीवर गेली. एका परिचारिकेनें दार उघडलें. तिला एका लहान खोलींत बसविलें गेलें. रोमे रोलॉं येताहेत असें आश्वासन मिळालें. पाउलें वाजलीं. मॅडेलीन अधीरतेनें उभी

राहिली. तिला दार उघडतांना एक छानदार हात दिसला. रोमे रोलाँ खोलींत आले. मॅडेलीनची रोमे रोलाँवर नजर पडली. त्यांच्या सात्त्विक चेहऱ्यावर मंद स्मित झळकत होतें. त्यांचे निळे डोळे मॅडेलीनच्या हृदयाचा ठाव घेत होते. ती अबोल पण बोलकी भेट होती. खूप विचारायचं होतं आणि कांहींहि विचारलं गेलं नाहीं. खोलींतल्या मौनांतच एक प्रकारचं चैतन्य मॅडेलीनला भासलं. त्या शांतीचा भंग केला रोमे रोलाँच्या प्रेमळ बहिणीनें. तिनें त्यांना बाहेरच्या दालनांत चहाला पाचारण केलें. औपचारिक आभार उभयपक्षीं मानले गेले. मॅडेलीन संमोहवृत्तींतच रोमे रोलाँच्या घराबाहेर पडली. चार पांच दिवस तिच्या अंतर्मनांतील आंदोलनामुळें ती दऱ्याखोऱ्यांत फिरली. रोमे रोलाँचा मौन संदेश ती निसर्गाच्या रम्य आविष्कारांत शोधीत होती.

चार दिवसांनंतर तिला रोमे रोलाँकडून एक सप्रेम भेट आली. भेट एका गायन-पुस्तकाची. साधीच. लहानशी. रोमे रोलाँ विसरले नव्हते तर! पुन्हां भेटले पाहिजेच. पुनश्च भेटीची सवलत मागितली. पुन्हां चहाचें निमंत्रण आलें.

त्या खोलींतच भेट झाली. या वेळीं मुक्तकंठाने दोघेहि बोलत होतीं. रोमे रोलाँ विचारमग्नतेंतच आत्मगत भाष्य करीत होते. मॅडेलीन एकाग्रचित्तानें ते विचार टिपत होती. प्रवास करावा. अनेक देशांला जावें. हिंदुस्थानाला अवश्य भेट द्यावी. तेथें महात्मा गांधी आहेत. आपले 'महात्मा गांधी' हें पुस्तक नुकतेंच तयार झालें आहे.

रोमे रोलाँची तंद्री तुटली. ते म्हणाले, "महात्मा गांधी नांव ऐकलें आहे कां?"

"नाहीं", मॅडेलीननें मख्ख चेहरा करून सांगितलें.

"आधुनिक युगांतला तो येशू ख्राईस्ट आहे." ते गंभीर शब्दांत बोलले.

ते उठले. उभे राहिले. पुन्हां त्यांचे निळे डोळे मॅडेलीनच्या हृदयांत खोल खोल शिरले. तिच्या हृदयांत सूक्ष्म अशी संवेदना उत्पन्न झाली. तिला रोमे रोलाँनीं जवळ घेतली. तिच्या दोन्ही गालांचा त्यांनीं आशीर्वादपर मुका घेतला. सात्त्विक भावानें त्यांनीं मॅडेलीनकडे पाहिलें. त्या प्रेममय निरोपानें मॅडेलीनला परमानंद मिळाला. त्या परमानंदाच्या सूर्यप्रकाशांत ती बहरली.

भटकली. " महात्मा गांधी " हे रोमे रोलाँचें पुस्तक तिनें विकत घेतलें. त्या पुस्तकाचीं पारायणें केलीं.

मॅडेलीनला मनीं मानलेल्या गुरुवर्यानें—रोमे रोलाँनें मूक संदेश दिला होता 'तूं महात्मा गांधींकडे जा'. आणि त्या संदेशाप्रमाणें एका ब्रिटिश ॲडमिरलची ही कन्या महात्मा गांधींकडे आली. तिनें महात्मा गांधींना पाहिलें. मॅडेलीनला तिचा देव मिळाला. गुरु सांपडला. मॅडेलीनचें मीरादेवींत रूपांतर झालें. महात्मा गांधीजींची ती सत्शिष्या बनली.

मॅडेलीनचा कायापालट मीरादेवींत झाल्यावर तिचा केशकलाप बदलला. कपडे बदलले. खाद्य बदललें. वृत्ति बदलल्या. शंभर टक्के ब्रिटिश युवती शंभर टक्के भारतीय बनली. पूर्वजन्मीचे धागेदोरे असल्याशिवाय मॅडेलीन ही परकाया प्रवेश करूं शकली नसती.

महात्मा गांधींची तिनें एकनिष्ठतेनें, एकाग्रतेनें सेवा केली आणि पर्यायानें हिंदुस्थानची सेवा केली. प्रभावी व्यक्ति म्हणून गांधीजींची पूजा आणि त्यांचें विराट स्वरूप म्हणून हिंदुस्थानची सेवा. एका बाजूला देशसेवेचें कंकण, दुसऱ्या बाजूला साक्षात्कारी गुरुवर्यांचें मानसिक पूजन. हें स्वदेवतेचें पूजन करतांना अनेक अडचणींचा प्रहार, अनंत यातनांचें दारुण दुःख, छळवादी परीक्षा, अनेक दिव्यांतून परिभ्रमण, तुरुंगवास, हाल, रोगराईच्या खाईंतून प्रखर जीवन, समज—गैरसमज, असिधाराव्रताची परमोच्च पायरी. ईश्वर मिळविण्यासाठीं एकनिष्ठ भक्त जसा अमर्याद त्यागाला तयार होतो त्याप्रमाणें मीराबेननें आपल्या जीवनाचा सुकर्मयुक्त गुच्छ करून महात्माजींच्या पायांवर अर्पण केला. कारण ज्या दिवशीं तिची महात्माजींवर दृष्टि पडली त्या दिवशीं मीरादेवीची मनोमय खात्री झाली—या विनम्र, त्यागी, शांतियुक्त व सत्याग्रही विभूतींत आपल्या जीवनाचें सारसर्वस्व आहे. या विभूतीच्या अविरत सेवेंत आपल्या जीवनाचें सार्थक आहे.

मीराबेनचा हिंदी अभ्यास म्हणजे तिच्या जीवनांतील विनोदी प्रकरण आहे. जमेना पण सोडवेना! पण १०० टक्के हिंदी मीराबाईला आलें नाहीं तरी ती 'हिंदी' शिकली. चरखा फिरविणें, सूत कातणें, हरिजनांची सेवा करणें, त्यांच्यांत राहणें, रमणें—खाण्यापिण्याचे प्रयोग, प्रयोगी शास्त्र-

ज्ञाच्या अभिनिवेशानें करणें, गांधीजींची व्यक्तिगत सेवा करणें, वेद, कुराण, उपनिषदें, महाभारत, रामायण यांचा सतत अभ्यास करणें, महात्मा आदेश देतील त्याप्रमाणें आपल्या आचारांत विचारांत आमूलाग्र बदल करणें, या आश्रमांतून त्या आश्रमांत आत्मविकसनासाठीं व आत्मिक प्रयोगासाठीं फिरणें, अनेक प्रवृत्तींच्या आणि विकृतींच्या माणसांबरोबर काम करून आपली सहनशीलता, शांति आणि समतोलपणा जराहि ढळू न देणें अशा अनेकविध आणि वैचित्र्यपूर्ण ऐहिक कार्यांतून या विलायती मीराबाईनें आपला परमार्थ साधण्याचें महत्कार्य केलें. नव्हे तिनें परमार्थ गांठला.

गांधीजींचा मिठाचा सत्याग्रह म्हणजे ब्रिटनच्या दिवाळखोरीची मीरा-बेनला नांदी वाटली. ब्रिटिश साम्राज्याचा निःशस्त्र प्रतिकार म्हणजें स्वातंत्र्ययुद्धाचा अजब प्रयोग वाटला. गांधीजींचीं अस्त्रें सत्याग्रह आणि अहिंसा हीं तिला राजकारणांतील दिव्य तत्त्वप्रणालि वाटली. गांधीजींच्या ब्रिटिश प्रतिनिधींशीं—लाटसाहेबांच्या भेटी तिला हृद्य वाटल्या. एका बाजूला दांतविरहित, आखूड धोतर पेहरलेला, पायांत चपला घातलेला, उघडा बोडका, हातांत गुराख्याची काठी घेतलेला, हिंदुस्थानचा प्रतिमात्मक प्रतिनिधि आणि दुसऱ्या बाजूला वैभवसंपन्न ब्रिटिश साम्राज्याचे वैभवशील प्रतिनिधि! अतवर्य असें हे मीराबाईला संपर्क वाटले. व्हाइसरॉयच्या कोठींत बसून महात्माजी जेव्हां जेलच्या तवकडीतून दूध आणि खजूर खात आणि लाटसाहेब अनि-मिष नेत्रांनीं त्या दृश्याकडे पाहात तेव्हां मीराबेनना साक्षात्कार व्हायचा कीं ह्या महात्म्यानें लाटसाहेबाच्या कोठीवर गरीब हिंदुस्थानचें लोण पोहोंच-विलें आहे. महात्म्याच्या सान्निध्यांत खडतर तपश्चर्या करीत असतांना या मीराबेनच्या कविहृदयाला कधीं मैना भुरळ घाली, कधीं टोळ तिच्याकडे येऊन लगट करीत. केव्हां जमुना गाईवर ती अमर्याद प्रेम करी. तर केव्हां तिचा आवडता घोडा मन्ना तिला वेड लावी. तुरुंगांत दिवस काढतांना तिला हिरवं पान क्षणभर मुग्ध करी. जेलच्या गवाक्षांतून वडाचं झाड पाहिलं तर तिचं मन थरारायचं आणि जेलच्या कोंदट खोलीपेक्षां उघड्या जागेंत झोपून लुकलुकणाऱ्या तारकांच्या लपालपीचा डाव पाहण्यांत तिचे डोळे विद्ध होत असत आणि झोप कधीं लागे तेंहि तिला कळत नसे. आणि गांधी-

वधानंतर तर हिमालयाच्या नंदनवनांत फिरतांना आपण स्वर्गीय परिसरांत फिरत आहों असा तिला भास होई.

घरदार सोडलेली बाई. वडील निवर्तले. आई गेली. बहीण वारली. मीराबाईनें विरक्तता सोडली नाहीं. गांधीजींचा वध झाला. अमानुष वध झाला. मीराबाईनें आपल्या गुरूनें दिलेलें ग्रामसेवेचें काम सोडलें नाहीं. एकदांच एक वैयक्तिक मोह मनांत उत्पन्न झाला. पृथ्वीसिंग नांवाचा एक क्रांतिकारक पुरुष गांधीजींच्याकडे आला. त्याचें हृदयपरिवर्तन झालें होतें. तो अहिंसेचा एकनिष्ठ भक्त होण्यापूर्वीचा त्याचा इतिहास रोमांचकारी आणि रोमहर्षक होता. ह्या मनोवेधक पुरुषाबद्दल मीराबेनच्या मनांत एक मनोहर लहरी उत्पन्न झाली. गांधीजींनीं 'तूं लग्न कर' म्हणून अनुज्ञा दिली. मीराबाईच्या मनांत प्रेममय जीवनाचं चक्री वादळ सुरू झालं. निरासक्त सेवेला वाहिलेल्या या विदुषीच्या मनांत थोडा वेळ कां होईना पण प्रेमपिपासा निर्माण झाली. पण पृथ्वीसिंगानेंच या तरल लहरीला खो दिला. मीराबाईचें मन जागीं आलें. मानवी मन तिनें मागें टाकलें. निर्मनुष्य हिमालयाच्या परिसरांत तिनें तपोबळानें मन ताळ्यावर आणलें आणि पुन्हां विरक्ति आणि निरासक्तीनें आपली अखंड मानवसेवा सुरू केली. ऋग्वेदाच्या अभ्यासानें मन पुनीत केलें आणि सृष्टिसौंदर्याच्या शांत, शीतल आणि एकांतिक वातावरणांत मनाला आत्मिक पीळ मिळाला. मन उन्नत झालें.

गांधीवधानंतर मीराबाईनें अनेक प्रयोग केले. गांधीजींची तत्त्वप्रणालि मन:पूर्वक पाळली. खादी टोपीवाले बदलले, पण ती बदलली नाहीं. कॉंग्रेसवाले सरकार झाल्यानंतर त्यांच्यांत आमूलाग्र बदल झालेला पाहून तिचं मन विरसलं. ब्रिटिश ब्युराक्रसीच्या पायांवर पाय ठेवून जेव्हां कॉंग्रेस सरकारनें 'स्वराज्य' चालवायला सुरुवात केली तेव्हां तिला शिसारी आली. गांधीवधाबरोबर गांधीयुग संपलं असं तिला वाटलं. ती श्रमली होती–भागली होती. तिला आत्मसुखाची ओढ लागली होती. ती ओढ पुरी करण्यासाटीं, सविकल्प समाधि साधण्यासाठीं तिला या तप्त वातावरणांतून शीतल अशा व्हिएन्ना येथील बेडनच्या जंगलांत वास्तव्य करावें लागलें आहे. या स्त्रीनें जगांतील महान् व्यक्तीच्या सान्निध्यांत १९२५ ते १९४८ पर्यंतचा

काळ घालविला. महात्माजींबरोबर दुःख, दारिद्रय आणि दुरापास्त स्थिति अनुभवून आपल्या मानलेल्या मायभूमीचा त्याग, एकनिष्ठता आणि पारमार्थिक प्रसन्नतेनें सेवा केली.

आज परदेशांतील जंगलांत मीराबाईचें पारमार्थिक मन सत्य शोधीत आहे. नादलहरी ऐकत आहे. प्रवृत्तीनें ईश्वर जाणत आहे. मीराबाईच्या आत्म्याची यात्रा चालूच आहे.

* * *

# आमचे काकासाहेब

: २६ :

आमचे काकासाहेब म्हटलें म्हणजे काकासाहेब गाडगीळ डोळ्यांसमोर उभे राहतात. महाराष्ट्रांत अद्वितीय असे हे एकच काकासाहेब असल्यामुळें कुणालाहि त्यांची आठवण झाली तर त्यांत नवल काय ? परंतु मी ज्या काकासाहेबांचें स्मरण करतों आहे ते काकासाहेब खाजगींतले. माझे सख्खे चुलते. सार्वजनिक जीवनाशीं त्यांचा सुतराम संबंध नाहीं. व्यक्ति लहान खरी, पण ठसठशीत; बांधेसूद आणि ध्यानांत राहण्यासारखी. म्हणूनच आज माझी साठी उलटली तरी या म्हाताऱ्याची माझी आठवण बुजलेली नाहीं.

हे माझे काकासाहेब उंचेपुरे पांच फूट चार इंच होते. गौरवर्ण, भालप्रदेश मोठा, वरती तुळतुळीत गोटा, लांबलचक शेंडी, नाक लांबट, डोळे मांजरासारखे, शरीरयष्टि कमावलेली आणि दिसायला रुबाबदार मनुष्य. जवळ जवळ चारुदत्तच दिसायचे. त्यांच्या वेळच्या पोरी त्यांच्यावर खूष होत्या कीं नाहीं हें कळणें कठीण. परंतु आज आमचे काकासाहेब जर हयात असते

आणि ते तरुण असते तर बऱ्याच पोरी त्यांच्यावर बेहद्द खूष झाल्या असत्याच. तो जमानाच असा होता कीं, पोरी घरींच बसत. लग्नें व्हायचीं सात–आठ वर्षांच्या असतांना; आणि मग चूल आणि मूल ! तेव्हां प्रेम, मोहब्बत या सर्व गोष्टी त्या काळांत नव्हत्याच असेंच म्हणावें लागेल.

काकासाहेब पोर्ट ट्रस्टमध्यें काम करीत असत. सकाळीं साडेनऊला जेवणखाण करीत असत व कामाला जात असत. दोरासारखें पागोटें, अलपक साधे धोतर, पायांत जोडा असा त्यांचा थाट असे. स्वारी रस्त्यांतून निघाली कीं आमच्या वाडींतले लोक नमून नमस्कार करीत असत. तें बघून आमची छाती भरत असे. आम्हांला असं वाटायला लागायचं कीं काकासाहेब कोणत्या तरी मोठ्या हुद्द्यावर असणार. मात्र त्यांचा हुद्दा कोणता म्हणून त्यांना किंवा सौभाग्यवती काकीसाहेबांना विचारण्याची सोय नव्हती. त्या वेळच्या शिरस्त्याप्रमाणें असे भलते सलते प्रश्न विचारले कीं तोंडांत चपराक मिळत असे.

ज्याप्रमाणें काकासाहेबांचा हुद्दा आम्हांला माहीत नव्हता त्याचप्रमाणें त्यांचें शिक्षण किती झालें आहे याचेंहि ज्ञान नव्हतें. काकासाहेबांचा स्वभाव मितभाषी, त्यामुळें त्यांच्या भाषणावरून ते कितपत शिकलेले आहेत याचा आम्हांला कयास लागत नव्हता. पण मोठा शिस्तीचा मनुष्य. उठणें सकाळीं चार वाजतां. दोन तास सकाळीं पूजाअर्चा. नंतर जेवण. नियमित कचेरी, संध्याकाळी बरोबर सहा वाजतां कचेरींतून परत, अर्धा शेर दूध घेऊन फिरायला जाणें, अर्ध्या तासानें परत आणि मग एका चौरंगासमोर एक जाडजूड पुस्तक घेऊन ते बसत आणि त्या चौरंगाच्या आजूबाजूला आम्ही सगळ्या मुलांमुलींनीं आपापलीं पुस्तकें घेऊन अभ्यास करावयास बसण्याची सवित. हा कार्यक्रम वर्षानुवर्षे चालला होता. आणि इतका नियमित वर्ग तुम्हांला कुठल्याहि उत्तम शाळेमध्यें सांपडला नसता.

सौभाग्यवती काकीसाहेब या दिसायला नीटस, वागायला लोभस आणि कर्तृत्वानें हिशेबी अशा होत्या. त्या स्वतःच म्हणत असत कीं, आमचे यजमान म्हणजे सोंग आहे. पण आपण मालवणी असल्यामुळें हिशोबी. आपला गांव

म्हणजे मामा वरेरकरांचा गांव, म्हणजे हिशेबी माणसांचा गांव. म्हणजे मालवण म्हणजे हिशेबी माणसांचा गांव असें त्या समजावून सांगत असत. सौभाग्यावती काकीसाहेब यांना मुलेंबाळें नव्हतीं. त्यामुळें आम्ही सात पुतणें आणि चार पुतण्या यांच्यावरच त्यांचें अनंत प्रेम. खरं म्हणजे आमचे सर्व लाड पुरविले ते काकीसाहेबांनीं. आम्हां सगळ्यांना घेऊन त्या मारोतीला जात आणि सकाळीं आंघोळीचा मोठा रंगीत कार्यक्रम होई. पांच–सात मुलांना एकाच वेळेला आंघोळ घालून काढण्याची त्यांची करामत अजब आणि अपूर्व होती. त्या वेळेला आम्ही मुलें जो हलकल्लोळ माजवायचों तो इतका भयंकर असायचा कीं त्यापुढें आजच्या अॅटम बॉम्बचा आवाज कमीच मानावा लागेल. तिथं त्या एका मोठ्या घंगाळांतील पाण्यानें आम्हांला बुचकाळून काढावयाच्या बकऱ्यासारखें! आम्हांपैकीं कांहींना असं वाटायचं कीं काकी पूर्वजन्मीं अरब देशांतल्या असाव्यात अथवा मारवाडांतल्या. कारण या दोन्ही देशांत कमीत कमी पाण्यांत जास्तीत जास्त आंघोळी उरकण्याचा प्रघात आहे असें आम्हांपैकीं कुणी तरी ऐकलें होतें.

काकी खाण्याचे पदार्थ आपल्या कपड्यामध्यें कुठें कुठें लपवीत असत तें सांगणें कठीण. पोरगं रडायला लागलं कीं काकी कुठें तरी हात खुपशीत, कांहीं तरी खाणें त्यांनीं काढलेंच आणि बचक भरून त्या त्या मुलाच्या तोंडांत घातलें कीं मुलांनीं किंवा मुलींनीं रडण्याचें साफ बंद केलेंच म्हणून समजा. सकाळीं, दुपारीं, संध्याकाळीं, रात्रीं केव्हांहि मुलं रडोत, सौभाग्यवती काकीसाहेबांचा एकच उपाय आणि तो म्हणजे त्यांच्या तोंडांत खाणें दाबणें. खाणें दाबलें कीं रडणें कमी हा त्यांचा एक सिद्धांतच होता. मुलांबरोबर कधीं कधीं त्यांच्या तोंडांतहि बचकभर–पुष्कळसें–खाणें जायचें. पण यजमानांशीं फारसें बोलणें नसल्यामुळें त्यांना हें बचके गिळायला अवसर फार मोठा असायचा. काकीसाहेबांनीं आम्हांला लावलेली ही अवेळीं खाण्याची संवय आजहि आम्हां सगळ्यांना नडते. रात्रीं, अपरात्रीं उठल्यानंतर आज आम्ही सर्व मोठे झालों असतांनाहि चरतो. खाण्याची संवय एकदां जी लागली ती कांहीं केल्या जात नाहीं. सौभाग्यवती काकीसाहेब कुठेंहि मंदिरांत गेल्या, लग्नाला गेल्या अथवा मुंजीला गेल्या तरी त्यांच्याबरोबर जाणें आम्हांला कठीण वाटत असे. त्याचें कारण लग्नाला किंवा मुंजीला

गेल्या कीं त्या घरच्या सर्व लोकांचे नारळ मागून घेत असत. त्या वेळीं मात्र आम्ही मंडळी त्यांच्यापासून दूर होऊन त्या वेळेपुरती तरी त्यांना सोडचिठ्ठी देत असूं.

काकासाहेब आणि काकीसाहेब यांचा संसार सुखाचा झाला याबद्दल कांही शंका नाही. पण हा संसार अपुरा संसार आहे. काकीसाहेबांचें काकासाहेबांशीं बोलणेंच कमी. काकीसाहेबांचें बोलणें फार पण तें इतरांशीं. यजमानांशीं नाहीं. त्यांची मुळीं नजरच बोलत असे. त्या म्हणत असत त्यांना मुळीं कळतें तरी काय ? तेव्हां त्यांना मी काय बोलूं ? असें त्या —काकासाहेबांबद्दल—आपल्या यजमानांबद्दल बोलत असत. तरी पण काकासाहेबांच्या लहान सहान गोष्टीकडे त्या विलक्षण लक्ष पुरवीत असत. काकासाहेबांचें खाणें, पिणें, त्यांच्या धोतराच्या निऱ्या बांधणें, त्यांच्या लहान लहान गोष्टी नीट ठेवणें, त्यांना योग्य त्या वेळीं वा अवेळीं या सर्व गोष्टी देत असत आणि त्यांची पुष्कळच दक्षता बाळगीत असत. पण कधीं ना कधीं तरी त्या आपल्या यजमानांना सोंग तरी म्हणत किंवा डोकं नाहीं असें नाक हालवून दाखवीत.

बरींच वर्षे आम्हांला काकीसाहेबांच्या या बोलण्याचा अर्थ कळत नसे. त्याचें कारण काकासाहेबांचा चेहरा, डोळे आणि भालप्रदेशच मुळीं फसवा असा होता. त्यांच्या चर्येकडे पाहिलं कीं असं वाटायचं कीं हे आगरकर, गोखले, टिळक यांपैकीं कुणी तरी असणारच. तेव्हां तीक्ष्ण बुद्धि आणि उत्तम तजेला त्यांच्यांत असणारच ही खात्री. कपड्यांमुळें आम्हांला त्यांना चर-तांना पाहणें कठीण जात असे. शिवाय त्या वेळेला ते अत्यंत गंभीर होत आणि त्यांच्या हातांत एक जाडजूड पुस्तक असायलाच हवं आणि तें सारं ते चाळीत असत. आपण वाचीत आहोंत असं ते भासवीत असत. त्यांच्या-समोर तीन-चार तास चौरंगाच्या आजूबाजूला बसावं लागल्यामुळें आम्हां सर्वांना सक्तीनं अभ्यास करावा लागे आणि त्यामुळें आमचा वर्गामध्यें सगळ्यांचा नंबर पहिला, दुसरा, तिसरा असा असे. अभ्यास तसा पाहिला तर आवडत नसतांनाहि परीक्षेंत मात्र आम्ही पहिले. हा पहिला, दुसरा, तिसरा नंबर कसा काय हें कोडं बऱ्याचजणांना सुटत नसे. पण आमचे प्रेरक म्हणजे तो चौरंग आणि त्या चौरंगासमोर बसलेले स्थितप्रज्ञ काका-

ते बसत व तो चौरंग तिथें मध्यें असे म्हणून आमचा अभ्यास अथवा नालझाजानें केलेला अभ्यास आणि त्यामुळें आमच्यांत नसतांनासुद्धां आम्हांला हुशारी मात्र सदा चिकटलेली. आमचे बंधु असेंच चांगले एम्. ए. झाले. कुणी काय झाले, कुणी काय झाले. पण सगळ्यांचा क्लास ( वर्ग ) पहिलाच. कारण मात्र काकांची सक्ति आणि त्या चौरंगासमोरचा तो अभ्यास. मी बी. ए. झाल्यानंतर एक दिवस शाळेंतल्या एका पुस्तकांतील एक संस्कृत श्लोक जेव्हां काकासाहेबांना विचारला, त्या वेळेला त्यांनीं मला स्पष्ट उत्तर दिलं कीं मला संस्कृतबिस्कृत कांहीं येत नाहीं. मी सर्दच झालों. त्यांच्या हातांत मोठमोठे ग्रंथ पाहून त्यांच्या ज्ञानाबद्दल आम्हांला आदर वाटत असे, मोठा आदर वाटत असे. पण त्याला तेव्हां धक्का पोहोंचला. आणि मी आ वासून त्यांच्याकडे पाहात राहिलों. त्यानंतर सगळ्यांचाच धीर चेपत गेला आणि प्रत्येक विषयावर कठीण कठीण प्रश्नांची सरबत्ती ज्या वेळेला काकासाहेबांवर व्हायला लागली त्या वेळेला आम्हांला संपूर्णपणें कळून चुकलं कीं, काकासाहेब अज्ञानी होते, काकासाहेबांना कांहींच येत नाहीं. पण त्यांच्या अज्ञानामुळें त्यांनीं मात्र आम्हांला सुज्ञ केलें. काकीसाहेबांना ज्या वेळेला आम्ही आमचा हा शोध सांगितला तेव्हां त्या बाईला मात्र कांहींच आश्चर्य वाटलं नाही. त्या चटकन् म्हणाल्या, "त्यांत नवल तें काय ? ते बख्खड आहेत हें मला केव्हांच माहीत होतं." यामुळें मात्र आमचा आदर या बाईबद्दल फारच वाढला. कीं जी गोष्ट कळायला आम्हांला १०–१५ वर्षें लागलीं ती या बाईला मात्र संपूर्ण माहीत होती. तेव्हांपासून मात्र काकासाहेबांबद्दल आमचा आदर कमी कमी होत चालला. जेव्हां आम्ही काकांचे ग्रंथ पाहायला लागलों तेव्हां आम्हांला असें दिसून आलें कीं ते पोर्ट ट्रस्टच्या ग्रंथ संग्रहालयांतील केमिस्ट्री अथवा फिजिक्सवरील क्लिष्ट असे ग्रंथ होते. ते कधींहि त्यांनीं पाहिलें नव्हते, वाचले नव्हते. परंतु काकासाहेब नियमितपणें ते घरीं आणीत आणि ते आपण वाचीत आहोंत असा भास आमच्यासमोर करीत आणि त्यांच्या त्या 'गाढ' वाचनाच्या आविर्भावामुळें आम्हांला मात्र त्यांची फार भीति वाटे व आम्ही आमचें वाचन नीट करीत असूं. आम्हांला बनविण्याची बुद्धि काकासाहेबांमध्यें होती यावरून त्यांना बुद्धि होती हें खास. परंतु काकीसाहेबांचें म्हणणें

असें कीं, हे गृहस्थ अबौद्धिक आहेत.ब्रह्मदेवानें सगळ्यांना अक्कल वाटली तेव्हां हे गैरहजर ! त्यामुळें त्यांची बुद्धि अनाथ; आणि आम्ही वयांत आल्यानंतर तर आम्हांला असें कळलें कीं काकासाहेब ज्या जागेवर एकदां पोर्ट ट्रस्टमध्यें जाऊन बसले तिथूनच ते सेवानिवृत्त (रिटायर्ड) झाले. म्हणजे कचेरीमधील त्यांची ही प्रगतीसुद्धां कांही विलक्षण नव्हती. पण त्यांच्या मितभाषीपणामुळें त्यांच्यावर हुशारीचें कवच होतें आणि त्यांच्या हातांतील पुस्तकांमुळें ग्रंथामुळें गाढ्या विद्वानाचें कवच होतें. ते एक गाढे विद्वान् आहेत अशी त्यांची ख्याती होती. कांहीं ज्ञान नसतांनाहि मोठेपण लाभणारें असे हे गृहस्थ चुकून तर अवतरले नाहींत ना, अशी आम्हां सर्व मंडळींना शंका होती, नव्हे तशी खात्री वाटत होती. आम्हांला त्यांचें इंगित कळलें म्हणून कधीं काकासाहेब रागावले नाहींत वा ते कधीं घाबरलेहि नाहींत. त्यांचा रोजचा व्यवहार जसाच्या तसाच चालत असे. भगवंतानें वर्णन केलेला स्थितप्रज्ञ माणूस हाच कीं काय, अशी आम्हांला नेहमींच पुढें शंका येत असे. ते असे जरी स्थितप्रज्ञ असले तरी आम्ही तें कांहीं बोलावयाचें नाहीं असेंच ठरवून टाकलें.

काकासाहेब निर्बुद्ध खरे, पण गोड स्वभावाचे. अबोल असल्यामुळें अजातशत्रु. चाकोरींतल्या जीवनापलीकडे ते कधींहि प्रायोगिक अवस्थेंत गेले नाहींत. म्हणून जीवन यशस्वी. बाहेरख्यालीपणा म्हणजे इतर स्त्रियांकडे पाहणें त्यांना माहीत नाहीं. आपला संसार बरा आणि आपण बरे. हॉटेलची पायरी ते कधीं चढले नाहींत. चढण्याची त्यांना कधीं इच्छाच झाली नाहीं. घरीं मात्र अवाच्या सवा पुख्खा झोडायला ते कमी करीत नसत. त्यामुळें बायकोचा शेरा 'खादाडभाऊ आहेत हे पट्टीचे.' नियमितपणा, मंडलिकांचा, कपडे एखाद्या थिऑसफीच्या अवतारी पुरुषासारखे झकपक. ब्राह्मणी जोडा खास बांधणीचा. सकाळीं साडेनऊला कचेरींत जायचं, संध्याकाळीं सहाला घरीं हजर. मग तो चौरंग, ते आम्ही सर्व, तें जाडें पुस्तक आणि ती उघड्या डोळ्यांची झोप. आम्ही सर्व मुलें–मुलीं हुशार निघालों. कोणी वकील झाला, कोणी सरकारी सनदी नोकर, कोणी डॉक्टर, कोणी धंदेवाला. मुली एम्. ए., बी. ए. झाल्या. याचें श्रेय काकासाहेबांना. मूकवृत्तीनें आपला मोठा आदब राखून त्यांनीं आम्हांला सक्तीनें त्या चौरंगासमोर

सकाळीं आणि संध्याकाळीं दोन तीन तास बसविलें नसतें तर आम्ही कोठल्या तरी भटारखान्यांत, गटारखान्यांत ६०–७० ची नोकरी करीत सडलों असतों. हस्तेंपरहस्तें कोणा माणसाचा काय उपयोग होतो तें सांगणें कठीण, काकासाहेब लहान पण त्यांचा महिमा मोठा. त्यांनीं आम्हांला मोठं केलं. नाही म्हटलं तर काकासाहेबांना एक व्यसन होतं. तें म्हणजे 'चंपी'. ही चंपी म्हणजे कोणी बाई नव्हे. 'चंपी' म्हणजे 'मालीश'. वेळीं अवेळीं चंपीवाल्याला बोलावून आपल्या तुकतुकीत अंगाची चंपी करून घेत. हाडन्‌हाड जेव्हां ते घुसळून घेत तेव्हां त्यांना आराम वाटे.

एकदां आमचे शेजारी नारायणराव गडबडदास धांपा टाकीतच आले व म्हणाले, "अहो, काकासाहेब त्या नवीवाडीच्या नाक्यावर निश्चेष्ट पडले आहेत". आमच्या घरीं धावाधाव झाली. आम्ही सर्व, सौ. काकीसाहेब सर्वच आम्ही पाहतो तर खरंच, काकासाहेब निश्चेष्ट पडले आहेत. ते घोरत होते म्हणून आमच्या जीवांत जीव आला. एवढयांत चंपीवाला तेथें आला. त्यानें काकासाहेबांना झोप लागली असें पाहिल्यावर सूं बाल्या केला होता व एक कप चहा व बटर-बिस्किटें खाऊन तो परत आला होता. सौ. काकीसाहेबांचा शेरा असा–त्यांचें हें नेहमींचेंच आहे. हाडं मोडकळीस आलीं तर सारखीं घुसळून घेतील आणि रस्त्यावर हा असा ओंगळ प्रकार करून आम्हांला सतावतील. काकासाहेबांनीं आपल्या सभोंवार गर्दी पाहिल्यावर ते उठले, खुदकन् हंसले एक शब्द न बोलतां घरीं पोहोंचले, बिछाना तयारच होता. जे पडले ते सकाळीं ६ वाजतां उठले.

* * *

# कामराज नाडर

**: २७ :**

अखिल भारतीय काँग्रेस सभेचें मुंबईचें अधिवेशन संपलें. रोज रु. २० हजारांचा बर्फ वितळला. त्यामुळें मला वाटतं अधिवेशनांत शैथिल्य, थंडपणा आणि उदासीनताच जास्त भासली. १९२२ ते १९४२ पर्यंत काँग्रेसच्या अधिवेशनांत चैतन्य असायचें. प्रतिभापूर्ण मार्गदर्शन असायचें. लोकांमध्यें उत्साह संचारायचा. तसें आतां कांहीं होत नाहीं. शीत वातावरणांत थंडेथंडेपणच जास्त. स्वातंत्र्यापूर्वीचा अभिनिवेष आणि जोष काँग्रेस सभांत आतां उरला नाहीं. प्रांतिक अधिवेशनांत लाथाळींच जास्त. त्या वेळीं विशेष जाणवला होता जवाहरलालजींचा गलितपणा. काँग्रेस श्रेष्ठींमधील बेदिलीपणा, बेगडीपणा पटला. विशेष दिसलें म्हणजे कामराजांचें प्रभावी व्यक्तिमत्त्व. ती मूर्ति मुंबईकरांच्या मनावर ठसली. मुंबईकरांना आवडली. तुमचीं राजकीय मतें कांहींहि असोत, तुम्हांला कामराजांचें व्यक्तित्व खात्रीनें आकर्षक वाटेल.

जिवंतपणीं ज्या माणसाचा पुतळा मद्रास येथील कुअम नदीच्या चिखली मातींत उभा आहे, ज्यांच्यावर एकूण एक मद्रासी खूप खूष आहेत, ज्यांनीं शिक्षण नसतांना, पैशाचें पाठबळ नसतांना, केवळ निर्धार, दीर्घोद्योग, प्रामाणिकपणा आणि व्यवहारीपणा यांच्या जोरावर आपल्या देशबांधवां-कडून अवतारी पुरुष म्हणून पूजा बांधून घेतली, त्यांना पाहिजे म्हणून नव्हे तर लोकांनीं ती सहजस्फूर्त बांधली; त्यांनीं मात्र या मुंबईतील कॉंग्रेस अधिवेशनाचें अधिपत्य कणखरपणें, न बोलतां, वेळेचा अपव्यय न करतां, बोलघेवड्या लोकांना प्रत्यही गप्प बसवून एखाद्या कसलेल्या अध्यक्षाप्रमाणें केलें.

राज्यकर्ता म्हणून ते महशूर आहेत. आतां उत्तम अध्यक्ष असा त्यांचा बोलबाला होत आहे. कमी बोलून जास्त काम करू घेणें ही कामराजांची प्रकृति आहे.

एखाद्या कसलेल्या धन्वंतऱ्याप्रमाणें कामराजांनीं कॉंग्रेसच्या रोगाचें निदान केलें व भारतीय तत्त्वज्ञानांतलें उच्चत्तम तत्त्वज्ञान म्हणजे त्याग ही दिव्य औषधी उपचार म्हणून पुढें केली. कॉंग्रेसची पापविमुक्ति, रोगनिवृत्ति करण्यासाठीं बारा श्रेष्ठींना नेहरूंकरवीं त्यांनीं मुख्य जागा सोडायला लावल्या. स्वतः ते निवृत्त झाले व कॉंग्रेस सेवेला लागले. या कायापालटीनें कॉंग्रेस किती सकस, निरोगी, दणकट झाली आहे हें सांगणें कठीण. पण 'कामराज कार्यक्रम' हा नेहरूंचा कॉंग्रेस पुनरुत्थापनाचा एक मोठा प्रकल्प होता आणि एऱ्हवीं सुस्त असलेली जनता जागृत झाली, सावरली, डोळे उघडून पाहूं लागली. पुढें काय होणार तें, या ज्वलंत क्रियेमागचें चैतन्यमय धुरिणत्व कोणाचें असेल तर तें कामराजांचें होय.

कामराज १०० टक्के भारतीय दिसतात, वागतात. भारतीय राजकीय जगांतले ते खेडूत आहेत. राठस मिशा, खडकाळ चेहरा, डोक्याला टक्कल. सूजमीट डोळे, असा त्यांचा अवतार आहे. उंची ६ फूट, अंगांत एक अजा-गळी शर्ट आणि मद्रासी गुंडाळलेली धोती असें त्यांचें ध्यान आहे. अस्सल मद्रासी 'अप्पा' म्हणून हांक मारली तर ते 'ओ' म्हणून साद देतील.

एऱ्हवीं गबाळ, ओंगळ दिसणारा माणूस आंतून तयार आहे. त्याला अभिजात शहाणपणा, ईश्वरदत्त वर मिळाला आहे. पुढारीपण त्यांच्या सटीलाच पुजलेला आहे. ते तामीळ भाषा जाणतात. तीहि ते मापानें बोलतात. कमी बोलणें हाच मुळीं स्थायीभाव. लोकनायक खरे, पण लोकानुवर्ती होण्याकडे कटाक्ष. कामावर विश्वास. नुसत्या तत्त्वप्रणालीवर नव्हे. आणि निर्धार–निर्णय एकदां घेतला कीं कायम. सर्वसंगपरित्याग करण्याची सदैव तयारी–त्यामुळें निर्भीडपणा रामशास्त्र्यांचा.

जन्म मद्रासकडील विरुदनगरचा. शाळेंतून पलायन करणारा मुलगा पोतीं खोलून व्यापार करणारा गांधीवादी झाला–सत्याग्रही बनला. आणि राजकारणांत तंबू ठोकला तो कायमचा. सत्यमूर्तींचें शिष्यत्व कामीं आलें. एक अशिक्षित, अनाथ युवक सत्यमूर्तींच्या स्पर्शानें पावन झाला. आणि अगणित अनामिकांच्या रांगेंतून प्रकर्षानें प्रगट होऊन पुढारी बनला. अग्रेसर लोकनायक झाला. सत्यमूर्तींच्या आशीर्वादानें तामीळनाडचें अध्यक्षपद भूषीत केलें आणि मग मद्रासच्या मुख्यमंत्रिपदाचा राजमुकुट त्यांच्या माथ्यावर झळकला. मात्र त्या राजमुकुटाच्या भारानें ते दबले गेले नाहींत. लोकसेवक हेंच व्रत त्यांनीं चालू ठेवलें. तेंच चालू आहे.

बोलणें कमी. विशेष प्रिय मौन. संघटनाचातुर्य विलक्षण, पण त्याबद्दल दिमाख नाहीं कीं दर्प नाहीं. कामांत सुसूत्रपणा खरा पण थाट नाहीं कीं मिजास नाहीं. मांडी ठोकून बसायचं आणि काम करायचं. नको शीत कमरा कीं साहेबी टेबल–खुर्ची. आत्मनिष्ठ बैठक. त्यामुळें देशबांधवांच्या नाडीचें अगाध ज्ञान. अनेकांनीं आघात केले. पुष्कळांनीं वाळींत टाकलें. राजागोपालाचारींसारख्यांशीं–अजस्र, अद्वितीय, विद्वज्जनांशी दोन हात करावे लागले, पण शेवटीं सरशी झाली सरळ मनाच्या या माणसाची. विवेकी, वैराग्यशील, देशाच्या पाइकाची. खऱ्याखुऱ्या देशसेवकाची तपस्या. ज्याला नको मान त्याला मिळाला सन्मान. ज्याला नको मंत्रिपद त्याला घ्यावें लागलें मुख्य मंत्रिपद, आणि जो मद्रासच्या परिसरांत चमकेल कीं नाहीं अशी शंकामय स्थिति, तो आज काँग्रेसचा अध्यक्ष होऊन बसला आहे. पुढलं भवितव्य काय ? त्याबद्दल न बोलणें बरें. पण तें उज्ज्वल आहे खास.

नेहरू होते ईश्वरानें खास मुशींतून ओतलेले एक प्रतिभासंपन्न, तेजःपुंज पुरुष. पण, त्यांचें युग संपलें. ज्यांचें दर्शन घेण्यासाठी लोक जीव टाकीत तो आमचा नेता आपल्यांतून गेला आहे. त्याच्या धोरणाचे लचके पडत आहेत. त्यांच्या जिव्हारीं लागेल अशी टीका त्याच्यावर होत आहे. दिव्य वस्त्रें पेहरून आलेला लोकनायक अखेर आमच्यासारखाच हाडामासाचा माणूस होता कीं काय असें आतां वाटायला लागलें आहे.

अशा वेळीं कामराज भारतीय क्षितिजावर झळकायला लागले आहेत. नेहरू व कामराज यांच्यांत जमीन-अस्मानाचा फरक आहे.. नेहरूंचा थाट सम्राटाचा होता पण व्यासंग महापंडिताचा होता. व्यक्तित्व असाधारण होतं. त्याग फार मोठा होता. भरारी गरुडाची होती. कामराजांत साधे-पणाची कमाल आहे. जन्म, शिक्षण, घराणें वगैरे बाबतीत व्यस्त प्रमाण आहे. त्यांचे पाय मात्र जमिनीत रुतलेले आहेत. अबोल असून ते लोकांना मोहीत करतात. अबोल वृत्तीनें कामाचे डोंगर उचलतात. जवाहरलालजीं-मध्यें भारतीय व पाश्चात्त्य संस्कृतींचा संगम, तर कामराजांमध्यें भारतीय संस्कृतीचा परमोत्कर्ष.

इंग्रज गेला तरी जवाहरलालजींच्या रूपांत इंग्रजच आमचा लोकनेता राहिला होता. यापुढें आमचें नेतृत्व शंभर टक्के भारतीयाकडे जाण्याचें तर चिन्ह नाहीं ना ? उत्तर कीं दक्षिण श्रेष्ठ हा प्रश्न आम्हांला नेहमींच भेड-सावीत असतो. भारतीय पातळीवरून पाहतां त्यांत तथ्य नाहीं. पण गंमत म्हणून विचार केला तर मात्र दिसतें कीं, मद्रासी इडली डोसा भारतांत सर्वत्र आतां आवडूं लागलीं आहेत. परदेशांत त्यांची लज्जत पाश्चात्त्य लोक लुटूं लागले आहेत. दक्षिणी माणूस आतां थेट चंदीगडपासून तो राजस्थान-पर्यंत आणि संयुक्त प्रांतापासून तो गुजरातपर्यंत नोकरीनिमित्त स्थायिक झाला आहे. मुंबईत तर माटुंग्याचें माटुंगम झालें आहे. दिल्ली मद्राशांनीं व्यापली आहे. आतां राजकारणांतहि त्यांचेकडे म्होरकेपणा येत आहे. आणि हें म्होरकेपण विशेष ठळकपणें मद्रासला मिळवून देण्यास कामराज कारणीभूत आहेत.

नेहरूंनंतर कोण याचा जेव्हां जेव्हां ऊहापोह होत होता तेव्हां तेव्हां नंदा की शास्त्री असा प्रश्न उभा राहात होता. श्रीमति इंदिरा गांधीना तर

आपला वारसा म्हणून जवाहरलाल नेमणार नाहींत ना असा प्रश्न मनाला चाटून जात होता. एकुलत्या पोरीची माया क्षणभर जवाहरलाल-जींना मोह कदाचित् घालील असें वाटत होतें. माणूसवाणे मोरारजी देसाई त्यांच्या चोख राज्यकारभाराच्या बांकेपणामुळें पुनश्च येतील का ? उत्तम ग्रहमान असल्यामुळें चव्हाणांना दिल्लीची वारसदारी सहजगत्या माळ घालणार तर नाहीं ? अशोक मेहता तर जवाहरलालजींचे मानसपुत्र. त्यांचे-कडे दिल्लीचें तक्त येणार नाहीं ना ? आणि दक्षिणेचे टी. टी. कृष्णाम्माचारी, ते ही गादी बळकावून बसणार नाहींत कशावरून ? नेहरूंच्या वारसाचें हें गौडबंगाल म्हणजे भुलभुलावणीचं न सुटणार कोडं होतं. आतां शास्त्री झाले मुख्य प्रधान, पण खऱ्या अर्थानें धुरिणत्व आलें कामराजांकडे.

आम्हां मुंबईकरांना मात्र असं वाटतं कीं निरपेक्ष, वैराग्यपूर्ण, निरंहकारी आणि त्यागी कामराजांना भारतीय प्रजा नेतृत्व देईल. तसें नेतृत्व आपोआप त्यांचेकडे आलें आहे. हिरा जसा पाजळावा तसा तो जास्त चमकतो. तसें कामराज निरनिराळ्या क्षेत्रांत पाऊल घालत आहेत. तसतशी त्यांचीं नव-नवीन रूपें भारताला मोहित करून टाकीत आहेत. त्यांच्यांत हेवेदावे नाहींत. स्वार्थ नाहीं, महत्त्वाकांक्षा नाहीं. आहे तें सेवेचें व्रत. साधुतुल्य वृत्ति आणि समाजाच्या कल्याणाची तळमळ. भारतीय पातळीवरून काम करणाऱ्यास आणखी कोणते गुण पाहिजेत ? काळाचीं पावलें हेंच दाखविताहेत कीं भविष्यांतला तुमचा एकमेव पुढारी ‘ कामराज ’ आहे. मात्र भवितव्याच्या पोटीं काय असंभाव्य घटना दडून राहिली आहे तें एका विधात्याला फक्त माहीत.

* * *

# श्री. पंढरीनाथ पाटील

: २८ :

शहरांतील अनेक लहानमोठ्या माणसांचीं व्यक्तिचित्रें मीं लिहिलीं. पण खेडयांतील एखाद्या गृहस्थाचें जीवन-चित्र रंगविण्याची संधि मला परवां परवांपर्यंत मिळालेली नव्हती. औरंगाबादेस कामानिमित्त गेलों होतों. तेथें अचानक ढाकेफळचे श्री पंढरीनाथ पाटील यांची ओळख झाली. मी पंढरी-नाथांना भेटलो मात्र, वाटलें, या गृहस्थाची आपली जुनी ओळख आहे. आम्ही भेटलो आणि स्नेही झालों, ओळख झाली आणि एकमेकांचीं मनें जुळलीं. आठ दहा दिवस एकत्र काढले. त्यांत परमानंद मिळविला. निरपेक्ष स्नेहाच्या भावानें जवळ आलेले दोन जीव सुहृदभावानें जोडले गेले. कायमचे !

औरंगाबादेचा परिसर म्हणजे संतांचें माहेरघर. आपेगांव श्रीज्ञानेश्वर महाराजांचें आजोळ तर पैठण श्रीएकनाथ महाराजांचें पवित्र स्थान. येथेंच जवळ ढाकेफळ. तो पंढरीनाथ पाटलांचा गांव. संतांची कृपा असलेल्या भूमींत पंढरीनाथांचा जन्म झाला. त्यामुळें शिक्षण नसतांहि सुसंस्कृत मन, खेडूत असूनहि विचारांत विशालता, स्वभावांत गोडवेपणा, वागण्यांत आदब आणि

आदरातिथ्यांत मनाचा मोठेपणा. नखशिखान्त शेतकरी, पण संवेदनाशील वृत्तीमुळें चांगल्या गोष्टींचा पुरस्कार. शिक्षणाचा, समाजसुधारणेचा हव्यास. बहुजनसेवेची मनापासून आवड, समाजसेवेची तळमळ कळकळ. एका संत-पुरुषाशी माझी गांठ झाली आहे असा मला भास झाला. संत पुरुषांच्या मुलखांत सतांची छाया प्रत्येकाच्या सुमुखावर पसरलेली आहे जणुं !

पंढरीनाथ बरेचसे गंभीर, थोडेसे हंसरे पण चेहऱ्यानें रुबाबदार असे आहेत. आवाज भरदार पण घोगरा आहे. डोक्यावरचा पांढरा फेटा त्यांच्या परिसरांत त्यांना शोभा देतो. कपडे, पायांतले जोडे मराठवाडा धाटाचे. बोलणें मराठशाही मराठींत पण स्पष्ट, बाळबोध, संतांच्या शब्दांत. हे संस्कार शिक्षणाचे नव्हेत, पण आंतरिक खरें उपजत ज्ञान चांगलें. संतामृत मुखोद्गत. विचारसरणी सदाचाराची, सद्भावाची, सुवर्तनाची. म्हणूनच एकंदर व्यक्तित्वाचा परिणाम प्रासादिक. वाटतें अशा व्यक्तित्वाचा गृहस्थ आपला मित्र असावा. जवळजवळचा असावा. पंढरीनाथ सहजसुलभतेनें तुमच्या मनांत शिरतात. तेथें आपल्याला चिरस्वरूपाची जागा तयार करतात.

ते आपल्या गांवीं ढाकेफळला मला घेऊन गेले. रस्त्यांत काव्यशास्त्र-विनोद चालू. 'दादा, माझिया दारी सोनियाचा पिंपळ, अवघा झालासे संसार सोनियाचा याचा अर्थ काय हो ?' मी म्हणायचं, 'भाऊ याचा अर्थ–असा–असा'. गाडी रस्त्यावर धांवायची. पंढरीनाथ हं हं म्हणायचे. त्यांच्या स्तब्धतेंत अर्थ होता. ज्ञान होतं. माझ्या बडबडींत अनर्थ होता. अज्ञान होतं. पण पंढरीनाथांचें उत्तेजन. गाडी धांवायची. आणि मी बोल बोल बोलायचा. परिणती ही कीं आमचा वेळ मजेंत जायचा. या मनींचें ज्ञान त्या मनींत ओतलें जायचें. पण कोणी कोणाच्या मनांत ज्ञान ओतलें कळणें कठीण !

ढाकेफळांत जीप शिरली आणि पंढरीनाथांची वागेश्वरी आपल्या सुजलां सुफलां पृथ्वीमातेचीं गीतें गाऊं लागली. त्यांचीं विस्तृत शेतें बहरलीं नव्हतीं तरी पण हिरवीचार होतीं. त्यांचा मोसंबींचा बाग, द्राक्षांचा भला मोठा मळा पाहून हृदय हाललं. दादा हें बघा––दादा तें बघा, पंढरीनाथांतला कवि जागृत झाला होता. एखाद्या बालकासारखे ते हुंदडत होते. शब्दांच्या

फेरींतून त्या मळ्याचें शब्दचित्र माझ्या डोळ्यांसमोर उभें करीत होतें. पृथ्वीमातेचा हा सुपुत्र आपल्या शेतकरी–कुंचल्यानें आपल्या शेतांत आपल्या मशागतीनें काढलेलीं सुंदर सुंदर चित्रें मला दाखवीत होता. तें प्रदर्शन अपूर्व होतें, रेखीव होतें, चित्रमय होतें.

शेतांतील ती वाटचाल मला भारी होती. पायांत बळ नव्हतं. पोटांत भूक कोकलत होती. पण पाटील ताठ होते. त्यांच्यावर प्रवासाचा अथवा शेतांतील फिरण्याचा कांहींच परिणाम झाला नव्हता. मीं पाय गरम पाण्यानें धुतले तेव्हां जरा बरें वाटलें. सुग्रास अन्न पानावर वाढलें गेलें आणि तें पोटांत गेलें तेव्हां तजेला आला. पाटलाच्या घरची पंगत मोठी चवदार. रुचकर जेवण वाढणं मोठ्या हातानं. पाटलांचा विवेकपूर्ण आग्रह. दोन घांस जास्तच खाल्ले. साधंच पण पौष्टिक अन्न शरीराला लागलं, ताकद वाढली.

पुन्हां पाटलांचे प्रश्न दादा मंत्रसाधना चांगली कीं तंत्रसाधना बरी ? ईश्वरसाधनेला माणसांत कोणते गुण पाहिजेत ? ज्ञानेश्वरींत जीवन जगण्याची कला कथन केली आहे काय ? जीवनाचें ती ज्ञानेश्वरी शास्त्र आहे काय ? कुठल्या मंत्राला देव जवळचा ? मध्येंच पंढरीनाथ तुकारामांचे दोन चार अभंग म्हणायचे, त्यावर वादविवाद पुन्हां प्रश्न. पुन्हां कडवी. ज्ञान द्यावें कसें घ्यावें कसें पंढरीनाथांना माहीत. तुमच्यांतलें सारसर्वस्व काढायचें कसें, तुमच्याकडून सर्व चांगलें वदवायचें कसें हे पंढरीनाथ अचूक जाणतात. आणि अचूक तें तुमच्याकडून काढून घेतात. पैठणांत एकनाथ महाराजांचें दर्शन झालें. भागवतधर्माचा प्रसार करणाऱ्या महासंतांच्या भूमीचें दर्शन घेतल्यानें मन भारावून गेलें. भागवतधर्म म्हणजे विश्वधर्म, समताधर्म. परमानंदांचा धर्म तो सोप्या मराठींत, सोज्वळ शब्दांत, सात्त्विक स्वरूपांत एकनाथ महाराजांनीं पैठणांत सांगितला आणि विश्वांत त्यांची वाणी निनादली. पंढरीनाथ भक्तिभावानें माथा लववीत होते. त्यांचे डोळे उजाळत होते. मन भरून येत होतें, हें त्यांच्या डोळ्यांतील आसवांवरून दिसत होतें. ढाकेफळचा हा शेतकरी मनानें वारकरी आहे हें पैठणला प्रतीत झालें.

आपेगांवला गेलो. रस्ता नागमोडी आणि खाचखळग्यांचा, पण पंढरीनाथांना पुरा माहीत. नेहमीं जाणाऱ्या माणसाप्रमाणें ते जीपच्या चक्रधाऱ्याला

रस्ता दाखवीत होते. शरीर कसमसलं. पण आपेगांव गांठलं. देवळांत दर्शन झालं. गांव लोटलं आम्हांला पाहायला. आम्ही पाहिलं गांवाला. येथें पंढरीनाथांच्या मुलीचें घर. उत्तम मेजवानी. श्रीज्ञानेश्वरमहाराजांच्या आजोळचं भोजन. प्रासादिक जेवणानं मन प्रसन्नलं. गोदावरीचं दर्शन घेतलं. मन, बुद्धि, शरीर पुनीत झालीं. ' दादा, आपेगांवचं जुनं वैभव डोळ्याला दिसत नाहीं. पण डोळे असतील त्यांना लहानगा ज्ञानबा दिसेल आणि त्यांनीं लाव-लेली दीपमाळ मनं उजाळील. ' पंढरीनाथांची भरघोंस आवाजांतली मल्लीनाथी ! पाटील बोलतात कमीच. पण त्यांच्या भाषणांत अर्थ मात्र खूप. मनाला दिलासा देणारं बोलणं. श्रीज्ञानेश्वर आणि एकनाथ, पंढरीनाथांचीं आवडतीं दैवतें.

पैठणच्या प्रतिष्ठान कॉलेजांत माझें भाषण झालें. ' Ideals of University Education या विषयावर. रस्त्यांत त्या भाषणाच्या अनुषंगानं प्रश्नांची सरबत्ती. तेथील शाळेंत भाषण झालें. जवाहरलाल नेहरू–कार्य आणि व्यक्तित्व. पुन्हां प्रश्नावलि चालू. पंढरीनाथांचें मन आहे चौकस. ते गप्प बसत नाहींत. सदानकदा ते जागरूक. त्यांना माहितीचें पेय मिळालें नाहीं तर त्यांची तृषा भागत नाहीं. मला आश्चर्य वाटलें तें हें कीं, वेष शेतकऱ्याचा, भाषा रांगडी पण माणसाचें मन आधुनिक. त्यांना अद्ययावत् माहिती पाहिजे. काल, आज आणि उद्यांच्या जगांतील उलाढालींचा इतिहास आत्मसात करायला पाहिजे. पाटलांच्या मनाची भरारी गरुडाची. ते आपल्या बरो-बरच्या माणसाला शोषून घेतात.

पंढरीनाथ पाटील मराठवाड्यांत विद्यालयें चालवितात. महाविद्यालयेंहि चालवितात. या सर्व कामांत त्यांना साहाय्य करणारीं माणसेंहि तशींच उत्साही, आदर्श आणि तळमळीचीं आहेत. ज्ञानप्रसाराची प्रेरणा मात्र पंढरीनाथांकडून प्रत्येक मराठा शिकला पाहिजे. हा पंढरीनाथांचा पण. त्याच्यासाठीं जिवाची आटापीट. आपला मोठा संसार संभाळतांना, आपल्या घरच्या युवकांना उत्तम शिक्षण देतांना, त्यांनीं मराठवाड्यांतील बहुजन-समाजाची काळजी वाहिली आहे. त्यांनाहि शिक्षणानं सालंकृत करण्याचा चंग बांधला आहे.

एऱ्हवीं साधे दिसणारे हे पंढरीनाथ पाटील आंतून रंगलेले आहेत. महाराष्ट्राचे उपगृहमंत्री श्री. कल्याणरावांचे ते वडील. पण ते आपल्या मुखानें ' मी कल्याणरावांचा बाप ' म्हणून म्हणणार नाहींत. मुलाला भेटायला रांगेंत बसतील. त्यांची पाळी आली म्हणजे आपल्या मुलाला भेटतील. ' घरीं मुलगा—बाहेर उपमंत्री ' ते हंसून म्हणतील. कोणाहि वड्या अधिकाऱ्याला भेटायला गेले तरी हीच पद्धत. शिस्त न बिघडवतां बिनबोभाट काम करणें. सर्वांशीं संबंध चांगला ठेवणें. प्रत्येकाच्या गुणांकडे पाहणें, त्या गुणांशीं सहकार्य करणें. आपल्या कामाचा टेंभा मिरवायचा नाहीं, कीं पैसा आहे म्हणून मिजास करायची नाहीं. सडेतोड कारभार, शिस्तीची अतोनात आवड. प्रेमाची वागणूक. नेत्याचीं सर्व लक्षणें ह्या गृहस्थांत असून नेतेपणाची हांव नाहीं. आठ दहा दिवसांचा अवधि पण त्या काळांत पंढरीनाथ पाटलांचें जें व्यक्तिदर्शन झालें तें मनोज्ञ होतें. आजच्या बहुजनसमाजाचा पुढारी असा असावा. आपल्या संसारांत मशगूल. आपल्या शेतीच्या धंद्यांत वाकबगार, मनाचा चौकस. शाळेंत गेला नाहीं पण शाळेबाहेर विश्वाच्या शाळेंत ज्ञान कमविलें. बर्नार्ड शॉ कोण हें जाणण्याची इच्छा. जेमिनी जहाज अंतराळांत फिरलें ती माहिती मिळवण्याची धडपड. ज्ञानेश्वरमहाराज आणि एकनाथमहाराजांच्या वाङ्मयाची संपूर्ण माहिती करून घेण्याची जिद्द. तरी पण लीनपणें ' तुम्ही कांहीं तरी सांगा ' म्हणून आग्रह. एकदां मनुष्य आवडला कीं मग त्याचें आग्रही स्वागत. त्याला जेवणखाण, त्याला औरंगाबादेचा परिसर दाखविणें, त्याचा आपल्या संस्थांसाठीं उपयोग करून घेणें, आपलें कार्य सतत चालू ठेवून पुन्हां दुसऱ्या लोकांना राबवून घेण्याची उत्तम कला पंढरीनाथांना साधली आहे.

बुद्धीवर कोठलेहि संस्कार नसून स्वयंप्रकाशित बुद्धि आहे. समाजकार्य कशाशीं खातात हें माहीत नाहीं, पण उत्तम समाजकार्य चालू. शाळेची पायरी चढले नाहींत, पण शाळा स्थापन करण्याची तीव्र इच्छा. असा हा मजेदार, आश्चर्यकारक पिंड आहे पंढरीनाथांचा. मराठवाड्यांतील म्होरक्यांत हा ' म्होरका ' सत्त्वशील, तत्त्वशील म्हणूनच लोकप्रिय आहे. महाराष्ट्रांतील पुढारीपण मातींत माखलेल्या हातांत ज्या दिवशी जाईल तो दिवस मोठा. शेतांत ज्याचे पाय रुतलेले आहेत तोच आमचें कल्याण करूं शकेल. हाडाचा

शेतकरी डोळचान डोळस असला तर तो महाराष्ट्राचें कल्याण साधूं शकेल. आपल्या जुजवी व्यवहारज्ञानाच्या जोरावर राज्यशासन हाकूं शकेल. वरून येणाऱ्या पुढाऱ्यापेक्षां खालून वर आलेले पुढारी सकस, सबळ आणि सत्त्वशील. पंढरीनाथ तुकाराम पाटील असेंच आहेत. म्हणूनच ढाकेफळच्या या पाटलांचा गौरव करावा तेवढा थोडाच आहे. तो आपल्या मतीनं, गतीनं आपलीं पावलें महाराष्ट्राच्या इतिहासावर उठविल्याशिवाय राहणार नाहीं.

* * *

ठाणे, स्थळप्रत.
८८०८९० वि: भारित
2.12.९८

# बालगंधर्व

: २९ :

आज मुंबईतील रसिक मराठी माणसांच्या तोंडीं जर कोणती एक चर्चा ऐकू येत असेल, तर ती बालगंधर्वांच्या अमृतमहोत्सवाची. विदर्भ, मराठवाडा, कोंकण, घाटमाथा या सर्व प्रदेशांत बालगंधर्वांची लोकप्रियता अजूनहि पूर्वीइकीच कायम आहे. केवळ महाराष्ट्रांतच नव्हे तर महाराष्ट्राच्या बाहेरहि माळव्यांत, गुजरातेंत त्यांचे असंख्य चाहते आहेत. गानलुब्ध, नादलुब्ध, नाट्यलुब्ध रसिकांचें बालगंधर्व म्हणजे एकमेव श्रद्धास्थान. चाळीस-पन्नास वर्षें नाट्यसाम्राज्याचें सार्वभौम चक्रवर्तीपद भूषविणारे एकमेव नटसम्राट् असेंच बालगंधर्वांचें वर्णन करावें लागेल.

किर्लोस्कर कंपनींत अगदीं कोवळ्या वयांत नारायण श्रीपाद राजहंस नांवाचा पोरगा सामील झाला तेव्हां ती अगदी नित्याच्या घटनेपैकीं एक घटना होती. पण याच घटनेनें पुढें मराठी रंगभूमीला 'बालगंधर्व' मिळवून दिला. मनोहर रूप, सुरेल आवाज आणि पडेल ती मेहनत करण्याची तयारी असलेल्या या कोवळ्या पोरानें अल्पावकाशांतच मराठी नाट्यरसिकांचें लक्ष

स्वत:कडे वेधून घेतलें आणि रंगभूमीला सुवर्णाचें लेणें चढविलें. लोकमान्य टिळकांनीं त्याला दिलेली 'बालगंधर्व' ही पदवी या कोवळ्या पोरानें सार्थ करून दाखविली.

मराठी रंगभूमीला खरेंखुरें वैभव मिळवून दिलें तें बालगंधर्वांनींच. मराठी रंगभूमीच्या मंचकावर ते भामिनी, द्रौपदी, सुभद्रा, देवयानी, सिंधु या विविध रूपांत अनेक वर्षे तळपले. कुठल्याहि स्त्रीला ज्या भूमिका रंगवायला एरव्हीं जड गेलें असतें, अशा या कठीण भूमिका बालगंधर्वांनीं स्त्रीसुलभ सहजतेनें वठवून एका संपूर्ण पिढीला अक्षरश: वेड लावलें होतें. स्त्रियांनीं कोणते दागिने घालावेत, कोणत्या साड्या नेसाव्यात, कोणत्या चोळ्या घालाव्यात, कुंकू कसें लावावें, हें त्यांनीं स्त्रियांना शिकविलें. बोलावें कसें, बसावें कसें, फार काय प्रियकराशीं अबोला धरावा कसा, लटकेपणानें रुसावें–फुगावें कसें याचें तंत्रहि त्या काळांतील स्त्रियांनीं गंधर्वांपासूनच उचललें. महाराष्ट्रांतील गंधर्वकाळांतील स्त्री बालगंधर्वांनींच घडविली. मामा वरेरकर हें स्त्रियांचे मोठे पक्षपाती असल्यामुळें बालगंधर्वांचें हें श्रेय ते त्यांना द्यावयास तयार नाहींत. 'पुल्लिंगी स्त्री' म्हणूनच ते या श्रेयाच्या बाबतींत बालगंधर्वांच्या स्त्री-भूमिकांची व त्यांच्या परिणामांची संभावना करतात. पण रसिक महाराष्ट्रानें बालगंधर्वांना त्यांचें श्रेय दिलेलें आहे. त्यांचा उदो उदो केलेला आहे आणि स्त्रियांनीहि गंधर्वांचें हें खास ऋण मानलें आहे. आणि म्हणूनच जोपर्यंत मराठी रंगभूमि आहे तोपर्यंत बालगंधर्वांचा विसर कधींहि पडणार नाहीं.

१९१४ पासून १९४२ पर्यंतचा बालगंधर्वांचा सोन्याचा संसार मी माझ्या डोळ्यांनीं पाहिलेला आहे. 'गंधर्व वेड' हें त्या वेळच्या वेडांत एक महत्तम वेड होतें. शाळेंतील फी वाटल्यास आम्ही देत नसूं पण बालगंधर्वांचें नाटक पाहण्यांत, पिटांत बसून कां होईना पण त्यांचें नखरेल गायन ऐकतांना तल्लीन होण्यांत, त्यांच्या श्रेष्ठ अभिनयाचें दृष्टिसुख भोगण्यांत जी मजा होती, तीच आमच्या आयुष्यांतील मोठी घटना आम्ही समजत होतो. त्या वेळीं बालगंधर्वांसंबंधीच्या नित्य नव्या आख्यायिका विपुल प्रमाणांत पसरत असत. या नटश्रेष्ठानें जसें डोलविलें तसा महाराष्ट्र डोलत असे.

केशवराव भोसले धैर्यधर आणि बालगंधर्व भामिनी असा ‘मानापमान’चा संयुक्त प्रयोग झाला, त्या वेळीं पिटांत बसून आम्हीं तो पाहिला. आमच्या डोळ्यांचें पारणें फिटलें. केशवरावांचा पल्लेदार आवाज आणि मर्दानी अभिनय तर बालगंधर्वांच्या ठिकाणची स्त्रीसुलभ अभिनयकुशलता व गानमाधुरी यांचा अपूर्व संगम महाराष्ट्रानें पाहिला. तो सोहळाच अद्वितीय ! त्या अनुभूतीनें एक पिढी उजळली. नितांत आनंदांत डुंबली. द्वारकेला कृष्णानें, अयोध्येला रामानें, तसें आमच्या काळांत आम्हांला बालगंधर्वांनीं अगदीं वेडें केलें होतें. महाराष्ट्राच्या गळ्यांतले ते ताईत झाले. असा नटसम्राट् पूर्वी झाला नाहीं, पुढें होणार नाहीं.

बालगंधर्वांना ७५ वर्षें पुरी झालीं असल्यामुळें त्यांचा अमृतमहोत्सव करण्याचें महाराष्ट्रानें ठरविलें आहे. मराठी नाट्यपरिषदेनें हें कार्य आपल्या शिरावर घेतलें आहे आणि हा महोत्सव फेब्रुवारींत घडवून आणण्यासाठीं कार्यकर्त्यांची खटपट चालू आहे. विदर्भांतील नाट्यसृष्टीला आतां उत्तमोत्तम लेणीं लाभत आहेत. महाराष्ट्र सरकारचें नाटकाचें पारितोषिक, ‘वऱ्हाडीं मानसं’ या नाटकाला लाभलें आहे. विदर्भ नाट्यकलेमध्यें हिरिरीनें भाग घेत आहे, आणि म्हणूनच बालगंधर्व अमृतमहोत्सव घडवून आणण्याचें कार्य श्रीमति सुमतिदेवी धनवटे या विदर्भाच्या प्रतिनिधीकडे सोपविण्यांत आलें आहे. या बाईंमध्यें उत्साह अमाप आणि अंतःकरणपूर्वक कार्य करण्याची असीम तळमळ आहे. त्यांच्या उत्साहाला बांध घालणें कठीण पडतें. अहोरात्र त्या परिश्रम करीत आहेत. त्यांच्याबरोबर काम करणाऱ्या लोकांना त्यांच्या जेटगतीनें पुढें सरसावणें कठीण जातें. या महोत्सवाच्या कामांत सदैव दक्ष असे मोतीराम रांगणेकर आहेत, तर कार्यक्रमबाज हमणेहि आहेत. कल्पक डोंगरे व विधायक वृत्तीचे गोगटे प्रभृतीहि आहेत. अडिवरेकरांची सूचकता, डोंगरे यांची कल्पकता आणि गोगटे यांची विधायक प्रवृत्ति असें हें केवढें तरी मोठें भांडार नाट्यपरिषदेस लाभलें आहे. याच कार्यकर्त्यांबरोबर उत्साही प्रसिद्धिवितरक प्रभाकर वेंगुर्लेकर आहेत. सरकारी नाट्यमहोत्सवाच्या कार्यासाठीं आलेल्या श्री. माडखोलकरांनींहि कार्याला योग्य वळण लावण्यासाठीं खूप परिश्रम घेतले आहेत. सांगायचें तात्पर्य हेंच कीं, असा कार्यकर्त्यांचा संच लाभलेला हा अमृतमहो-

त्सव निःसंशय गाजेल. महाराष्ट्रांतील कानाकोपऱ्यांतून लोक मदत करतील आणि पुनश्च एकदां महाराष्ट्रीय माणूस आपलें बालगंधर्वांवरील प्रेम व्यक्त करील. बालगंधर्वांनीं मराठी रंगभूमीचे पांग फेडले. आतां महाराष्ट्र त्यांचें ऋण फेडत आहे.

मुंबईकरांनीं या महोत्सवाची तळी उचलून धरली आहे. प्रत्येक घरांतून गिरणगांवांतून, मध्यम स्थितींतल्या गिरगांववाल्यांकडून, कारकून–बाबूकडून तों बोटीवर–बोरीबंदरवर काम करणाऱ्या हमालापर्यंत एक एक रुपयाची देणगी घेण्यांत येत आहे. मुंबई महानगरपालिकेनें त्यांना शहरातर्फे मान-सन्मान द्यायचें ठरविलें आहे. महाराष्ट्र सरकारनें आगळा पण वेगळा अमृत-महोत्सवी मानसन्मान परवां केला. महाराष्ट्र सरकारनें मध्यवर्ती सरकारला बालगंधर्वांना पदवी देण्यासाठीं आग्रहहि केला आहे, असें अधिकृत गोटांतून ऐकतो. मुंबई महानगरपालिकेचें नवें नाट्यगृह वांद्रें येथें तयार झालें आहे. या नाट्यगृहाला बालगंधर्वांचें नांव द्यावें असा मुंबईकरांचा आग्रह आहे. हें नांव जर दिलें गेलें नाहीं तर मुंबईकर आंदोलन केल्याशिवाय राहणार नाहींत. ज्या मुंबईंत बालगंधर्वांनीं आपल्या कलेच्या नौबती दुमदुमविल्या, जेथें आपल्या रसरंगानें जनतेचीं मनें खुलविलीं, जेथें त्यांनीं वैभवाचा कळस गाठला, त्या शहरांतील एका नाट्यगृहाला त्यांचें नांव दिलें जाऊं नये, हा दैवदुर्विलासच आहे. या कार्यांत मोडता घालणारा कोण आहे हें लोकांना कळलें तर त्या माणसाला पळतां भुई थोडी होईल, इतकी लोकांची या बाबतींतली भावना तीव्र आहे.

मराठवाड्यांत बालगंधर्वांबद्दल आस्था खूप आहे; पण वित्त जमविण्या-साठीं उत्साही खटाटोप अजून सुरू झालेला नाहीं. विदर्भांतूनहि अजून जेवढा देणग्यांचा पूर वाहायला हवा, तितका वाहात नाहीं. कोंकण, गोवा, घाटमाथा येथें जोरानें कार्य चालू आहे. बालगंधर्वांच्या नांवानें पैशांचा पाऊस पडला पाहिजे; तरच नाट्यपरिषदेनें ठरविलेला कार्यक्रम पुरा करतां येईल.

बालगंधर्व ही पूर्वी व्यक्ति असेल, पण आज ती संस्था आहे.

* * *

# श्री. पु. ल. देशपांडे

: ३० :

हल्लींच वर्तमानपत्रांत प्रसिद्ध झालें आहे कीं, पु. लं. ची निवड मराठी नाटचपरिषदेचे अध्यक्ष म्हणून झाली आहे. याबद्दल पु. ल. देशपांडे यांचें अभिनंदन आणि नाटच परिषदेबद्दल एक प्रकारचा अभिमान, कीं या संस्थेनें एका योग्य व महनीय अशा प्रतिभावान नाटचाचार्याची या जागीं निवड केली आहे. चालू नाटकांचें युग हें पु. लं. चें युग चालू आहे. आणि म्हणूनच या युगाचा युगकर्ता, युगप्रवर्तक म्हणजे पुरुषोत्तम लक्ष्मण देशपांडे यांची अध्यक्ष म्हणून निवड ही सर्वथैव योग्य अशी निवड आहे.

पु. ल. हे अष्टावधानी, सव्यसाची, सम्यक् आणि सावधान असे लेखक आहेत. जें जें वाङ्मय यांनीं लिहिलं, हाताळलं तें तें सुगंधी, सुषम आणि सालंकृत असं आहे. पु. लं. मध्यें अनेक गुणांचा संमिश्र भाव आहे. ते निष्णात लेखक आहेत, उत्तम अभिनयकार आहेत, साग्रसंगीत गाण्याचे कलात्मक कलाकार आहेत, हार्मोनियम वादनांत पटाईत आहेत, कलात्मक

वाङ्मयाचे भोक्ते आहेत, उत्तम वक्ते आहेत आणि सदा ताजेतवाने, सदा आनंदी, सदा अनुभव घेण्यासाठीं जागृत असे गृहस्थ आहेत.

एका साधु घराण्यांत जन्म. जिथें श्रद्धा उत्तम. भक्तीचा मळा सदा पिकलेला आणि आत्मानुभवाकडे त्यांचा कल. त्यामुळें पु. लं.मध्यें जुन्या संतवाङ्मयाचे संस्कार, जुन्या वाङ्मयाचा अर्क शरीरांतल्या प्रत्येक नसानसांतून भिनलेला. त्यांतून त्यांच्या वाणीला, त्यांच्या भाषेला प्रासादिकपणा आलेला आहे. त्यांत चैतन्य आहे, ओज आहे, प्रतिभा आहे. जितकें ते तत्त्वज्ञानी आहेत तितकेंच ते भक्तिमयहि आहेत. तितकीच त्यांची भूमिका तात्त्विक आणि तार्किक अशी आहे आणि त्यामुळें अंधभक्तीपेक्षां त्यांच्यामध्यें डोळस भक्ति आहे. गतानुगतिकतेपेक्षां त्यांच्यांत विश्लेषणात्मक भाव विशेष आहे आणि त्यांची श्रद्धा तर्कविवश आहे. म्हणूनच त्यांच्या बोलण्यांत, चालण्यांत, लिहिण्यांत आणि नाटकांत तर्क आणि श्रद्धा यांची संमिश्रता दिसून येते. लिहितांना व बोलतांना ते आदब सोडीत नाहींत, सौजन्य भिरकावून देत नाहींत, सुजनतेला फाटा देत नाहींत. त्यांच्या व्याजोक्ति—उपहासांत आणि वर्तृक्त्वांत खेळकरपणा विशेष आहे. चिकोंडा काढायचा पण वरवर. त्यानें शरीर थरारलें पाहिजे पण दुःख मात्र होता कामा नये. ते रडवतील पण हंसून रडवतील. माणसांबद्दल, मानवतेबद्दल त्यांना सहृदयात्मक प्रेम आहे, आस्था आहे. माणसांच्या प्रभावाबद्दल त्यांच्या मनांत दया आहे. त्यांनीं आपल्या वाङ्मयांत निर्माण केलेल्या व्यक्तींबद्दल त्यांना सहानुभूति आहे.

अनेक वर्षांच्या अनुभवानें, मननानें आणि चिंतनानें त्यांच्या चेहऱ्यावर एक प्रकारचा सुजमीटपणा प्रतीत होतो. त्यांच्या डोळ्यांत शोधकपणा आहे. दूर दूर पाहण्याची एक आत्मनिष्ठ ऊर्मि आहे. गरुडाच्या भरारीनें माणसांच्या जीवनाचें त्यांचे डोळे डोळस दर्शन घेऊ शकतात. कोणाकडेहि त्यांनीं पाहिलें कीं, त्या त्या माणसांचे दोष, गुण, त्यांच्यांतील तर्कवितर्क त्यांच्या हृदयाला भिडतात आणि त्यांच्या वाङ्मयामध्यें त्या त्या व्यक्तीचें दर्शन घडवून त्या त्या व्यक्ति ते निर्माण करीत असतात. त्या निर्मितींत तुम्हांला सहजानंद देण्याचा पु लं.चा हेतु असतो. 'तुझें आहे तुजपाशी' मधला त्यांचा काकाजी या व्यक्तींतील दोष त्यांनीं जितक्या सहृदयतेनें मांडलेले

आहेत तितक्याच सहृदयतेनें ते प्रत्येक मानवाकडे पाहात असतात. आणि म्हणूनच काकाजींच्या उग्र परिस्थितीबद्दल, त्यांच्याबद्दल जसा एक प्रकारचा दयाभाव ते आपल्या मनांत उत्पन्न करतात तशाच प्रकारचा दयाभाव सतत आणि सातत्यानें त्यांना मनुष्यमात्राबद्दल सारखा वाटत असतो. गायनाच्या गंधर्वमय वातावरणांत ते गुंग होतात आणि पु. ल. देशपांडे बाजूला गेले कीं, एखादी लय कानावर पडल्याशिवाय राहात नाहीं. अविरत विचार करण्याची त्यांच्या बुद्धीची भरारी विलक्षण आहे आणि त्यामुळें त्यांचे शब्द अमृता-इतके गोड आहेत. त्यांच्या विचारांत प्रगल्भता आहे आणि त्यांच्या तत्त्व-ज्ञानांत जिवंतपणा आहे. त्यांचें व्यक्तित्व अशा प्रकारचें आहे कीं, ते दुसऱ्याला दुखवतील पण दुसऱ्याला दुखवण्याची त्यांची इच्छा नाहीं. त्यांच्यांत आढ्यता जराहि नाहीं. त्यांना वावदूकपणा माहीत नाहीं, दिखाऊपणांत गम्य नाहीं. सदा भर संथपणें विचारप्रवर्तनावर आणि स्वयंप्रेरित आंतरिक अशा वागणुकीवर, वर्तणुकीवर.

हा पु. लं.चा पिंड निसर्गनिर्मित आहे आणि तो तसा अनुभवामुळेंहि बनला आहे. त्यांच्या जीवनाकडे विशेषत्वानें (ऑब्जेक्टीव्हली) पाहिल्यास तुम्हांला असें दिसून येईल कीं, लहानपण श्रद्धाळू आईबापांच्या वात्सल्य-पूर्ण सरक्षणाखालीं गेलें आहे. शिक्षण उत्तम झालें. स्वयंभू आवड लालि-त्याची, साहित्याची, गायनाची, वाचनाची आणि लिहिण्याची. त्याला या पूर्व आयुष्यामध्यें भरपूर प्रेरणा मिळाली, सिंचन मिळालें, सिद्धहस्तानें वडीलधाऱ्या माणसांचे आशीर्वाद मिळाले. स्वतंत्र जीवन सुरू झाल्यानंतर मात्र त्यांच्यावर अडीअडचणींचेच आघात आणि प्रत्याघात झाले. अपयशानें प्रथमतः त्यांना हैराण केलेलें होतें, बेजार केलेलें होतें. प्रथम शिक्षक, नंतर प्राध्यापक ( प्रोफेसर ), त्यानंतर फिल्मी दुनियेंत परिभ्रमण, इथें-तिथें लिखाण असें त्यांचें बिनशिडाचें, बिनसुकाणूचें जीवनजहाज भवसागरांत आणि जीवनप्रवाहांत तरंगत तरंगत तसेंच तरलें होतें. त्यांच्या जीवनावर नियतीनें मात केली पण नियतीवर त्यांना मात करतां आली नव्हती. अड-थळे आणि अडचणी, अनंत यातना हाहि खुराक त्यांनीं आयुष्याच्या-जीव-नाच्या मध्यभागीं आल्यावर गिळून पचविला आहे. त्यांतच त्यांच्या पहिल्या पत्नीचा अंत, कमाई फारशी नाहीं, बिऱ्हाड एकें ठिकाणीं नाहीं, अशा या

अंधःकारांतून पु. लं.चा पिंड बनलेला आहे. दुःखांतून त्यांना आजच्या आनंदाकडे धांव घ्यावी लागली आहे. निराशेंतून त्यांना आशावाद दिसला आहे. अशक्य अशा परिस्थितींतूनच त्यांना आजचा परमानंद लाभला आहे.

त्यांचें सुरुवातीचें वाङ्मय पाहिलें कीं, त्याच्यांत कृत्रिमता आली आहे, अतिशयोक्ति आलेली आहे, बादरायण आहे, थोडासा विस्कळीतपणा आहे असें पाहायला सांपडेल. परंतु त्या वाङ्मयांत चमक आहे, धमक आहे. पण आजच्या त्यांच्या वाङ्मयांतील सुटसुटीतपणा आणि सुस्वर नाहीं. देशमुख आणि कंपनीनें प्रसिद्ध केलेलीं त्यांचीं पुस्तकें वाचलीं तर आपलें समाधान होत नाहीं. कुठें तरी खटकतें. कांहीं तरी कमी आहे असें वाटतें. पण तरीहि या लेखकाकडून विशेष असें कांहीं तरी घडणार अशी अपेक्षा निर्माण होते.

त्यांना त्यांच्या वनवासांतून सोडविणारें त्यांचें पहिलें नाटक म्हणजे साहित्यसंघानें केलेलें 'तुझें आहे तुजपाशीं' हें नाटक. या नाटकानें त्यांची साडेसाती संपली, ते प्रसिद्धीच्या मार्गावर आले आणि तेव्हांपासून त्यांच्या जीवनांत यश आणि लक्ष्मी या दोघांनींहि स्थान मिळविलें. 'तुझें आहे तुजपाशी', 'सुंदर मी होणार', 'बटाटयाची चाळ', 'वाऱ्यावरची वरात', आणि 'असा मी, असा मी' या निरनिराळया वाङ्मयकृतीं-मुळें त्यांनीं यशोगिरीचें टोंक गांठलें आहे. सर्व महाराष्ट्राला आपल्याकडे वेधून घेतलें आहे आणि महाराष्ट्राच्या वाङ्मय इतिहासांत आपलें नांव अजरामर केलें आहे. एका बाजूला पडलेला दुःखविवश पण आत्मानुभवी असा हा लेखक जगासमोर आपल्या देदीप्यमान कलाकृतीनें झळकूं लागला. कारण त्यांची 'अपूर्वाई.' हीं प्रवासवर्णनें! या आपल्या कलाकृतीनें सबंध महाराष्ट्राला हंसविलें, रिझविलें आणि वेडें केलें आहे. या त्यांच्या प्रवाही वाङ्मयामध्यें त्यांचें अवलोकन, त्यांचा विनोद, त्यांचें हंसरें तत्त्वज्ञान आणि द्रष्टेपणाची विजिगिषु वृत्ति उत्तम प्रकारें दिग्दर्शित होते. याच काळांत ते नाटककार म्हणून चमकूं लागलें. ललित वाङ्यांमध्यें त्यांनीं अग्रेसरत्व मिळ-विले. वक्ता म्हणून त्यांचें नांव सर्वतोमुखीं झालें आणि महाराष्ट्राला पु. ल. हवेहवेंसे वाटायला लागले. आधींच गोड असणारें त्यांचें व्यक्तित्व आणखीन मधुतुल्य झालें.

त्यांची युगप्रवर्तकता ही त्यांच्या एकपात्री नाट्यामुळें त्यांना मिळाली. स्वतःच नाटककार आणि स्वतःच नट. तीन–चार तासांचा कार्यक्रम म्हणजे हास्य–विनोदाचे फवारे. 'बटाट्याची चाळ', 'वाऱ्यावरची वरात' आणि 'असा मी असा मी' या तिन्हीहि वाङ्मयप्रकारांत त्यांनीं जीवनाचा सूक्ष्म अभ्यास केला आहे. पण त्याबरोबरच त्यांची लोभनीय मांडणी इतकी आकर्षक आहे कीं, त्यावरच लोक बहुधा खूष होतात. ते स्वतः रंगभूमीवर आले कीं, त्यांनीं प्रेक्षकांकडे पाहिलें की, त्यांच्या विनोदांत, नाट्यांत, गायनांत आणि भाषणांत विनोदाचे फवारे प्रेक्षकांना इतके हंसवितात, इतके रिझवितात कीं, त्यांच्या नाट्यात्मक सार्वभौमत्वाचा आविष्कार दिसून येतो. यांत त्यांना लाखों रुपयांची कमाई झाली. पण त्याबरोबरच महाराष्ट्राला त्यांनीं पै पै वसुलीनें नाट्य, वाङ्मय, गायन, तत्त्वज्ञान देतां येईल तितकें दिलें. तेलाला तेल आणि मोलाला मोल. म्हणूनच आज महाराष्ट्रांत त्यांचें नांव दुमदुमत आहे आणि म्हणूनच आज त्यांचें युग वाङ्मयांत चालूं झालें आहे. त्यांचे वाङ्मयप्रकार जितके मुंबईच्या बाजूला अथवा कोंकणांत आवडतील तितके बाहेरगांवीं आवडतील असें मी म्हणत नाहीं. कमी अधिक प्रमाणांत मात्र इथें व तिथें त्यांच्या कलाकृति आवडल्याशिवाय राहणार नाहींत हें नक्की, हें खास. पण महाराष्ट्रांत आज मात्र तें मान्यता मिळविलेले साहित्यिक आहेत आणि हें जें त्यांनीं साहित्यिक सार्वभौमत्व मिळविलेलें आहे त्याचें कारण त्यांच्यांतला मनुष्य जिवंत आहे. ते रस्त्यावरच्या माणसाला विसरलेले नाहींत आणि विसरणार नाहींत.

पु. लं.चें मराठी वाङ्मयांत स्थान काय हें पुढील पिढीला नक्की करावं लागेल. पण हा एका बाजूला पडलेला साहित्यचंद्र आज आपल्या प्रतिभेनें शांत शांत आणि शीतल अशा प्रकारचें एक वातावरण महाराष्ट्रांत सतत निर्माण करीत आहे याबद्दल दुमत होणार नाहीं. त्यांचें वक्तृत्व लोभस आहे यावरहि कोणी अनिष्ट टीका करणार नाहीत. त्यांच्या सहृदयतेबद्दल प्रत्येक प्रेक्षक, प्रत्येक वाचक याची साक्ष देईल आणि त्यांच्या सुजनतेबद्दल, सत्प्रवृत्तीबद्दल आणि सहृदयतेबद्दल अनेक त्यांच्या जवळचे मित्र आवर्जून सांगतील.

त्यांच्या पत्नी सुनीताबाई या सुविद्य आहेत, कणखर मनोवृत्तीच्या आहेत आणि सहचारिणी या नात्यानें पु. लं.च्या खऱ्याखुऱ्या सहचारिणी आहेत. त्यांच्यांत कला आहे, नाटच आहे, वाङ्मयाची रुचि आहे आणि उत्तम प्रकारचा व्यवहार आहे. पु. ल. जितके लवचिक हृदयाचे आणि थोडेसे ढिले आहेत तितक्याच सुनीताबाई सोज्वळ आणि संयमी आहेत. जपून आणि संभाळून वागणाऱ्या आहेत. पु. लं.च्या आपण जवळ जाऊ शकतो पण सुनीताबाईंबद्दल आदर लांबूनच व्यक्त करावा. नियमानें आणि नेमानें त्या तुम्हांला लांब ठेवतात असें तुम्हांला वाटेल. त्या आहेत कोंकणच्या, फणसासारख्या बाहेरून जाड पण आंतून गोड, अशा त्या आहेत असा माझा अंदाज आहे. पण एकंदरींत त्यांच्यांत त्या आभास घडवितात, एकदम आतीत राहू शकतात. हें बहुतेक बाहेरचें वेष्टण असावें अशी माझी मात्र प्रांजल समजूत आहे.

पु. लं.चें हें व्यक्तिदर्शन आहे. एक दूर राहून पण अतिशय जवळ जाऊन ज्या पद्धतीनें मी त्यांना पाहिलें आहे तेच भाव माझ्या मनांत निर्माण झाले आहेत. ते तसेच्या तसे मी मांडलेले आहेत. ते वाङ्मयीन विश्वांत तज्ज्ञ, अत्यंत उत्तुंग शिखरावर असतांनाच पु. लं.ना महाराष्ट्र नाटचपरिषदेचे अध्यक्ष म्हणून सन्मान मिळालेला आहे. त्यांचें महाराष्ट्रातर्फें मी अभिनंदन करतों व मनःपूर्वक त्यांना अभिवादन करतों. त्यांच्या हातून त्यांच्या कारकीर्दीत नाटच-परिषदेसाठीं महनीय अशा प्रकारचें विधायक कार्य व्हावें अशी मी त्यांच्यापासून अपेक्षा करतों.

* * *

# लालबहादुर शास्त्री

: ३१ :

नेहरू गेले. त्यांच्या अस्थि आणि त्यांच्या अस्थींची राख सर्व हिंदुस्थानभर निरनिराळ्या नद्यांत, डोंगरांवर, पठारांवर फेंकण्यांत आली. पंचमहाभुतांचा हा महापुरुष पंचमहाभुतांत विलीन झाला. फक्त त्याचं मोठेपण, श्रेष्ठपण आमच्याकडं राहिलं. त्याच्या स्मृति गोड आहेत, अभिमानास्पद आहेत आणि अविस्मरणीय आहेत. त्या स्मृतींतून नवीन प्रकारची नवीन उभारणी आम्हांस करावयाची आहे. मुंबईकरांची परिस्थिति नेहरू गेल्यापासून मोठी हवालदिल होत आहे. प्रत्येक घरांत, प्रत्येक दारांत, प्रत्येक झोपडींत, प्रत्येक राजवाड्यांत सगळीकडे एकच प्रश्न– आतां नेहरूंनंतर भारताचं काय होईल ?

राष्ट्र आणि व्यक्ति यांचा ऱ्हास हा ठरलेलाच. त्यांचं भवितव्य ठरलेलंच असतं. त्यामुळं नेहरू गेले, आम्हीं उघडे पडलो, तरी पण नियतीच्या हातांत

पुढें काय हें ठरवावयाचं आहे आणि नियतीनंच आम्हांला आमचा नवीन पंतप्रधान दिला आहे. तो पंतप्रधान म्हणजेच आमचे श्री. लालबहादूर शास्त्री. मुंबईकरांच्या मनाचा कानोसा जर घेतला तर शास्त्रींची निवड ही अत्यंत उत्तम निवड आहे असंच राजापासून ते रंकापर्यंत प्रत्येकाचं मत आहे. वास्तविक सदोबा पाटील आम्हांला जवळचे. ते महाराष्ट्रीयन. परंतु उत्तम राजकारण, बुद्धीनं चतुरस्त्र, कामांत अत्यंत वाकबगार असूनहि सदोबा पाटील मुंबईकरांना तितकेंसें आवडत नाहींत. त्यांचं शरीर आणि बुद्धि महाराष्ट्रीयन असेल तर मन गुजराथमय झालेलं आहे. आणि त्यामुळें त्यांच्या अवतीभोंवतीं बहुतेक गुजराथ्यांचाच गराडा असतो. त्यामुळं त्यांच्या-बद्दल असं म्हणावंच लागेल कीं, ते एक गुजराथळलेलें महाराष्ट्रीयन आहेत. रेल्वेमंत्रीपदाला मात्र ते योग्य आहेत आणि म्हणून त्यांची निवड झाली हें चांगलंच झालं, असंच म्हणावं लागेल. मोरारजीभाईंना मात्र आम्हां मुंबईकरांचा कडवा विरोध होता. त्यांचं नांव मंत्रिपदाकरितां ज्या ज्या वेळीं घेण्यांत आलं त्या त्या वेळीं विषादाची तीव्र भावना मुंबईकरांत दिसत होती. काय असेल तें असो, परंतु मोरारजींना त्यांच्या जन्मभूमींत बलसाड या गांवीं किंमत नाहीं. गुजराथेंतून त्यांच्याबद्दल एक प्रकारचा उपरोधच आहे. आणि मुंबईकरांना त्यांच्याबद्दल एक प्रकारची घृणा आहे. त्यांच्या निवडणुकींत बऱ्याच लोकांनीं त्यांना पाठिंबा दिला. यशवंतरावजींनीं पाहूं या काय होतं तें म्हणून मुत्सद्देगिरीच पुष्कळ वेळपर्यंत चालविली. पण वसंतराव नाईकांनीं मात्र त्यांना मत देणार नाहीं अशी निश्चित भूमिका घेतली आणि त्या दृष्टीनं आम्हां महाराष्ट्रीयांच्या अंतरीचा दिलासा दिल्लींत पोंहोंचविला. दिल्लींत वसंतरावजींनीं आपलेंच मत केवळ देऊन ते स्वस्थ बसले नाहीत तर यशवंतरावजींचंहि मन त्यांनीं वळविलं. मिश्रांना त्यांनीं आपल्या बाजूला आणलं आणि धडाडीनं लालबहादूर शास्त्री आलेच पाहि-जेत असं आपलं मत श्री. कामराज यांच्याकडे प्रगट केलं. यामुळें वसंतराव-जींचं जेवढं कौतुक करावं तेवढं थोडंच आहे.

लालबहादूर शास्त्री हे शांतताप्रिय, सोज्वळ आणि शालीन असें गृहस्थ आहेत. त्यांच्या वर्तनांत प्रामाणिकपणा आहे, निष्ठा आहे, सद्भाव आहे. ही स्वभावांतली पुंजी उत्तम प्रकारची आहे, यांत शंका नाहीं. त्याचप्रमाणं

त्यांच्यांत दैवहि आहे. वास्तविक दोन वेळां राजिनामा दिलेला हा मंत्री पुन्हां पुन्हां राजकीय प्रभावळींत येतो हा नियतीचा खरा चमत्कारच आहे. नेहरूंना ते जवळचे, अजातशत्रु. १०० टक्के भारतीय म्हणूनच अजूनहि त्यांच्या हातून एकहि परदेशाचा दौरा झालेला नाहीं. त्यांच्या बटुमूर्तीकडे पाहिल्यानंतर रुबाबदार व्यक्तित्व नाहीं, एवढंच काय तें मनाला वाटतं. पण त्यांच्या चेहऱ्यावरचं हास्य पाहिलं, त्यांच्या सात्त्विक चेहऱ्याकडे बघि-लंत कीं, त्यांच्याबद्दल एक प्रकारचं औत्सुक्य वाटायला लागतं. म्हणूनच त्यांच्या दर्जाचे योग्य प्रतिनिधि तेच आहेत असं वाटतं. एरव्हीं बटुमूर्ति असणारी ही व्यक्ति अवसर मिळाला तर विश्वव्यापी विभूति होईल असं मुंबईकरांना वाटतं. म्हणूनच अनेक उमेदवार पंतप्रधानाच्या जागेसाठीं असून शेवटी पंतप्रधान म्हणून लालबहादूर शास्त्रींची निवड झाली हें मुंबईकरांना तर दिसतच आहे. पण सबंध महाराष्ट्रानंसुद्धां या नेमणुकीचं कोडकौतुक केलं आहे. आतां वामनमूर्तीचं युग भारतीय राजकारणांत सुरू झालेलं आहे. या वामनमूर्तीचं प्रस्थान ठीक बसो, त्यांची कारकीर्द यशस्वी होवो आणि विश्वांत सगळीकडें त्यांचं नांव होवो ही मुंबईकरांची सदिच्छा आहे.

आंतरराष्ट्रीय दृष्टीनं नेहरूंचा रुबाब, इतमाम आणि त्यांचं नांव हें ताबडतोब लालबहादूर शास्त्रींना मिळणं कठीण आहे. परंतु भारतीय राष्ट्रामध्यें मात्र जर त्यांनीं आपली निःसंदिग्ध भूमिका ठरवून राजशासनांत कणखरपणाला सुरुवात केली, तर भारतीय राष्ट्राला ते सुखी करूं शकतील असं सर्वांना वाटतं. भारतांत दारिद्र्य फार, विस्कळीतपणा पुष्कळ, लांच-लुचपत कमालीची. आणि म्हणून १६–१७ वर्षें स्वराज्यप्राप्तीला होऊनहि अजूनपर्यंत त्या मानानें राज्यव्यवस्थेला बाळसं येत नाहीं, किंवा लोकांच्या चेहऱ्यावर तजेलदारपणा दिसत नाहीं. या दृष्टीनं मुंबईकरांना असें वाटतें कीं, लालबहादूर शास्त्रींनीं बायबलांतील जे १० हुकूम आहेत – जे १० आध्यात्मिक हुकूम आहेत त्याप्रमाणें त्यांनीं आपल्या १० आज्ञा काढाव्यात आणि त्या १० आज्ञांचा उपक्रम भारताच्या प्रत्येक विभागांत होईल अशी व्यवस्था करावी. समाजवादी राज्य आम्हांला पाहिजे. जास्तींत जास्त लोकांना सुखी करणें हें समाजवादाचें ध्येय आहे. त्या ध्येयपूर्तीसाठीं शास्त्री-जींनीं देशाला विश्वासांत घेऊन आपल्या धोरणाची आंखणी केली पाहिजे.

नुसती आंखणी करूनच चालणार नाहीं तर त्या धोरणाची अंमलबजावणी फार जोरांत केली पाहिजे. आणि आम्हां सर्व देशबांधवांच्या मनांत असा विश्वास निर्माण केला पाहिजे कीं, यापुढें भारतांत शांतता, सुबत्ता आणि सुव्यवस्था नांदेल.

आम्हां मुंबईकरांना असं वाटतं कीं, लालबहादूर शास्त्रींनीं खालीं दिलेल्या १० आज्ञा अखिल भारतांत प्रसारित कराव्यात. त्या १० आज्ञा अशा आहेत :—

(१) प्रत्येक व्यक्तीला, मग तो कुठल्याहि स्थितींतला माणूस असो, त्याला योग्य भाड्यांत राहायला जागा मिळावी.

(२) शरीरानं सुदृढ असणाऱ्या प्रत्येक माणसास विनासायास नोकरी मिळावी.

(३) प्रत्येक रहिवाशाला पाहिजे असलेलं वस्त्रप्रावरण योग्य किमतींत मिळावं.

(४) प्रत्येक माणसाला लागणारं अन्यधान्य योग्य किमतीला विनाकष्ट मिळावं.

(५) निरनिराळ्या राज्यांतील मुख्य प्रधान व मंत्री आणि उपमंत्री, त्याचप्रमाणं मध्यवर्ती केंद्रांतील पंतप्रधान, इतर प्रधान व उपप्रधान यांनीं विनाकारण लांबलचक भाषणांचे घोळ घालून लोकांची दिशाभूल करण्यापेक्षां भाषणें कमी करून जास्तींत जास्त भरीव कामगिरी करावी असा आदेश पंतप्रधानांकडून त्यांना मिळाला पाहिजे.

(६) पंडित नेहरू नेहमीं म्हणत असत कीं, काळाबाजार करणाऱ्या लोकांना शहराच्या मध्यभागीं फाशी दिलं पाहिजे. परंतु काळ्या बाजाराची समस्या सबंध भारतांत फारच बोकाळली असूनहि एकाहि काळाबाजारवाल्याला सुळावर देतां येत नाहीं. शास्त्रीजींनी पुन्हां एकदां ही घोषणा करावी. इतकंच नव्हे तर प्रत्येक गांवांतील किंवा शहरांतील सर्व मोठ्या काळाबाजाराचं निर्मू-

लन करावं हा आदेश त्यांनीं अखिल भारतांतील प्रत्येक विभागाला दिला पाहिजे. सर्व मोठ्या काळाबाजारवाल्यांना पकडून त्यांना फाशीची शिक्षा द्यावीच द्यावी. इतकंच नव्हे तर या आदेशाचें उल्लंघन झालं तर त्यांनीं मंत्र्याकडून किंवा मुख्य मंत्र्याकडन जाब विचारला पाहिजे.

(७) आज सर्व वस्तूंच्या किमती इतक्या भरमसाट वाढत चाललेल्या आहेत कीं, आम्हां सर्व लोकांची गळचेपी होत आहे. अन्यधान्याचे फार मोठे साठे व्यापाऱ्यांच्याकडे पडून असल्यामुळें आमची गुदमरणूक होत आहे. म्हणूनच मध्यवर्ती सरकारनें व प्रांतिक सरकारनें जिवाचा आटापिटा करून किमतवाढीला निर्बंध घातले पाहिजेत. या बाबतींत दिव्य करावं लागलं तर तें दिव्य करण्याची त्या सर्वांची तयारी पाहिजे. नाहीं तर हा किमतवाढीचा भस्मासूर देशाला खाऊन टाकील. भारतांत क्रांति घडवून आणील आणि पुढें अशाच ज्वाला भारतांत प्रदीप्त होतील कीं, त्यामुळें लोकशाहीवरसुद्धां गंडांतर येईल. म्हणूनच सर्व वस्तूंच्या किमती कमी करण्याकडे शास्त्रीसरकारचं लक्ष वेधून राहिलं पाहिजे, तेंसुद्धां केवळ एक दोन महिन्यांच्या अवसरांतच धडाधड वस्तूंच्या किमती खालीं आल्या पाहिजेत. वस्तूंच्या किमतवाढीच्या मागची भूमिका, धान्याचें उत्पादन वाढवून त्या भूमिकेचं संपूर्ण निर्मूलन झालं पाहिजे.

(८) आमचा देश शेतकीप्रधान आहे. आणि आम्हीं आतां उद्योगधंद्यांना आमच्या देशांत सुरुवात केलेली आहे. तेव्हां औद्योगीकरण आणि शेतकीसुधारणा यांचा समन्वय होऊन भारतांत शेतीला उर्जितावस्था आणली पाहिजे. आपण आपला देश उद्योगाच्या बाबतींत बलवत्तर ठरेल असें केलें पाहिजे. सध्यां शेतकीबाबत अथवा उद्योगाच्या बाबतींत फारच थोडे लोक शिरत आहेत. थोड्या लोकांच्या हातीं लाखों रुपये, करोडों रुपये येऊन पडत आहेत आणि या देशांत गर्भश्रीमंत लोकांचा एक नवीन वर्ग उत्पन्न होत चाललेला आहे. एकदां या मंडळींची पैशाची लालसा पुरी झाली

कीं, हे लोक स्वार्थाच्या मागें लागतील आणि अमेरिकेमध्यें किंवा इंग्लंडमध्यें ज्याप्रमाणें लोकशाहींतसुद्धां कित्येक वेळेला श्रीमंतीचाच अंमल सुरू झालेला असतो, त्याप्रमाणें या देशांतसुद्धां या गर्भ-श्रीमंतीचाच अंमल सुरू होईल. यासाठीं अशा प्रकारच्या या उद्योगांना–पाशवी सुलतानशाहीला–वेळींच आळा घालावयाचा असेल तर शेतकींतला किंवा उद्योगांतला फायदा सर्वांना मिळावा, समाजाला मिळावा अशी सुव्यवस्था शास्त्रीसरकारनें घडवून आणली पाहिजे. ही तशी सुव्यवस्था घडवून आणण्यासाठीं लागणारी सुव्यवस्थित यंत्रणा आपल्या देशांत जितक्या तांतडीनें निर्माण करतां येईल तितक्या तांतडीनें ती योजना तयार करून सर्व भागांत ती प्रसारित झाली पाहिजे. आम्हांला यापासून त्रास होत असेल तर एका विशिष्ट वर्गाचें महत्त्व आणि वर्चस्व आणि त्यांचं केन्द्रीकरण आम्ही नेस्तनाबूत केलं पाहिजे. लोकशाहीचा प्रबळ वृक्ष जर आमच्या देशांत वाढवायचा असेल तर शास्त्री सरकारनें धडाडीनें समाजकल्याण करण्यासाठीं, ऐतखाऊ गर्भ-श्रीमंतांचं वर्चस्व निक्षून नाहींसं केलं पाहिजे.

(९) लांचलुचपत, लोभ, प्रत्येक गोष्टींसाठीं पैसे खाणें हा या देशांत रोजचाच प्रकार होत चालला आहे. या लांचलुचपतीपायीं आमचें शील भारतांत राहिलं नाहीं. पैसा अधिकाऱ्यांच्या खिशांत पडल्यामुळें ते गबर होत चाललेले आहेत. या पैशाचा उपयोग राष्ट्राला होत नाहीं. मंत्री काय, अधिकारी काय, साधा कर्मचारी काय प्रत्येकजणाची वृत्ति अशी होत चाललेली आहे कीं, ‘दाम करी काम’. ही वृत्ति लांच्छनास्पद आहे आणि म्हणूनच निष्ठुरपणें हीं लांचलुचपत प्रकरणें एव्हांनाच थांबविलीं नाहींत तर राष्ट्राचा ऱ्हास होऊन राष्ट्रामध्यें अशा परिस्थितीची स्वैरवृत्ति बळावून राजकारणांत क्रांत्या सुरू होतील. आतांच या लांचलुचपतीला वेसण घालण्यासाठीं जितका आग्रह लालबहादूर शास्त्री धरतील तितकी त्याची अत्यंत आवश्यकता आहे.

(१०) भारतांतील प्रत्येक रहिवाशाला आपल्या देशाबद्दल अभिमान वाटला पाहिजे. त्याची मान अभिमानानं ताठ झाली पाहिजे. मी या राष्ट्राचा घटक आहे अशी भावना त्याच्या मनांत प्रदीप्त झाली पाहिजे. त्याचा स्वाभिमान ज्वलन्त आणि जाज्वल्य असला पाहिजें. अन्याय होत असेल, अपमान होत असेल, समता मिळाली नाहीं, योग्य ते निर्णय मिळाले नाहींत तर संघटना करून, निष्ठात्मक जाहीरनामे काढून वर्तमानपत्रें आणि जाहीर सभा यांच्यामधून त्या त्या प्रश्नांचा ऊहापोह करून त्यांनीं आपलं नागरिकत्व प्रत्यहि पंतप्रधानापासून तो चपराशापर्यंत प्रत्येकानें दाखवून दिलं पाहिजे. राष्ट्राचा सगळयांत मोठा बिन्दु, राष्ट्राचा मोठा आधार म्हणजे त्या देशांतील, त्या राष्ट्रांतील रहिवासी होत. त्या रहिवाशांचें अस्तित्व वरच्या पंतप्रधानापर्यंत दिसलं पाहिजे, पटलं पाहिजे आणि प्रत्येक राष्ट्रघटकाला सुख, स्वास्थ्य, समाधान आणि आनंद देण्याकडे शास्त्रींची झेंप गेली पाहिजे. देशांत आनंद नसेल तर राष्ट्र फारसें टिकणार नाहीं. म्हणूनच शास्त्रीसरकारनें आपला मूलभूत घटक हाच समजला पाहिजे कीं, राष्ट्रांतील प्रत्येक रहिवाशाचं श्रेष्ठपण कायम राहील आणि त्याच्या सुखाला पोषक अशा सर्व गोष्टी भारतांत सदैव आणि सतत होत राहतील.

शास्त्रीजींनीं एका अत्यंत दृढ पद्धतीनं वर नमूद केलेल्या सर्व गोष्टी अमलांत आणल्या पाहिजेत. आणि केवळ अमलांत आणूनच फक्त तें धोरण चालणार नाहीं तर सर्व प्रजा संतुष्ट झाली पाहिजे, प्रजेला धन्यता वाटली पाहिजे. याचें कारण आम्ही भारतीय लोक त्या मानानं अत्यंत सहनशील आहोंत. आम्ही हातांत कायदा घेत नाहीं. पण म्हणून शास्त्रीजींनीं आमच्या गरजांकडे, आमच्या अत्यंत योग्य अशा गोष्टींकडे जर लक्ष दिलं नाहीं, तर एकाद्या वेळीं आमच्यामध्यें उद्रेक निर्माण झाल्याशिवाय राहणार नाहीं, आमच्यांत उठाव झाल्याशिवाय राहणार नाहीं. संघशक्तीनें कितीहि मगरूर सुलतानशाहीला आळा बसूं शकतो. लोकशाहींत संघटनेमुळें केवळ राजकीय धोरणाला किती विरोध करावा लागेल याबद्दल न लिहिलेलंच बरं.

नवीन राज्याला सुरुवात झालेली आहे. नवीन निवडणुका जवळ येत आहेत, नजीक येत चाललेल्या आहेत. नवीन पंतप्रधानानें आपल्या स्वतःच्या आत्म्याशीं एकनिष्ठ होऊन लोकांच्या आणि पर्यायानें राष्ट्राच्या भवितव्याबद्दल आधींच विचार करून योग्य ते निर्णय घेऊन, योग्य त्या योजना आंखल्या पाहिजेत. तरच भारत हें लोकशाही राष्ट्र होईल आणि तरच भारतामध्यें सुव्यवस्था, सुबत्ता आणि स्वास्थ्य यांचें वातावरण प्रस्थापित होईल.

शास्त्रीसरकार वरील या सर्व ऊहापोहाकडे लक्ष देईल काय अशीच मुंबईकरांची त्यांना पृच्छा आहे.

* * *

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत.
अनुक्रम ८८०८९० वि: परेश
नोंद दि: २१३।६०

# सरहद गांधी

## : ३२ :

लाहोर स्टेशनवर मी अगदीं जिकिरीला आलों. पेशावरची गाडी ५ नंबरच्या प्लॅटफॉर्मवर येणार म्हणून तिथें माझें अवाढव्य सामान हमालानें नेऊन उतरविलें. पांच दहा मिनिटें प्लॅटफॉर्मवर फिरून पंजाबी सौंदर्य-लतिकांकडे पाहात मी माझ्या डोळ्यांचें पारणें फेडतों न फेडतों तोंच गाडी ४० मिनिटें उशिरा येणार म्हणून समजलें. लवकरची गाडी म्हणून संध्याकाळीं न जेवतां मी स्टेशनवर आलों होतों. उगाच उपासमार ! ही बातमी आगाऊ समजली असती तर स्वादिष्ट पंजाबी अन्नावर चांगला हात मारून तरी निघालों असतों. चाळीसच मिनिटें एक्स्प्रेसची जास्त वाट पाहावी लागणार म्हणून मी मनाचें समाधान करतों—कारण त्या दिवशीं मुंबईच्या वादळामुळें सकाळीं येणारी फ्रॉंटियर मेल संध्याकाळीं ७ ला आली—तोंच हमालानें गजर केला कीं गाडी लवकर येत आहे. पण ती ८ नंबरच्या प्लॅटफॉर्मला लागेल. नको जीव झाला अगदीं. पुन्हां सगळं सामान घेऊन आम्ही एकदांचे ८ नंबरच्या प्लॅटफॉर्मवर येऊन ठेपलों. ८ नंबरच्या

प्लॅटफॉर्मला पोंचून ४–५ मिनिटें झालीं असतील नसतील तों पुन्हा गर्जना ऐकली कीं गाडी ५ नंबरच्या प्लॅटफॉर्मलाच लागणार. पुन्हा सगळें सामान घेऊन ५ नंबरचा प्लॅटफॉर्म गांठावा लागला. माझा पाय प्लॅटफॉर्मला लागायला आणि गाडी स्टेशनांत यायला एक गांठ. धांवतच डबा गाठला व एक म्हातारें युरोपियन जोडपें उतरलें होतें तिथें सामान लावलें. जिकिरीला आलेल्या जिवाला आता कुठें निवाऱ्याची जागा मिळाली. भूक लागली होती. आमलेट, ब्रेड इत्यादि खाद्यसाहित्य बरोबर आणलेंच होतें, त्याच्यावर ताव मारायला सुरुवात केली.

एक दोन फाके मारल्यावर, जरा तळीराम गार झाला व डब्यांत आणखी कोण प्रवासी आहेत म्हणून इकडे तिकडे पाहिलें तों दाराकडे बरीच गर्दी दिसली. असेल कसली तरी झुंबड म्हणून दुसरीकडे नजर फिरविणार, तोंच त्या गर्दीत उंचच उंच, लालबुंद, हसऱ्या चेहेऱ्याची व्यक्ति दिसली. तिच्याकडे नजर लागली मात्र, लगेच वेधून घेतलं तिनं माझं मन. त्या जनसमुदायांत प्रभावी व्यक्तित्व त्या एकाच व्यक्तींत दिसत होतं. एका सेकंदांत मी ताडलं कीं ही व्यक्ति दुसरी तिसरी कोणी नसून अबदुल गफारखान—सीमा प्रांताचे गांधी होत. अलभ्य लाभ होता तो मला असल्या असामान्य व्यक्तीच्या दर्शनाचा. मी मनानं त्यांना वंदन केलं.

अबदुल गफारखान डब्यांत आले. बरोबर आलेल्या मंडळीनं त्यांच अंथरूण पसरविण्याचा प्रयत्न केला. पण त्यांनीं कोणाचीहि सेवा घेतली नाहीं. अलगत आपलं बेडिंग वरच्या बर्थवर ठेवलं व स्वतःच्या हातानं तें आंथरलं. बरोबर आणलेली फळांची टोपली त्यांनीं बिस्तऱ्याकडे ठेविली. डब्यांतील सगळ्या लोकांकडे पाहून मंदस्मित केलं व पुन्हां प्लॅटफॉर्मच्या गर्दीत जाऊन ते मिसळले. एवढी गर्दी जमली होती, तरी पण गफारबाबांचं ( ह्या नांवानंच सरहद्द प्रांतांत ते ओळखले जातात ) सर्वांना दर्शन होत होतं. चांगली ६–७ फूट त्यांची उंची आहे. चेहरा लालबुंद आहे. डोळे बारीक पण तेजस्वी आहेत. नाक एखाद्या टेकडीच्या तुटलेल्या कड्यासारखं पण नीटस आणि रुबाबदार आहे. कोणत्याहि स्वतंत्र देशांत अब्दुल गफारखान बडे लष्करी अम्मलदार झाले असते अशी त्यांची

शरीरयष्टि आहे. खरंच, परतंत्र हिंदुस्थानांत गांधीजींच्या एकनिष्ठ शिष्यांतील ते आघाडीचे सरसेनापति नाहीत काय ?

प्लॅटफॉर्मवरून जाणाऱ्या येणाऱ्या युरोपियन, हिंदी माणसांना थोडा वेळ तरी त्यांच्याकडे पाहिल्यावांचून पुढें जाणं अशक्य होतं. गरीब खेडूत पठाण मंडळी तर देवदर्शन झाल्यासारखं समजून, मुग्ध होऊन जागच्या जागीं खिळून उभी होती.

गाडी सुरू झाल्याबरोबर अब्दुल गफारखान डब्यांत आले. अतिशय नम्रतेनं त्यांनीं एका युरोपियन वेषधारी हिंदी गृहस्थाला थोडीशी बसण्या-करितां जागा घेऊं का म्हणून विचारलं. संमति मिळाल्यावर त्या गृहस्थाचं बेडिंग थोडसं बाजूला केलं, व जी थोडीशी जागा मिळाली तीवर ते विराजमान झाले. आपले लांबच लांब हात दोन तीनदां एकमेकांवर घासले व डोळे मिटून जणुं कांहीं ध्यानस्थ होऊन ते बसले. त्यांची या वेळची ध्यानस्थ मूर्ति खरोखरीच मनोज्ञ होती. त्या त्यांच्या विशिष्ट बैठकींत त्यांची सुसंस्कृतता, सात्त्विकता व ध्येयवादित्व पूर्णपणें प्रतीत होत होतं. जातीनं पठाण म्हणजे त्यांच्यांत क्रौर्य, आडदांडपणा, बेईमानपणा, रानटी वृत्ति दिसायला पाहिजे होती. पण त्यांच्या ध्यानस्थ मूर्तीकडे पाहून कोणालाहि वाटलं असतं कीं ते एक संत पुरुष आहेत.

" इंग्रजींत तुमची स्वाक्षरी द्यायला इतके कां तुम्ही आढेवेढे घेतां ? " चालत्या गाडींत उडी मारून आमच्या डब्यांत आलेल्या एका जवान मुसलमानानं गफारबाबांना प्रश्न केला. त्याच्या हातांत उघडं फाउन्टन पेन होतं व हरदयाळांच्या Hints on Self Culture या पुस्तकाचं पहिलं पान स्वाक्षरीसाठीं त्यानं गफारबाबांपुढं केलं होतं.

गफारबाबांनीं डोळे उघडले. त्या तरुणाकडे पाहून त्यांनीं स्मित केलं व ते म्हणाले, " इंग्रजींत स्वाक्षरी द्यायला माझी तयारी नाहीं. माझ्या भाषेंत पाहिजे असेल तर देतों. माझी ना नाहीं. " पुन्हां गफारबाबांनीं डोळे मिटले.

" तुम्हांला इंग्रजी येत नाहीं का ?" त्या मुसलमानानं दुसरा प्रश्न केला.

गफारबाबांनीं डोळे उघडले व ते नुसते हसले. एक जाडजूड शीख गृहस्थ आमच्या शेजारी बसले होते, ते उद्गारले, " या प्रश्नाचं उत्तर मी

देतों. आमच्या आलम सरहद्द प्रांतांत इंग्रजी जाणणारे जे कांहीं विद्वान् लोक आहेत त्यांत गफारबाबांची गणना होते. तुम्ही त्यांना इंग्रजी येतं काय, असा प्रश्न विचारण्याची जरुरीच नाहीं मुळीं.'

गफारबाबांनीं डोळे साफ उघडले. डब्यांतील सर्व प्रवाशांकडे पाहून मंद स्मित केलं व ते म्हणाले, 'मला काय येतं आणि काय नाहीं याचा पाढा मी कशाला वाचूं? मी या गृहस्थांना एवढंच म्हटलं कीं, मी स्वाक्षरी राजीखुशीनं देईन, पण माझ्या भाषेंत. इंग्रजींत पाहिजे असा हट्ट ते धरताहेत. तरुण आहेत ते. हट्ट त्यांना शोभून दिसतो.'

गफारबाबांच्या शेवटच्या वाक्यामुळं डब्यांत हास्याची खसखस सुरू झाली. तो पंजाबी तरुण होता. थोडासा निर्ढावलेलाच होता तो. त्याला गफारबाबांनीं काढलेल्या चिमटयाचं कांहींच वाटलं नाहीं.

त्यानं दुसऱ्याच विषयाला हात घातला—

'गांधीजी व त्यांचे जे वृद्ध अनुयायी आहेत त्यांची सद्दी आतां संपली आहे, असं नाहीं तुम्हांला वाटत?'

'स्वाक्षरी प्रकरण' आतां बाजूला राहिलं. सरहद्द गांधींना आतां त्या तरुणानं छेडायला सुरवात केली.

डब्यांतील इतर प्रवाशांना हा प्रश्न तितकासा रुचला नाहीं. गफार-बाबांच्या मनावर या प्रश्नाचा काय परिणाम झाला असेल तो देव जाणे. पण त्यांनीं उत्तर मात्र निर्विकारपणें दिलं.

ते म्हणाले, 'आपल्या म्हणण्याप्रमाणं गांधीजी आणि त्यांचे अनुयायी वल्लभभाई पटेल, पट्टाभि सीतारामय्या, मौलाना अबुल कलम आझाद, राजगोपालाचारी, सरोजिनीदेवी व स्वतः मी—या सर्वांची सद्दी संपली असेल, पण सद्दी संपली अशी हाकाटी झाली म्हणून आमचं काम आम्ही थोडंच सोडणार आहोंत? आम्ही सेवाधर्म पत्करला आहे. आमचं कार्य अविरत चालू राहणार. मरू त्या दिवशी तें खतम् होणार. असं कधींच होत नाहीं, कीं एखाद्याचं युग संपलं असं तुमच्यासारख्यांनीं म्हटलं कीं तो आपल्या कामाला पूर्णविराम देतो आणि 'हरि हरि' म्हणत स्वस्थ बसतो. परंत

पडो अगर न पडो, तो आपली सेवा आपल्या अंतःकरणाच्या प्रेरणेप्रमाणं करीतच असतो '–

आणखी कांहीं तरी गफारबाबा बोलणार होते. पण मध्येंच त्या तरुणानं दुसरा प्रश्न टाकला.

" शिस्तीच्या नांवाखालीं कॉंग्रेसमधून बोस, रॉय, नरीमन यांच्यासारख्या लोकांची उचलबांगडी होत आहे, हें तरी तुम्हांला पटतं का ? "

मला वाटलं, आतां गफारखां गप्प बसतील, नव्हे गोंधळतील; पण अशा प्रश्नांची त्यांना संवयच दिसली. कारण त्यांनीं पटकन् उत्तर दिलं, "बोस, रॉय यांच्या उचलबांगडीची गोष्ट सध्यां बाजूला ठेवा. पण मला आपण एक उत्तर द्या, एखाद्या संस्थेस अथवा व्यक्तीस शिस्तीची आवश्यकता आहे कीं नाहीं ? तुम्ही एखाद्या विद्यालयांत शिकत आहां, तर तेथील नियम, कायदेकानू तुम्ही पाळाल कीं नाहीं ? कॉंग्रेससारख्या महान संस्थेचे काहीं नियम, कायदे आहेत. त्या संस्थेशीं संलग्न असणाऱ्या सर्व मंडळीनीं आणि विशेषतः पुढाऱ्यांनीं ते नियम पाळायला नकोत कां ? बोस, रॉय ही नेते मंडळी आहेत. त्यांना कॉंग्रेसची शिस्त कबूल नाहीं. मग त्यांनीं कॉंग्रेसबाहेर राहून काम करावें हें योग्य नाहीं कां ? कोठल्याहि पुढारलेल्या राष्ट्रांत तेथील राष्ट्रीय संस्थांचे नियम असायचेच. जे सभासद ते नियम पाळीत नाहींत त्यांना या संस्था आपलं सभासदत्व कायम ठेवूं देतील कां ? अफाट कार्याला कॉंग्रेसमध्यें अथवा कॉंग्रेसबाहेरदेखील हवा तेवढा वाव आहे. मग या अद्वितीय पुढाऱ्यांना मतभेदामुळं बाहेर पडावं लागलं तर त्याबद्दल एवढी हुल्लड कशाला उडवायला पाहिजे ? कॉंग्रेसनं आपलं कार्य करावं, या पुढाऱ्यांनीं आपल्या रस्त्यानं जावं. पुन्हां केव्हां तरी ही मंडळी एकत्र येतील अगर अशीच अखेरपर्यंत विभक्त राहतील. त्यांचा रस्ता बरोबर असेल तर लोक त्यांची कास धरतील. कॉंग्रेसचा मार्ग योग्य असेल, तर जनता कॉंग्रेसला पाठिंबा देईल. आजच्या या हुल्लडीमुळं देशकार्याला मात्र बराच फाटा मिळत आहे. "

गफारबाबा संथपणें, विचारपूर्वक बोलत होते. त्यांच्या हातांची चुळबूळ सारखी चालू होती. अगावरचं उपरणं ते वरखाली करीत होते.

त्या पंजाबी तरुणाच्या मनांत विचारांचं काहूर माजलेलं दिसत होतं. कारण गफारबाबांचं त्याच्या पूर्वीच्या प्रश्नाचं उत्तर पुरं होण्यापूर्वींच यानं आणखी एक प्रश्न गफारबाबांना केला,–" गांधीमार्ग निःसत्त्व, नेभळट आणि शेळपट वाटत चालला आहे लोकांना. त्यांचें तें सत्य अहिंसा–थोतांड आहे सर्व. गांधींनीं हिंदी राजकारण बेचव करून टाकलं आहे सर्व. सशस्त्र क्रांतीनंच जगांत स्वराज्य स्थापन झालं आहे. पारतंत्र्यांत खितपत पडलेल्या देशांत तोच खरा मार्ग आहे स्वराज्यप्राप्तीचा."

पुन्हां आम्हां सर्वांना वाटलं, गफारबाबा घुटमळणार, घोटाळणार. पण ते नुसते हसले व म्हणाले, "मला तुम्हा तरुणांची गंमत वाटते. तुम्ही सीमेवर बसतां आणि नुसत्या पंडिती बाता करतां. टीका करायला कुणाचं काय जातं ? पण मी म्हणतों, तुम्ही कार्यप्रवृत्त कां होत नाहीं ? तुमचं मन सांगतं ना तुम्हांला, क्रांतिमार्ग योग्य आहे म्हणून ? करा मग कार्याला सुरवात. थांबता कां ? हिंद–राष्ट्रापुढें स्वराज्य–संपादनाचे दोन मार्ग आहेत. एक गांधीमार्ग, दुसरा क्रांतिमार्ग. ज्याला जो पसंत आहे त्यानं त्या मार्गानं कार्याला लागावं. उगाच बक्‌बक् नको. आम्हांला आमचा अहिंसा–मार्ग प्रिय आहे. ह्या मार्गानं स्वराज्य मिळायला वेळ लागला, तरी आम्हांला खात्री वाटते, तें अखेर याच मार्गानं मिळणार. तुमच्या क्रांतिमार्गानं कदाचित स्वराज्य ताबडतोब मिळणार असेल तर जरूर तें मिळवा. नको कोणाला तें स्वराज्य ? हा निष्ठेचा प्रश्न आहे. निष्ठेमुळं आम्ही कार्यप्रवण झालों आहोंत. गांधीजींनीं, बरी वाईट कशी का असेना, पण भरीव देशसेवा केली आहे. तुम्ही तुमची सेवा क्रांतिमार्गानं करा. मी अकारण टीकेच्या मात्र विरुद्ध आहे. तुम्ही दोन वेळ मजेनं घरचं चमचमीत अन्न खाता, बरीचशीं नवनवीन राजकीय पुस्तकं चाळतां आणि त्यावर सखोल विचार न करतां तुमचीं अपक्व मतं मोठमोठ्यानं जाहीर करता. मी म्हणतो, हीं मतं तुम्ही कृतींत उतरवा, हिंदी क्रांतियुगाचे संस्थापक व्हा, स्वराज्य मिळवा; मी तुम्हांला वंदन करीन."

आणि खरोखरीच गफारबाबांनीं त्या तरुणाला हात जोडले. तो थोडासा खजील झाला. डब्यांतील प्रत्येकाला त्याच्या छेडण्याच्या वृत्तीचा राग आला

होता. पण त्याच्या बेदरकार प्रश्न विचारण्याच्या कसबाबद्दल त्याचं कौतुक वाटत होतं आम्हा सर्वांना.

" हिंदु–मुसलमानांची तेढ वाढायला काँग्रेस कारणीभूत झाली आहे, असं बऱ्याच जणांचं मत आहे. त्यावद्दल तुमचं म्हणणं काय आहे ? " पुन्हा त्या तरुणानं चमत्कारिक प्रश्न विचारला. मला वाटलं, गफारबाबा आतां तरी गप्प बसतील. असल्या जातीय प्रश्नावावत मौन स्वीकारतील. पण त्याचे ओठ हलूं लागले, हातांची चुळबुळ पुन्हां सुरू झाली. माझी खात्री झाली ते या प्रश्नाला उत्तर देणार म्हणून.

नेहमीप्रमाणें ते हसले व आपले डोळे किलकिले करत त्या तरुणाला उद्देशून ते म्हणाले, " तुम्ही एखाद्या रांगत्या मुलासारखे आहांत. तें कसं खेळतांना अगर चालतांना आपल्या बापाचे कधी हात धरतं, कधीं पाय धरतं, तर कधी डोक्यावर चढून बसतं, तसे तुम्ही एकदां एक प्रश्न विचाराल, तर दुसऱ्यांदा भलताच प्रश्न टाकाल. एकाचा मेळ नाहीं दुसऱ्याला. हिंदु–मुसलमानांच्या तेढीबद्दल मी एवढंच म्हणतो–ती एक विशिष्ट परिस्थितीमुळं उत्पन्न झालेली बाब आहे. तें एक हिंद–राष्ट्राचं सध्याचं दुर्दैव आहे. पण तें पार नाहींसं होईल. हिंदु–मुसलमानांची एकी होणार यावर माझा अढळ विश्वास आहे. स्वार्थी हिंदु वा मुसलमान पुढाऱ्यांनीं लोकांना गांगरून टाकलं आहे. त्यामुळं त्यांना स्व-विचार आणि सु-विचार सुचेनासा झाला आहे. आज या जातीय पुढाऱ्यांच्या वर्चस्वाचा दाब वाढलेला आहे. पण आपापसांत यादवी होऊन जेव्हां डोकीं फुटतील आणि रक्ताचे पाट वाहूं लागतील, तेव्हां जनतेचा आजचा मद उतरून पुन्हां ती ताळ्यावर येईल; व मग हिंदु–मुसलमानांच्या एकीची काय भलाई आहे तें त्यांना नीट कळेल. जनतेला चांगला जबर फटका बसल्याशिवाय तिचे डोळे उघडत नाहीत. पण एकदां ते उघडले कीं मग मतपरिवर्तन व्हायला वेळ लागत नाहीं. हा परिवर्तन-काळ जवळ येत चालला आहे. म्हणूनच मला वाटतं, हिंदी जनतेला सध्यां अवदसा सुचत आहे. लाळ घोटीत ती स्वार्थसाधू पुढाऱ्यांच्या मागे लागली आहे. एकदां स्फोट होऊं द्या, म्हणजे मग हिंदु–मुसलमानांना कळून चुकेल की तेढींत तोटा आहे, एकींत फायदा आहे–"

एवढं गफारबाबांचं बोलणं होत आहे, तोंच गाडी गुजराणवाला स्टेशनला आली. त्या पंजाबी मुसलमान तरुणाला तिथं उतरायचं होतं. तो उठून उभा राहिला व म्हणाला, "माफ करा, मला इथं उतरायचं आहे. मग मला स्वाक्षरी देतां ना ?"

गफारबाबांनीं त्याच्या हातांतील ग्रंथ व फाउन्टनपेन घेतलं. गुपचूप स्वाक्षरी केली व तो ग्रंथ व फाउन्टनपेन त्या तरुणाला दिलं. आम्हां सर्वांना आतां उत्कंठा लागली होती--स्वाक्षरी इंग्रजींत आहे की पुश्तूंत. आमची उत्कंठा त्या जवानाला समजली कीं काय न कळे, पण तो आम्हां सगळ्यांकडे बघून उद्गारला, "गफारबाबा हट्टी आहेत. त्यांनी शेवटीं स्वाक्षरी आपल्या मातृभाषेंत केली आहे."

आम्हां सर्वांना त्यानं गफारबाबांना हट्टी म्हटल्यामुळं हसूं कोसळलं. गफारबाबासुद्धां मनःपूर्वक हसले.

गाडी चालू झाल्यावर गफारबाबा टुणकन् चढून आपल्या बर्थवर पडले. किती लांबच लांब त्यांचा तो देह ! त्यांना एक बर्थ कमीच पडत होता. त्यांनीं डोळे मिटून घेतले होते व त्यांचं कसलं तरी चिंतन चाललं होतं. गाडीत आतां सर्वत्र स्तब्धता पसरली होती. बहुतेक मंडळी आपापल्या बिस्तऱ्यावर लवंडली होती. तरी पण पडल्या पडल्या सर्वांचं लक्ष वर बर्थवर झोपलेल्या गफारबाबांकडे होतं. ते कसे झोपतात, काय करतात, याबद्दल सर्वांना कुतूहल वाटत होतं.

प्रातःकाळीं चार वाजतां एका लहानग्या स्टेशनवर गाडी उभी राहिली. गफारबाबा तोंड धुण्यासाठीं खालीं उतरले. त्यांनीं स्टेशनवर दोन-चार फेऱ्या मारल्या. गार्ड, स्टेशनमास्तर वगैरे मंडळींनीं Good Morning ची त्यांना सलामी दिली. स्पष्ट शब्दांत Good Morning to you म्हणून त्यांनीं उलट सलामी दिली. गाडी सुरू होतांच ते आपल्या बर्थवर चढले. त्यांनीं आपलं फ्रुट बास्केट काढलें. प्रथमतः त्यांतील चांगलीं फळं काढून जागे असणाऱ्या मंडळीस, 'आपण घेता का' म्हणून त्यांनीं विचारलं. कराचीहून आलेल्या एका हिंदु गृहस्थास व रावळपिंडीला चढलेल्या एका मुसलमान गृहस्थास त्यांनीं कांहीं फळं घेण्याचा फारच आग्रह केला; व तीं

घेण्यास त्यांना भाग पाडलं; व मग आपला फलाहार त्यांनीं केला. ते दिवस 'रोज्या'चे असल्यामुळं इतक्या लवकर गफारबाबा आपला आहार करीत असावेत अशी मी अटकळ बांधली. खाणं संपल्यावर ते डब्यांतील जाडजूड शीख गृहस्थाकडे आले; व 'आपल्या शेंजारी बसूं का?' म्हणून अत्यंत नम्रतेनं त्यांनीं विचारलं. त्या शीख गृहस्थाला गफारबाबांबद्दल अतिशय आदर वाटत असावा असं त्याच्या चेहऱ्यावर स्पष्ट दिसत होतं. त्यानं लगेच आपला बिछाना झटकून एक पांढरी चादर अंथरून गफारबाबांना आसन तयार करून दिलं. थोडा वेळ डब्यांत स्तब्धता नांदत होती. सर्वांचं लक्ष गफारबाबांवर खिळलं होतं.

"सरहद्दीवरील टोळ्यांची संघटना करण्यासाठीं नुकतेच भुलाभाई देसाई व असफअल्ली पेशावरला येऊन गेले. ब्रिटिशांना आज दीडशें वर्षांत या टोळ्यांच्या बाबतींत यशस्वी धोरण स्वीकारतां आलेलं नाहीं आणि अजूनहि हा सरहद्दीकडचा अत्यंत महत्वाचा प्रश्न भिजतच पडलेला आहे. या काँग्रेस पुढाऱ्यांना या टोळ्यांशीं सल्लामसलत करण्यास इंग्रज सरकारनं परवानगी दिली नाहीं, ही अत्यंत दिलगिरीची गोष्ट आहे. पण जी गोष्ट इंग्रजांना करतां आली नाहीं ती काँग्रेसला हातांत सत्ता नसतां शक्य आहे, असं तुम्हांला वाटतं?" त्या बलभीम शीख गृहस्थानं मोठ्या आदबीनं गफारबाबांना प्रश्न विचारला. त्या प्रश्नांत रात्रींच्या मुसलमान तरुणाचा ताठपणा नव्हता. उलट आपणांस योग्य तें ज्ञान व्हावं याच दृष्टीनं तो विचारला गेला होता.

गफारबाबांनीं विचार करायला जास्त वेळ घेतला नाहीं. सरहद्द प्रांतांतून आमची गाडी चालली होती. उजाडल्यामळें बाहेर फारच सुंदर दृश्यं दिसत होतीं. त्याकडे गफारबाबांनीं निश्चल दृष्टीनं पाहिलं. आकाशांत हळूहळू वर येणाऱ्या सूर्याप्रमाणे तांबूस अशा त्यांच्या चेहऱ्यावर नेहमींचं हास्य विलसलं व ते उद्गारले, "शक्याशक्यतेच्या गोष्टी आपण सध्यां बाजूला ठेवूं. पण आपणांला असं वाटत नाहीं कां कीं, जी काँग्रेस आज हिंदुस्थानांतील सर्व राजकीय पक्षांत श्रेष्ठ आहे, तिनं या टोळ्यांच्या वायव्य सरहद्दीकडील या विशिष्ट प्रश्नाचा विचार करून आपलंहि धोरण ठरवून टाकलं पाहिजे?

ज्या बाबतीत इंग्रजांचं धोरण यशस्वी ठरलं नाहीं त्या बाबतींत काँग्रेसनं काढलेली तोड यशस्वी कशावरून ठरणार नाहीं ?"

"पण या बाबतींत काँग्रेसनं कांहीं विशिष्ट धोरण आखलेलं आहे कां ?" तो शीख गृहस्थ मध्येंच म्हणाला.

"छे छे !" गफारबाबा म्हणाले, "अहो, अजून काँग्रेसनं तसं कांहींच धोरण आखलेलं नाहीं. पण मला वाटतं, जिथं ब्रिटिशांची मति खुंटली, तिथं काँग्रेसनं कांहीं प्रगति केली तर त्यांत वाईट काय आहे ? प्रयत्न करायला कोणती हरकत आहे ? कदाचित् काँग्रेसच्या धोरणानं या टोळचांतील लोकांत कांहीं बदल झाला, तर आज सरहद्दीवर जो लाखों रुपयांचा खर्च होत आहे, त्याचा विनियोग इतर ठिकाणीं फार चांगल्या रीतीनं करतां येईल."

त्या शीख गृहस्थाचं या उत्तरानं समाधान झालेलं दिसलं. कारण आणखी पुढे त्यानं कांहीं पृच्छा केली नाहीं. पुन्हा आम्हां सर्वांचं लक्ष बाहेरच्या प्रसन्न वातावरणाकडे वळलं. गफारबाबांनीं आपल्या बिस्तऱ्यांतून Ajanta Caves नांवानं एक चोपडं काढलं व बाहेरच्या निसर्गाचा आस्वाद घेत घेत ते त्या पुस्तकाचीं पानं चाळूं लागले.

"माफ करा, काल माझ्या मुसलमान भाईनं विचारलेल्या प्रश्नाचीच पुनरावृत्ति होत आहे. पण कालपासून तोच तो प्रश्न माझ्या मनांत मळमळत आहे. म्हणून विचारण्याचा हिय्या करीत आहे. इच्छा नसल्यास आपण उत्तर देऊं नका हवं तर," नखशिखान्त इंग्रजी पोषाख केलेल्या एका हिंदी गृहस्थानं अचानकपणें बोलायला सुरवात केली होती. "शांति-मार्गानं स्वराज्य मिळेल अशी अगदीं सोळा आणे खात्री तुम्हांला वाटते कां ? हिंदुस्थानांत जी क्रांति केव्हां होणार आहे ती शंभर टक्के शांतिमार्गानं, क्रांतीशीं सदा संलग्न असा रक्तपात झाल्याशिवाय होईल कां ?"

गफारबाबांनीं हातातलं पुस्तक खालीं ठेवलं. पाय वाकावर घेऊन त्यांनीं मांडी घातली. हात एकमेकांवर घासायला सुरवात केली. नेहमींप्रमाणें हसले थोडेसे, पण गंभीर झाली त्यांची मुद्रा लगेच. क्षणभर एक सुरकुती येऊन गेली त्यांच्या भव्य कपाळावर. त्यांनीं अगदी सावकाश बोलायला सुरवात केली—

" शांतिमार्गानं क्रांति घडवून आणणं हा मानवी प्रयत्न आहे. सुसंस्कृत मानवाचं तें अत्युच्च ध्येय असावं असं माझ्यासारख्या शांतिमार्गावर संपूर्ण विश्वास असलेल्याला सदैव वाटतं. पण या मानवी प्रयत्नाला ईश्वराचं सहाय्य मिळालं पाहिजे. माझ्या मनांत जेव्हां जेव्हां खूप विचारांची वावटळ उठते, तेव्हां तेव्हां असा संशय मनांत डोकावतो कीं, ईश्वरी संकेत निराळा तर नसेल ना ? रक्तपातमयच क्रांति कशावरून होणार नाहीं ? मानवी प्रयत्न फोल कशावरून ठरणार नाहीं ? विश्वाच्या मागें जी अदृश्य अशी प्रभावी शक्ति आहे, तिची तर इच्छा नसेल ना रक्तपातच घडवून आणण्याची. पण माझी अंत:प्रेरणा मात्र मला सारखी ग्वाही देते कीं, शांतिमार्गानं ना. माझा धर्म, माझं मन, माझी संस्कृति मला या मार्गाकडे बोट दाखवीत आहे. शांतिमार्गावर माझी अढळ निष्ठा आहे. माणूस सुंदर शहरं वसवतो, सुंदर सुंदर घरं बांधतो, सुंदर बगीचे तयार करतो; पण एक दिवस धरणीकंप होतो आणि हें सर्व बेचिराख होतं. आम्ही शांतिमार्गानं एक नवयुग निर्मिण्याचा प्रयत्न करीत आहोंत. ह्या नवयुगाची आमची कल्पना अतीव सुंदर आहे. पण ईश्वरी संकेत निराळाच असेल, तर आमचं मनोहर स्वप्न कुठल्या कुठं विरून जाईल आणि हिंदुस्थानांत रक्ताचे पाट वाहतील. पण धरणीकंप होईल म्हणून माणूस शहरं वसविण्याचं काम सोडत नाहीं. तसंच मानवानं शांति-मार्गाचीहि कास सोडून चालणार नाहीं. मात्र रक्तपातरहित राज्यक्रांति यशस्वी झाली, तर मानवाच्या सांस्कृतिक इतिहासांत मौलिक भर पडेल."—गफारबाबा आणखी बोलत राहिले असते, पण पेशावर स्टेशन आलं व स्टेशनच्या गजबजाटांत गफारबाबांच्या वक्तृत्वाचा ओघ थांबला. ते जागेवरून उठले व त्यांनीं बिस्तरा नीट बांधला. डब्याचा एक कोपरा रिकामा झाला होता. तिथं त्यांनीं आपली वळकटी लावली व ते थोडेसे रेलून बसले. त्यांच्या मुलुखांत आतां ते आले होते. बरेच पठाण त्यांना अभिवादन करीत होते. त्याचा ते अत्यंत नम्रतेनं स्वीकार करीत होते.

गाडी मध्येंच उभी राहिली. सिग्नल दिला नव्हता. गफारबाबांनीं आपली वळकटी अलगद उचलली, सर्वांना सस्मित अभिवादन केलं आणि ते गाडींतून खालीं उतरले. वळकटी काखोटीस, उपरणं मानेभोंवतीं, पायांत पठाणी चपला, पठाणी पद्धतीचा घोळदार वेष—सरहद्दीवरील लढाऊ जीवनाचं सार-

सर्वस्व त्यांच्यांत दिसत होतं या वेळीं. फक्त त्यांच्यांतील नम्रता आणि शालीनता मात्र सरहद्दीच्या वातावरणाला अगदीं विसंगत होती.

शेताच्या कडेकडेवरून ते चालले होते. सकाळच्या सोनेरी किरणांमुळं वातावरण अतिशय प्रसन्न होतं. शेतांत एक दोन गाई इकडे तिकडे फिरत होत्या. पलीकडच्या पुलावर कांहीं पठाण या वळकटी काखोटीला मारून शेतांतून वाट काढणाऱ्या अजब व्यक्तीकडे आदरपूर्वक कुतूहलानं पहात होते. त्यांनीं आपल्या गफारबाबांना ओळखलं होतं. गाडी चालू झाली. गफारबाबा पांच सहा टांगा टाकून पुलापलीकडे अदृश्य झाले.

माझ्या शेजारी बसलेले एक पठाण गृहस्थ उद्गारले, " मंगलबाबा, ( सरहद्दीवरील लोक गांधीजींना या नांवानं ओळखतात. ) सच्चे शांतिदूत आहेत. पठाणांचं मंगल करतील ते, हें नक्की. "

एवढ्यांत पेशावर कॅन्टोन्मेंट स्टेशनला गाडी पोहोंचली. माझी उतरण्याची धडपड, हमालाशीं हुज्जत व टांगेवाल्याशीं कटकट सुरू झाली. नेहमीं पेशावरला उतरतांना मी गांगरून जात असे. पण आज गफारबाबांच्या सान्निध्यानं मी पेशावरी वातावरणाशीं इतका तन्मय झालों होतों कीं, पठाणांशीं बोलतांना बिचकणारा मी मोकळेपणांनं बोलत होतो. त्यांच्याबद्दल एक स्निग्ध भाव माझ्या मनांत उत्पन्न झाला होता. त्या आडदांड, अवजड शरीरांतहि सात्विक सुंदर आत्मा असू शकतो, याची गफारबाबांना बघून मला खात्री पटली होती.

* * *

# श्री. ग. त्र्यं. माडखोलकर

: ३३ :

माझे स्नेही प्रो. विठ्ठलराव कुळकर्णी यांची चिठी घेऊन प्रथमतः मी श्री. माडखोलकरांच्या घरीं उतरण्यासाठीं गेलों. त्या वेळीं चिटणीसपुऱ्यांत चाळीवजा घरांत चार खोल्यांच्या ब्लॉकमध्यें ते रहात असत. मी त्यांच्या घरीं पोचलों, तेव्हां श्री. माडखोलकर कामावर गेले होते. सौ. शांताबाई माडखोलकर घरीं होत्या. त्यांनींच मला उतरवून घेतलं व माझी व्यवस्था लावून दिली. दुपारी १२ वाजतां श्री. माडखोलकर 'महाराष्ट्र' कचेरींतून जेवणासाठीं आले, तेव्हां आमची पहिली भेट झाली. औपचारिक प्रश्नावलि दोन्ही बाजूनं पुरी झाल्यावर त्यांनी माझ्याशीं निरनिराळ्या विषयांवर किती तरी बातचीत केली. मोठ्या कौशल्यानं माझा पेशा, नागपूरला येण्याचा माझा उद्देश वगैरे इत्थंभूत माहिती काढून घेतली व मी कशा रीतीनं माझ्या कार्यास प्रारंभ करावा, शिक्षणक्षेत्रांतील वऱ्हाड-मध्यप्रांताकडचा रागरंग, नागपूर हायस्कूल बोर्ड व विश्वविद्यालयांतील राजकारण यांसंबंधीं मला साद्यंत माहिती दिली. 'माझ्याकडून सर्व प्रकारची मदत

तुम्हांला मिळेल,' म्हणून त्यांनीं मला आश्वासनहि दिलं; व तें शब्दशः खर केलं. मी नागपूरला गेलों तेव्हा अनोळखी गृहस्थ या नात्यानं श्री. माडखोलकरांकडे गेलों, पण प्रथमपासून त्यांनीं इतकं जिव्हाळ्यानं मला वागविलं व इतकी मला मदत केली कीं, त्यामुळं आमची चांगलीच गट्टी जमली; व ती दिवसेंदिवस सारखी वृद्धिगत होत आहे.

आमची पहिली भेट चाळीवजा घरांत झाली. दुसऱ्या खेपेस श्री. माडखोलकरांनीं घर बदललं होतं. ते नव्या शुक्रवारींत 'गणेश–भवन' या प्रशस्त इमारतींत राहायला आले होते. ही दुमजली इमारत टुमदार होती. खालच्या बाजूस जुन्या पद्धतीची बैठक, जेवणघर, देवघर, स्वयंपाकघर, आंघोळघर आणि मागल्या बाजूस एक प्रशस्त सामानघर होतं; व माडीवर दिवाणखाना, श्री माडखोलकरांची खोली, मुलांची व सौ. शांताबाईंची खोली, त्या पलीकडे गच्ची व गच्चीला लागून पाहुण्यांची खोली होती.

श्री. माडखोलकर मला या पाहुण्यांच्या खोलीकडे घेऊन आले व हंसत हंसत म्हणाले, "कवि यशवंत नुकतेच या खोलींत सहकुटुंब राहून गेले आहेत. तुम्ही माझे दुसरे मित्र या खोलींत उतरणारे." मी नुसता हसलो. माझ्या मनाला मात्र सहज विचार चाटून गेला–श्री. माडखोलकर चाळीवजा घरांतून प्रशस्त भवनांत आले आहेत. पुढल्या खेपेस त्यांच्या मालकीच्या घरांत उतरण्याचा मोका यायचा.

आणि खरोखरीच त्यानंतर मी पुनश्च नागपूरला गेलो आणि मॉडेल मिल्स रोडवर शुक्रवार तलावाजवळ श्री. माडखोलकरांच्या मालकीचं बंगलीवजा नवं घर मला पहायला मिळालं. भाडोत्री घरांत रहाणारे श्री. माडखोलकर 'घरवाले' बनलेले दिसले. जसें वाङ्मयात आस्ते आस्ते मानमान्यता मिळवून आज ते एक प्रभावी लेखक गणले जात आहेत, तसेंच त्यांनीं आपल्या आयुष्यांतील आर्थिक ऊर्जितावस्थेचे टप्पे पायरी पायरीनें गाठले आहेत.

लहानपणीं ते गर्भश्रीमंतींत लोळले. तरुण वयांत उपजीविकेसाठीं त्यांची धडपड सुरू झाली. नागपूरस्थ झाल्यावर 'महाराष्ट्र'चे सहसंपादक म्हणून त्यांनीं प्रतिष्ठा मिळविण्यास प्रारंभ केला. याच काळांत ते एक खंदे लेखक

म्हणून पुढें आले; व त्यांच्या वाङ्मयीन यशाबरोबरच त्यांच्या आर्थिक उत्कर्षास प्रारंभ झाला. श्री. माडखोलकरांच्या भरभराटीच्या काळास या त्यांच्या मालकीच्या घरानं सुरवात झाली आहे. त्यांचं जीवन वाङ्मयीन असूनसुद्धां व्यवहार ते विसरलेले नाहींत. आणि सरस्वतीच्या गळ्यांतले ताईत बनूनसुद्धां लक्ष्मीचा त्यांच्यावर वरद हस्त आहे.

लेखक आणि दारिद्र्य यांचं सख्य जास्त. पण श्री. माडखोलकरांनीं लेखनबहाद्दरीनं जसा वाङ्मयीन जगांत उच्च दर्जा मिळविला आहे, तसाच नागपुरांत स्वतःचं घर बांधून 'सुसंपन्न रहिवाशी' अशी संज्ञा आपणास प्राप्त करून घेतली आहे.

श्री. माडखोलकर हे घरजावई आहेत. स्वतःच्या घरचे एकटेच असल्या-मुळें लग्न झाल्यानंतर ते सुरवातीला श्वशुरगृहीं राहूं लागले. नव्याजुन्याचा सुंदर मिलाफ त्यांच्या घरीं दिसून येतो. खालीं सारं बाळबोध वळण, तर वर सगळा आधुनिक प्रकार. शेतावर गेलेले नसले तर त्यांचे श्वशुर व सासूबाई, सौ. शांताबाईच्या आत्याबाई, चंद्रशेखर व मीनाक्षी आणि सौ. शांताबाई खालीं वावरत असतांना दिसतील; तर श्री. माडखोलकरांचा सारा वावर माडीवर. जेवणापुरतें ते खालीं उतरतात. खालीं संकष्टी, पोळा, महालक्ष्म्या वगैरे धर्मकृत्यं अखंड चालू असायचीं; तर वर त्यांची माहितीहि नसायची. श्री. माडखोलकर या धर्मकृत्यांस हातभार लावतात, तो फक्त सुग्रास अन्नावर ताव मारण्याचा. ते अधार्मिक नाहींत. पण धर्मकृत्यांपासून मात्र पूर्ण अलिप्त असतात. नवल वाटतं तें हेंच कीं, एकाच घरांत हे 'सनातनी' आणि 'आधुनिक' प्रकार चालतात तरी कसे? याला कारण सौ. शांताबाई आहेत. खालच्या 'जुन्या' कारभारांत त्या जुन्या आहेत; तर वर त्या शंभर टक्के नवमतवादी म्हणून वागतात. खालीं सोवळं नेसून ब्राह्मणांना वाढणाऱ्या या सनातनी बाई वर आल्या कीं निरनिराळ्या जातींच्या स्त्री-पुरुषांच्या संमिश्र समाजांत बसून नाना विषयांवर मनमुराद गप्पा मारतील, आपलीं प्रागतिक मतं निर्भयपणें तुम्हांसमोर मांडतील आणि प्रसंगीं आपल्या पुरोगामी विचारांनीं तुम्हांला आश्चर्यचकित करून सोडतील.

श्री. माडखोलकरांच्या या आधुनिक–सनातनी वातावरणांत छद्मीपणाचा मात्र लवलेश नाहीं. सारा खुला कारभार. खालच्या सनातनी कारभारांत वरची मंडळी मन घालायची नाहींत; वरच्या आधुनिक वातावरणांत खालची मंडळी फिरकायची नाहींत.

सौ. शांताबाई बालबोध वळणांतल्या असल्या, तरी श्री. माडखोलकरांच्या सहवासामुळं नवमतवादी बनल्या आहेत. माडखोलकरांच्या प्रभावी व्यक्तित्वा-मुळं त्यांच्यांत हें स्थित्यंतर होणं साहजिकच आहे. पण माडखोलकरांना इतकं श्रेय दिलं पाहिजे कीं, सौ. शांताबाईंच स्वतंत्र व्यक्तित्व त्यांनीं बिल-कूल लोपूं दिलेलं नाहीं. उलट त्यांनीं त्यांच्या व्यक्तित्वाचं काळजीपूर्वक सगोपन केलं आहे. स्वयंपाकघराच्या पलीकडे जग नाहीं, ही संकुचितता श्री. माडखोलकरांच्या घरीं नाहीं. स्त्रीविकासास योग्य अशी स्वतंत्रता व समता त्यांनीं सौ. शांताबाईंना बहाल केली आहे, केव्हां केव्हां श्री. माडखोल-कर व सौ. शांताबाई यांच्या विचारांत विसंवादी सूर तुम्हांला ऐकूं येतील. पण त्यामुळं त्यांच्या सुखी संसारांत दुःखाची सावली मात्र कधींहि पडलेली नाहीं.

श्री. माडखोलकर स्वत: मॅट्रिकपलिकडे शिकलेले नाहींत. पण सौ. शांताबाई बी. ए. झाल्या पाहिजेत, हा त्यांचा कटाक्ष. अजूनहि ‘ बाईसाहेबांनीं पी. ए. झालं पाहिजे ’ असं सारखं ते घोकीत असतात. विश्वविद्यालयीन शिक्षण त्यांना स्वत:ला घेतां आलं नाहीं, तरी पत्नीला त्यांनी तें दिलं आहे, आग्रहानं घ्यायला लावलं आहे. तेवढ्याच आग्रहानं ते बाईसाहेबांना वाद्यं वाजवायला उत्तेजन देतात, बॅडमिंटन खेळायला प्रोत्साहन देतात, बोटिंग शिकवितात, भारतीय महिला परिषदेला, प्रांतिक महिला परिषदेला पाठ-वितात, अनेक सामाजिक चळवळींत भाग घ्यायला लावतात. हेतु हा कीं, त्यांच्याहि हातून कांहींतरी विधायक कामगिरी व्हावी. सौ. शांताबाईंचंहि एक स्वतंत्र क्षेत्र असावं नि त्या क्षेत्रांत काम करून त्यांनीं नांव कमवावं.

आज सौ. शांताबाई मुलींच्या एका इंग्रजी शाळेच्या मुख्याध्यापिका आहेत. त्यांची बुद्धि तीव्र आणि ग्राहक आहे. त्या शांत, सुस्वभावी, अंतर्मुख व थोड्याशा हट्टी आहेत. सगळ्यांशींच त्या मोकळेपणानं बोलतील कीं नाहीं, हें सांगणं कठीण. पण आवडीच्या माणसांशीं मात्र त्या मोकळेपणीं

बोलतात. शिक्षणाची त्यांना फार आवड आहे. स्वतंत्र कार्य करण्याची फार हौस आहे. त्या खूप वाचतात, खूप श्रवण करतात. श्री. माडखोल-करांच्या लिखाणावर त्या मार्मिक टीका करतात. श्री. माडखोलकरांनीं लिहिलेला शब्द न् शब्द त्यांनीं वाचलेला आहे. आणि जिथं जिथं त्यांची विचारसरणी, कल्पना अगर विशिष्ट प्रसंग सौ. शांताबाईंना पसंत पडलेला नाहीं, तिथं तिथं त्यांनीं श्री. माडखोलकरांना तसा इशारा दिलेला आहे. श्री. माडखोलकरांचे व्यवहार योग्य वा अयोग्य याचं त्यांना पूर्ण आकलन असतं. त्यांचे कोठले मित्र सच्चे व कोठले भोंदू याची त्यांनीं अगोदरच खूणगांठ बांधलेली असते आणि त्यांचे तर्क व भाकितं हरहमेश खरीं ठरतात. श्री. माडखोलकरांनीं आपला बंगला, 'शांता-निवास' हें नांव देऊन, सौ. शांताबाईंच्या नांवावर चढविला आहे, याचं कारण हेंच कीं, आपल्या पत्नीच्या बहुमोल मदतीचं कांहीं तरी सदैव दृष्टीसमोर असणारं प्रतीक असावं.

जी आस्था श्री. माडखोलकर 'बाईसाहेबां'च्या स्वतंत्र भवितव्याबद्दल दाखवितात, तीपेक्षा कांकणभर जास्त काळजी ते आपल्या मुलांच्या शिक्ष-णाबद्दल घेत आहेत. श्री. माडखोलकरांचे लहानपणीं अति लाड झाले. या प्रेमामुळं ते पंगु आणि परावलंबी बनले आहेत. त्यांच्यांतील हे व इतर दोष आपल्या मुलांत उतरू नयेत, म्हणून, जबाबदार पालक या नात्यानं, ते मुलांना अतिशय जपतात. या बाबतींत सौ. शांताबाईसुद्धां आपली जबाब-दारी अतिशय कसोशीनें पार पाडतात. नागपूरच्या माझ्या दर सालच्या वारींत गांठी-भेटी झाल्या कीं पुष्कळ वेळां आम्ही 'संसारी' गोष्टी बोलतो. त्या वेळीं ते एकदां तरी हटकून म्हणतीलच,—"उमाकांत, आमचा बबड्या (चंद्रशेखर) आणि मीनाबाई (मीनाक्षी) यांना उत्तम शिक्षण देण्याची तीव्र इच्छा मला आहे. अहो, आपण जे इतके धडपडतों, झगडतों, पैसे मिळविण्यासाठीं जिवाची आटापीट करतों, त्याचा सदुपयोग मुलांना सुशिक्षण देण्यासाठीं करायचा नाहीं, तर मग या खटाटोपाचा उपयोग काय ?"

चि. चंद्रशेखर व मीनाक्षी नागपूरच्या अत्युत्तम शाळेंत जातात. यामुळें श्री. माडखोलकरांना फार खर्च पडतो, पण तो ते आनंदानं सोसतात. मुलांचे सगळे योग्य लाड ते राजीखुषीनं पुरवितात. त्यांच्या बुद्धीचं योग्य

विकसन व्हावं, म्हणून पुस्तकी विद्या शाळेंत चालू असतां त्यांना व्यवहारी ज्ञान ते भरपूर देत असतात. गांव-परगांवचीं सुंदर स्थळं दाखविणं, सर्कसला नेणं, त्यांच्या कुतूहलपूर्ण प्रश्नाचं समर्पक उत्तर देणं, खेळ खेळण्यास उत्तेजन देणं, गाणं-वजावणं शिकविणं, सर्वसाधारण विषयांची मनोरंजक माहिती देणं, चांगल्या संवयी लावणं अशा अनेक गोष्टी ते व सौ. शांताबाई आपल्या चिरंजीव-चिरंजीवीसाठीं करीत असतात. त्या दोघांनींहि घेतलेल्या काळजी-मुळं बाळ चंद्रशेखर मोठा बहुश्रुत व मीनाक्षी मोठी चुणचुणीत बनली आहे. श्री. माडखोलकरांचं दोघांवरहि अमर्याद प्रेम, मीनाताईला ते दिवसांतून कितीक वेळां कुरवाळतात, पापे घेतात, तिच्यासाठीं ससे बाळगतात, त्यांचं कौतुक करतात. चिडतातहि ते मुलांवर त्यांनीं हुल्लड केली म्हणजे. हाकलून लावतात त्यांना खाली, पण ही चिडचिड ते लगेच विसरतात आणि पुन्हां मुलांशीं समरस होतात. आत्याबाई मुलांना सांभाळ-तात. आजोबा व आजी नातवंडांचं कौतुक करतात. सौ. शांताबाई त्यांची देखभाल ठेवतात; पण श्री. माडखोलकर अहोरात्र त्यांचा बौद्धिक, मानसिक आणि शारीरिक विकास योग्य पद्धतीनं होत आहे कीं नाहीं, याकडे डोळयांत तेल घालून पहात असतात. वाङ्मयीन जीवन म्हणजे अविश्रांत श्रम; पण आपली पालकाची भूमिका ते कधींहि विसरत नाहींत.

चार वर्षांपूर्वीचा प्रसंग. श्री. माडखोलकरांच्या घरीं श्री. डांगे, निंबकर, कर्णिक आणि मी एकाच वेळी उतरलों होतों. तत्पूर्वी सौ. शांताबाई कशाळकर तिथं येऊन गेल्या होत्या. कवि यशवंत व त्यांच्या नवविवाहित पत्नी यांनींहि कांहीं दिवस त्यांचा पाहुणचार घेतला होता. तेंहि जोडपं निघून गेलं होतं. आम्हां चौघांचाहि दृष्टिकोन निरनिराळा. डांगे, निंबकर व कर्णिक यांच्यांतहि तीव्र मतभेद. पण तरीहि श्री. माडखोलकर या सर्वांचं आदरातिथ्य इतक्या प्रेमळपणें करीत होते कीं, आम्हांपैकीं एकालाहि असं वाटणं शक्य नव्हतं कीं, ते अमुक एका व्यक्तीबद्दल जास्त तत्पर आहेत. सर्वांशीं सारखाच मोकळेपणा. सर्वांचा सारखाच आदरसत्कार.

मी त्यांना एकदां विचारलंहि, "कां हो, इतक्या निरनिराळ्या धंद्यांतील लोकांना घरीं उतरवून घेऊन त्यांच्याशी तुम्हीं समरस तरी होऊं कसें

शकतां ? तुमच्या मागें कामाचा लकडा असूनसुद्धां ही पाहुण्यांची ब्याद सारखी तुमच्या मागें कां लावून घेतां ?"

" मला सर्व जातींचे व निरनिराळ्या धंद्यांतले मित्र असावेत, म्हणजे माझ्या एकांगी जीवनाला पूर्णता येईल असं मला सारखं वाटतं," असं त्या वेळीं मला श्री. माडखोलकरांनीं गंभीरपणें उत्तर दिलं होतं.

श्री. माडखोलकरांच्या घरीं सदा न् कदा पाहुणे हे असायचेच. घरीं उतरायला नसले तरी चहाला, नाहीं तर जेवायला. रोज नवीन लोक हमखास येतात. साहित्यिक, समाजसत्तावादी, व्यापारी, राजकारणी, धार्मिक, नास्तिक, समाजसुधारक, हिंदु सभावाले, काँग्रेसवाले—अठरापगड लोक तुम्हांला त्यांच्याकडे उतरायला अथवा जेवायला आलेले सांपडतील. तुम्ही साहजिक म्हणाल कीं, वर्तमानपत्राच्या धकाधकीच्या धंद्यांत पडलेल्या, लेखनांत सदैव मग्न असलेल्या या गृहस्थास पाहुण्यांच्या व्यवस्थेसाठीं वेळ तरी कसा मिळतो ? पण गंमत ही आहे कीं, आपलं एक मिनिटहि फुकट न दवडतां ते पाहुण्यांच्या सुखसोईकडे बारकाईनं पाहतात. त्यांना शक्य होईल तेव्हां खूप गप्पा मारतात आणि आपल्या आग्रही आतिथ्यानं अतिथींना जर्जर करतात.

बिनडौलाची राहणी, सुग्रास अन्न, काव्यशास्त्रविनोद आणि मोकळें वातावरण हीं श्री. माडखोलकरांच्या आतिथ्याचीं वैशिष्टचें होत. ते सकाळीं ५॥–६ ला उठतात व तुम्हांलाहि प्रेमळपणें हाक मारून उठवितात. सकाळीं लवकर न उठणाऱ्या माझ्यासारख्या माणसास ही हाक बऱ्याच वेळां जाचक झाली आहे. तरी पण श्री. माडखोलकरांच्या गोड व खुशखुशीत संवादामुळं आणि गरम गरम चहामुळं माझी झोप सव्याज भरून निघाली आहे. घरांत असतां–त्यांचा कांहींहि उद्योग चालू असो–ते तुमच्याशीं नाना विषयांवर पुष्कळ गप्पा मारतील. जेवतांना, दूरवर फिरतांना, रात्रौ स्वच्छ चांदण्यांत शुक्रवार तलावाच्या कांठीं, ते आपल्या रसाळ गप्पांनीं तुम्हांला रिझवतील. श्री. माडखोलरांच्या संवादांत बुद्धीची चमक, त्या त्या विषयाची प्रगल्भ माहिती, अनेक गौप्यांचा स्फोट, विनोद, उपरोध आणि अतिशयोक्ति असते. त्यांच्या गप्पांचा ओघ सुरू झाला, म्हणजे तुम्ही अगदीं रंगून जाल.

श्री. माडखोलकरांना गप्पा मारण्यास mood लागावा लागत नाहीं. गप्पांसाठीं ते केव्हांहि ताजेतवाने असतात.

श्री. माडखोलकर जसे स्वत: खूप बोलतात, तसं तुम्हांलाहि बोलायला लावतात. ब्लॉटिंग पेपर अथवा स्पंज जशी शाई व पाणी शोषून घेतो, तद्वत् ते तुम्हांला शोषून घेतात. तुमचीं सगळीं गुह्यं काढून घेतात. तुमच्या हृदयाचा ठाव घेतात. यांत त्यांचा वाईट हेतु नसतो. केवळ आपल्याला मनुष्यस्वभावाचं योग्य दर्शन, अभ्यसन आणि आकलन व्हावं म्हणूनच तें तुमच्या पोटांत शिरतात. त्यांच्या या अभ्यासाचे त्यांच्या लेखनांत कुठं तरी ठसे उमटत असतील, नाहीं असं नाहीं; पण नक्की कुठं तुमचा उपयोग झाला हें मात्र कळणं कठीण.

कितीहि पाहुणे घरीं असले, तरी श्री. माडखोलकर आपला आखीव कार्यक्रम सोडत नाहींत. त्यांचं वाचन, मनन, लेखन, व्यायाम, आसनं—सर्व कांहीं बिनविरोध चालू असतं. कार्यक्रमांत फेर एवढाच कीं, तुमच्या संगतींत ते खूप फेरफटका करतील व रात्रौ तास न् तास शुक्रवार तलावावर बसून हितगुज करतील. केव्हां केव्हां पहाटेपर्यंतसुद्धां माझ्याशीं ते बोलत बसले आहेत. हीं जागरणं त्यांना सहन कशी होतात, याचंच मला नवल वाटतं. रात्रौ दोन तीन वाजतां झोपलेले श्री. माडखोलकर पुनश्च सकाळीं सहा वाजतां गप्पांची फैर उडविण्यासाठीं ताजेतवाने असतातच.

मित्रमंडळींशीं गुजगोष्टी आणि पाहुण्यांशीं संवाद हे श्री. माडखोलकरांच्या आयुष्यांतील सुखाचे क्षण आहेत. बाकी त्यांचं आयुष्य म्हणजें धकाधकीचा मामला.

एकदां लाहोरच्या मुक्कामांत एल्फिन्स्टन हॉटेलमध्यें एका फ्रेंच बाईचा व माझा परिचय झाला. वेळ असला कीं गप्पा मारण्यासाठी ती माझ्या खोलींत येऊन बसे. एके दिवशीं माझा आल्बम तिच्या हातीं लागला. फोटो चाळतां चाळतां तिनें चेहेरेपट्टीवरून एकेकाचं स्वभावचित्र रेखाटायला सुरवात केली. वेळ मजेंत जावा म्हणून ही शक्कल काढली होती तिनं. चुरचुरीत वर्णनं करायचीं एकेकाचीं.

श्री. माडखोलकरांचा फोटो पाहिल्यावर ती म्हणाली, "सुंदर चेहरा आहे हा. चित्रकार, गवई आणि तत्त्वज्ञानी यांचा त्रिवेणी संगम या चेहऱ्यांत दिसतो. या गृहस्थानं केसांच्या बाबतींत हलगर्जीपणा दाखविला असता, हवे तसे त्यांना वाढू दिले असते, तर त्यांचे काव्यमय भव्य डोळे आहेत त्यापेक्षां जास्त उठावदार होऊन, शेले, बर्न्स, स्टीव्हन्सनसारखे ते दिसले असते. म्हणजे कवीचा चेहरा झाला असता त्यांचा. त्यांनीं केसांना मागें वळण दिलं असतं, थोडा कुरळेपणा आणला असता, तर एखाद्या आधुनिक ऑपेराचे Music Director ते शोभले असते. पण आजच्या त्यांच्या क्लोज क्रॉपमुळं ते एक तत्त्वज्ञानी वाटतात मला. तत्त्वज्ञानी म्हणजे गूढ तत्त्वं शोधून काढणारे असंच कांहीं नव्हे; कोणत्याहि प्रकारची त्यांची कलाकृति असली, तरी त्यांत तात्त्विक विचार हा असणारच. त्यांची कादंबरी असली, तरी तींत कांहींतरी विशिष्ट तत्त्वाचा पुरस्कार त्यांनीं केलेला असायचा. पण मला हें सांगा, खरोखरी ते कोण आहेत ? मोलमजुरीवाले कीं माल-गुजार ? Mechanic कीं Modernist ?

मी म्हटलं, "ते Modernist आहेतच, त्याबद्दल शंका नाहीं. त्यांचा खरा पेशा मात्र वर्तमानपत्रकाराचा. चांगले कादंबरीकार आहेत मराठींतले ते."

गंमत म्हणून बाई म्हणाली होती कीं, श्री. माडखोलकरांच्या चेहेरेपट्टींत Artist, Musician, Philosopher असा त्रिवेणी संगम सांपडतो. वास्तविक तेंच श्री. माडखोलकरांचें वर्णन करतां येईल. त्यांच्या चेहऱ्यांत सारा त्यांचा मोठेपणा दिसून येतो. त्यांच्या चेहऱ्याकडे पाहिलें कीं, त्यांच्यांत एक प्रकारचा निराळेपणा दिसतो. 'असामान्य व्यक्ति' म्हणून कोणीहि त्यांना सहज म्हणेल त्यांच्या चेहऱ्याकडे पाहिल्यावर. केस नीटनेटके विंचर-लेले, विस्तृत भालप्रदेश, टपोरे काव्यमय डोळे, सदा गंभीर वृत्ति, रेखीव टोंकदार नाक, वळणदार गाल आणि महत्त्वाकांक्षा सुचविणारे ओठ— सूक्ष्म अवलोकन केल्यास साधारणतः अशा प्रकारचं श्री. माडखोलकरांच्या चेहरे-पट्टीचं वर्णन करतां येईल. बाकी त्यांच्या शरीराकडे पाहिल्यावर, एक बेडौल, साधासुधा माणूस असंच म्हणावं लागेल. पोषाखाच्या बाबतींत ते अतिशय निष्काळजी आहेत. औपचारिक वर्तनांत ते अतिशय ढिले व गांगरून जाणारे

आहेत. त्यांचं आधुनिकत्व त्यांच्याकडे पाहून ठरवायचं असेल, तर मात्र बऱ्याच जणांची निराशा होईल. त्यांच्या कादंबरींत जी कलात्मकता दिसते, त्यांच्या गद्यांत केव्हां केव्हां काव्याचे जे पडसाद ऐकूं येतात आणि मानवजातीच्या करामतीचं सूक्ष्म अवलोकन करून जे जे सिद्धान्त ते आपल्या कादंबरींत प्रच्छन्न रीतीनें गुंफत असतात, त्या सर्वांचं सारसर्वस्व त्यांच्या चेहऱ्यांत भरलेलं दिसतं,—इतका तो प्रभावी चेहरा आहे. चेहरा झाका — श्री. माडखोलकर हे एक गांवढळ, बेंगरूळ माणूस वाटतील.

यंत्रासारखं त्यांचं सारं आखीव काम आहे. एकदां कधीं तरी त्यांनीं आपल्या आयुष्याचा आराखडा करून ठेवला आहे. त्याबरहुकूम सर्व कार्यक्रम त्यांनीं यशस्वी रीतीनें पार पाडला आहे. 'अमुक वेळेला मी अमुक अमुक कादंबरी लिहिणार', म्हणून ते मला सांगतात आणि बरोबर सांगितल्या वेळीं ते ती पुरी करतात. हा जो त्यांच्यामध्यें यांत्रिक आंखीवपणा आला आहे, त्याचं कारण त्यांची academic वृत्ति आणि महत्त्वाकांक्षा. त्यांच्या या वृत्तिमुळं त्यांच्या वाचनांत, अवलोकनांत व मानवी स्वभावाच्या सखोल अभ्यासांत कधींहि खंड पडत नाहीं. त्यांची महत्त्वाकांक्षा कीर्तिशिखर गाठण्यासाठीं त्यांना अविश्रान्त श्रम घ्यायला लावते.

कोठल्याहि गोष्टीकडे ते अभ्यासू वृत्तीनं पहात असतात. दारुड्यांच्या अड्ड्यांत ते जाऊन बसतील, Dance-halls मध्यें ते रात्रीच्या रात्री घालवतील. ब्रॅण्डन, माऊंट, एम्पायर या नागपूरच्या प्रमुख हॉटेलांत इंग्रजी पद्धतीचा खाना घेतील, बदफैली लोकांच्या संगतींत वेळ घालवतील. या नाहीं त्या कामासाठीं प्रवास करून निरनिराळीं स्थळं पाहून घेतील. हेतु हा कीं, या सर्वांचा आपल्या कादंबऱ्यांत उपयोग करतां यावा. त्यांच्या स्वभावाची अशी कांहीं विशेष ठेवण आहे कीं, ते व्यसनाधीन होऊंच शकत नाहींत. कोठल्याहि वस्तूची त्यांना आसक्ति वाटत नाहीं. त्यामुळं मी त्यांना विनोदानें नेहमीं म्हणतो, "तुम्ही एखाद्या विषयांत रंगणें कठीण. दारू कशी पितात याची माहिती तुम्हांला होईल, पण तुम्ही त्यांत दर्दी बनणार नाहीं. नृत्याचं वर्णन तुम्ही कराल, पण तुम्ही स्वतः नाचूं शकत नाहीं. तुमची भूमिका म्हणजे सीमेवर बघणाऱ्या बघ्याची, प्रत्यक्ष भाग घेणाऱ्या रंगेलरावाची नव्हे".

श्री. माडखोलकरांच्या मनाची ठेवण त्यांना आधुनिकत्वाकडे ओढीत असली, तरी त्यांचा पिंड एकदरींत सनातनीच. विचारांनीं जरी ते नवे वाटले, तरी आचारांनीं ते जुनेच आहेत. सामाजिक नवसंकेतांनीं ते बुजून जाणार नाहींत; पण नवसंकेतांचे प्रणेते मात्र ते होणार नाहींत. ज्या संस्कृतींत ते लहानपणीं वाढले, त्या संस्कृतीचा हा परिणाम असेल. त्यांची बौद्धिक उत्क्रान्ति जितक्या झपाट्यानें झाली आहे, तितका त्यांचा इतर रीतीनें विकास झालेला नाहीं. त्यांना पत्ते खेळतां येत नाहींत, टेनिसची माहिती नाहीं, सायकल चालवितां येत नाहीं, आधुनिक थाटाचा पोषाख करता येत नाही, गाणं–बजावण्याचा नाद नाहीं–एकूण काय कीं, त्यांना hobbies अशा कांहीं नाहींतच. आधुनिक माणसाला अवगत असणाऱ्या कला त्यांच्या गांवच्या नाहींत. दूरवर फिरायला जाणं आणि खूप बोलणं याच काय त्या त्यांच्या मोठ्या hobbies. स्वादिष्ट पदार्थांवरहि त्यांची फार भक्ति आहे.

मैत्रीला ते फार उत्तम, पण त्यांच्या बाबतींत मित्रांपेक्षां शत्रूच जास्त. योग्य समज असण्याऐवजीं गैरसमज जास्त. म्हणूनच वेळीं अवेळीं त्यांच्यावर धूळफेक झाली आहे. टीकेच्या बॉम्बगोळ्यांनीं त्यांना जर्जर करून सोडलं आहे. त्यांच्या विरुद्ध वावटळी उठल्या, अशा एक दोन प्रसंगीं मी त्यांच्या वागणुकीकडे विशेष कटाक्षानं पाहिलं आहे. ते मला शांत दिसले. या वावटळी आल्या आणि गेल्या. त्यांना प्रत्येक वेळीं आपल्या लेखणीचं पाणी दाखवावं लागलं आणि ती एखाद्या तलवारीप्रमाणं त्या त्या वेळीं चमकली आहे. हें जें त्यांनीं तेज दाखविलं आहे, याचं कारण म्हणजे त्यांचा युद्धप्रिय स्वभाव. एकादं वाङ्मयीन द्वंद्वाचं आव्हान ते सहजगत्या स्वीकारतात, निकरानं हल्ल्यांवर प्रतिहल्ले चढवितात. प्रसंगीं वार देतात–घेतात. पण युद्ध संपलं कीं ते शत्रुत्व विसरून मित्रत्व पत्करायला आनंदानं तयार असतात. त्यांचे कित्येक पूर्वकालीन शत्रु घनिष्ट मित्र बनले आहेत आणि नाक मुरडणारे निंदक स्तुतिपाठक बनले आहेत.

मानवजात, मानवधर्म, मानवी राजकारण, मानवी उत्क्रान्ति हे त्यांचे आवडीचे विषय, असं मला तरी वाटतं. ते उथळ पुष्कळ बोलत असले, तरी

त्यांच्या गंभीर विचारांचा केव्हां केव्हां सुगावा लागल्याशिवाय रहात नाहीं. ते कोठलीहि कृति करीत असतां विचारतंद्रींत आहेतसे वाटतात. आणि कित्येक वेळां आपल्या विचारतंद्रींत, एक सेकंदभर कां होईना, ते आसपासच्या जगाला विसरतात. या विचारचैतन्यामुळंच त्यांच्या लेखनांत एक प्रकारचं गांभीर्य सांपडतं, तेजस्वीपणा असतो, उदात्तपणा असतो. ते फार मोठे नसले, तरी लहान मात्र खास नाहींत. आणि जागतिक किंवा भारतीय संदेश जरी ते देऊ शकले नाहींत, तरी महाराष्ट्रांत त्यांचं वाङ्मय अमर राहील यांत शंका नाहीं.

मला त्यांच्यात दोन दोष दिसतात--अतिशयोक्ति आणि एकांगी विचार. पुष्कळदां त्यांच्या बोलण्यांत भडकपणा फार वाटतो. पण त्याचं कारण बहुधा त्यांची कल्पनाशक्ति असावी, असं वाटतं. जी गोष्ट साधारण माणसाला समजायला थोडा वेळ लागतो, तीच यांना समजली कीं यांच्या कल्पनाशक्तीला चालना मिळते. कल्पनाशक्तीनं तयार केलेल्या सर्व वातावरणावर, ते खरंच आहे असं समजून, त्यांचा विश्वास बसतो; आणि मग तें सत्य म्हणूनच ते सगळ्यांना कथन करतात. म्हणजे खरोखर पहातां हा दोष त्यांचा नसून त्यांच्या कल्पनाशक्तीचा आहे. प्रभावी कल्पनाशक्तीमुळं ज्या गोष्टी मंद बुद्धीच्या माणसाला आकलन होण्यास कठीण, त्या गोष्टींचं अथपासून इतिपर्यंत सगळं चित्र यांच्या डोळ्यांसमोर उभं रहातं. ते प्रामाणिकपणें या काल्पनिक चित्रावर विश्वास ठेवून त्याचं मग भडक वर्णन करतात.

मी त्यांच्यांत एकांगीपणा आहे असंहि म्हटलं आहे. तो येण्याचं कारण त्यांचं शिक्षण विवक्षित पद्धतीनं झालं नाहीं. पायरी पायरीनं ज्या माणसाच्या बुद्धीचा विकास झालेला असतो, पद्धतशीर ज्याचं शिक्षण झालेलं असतं, त्याच्यामध्यें एक प्रकारचा समतोलपणा आणि तुलनात्मक अभ्यास करण्याची संवय दिसून येते. श्री. माडखोलकरांचा बुद्धिविकास स्वतंत्ररीत्या स्वयंप्रेरणेनें घडून आलेला आहे. विश्वविद्यालयीन शिक्षण त्यांच्या वाट्याला आलेलं नाहीं. त्यामुळें त्यांच्यांत मला तरी समतोलपणाचा व तुलनात्मक पद्धतीनं अभ्यास करण्याच्या संवयीचा अभाव वाटतो. कांहीं विशिष्ट

विषयांवर त्यांचे जे आग्रही विचार केव्हां केव्हां दिसून येतात, त्याचंहि हेंच कारण असावं काय ?

मला स्वतःला श्री. माडखोलकर प्रिय आहेत ते त्यांच्या संवादकुशलते-मुळें. ते जर कादंबरीकार झाले नसते, तर एक उत्तम संवादपटु झाले असते. त्यांच्या संवादांत तेजस्विता, गांभीर्य, विनोद, उपहास, उथळपणा, विविधता, माहिती–काय वाटेल तें सांपडेल. म्हणूनच एका मित्रानं त्यांच्या-बद्दल काढलेले उद्‌गार मला समर्पक वाटतात– "Everything about him is common place, except his facc and talk." श्री. माडखोलकरांची आणि तुमची ओळख होऊं द्या, तुम्हीही तसंच म्हणाल.

REFBK-0016022

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थलप्रत.
अनुक्रम 80090 दि:
नोंद दि: 21316C

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
क्र. 90022